मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.५५१२(जुना अपिल क्र.४३७४) /०२

श्री.अर्जुनलाल एम.छाब्रिया अपिलार्थी
बेला विस्टा, प्लॅट नं.१५, ३ रा मजला,
एल.आय.सी. ऑफीसच्या समोर,
एस.व्ही.रोड, बांद्रा पश्चिम
मुंबई ४००० ५०

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपसचिव --उत्तरवादी
गृह विभाग, मंत्रालय,मुंबई ३२

जन माहिती अधिकारी कक्ष अधिकारी
गृह विभाग, मंत्रालय,मुंबई ३२

- विवेचन -

अपिलाचा दिनांक २०.१.२०१०

सुनावणीची तारीख दि.२.३.२०१०

अपिलार्थी यांचे प्रतिनिधी, अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपिलीय अधिकारी तथा जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराच्या अपिलाच्या संदर्भात पुढीलप्रमाणे निवेदन दिले.

श्री. अर्जुन छाब्रिया, बांद्रा मुंबई यांनी माहितीच्या अधिकारात माहिती मागण्यासंबंधी दि.१६.११.२००९ रोजी या विभागाकडे अर्ज केला होता. सदर अर्जात त्यांनी त्यांचे अशील श्रीमती नाझिर बेगम मोहम्मद अन्वर खान यांच्या वतीने श्री.अब्दुल रशीद जिवानी यांच्या विरोधात फसवणूकीची तक्रार मालवणी पोलिस ठाण्यांत केली होती. ही तक्रार ओशिवरा पोलिस ठाणे येथे हस्तांतरीत झालेली होती. सदर तक्रार अर्जावर करण्यांत आलेल्या कारवाईच्या अनुषंगाने माहिती मिळण्याची विनंती केली होती.

ॲडव्होकेट अर्जुन छाब्रिया यांनी शासनाकडे मागितलेल्या माहितीच्या अनुषंगाने ही माहिती शासनाकडे उपलब्ध नसल्याने त्यांचा अर्ज पुढील कारवाईसाठी पोलिस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्याकडे दि.१७.नोव्हेंबर २००९ रोजी पाठविण्यांत आला होता व

**तसे अर्जदार ॲडव्होकेट अर्जुन छाब्रिया यांना कळविले होते. श्री. छाब्रिया यांनी मा.राज्य माहिती आयोग यांच्यासमोर व्दितीय अपील दाखल केले आहे. सदर प्रकरणी ओशिवरा पोलिस ठाणे, मुंबई येथील अधिका-यांशी चर्चा केली असता श्री.छाब्रिया यांचे अशील श्री.नाझिरा बेगम मोहम्मद अन्वर खान यांच्या वतीने श्री. अब्दुल रशीद जिवाणी यांच्या विरोधात केलेल्या फसवणूकीच्या संदर्भात गुन्हा रजिस्टर क्र.६४/२००९ च्या संदर्भात ओशिवरा पोलिसांनी तपास केला असून या गुन्हयातील आरोपीचा तपास लागत नसल्याने दि.५.२.२००९ रोजी हे प्रकरण अ समरी वर्ग करण्यांत आल्याचे सांगण्यांत आले.**

**वास्तविक पाहता संबंधित पोलिस स्टेशनचा संबंध हा ज्या जन माहिती अधिका-याच्या अखत्यारित येत आहे त्या जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती अर्जदारास कळविणे आवश्यक होते. मात्र अर्जदाराच्या म्हणण्यानुसार संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या कडून त्यांना कोणतीही माहिती मिळालेली नव्हती. याबाबत गृह विभागाने त्या जन माहिती अधिका-याचा खुलासा प्राप्त करुन घेऊन आयोगास १५ दिवसाचे आत सादर करावा. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.**

आदेश

अपिल मान्य करण्यांत येत आहे.
वर निर्देश दिल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

**मुंबई**
**दिनांकः ३.२.२०१०**

**(डॉ. सुरेश वि.जोशी)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.५५७१/०२

श्री.संजय शंकर सगळे — अपिलार्थी
प्लॅट क्र.२, कैलास पूजन को.हौ.सोसायटी
चंद्रेश्वर नगर, दुर्गामाता मंदिरासमोर,
जुना सायखेडा रोड,जेल रोड,नाशिक ४२२१०१

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक --उत्तरवादी
सहकारी संस्था नाशिक तालुका, नाशिक

जन माहिती अधिकारी जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था,नाशिक

- विवेचन -

अपिलाचा दिनांक ९.७.२००९

सुनावणीची तारीख दि.२२.१२.२००९

अपिलार्थी,प्रथम अपिलीय अधिकारी. जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपिलार्थीनी दि.१८.१२.२००८ च्या माहिती अर्जाव्दारे खालील माहिती मागितली.

" उपनिबंधक, सहकारी संस्था,नाशिक तालुका यांच्याकडील दावा क्र.१००३/०७ संबंधित सर्व कागदपत्रांच्या सत्यप्रती. "

या अनुषंगाने त्यांना दि.२५.१२.२००८ च्या पत्रान्वये कळविण्यांत आले की, सर्व कागदपत्रे कार्यालयात आहेत. तरी नक्कल फी भरुन ती समक्ष घेऊन जावी. या उत्तराने समाधान न झाल्याने त्यांनी दि.२०.३.२००९ रोजी प्रथम अपील केले. अपीलावर दि.२८.४.२००९ रोजी निर्णय झाला व जन माहिती अधिकारी यांनी कागदपत्रे उपलब्ध करुन द्यावी असे आदेश पारित करण्यांत आले. तथापि त्यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपीलावरील सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सादर केले की, त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीना देण्यांत आली आहे. संस्थेकडील माहिती उपलब्ध नसल्याने दिली नाही. यावर आयोगाचे असे निर्देश आहेत की, सहकार कायद्यांतर्गत जी माहिती विवरणपत्रे संस्थेने

**सहकार विभागाला पाठवावयाची असतात ती संस्थेकडुन प्राप्त करुन घेऊन अपिलार्थीस पुरवावी.**

## आदेश

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई** **(डॉ. सुरेश वि.जोशी)**

**दिनांक: ३.३.२०१०** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.१५५९/०२**

**श्री.राजेंद्र विष्णुपंत भुजबळ** **अपिलार्थी**
**१४०५ टाकसाळ लेन,भद्रकाली, नाशिक**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता** **--उत्तरवादी**
**कार्यकारी अभियंता (इ व द)-३**
**जि.प.नासिक**

**जन माहिती अधिकारी अधिक्षक**
**कार्यकारी अभियंता (इ व द)-३**
**जि.प.नासिक**

**- विवेचन -**

**अपिलाचा दिनांक २.७.२००९**
**सुनावणीची तारीख दि.२२.१२.२००९**

**अपिलार्थी,प्रथम अपिलीय अधिकारी. जन माहिती अधिकारी उपस्थित.**

**अपिलार्थीनी दि.१८.३.२००९ च्या अर्जाव्दारे सन २००८-२००९ या कालावधीतील खासदारनिधी, आमदार निधी व इतर सर्व योजनांमधून घेण्यांत आलेल्या कामाबाबतची माहिती मागितली. यात कामाचे नांव कामासाठी प्राप्त अनुदान, वर्कशीटच्या झेरॉक्स प्रती इत्यादि माहितीचा समावेश आहे.**

**उपरोक्त माहिती न मिळाल्याने त्यांनी दि.२.५.२००९ रोजी प्रथम अपील केले. तथापि त्यांना माहिती न मिळाल्याने त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील केले.**

**व्दितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी आयोगासमोर जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सादर केले की, निवडणूकीच्या कामामुळे माहिती देण्यास विलंब लागू शकेल याची लेखी कल्पना अर्जदारास दिली होती. त्यानंतर अपिलार्थीनी मागितलेली माहिती तयार आहे व ती घेऊन जाण्यासाठी त्यांना दि.११.५.२००९ व दि.२७.५.२००९ रोजी पत्र दिले आहे. तेव्हा आयोगाचे असे निर्देश आहेत की, अपिलार्थीनी माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त करुन घ्यावी.**

आदेश

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई** **(डॉ. सुरेश वि.जोशी)**
**दिनांक: ३.३.२०१०** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

क्र. मुमाआ-२००९/तक्रार क्र.५९८/०२

श्री.भगवान व्यंकटराव लहाने तक्रारकर्ता
सेवानिवृत पोलिस अधिकारी,
लहाने निवास,पवई पोलिस ठाण्यासमोर
क्रिस्टल पॅलेस टॉवर जवळ, पवई मुंबई ७६

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहसचिव पोल-२ --उत्तरवादी
गृह विभाग, मंत्रालय,मुंबई.३२

जन माहिती अधिकारी कक्ष अधिकारी पोल-२
गृह विभाग, मंत्रालय,मुंबई.३२

- विवेचन -

तक्रारीचा दिनांक ७.१०.२०१०
सुनावणीची तारीख दि.१०.३.२०१०
तक्रारकर्ता,प्रथम अपिलीय अधिकारी. जन माहिती अधिकारी उपस्थित.

अर्जदाराचा मुळ अर्ज हा त्यांनी गृह विभागास दिलेला होता व अंमली पदार्थ विरोधी कक्ष गुन्हे शाखा,मुंबई येथे गु.र.क्र ६/३ व ७/३च्या सूपर्ण केस नोंदी व सरकारी साक्षीदाराच्या जबाबाच्या सत्यप्रती जोडपत्र-४ मध्ये नमुद केलेल्या प्रमाणित सांक्षकिती प्रत याची मागणी केली होती. अर्जदाराची मुख्य तक्रार क व ड या मुद्दयाबाबतची दिसते. याबाबत दि.१९. मे २००७ रोजीच्या पत्रात पुढील प्रमाणे कारणे दर्शविलेली होती.

मुद्दा क्र. क व ड बाबत नमुद करण्यांत येते की, आपणाविरुध्द प्रस्तावित विभागीय चौकशी प्रकरणी शासन ज्ञापन गृह विभाग क्र.इएनक्यू ०२०५/प्र.क्र.६३/भाग-१/पोल-२ दि.५.३.२००७ अन्वये बजावण्यांत आलेल्या दोषारोपाबाबत आपले बचावाचे लेखी निवेदन अद्यापि प्रतिक्षाधिन आहे. याबाबत आपले लक्ष महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, विभागीय चौकशी नियम पुस्तिका १९९१ च्या प्रकरण सहा, परिच्छेद क्र.६१० (१) व (२)कडे वेधण्यांत येत असून बचावाचे लेखी निवेदन पत्र सादर करण्यासाठी कर्मचा-याने दस्ताऐवजाची तपासणी करण्याबाबत महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील)नियम १९७१ मध्ये तरतूद केलेली नसल्याने तसेच नाकबुल दोषारोपाबाबत चौकशीच्या टप्प्यावर निरनिराळया दस्तऐवजांची तपासणी करण्याची व त्यांच्या प्रती घेण्याची संधी आपल्याला उपलब्ध असल्याने याक्षणी आपण मागणी केलेली कागदपत्रे दस्तऐवज आपणांस देता येत नाहीत. तसेच आपणाविरुध्द प्रस्तावित विभागीय चौकशी प्रकरणी अंतिम निर्णय अद्याप

**झालेला नसल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ८ (१) (ज)मधील तरतूदीनुसार आपली विनंती करण्यांत करता येणार नाही.**

**सुनावणीच्या वेळेला मात्र जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, गृह विभाग यांनी क व ड बाबत शासनाकडे अपुरी माहिती असल्यामुळे संपूर्ण माहिती पोलिस महासंचालक कार्यालयामार्फत प्राप्त करुन घेऊन तक्रारदारास ८ दिवसांत उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्यांत येईल, असे प्रतिवेदन आयोगास दिलेले आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.**

आदेश

तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई** **(डॉ. सुरेश वि.जोशी)**
**दिनांकः १०.३.२०१०** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.१५४०/०२

श्री.सुनिल देवीदास कडासने अपिलार्थी
पोलिस अधिक्षक
निवास कॅम्प रोड, मनमाड,
ता.नांदगांव

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलिस अधिक्षक --उत्तरवादी
पोलिस अधिक्षक (ग्रामीण)यांचे कार्यालय,नाशिक
जि.नाशिक

जन माहिती अधिकारी अधिक्षक
पोलिस अधिक्षक (ग्रामीण)यांचे कार्यालय,नाशिक

- विवेचन -

श्री.सुनिल देवीदास कडासने, अपर पोलिस अधिक्षक नाशिक, यांनी दि.२४.९.२००८ च्या माहितीच्या अर्जान्वये एकूण २५ मुद्याबाबत माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी तथा पोलिस उप अधिक्षक (मुख्यालय),नाशिक (ग्रामीण)यांनी दि.१.११.२००८ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस एकूण १२५ पृष्ठांची माहिती दिलेली आहे. त्या माहितीने समाधान झाले नाही म्हणून प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे दि.५.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले.

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा अपर पोलिस अधिक्षक नाशिक (ग्रामीण)यांनी त्यांचेकडे प्राप्त झालेल्या प्रथम अपिलाच्या अनुषंगाने दि.७.२.२००९ रोजी स्वयंस्पष्ट अशी मुद्देनिहाय माहिती दिलेली आहे. त्या माहितीने देखील समाधान झाले नाही म्हणून दि.४.५.२००९ रोजी एकूण २० पृष्ठांचे व्दितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी दि.२१.१२.२००९ रोजी नाशिक येथे घेण्यांत आली. सदर सुनावणीस जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी हे उपस्थित होते. तथापि अपिलकर्ते अनुपस्थित होते.

श्री. सुनिल कडासने यांनी व्दितीय अपीलासोबत केलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, त्यांनी मागितलेली माहिती ही खुप मोठया प्रमाणावर आहे.

**अपिलार्थी सुनावणीस अनुपस्थित होते. त्यामुळे त्यांचे म्हणणे ऐकून घेता आले नाही. उपलब्ध कागदपत्रावरुन व विशेषत:प्रथम अपिलीय अधिका-यांचा मुद्देसुद पाहता अपिलार्थीस उपलब्ध सर्व माहिती दिली असल्याचे दिसते त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.**

<u>आदेश</u>

अपिल फेटाळण्यांत येत आहे.

**मुंबई** **(डॉ. सुरेश वि.जोशी)**
**दिनांक: १०.३.२०१०** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.५४९१/०२

श्री.मिर्झा अब्दुल हसन --अपिलार्थी
बी-४०८ सागर अपार्टमेंट फादर पीटर
परेस रोड, सोनपूर लेन, एल.बी.एस.मार्ग
कुर्ला पश्चिम मुंबई ७०

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलिस उपआयुक्त मुख्यालय-१ --उत्तरवादी
पोलिस आयुक्त कार्यालय, क्रॉफर्ड मार्केट, मुंबई ०१

जन माहिती अधिकारी सहाय्यक पोलिस आयुक्त मुख्यालय-१
पोलिस आयुक्त कार्यालय, क्रॉफर्ड मार्केट, मुंबई ०१

- विवेचन -

अपिलाचा दिनांक १७.१२.२००९
सुनावणीची तारीख दि..११.३.२०१०
अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती अधिकारी उपस्थित.

श्री.अब्दुल हकीम खान यांना देण्यांत आलेल्या रिव्हॉलव्हरच्या लायसन्सच्या संदर्भात माहिती पाहिजे होती ती माहिती पुढील कारणामुळे नाकारण्यांत आली :-

" आपण मागणी करीत असलेली माहिती ही वैयक्तिक माहितीशी संबंधित माहिती असल्याने तसेच सदर माहिती उघड केल्याने व्यापक जनहित साध्य होईल अशी आमची खात्री पटत नसल्याने सदरची माहिती माहितीचा अधिकार अधिनियम -२००५ च्या कलम ८(१ (ञ) अन्वये नाकारण्यांत येत आहे. तसेच आपण मागणी केलेली माहिती उघड केल्याने संबंधीत व्यक्तीचे जीवन व शारीरीक सुरक्षितता धोक्यात येण्याची शक्यता नाकारता येत नाही. यास्तव मागणी केलेली माहिती माहितीचा अधिकार अधिनियम ॾ २००५ च्या कलम ८ (१) (छ) अन्वये नाकारण्यांत येत आहे. त्यसाचप्रमाणे आपण मागणी करीत असलेली माहिती त्रयस्थ व्यक्तीशी संबंधित असल्याने सदर माहिती माहितीचा अधिकारी अधिनियम -२००५ मधील कलम ११ (१)अन्वये नाकारण्यांत येत आहे. "

प्रथम अपिलीय अधिकारी आदेशात सुध्दा प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती नाकारण्याचे समर्थन केले आहे त्यामुळे अपिलार्थीनी व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केलेले आहे.

**अर्जदार मागत असलेली माहिती ही त्रयस्थ व्यक्तीच्या जिवीताशी संबंधित आहे व अधिनियमाच्या कलम ८ (१) (छ) नुसार " माहिती उघड केल्याने संबधित व्यक्तीच्या जिवितास किंवा शारिरीक सुरक्षिततेस धोका निर्माण होईल " या कारणावरुन पोलिस उप आयुक्त तथा प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुध्दा अर्जदाराचे अपील नाकारलेले दिसते. माहिती नाकारण्याची कारणमीमांसा आयोगास योग्य वाटते. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.**

आदेश

अपिल अमान्य येत आहे.

**मुंबई** **(डॉ. सुरेश वि.जोशी)**
**दिनांकः ११.३.२०१०** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.५४९३/०२

सौ.पूर्णिमा प्रकाश वाळींजकर --अपिलार्थी
प्रशासकिय अधिकारी,
मध्यवर्ती खरेदी प्राधिकरण खाते.
प्रशासकिय अधिकारी (मखप्रा)
५६६,ना.म.जोशी मार्ग, मुंबई ०१

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा प्रशासकिय अधिकारी --उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगर पालिका (साप्रवि)मनपा मार्ग,
६ वा मजला विस्तार इमारत, मुंबई ०१

जन माहिती अधिकारी प्रमुख कर्मचारी अधिकारी
बृहन्मुंबई महानगर पालिका (साप्रवि)मनपा मार्ग,
६ वा मजला विस्तार इमारत, मुंबई ०१

- विवेचन -

अपिलाचा दिनांक १०.१२.२००९
सुनावणीची तारीख दि..११.३.२०१०
अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अर्जदाराने सहप्रमुख कर्मचारी अधिकारी या पदावर पदोन्नतीने नेमणूक करण्याची अर्हता व त्यांची त्या ठिकाणी निवड कां झाली नाही ? याबाबतची माहिती पाहिजे होती. अर्जदारास ही माहिती देण्यांत आलेली आहे. तसेच जी अर्हता या पदावर पदोन्नतीने नेमणूक मिळण्यास दर्शविण्यांत आलेली आहे ती अर्हता श्रीमती वाळींजकर पूर्ण करीत नसल्याने त्यांना पदोन्नती देता आलेली नाही, असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले.

अर्जदाराना जर पदोन्नती समितीच्या प्रोसिडिंग पाहावयाचे असतील तर ते त्यांना पाहाण्यास मिळू शकतील व ते त्यांना दाखविण्यांत यावेत असे निर्देश जन माहिती अधिकारी यांना देण्यांत आले. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

आदेश

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई (डॉ. सुरेश वि.जोशी)
दिनांक: ११.३.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.५४९५/०२

श्री. चेतन कोठारी --अपिलार्थी
५२ ओशियानिक अपार्टमेंट,
डॉ.राजाबली पटेल लेन, श्री.देसाई रोड, मुंबई २६

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलिस उपआयुक्त --उत्तरवादी
परिमंडळ-३ मध्य प्रादेशिक विभाग, तळमजला भायखळा,
डॉ.बी.आर.रोड,मुंबई

जन माहिती अधिकारी सहाय्यक पोलस आयुक्त
मध्य प्रादेशिक विभाग, तळमजला भायखळा,
डॉ.बी.आर.रोड,मुंबई

- विवेचन -

अपिलाचा दिनांक २.११.२००९
सुनावणीची तारीख दि..११.३.२०१०
अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अर्जदारास त्यांनी सुमन मोटेलचे संचालक सुरेद्र खंदार व इतराच्या विरुध्द दाखल केलेल्या खटल्याच्या संबंधाने त्यांना ज्या धमक्या मिळालेच्या संदर्भात प्रतिज्ञापत्र सादर केल्यावर त्यासंबंधी काय कार्यवाही करण्यांत आले यासंबंधीची माहिती पाहिजे होती.

अर्जदार यांनी निश्चितपणे केव्हा कशा धमक्या दिलेल्या आहेत व याबाबत अर्जदाराने कुठेही उल्ल्ेख केलेला नाही याबाबत थोडी जास्त माहिती दिल्यास त्यावर निश्चितपणे कार्यवाही करण्यांत येईल. प्रथम अपिलाच्या आदेशात याबाबत अर्जदाराना आवश्यकता वाटत असल्यास पोलिस अधिक्षक, परिमंडळ-४ यांची समक्ष भेट घेण्याची विनंती सुध्दा करण्यांत आली होती. त्यामुळे त्यांच्या अर्जातील प्रश्नाच्या वस्तुस्थितीसंबंधी माहिती देण्यांत आलेली आहे व त्या नंतर सल्लाही देण्यांत आलेला आहे. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

आदेश

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई (डॉ. सुरेश वि.जोशी)
दिनांक: ११.३.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.५४५१/०२

श्री. राजेंद्र आर.चौहान --अपिलार्थी
४ चानिका प्रसाद चाळ,
जुने हनुमान टेंपल शेजारी,
टेक्निकल एरिया, मरोळ पाईप लाईन
अंधेरी पूर्व,मुंबई ५९

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता (विशेष) --उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,
३ रा मजला,के/पूर्व वॉर्ड कार्यालय इमारत,
आझाद रोड, गुंदवली, अंधेरी पूर्व मुंबई ६९

जन माहिती अधिकारी सहाय्यक अभियंता (इ/कारखाने)
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,
३ रा मजला,के/पूर्व वॉर्ड कार्यालय इमारत,
आझाद रोड, गुंदवली, अंधेरी पूर्व मुंबई ६९

- विवेचन -

वरील क्रमांकाच्या अपिलात दिलेल्या आदेशाप्रमाणे जन माहिती अधिकारी हे प्रत्यक्ष उपस्थित राहिले. विलंबाबाबत खुलासा करताना त्यांनी असे सांगितले की, अर्जदाराचा दि.६.८.२००९ रोजी प्राप्त झालेल्या अर्जावर दि.८.९.२००९ रोजी त्यांना विहित फी भरुन माहिती घेऊन जाण्यासंबंधी कळविण्यांत आले होते. मात्र दरम्यानच्या काळात सर्व कर्मचारी वर्ग हा निवडणूकीच्या कामात व्यस्त असल्यामुळे अर्जदारास माहिती देण्यांत उशिर होईल याचीही कल्पना देण्यांत आलेली होती. अर्जदारास माहिती देण्याच्या संदर्भात ३० दिवसाचे नंतरच्या कालावधीत कळविण्यांत आलेले आहे. त्यामुळे अर्जदारास जी माहिती द्यावयाची होती ती त्यांनी विनामुल्य पोस्ट पाठवावी. निवडणूकीच्या कामाया व्यस्ततेमुळे जन माहिती अधिकारी यांना शास्ती न लावण्याचे आयोगाने ठरविले आहे. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहे.

आदेश

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

वर दर्शविल्याप्रमाणे दोन दिवसांत विनामुल्य माहिती देण्यांत यावी.

मुंबई
दिनांकः १८.३.२०१०

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.५५३६/०२

श्री. नरेंद्र भिकाजी सावंत --अपिलार्थी
११/३४५, सहकार नगर-३,
चेंबूर, मुंबई ७१

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप/सह सचिव --उत्तरवादी
सामाजिक न्याय व सांस्कृतिक कार्य विभाग,
मंत्रालय, मुंबई ३२

जन माहिती अधिकारी कक्ष अधिकारी
सामाजिक न्याय व सांस्कृतिक कार्य विभाग,
मंत्रालय, मुंबई ३२

- विवेचन -

अपिलाचा दिनांक २४.१२.२००९
सुनावणीची तारीख दि..१८.३.२०१०
अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अर्जदाराचा मुळ अर्ज हा जन माहिती अधिकारी, सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय यांचेकडे करण्यांत आला असून त्यांना साईकृपा व संघमित्रा संस्था यांना समाजकल्याण केंद्रासाठी मंजूर झालेल्या निधीपैकी किती रक्कम खर्च करण्यांत आली व या दोन्ही संस्थांनी सरकारी निधी मिळविण्यासाठी सादर केलेल्या कागदपत्राच्या प्रती मिळण्याबाबत अर्ज केला होता.

सामाजिक न्याय विभाग ते नगर विकास विभाग यांचेकडून अर्जदाराचा अर्ज जिल्हाधिकारी, उपनगर यांचेकडे माहिती देण्यासाठी पाठविण्यांत आला. अर्जदारास नागरी दलित वस्ती सुधार योजना या कार्यक्रमांतर्गत मा.आमदार चंद्रकात हांडोरे यांनी प्रस्तावित केलेल्या कामाना प्रशासकिय मंजूर प्रदान केल्याचे कोणते कागदपत्र देण्यांत आले. याबाबत कोणतीही माहिती कार्यालयाकडे नाही तरी ही माहिती मुंबई गृहनिर्माण विकास मंडळ यांचेकडून घेण्यांत यावी असे अर्जदारास कळविण्यांत आले. अपिलार्थीचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :-

१. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा नियोजन अधिकारी प्रभारी, मुंबई उपनगर यांनी त्यांच्या कार्यालयात मा.आमदार महोदयानी ज्या कामांचे शिफारस पत्र दिले असेल त्या शिफारस पत्राची प्रत अर्जदारास देण्यांत यावी.

**२. अर्जदाराचा अर्ज हा मुंबई उपगर जिल्हा नियोजन प्रभारी यांनी स्वतःहूनच मुंबई गृहनिर्माण व गृह विकास मंडळ यांचे जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती देण्यासाठी पाठवावा व त्या अधिका-यांनी अर्ज मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत अर्जदारास माहिती द्यावी.**

<u>आदेश</u>

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

सदरील आदेशाची प्रत ही जन माहिती अधिकारी, जिल्हा नियोजन अधिकारी प्रभारी, मुंबई उपगर, जिल्हा प्रशासकिय भवन ९ वा मजला, बांद्रा ५१ तसेच जन माहिती अधिकारी, मुंबई गृहनिर्माण क्षेत्र विकास महामंडळ, म्हाडा, बांद्रा, मुंबई ५१ यांना पाठविण्यांत यावी.

या दोन्ही अधिकारी यांनी वरील आदेशाची विहित मुदतीत अंमलबजावणी करावी.

**मुंबई** **(डॉ. सुरेश वि.जोशी)**
**दिनांकः १८.३.२०१०** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.५३८८/०२

श्री.अजितकुमार पंजाबी, --अपिलार्थी
व्दारा- रमजान भटार चाळ ख चाळ नं.२६३/५
डॉ.आंबेडकर चौक, तक्या वार्ड, कुर्ला पश्चिम
मुंबई-७०

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता --उत्तरवादी
सहाय्यक मनपा आयुक्त कार्यालय,
सुधीर फडके उड्डान पूलाखाली
जयवंत सावंतमार्ग दहिसर पश्चिम मुंबई ६८

जन माहिती अधिकारी सहाय्यक अभियंता
सहाय्यक मनपा आयुक्त कार्यालय,
सुधीर फडके उड्डान पूलाखाली
जयवंत सावंतमार्ग दहिसर पश्चिम मुंबई ६८

- विवेचन ः

श्री. अजितकुमार पंजाबी यांनी दि.१७.६.२००९ रोजी दाखल केलेल्या माहिती अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि.१३.७.२००९ रोजी उत्तर दिले आहे.

अपिलार्थीने दि.१६.९.२००९ रोजी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे प्रथ्ज्ञम अपिल दाखल केलेले आहे. दि.१३.७.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांनी पाठविलेले पत्र त्यांना दि.२८.७.२००९ रोजी मिळाल्याचे नमूद करुन त्यांनी मागितलेली माहिती विनामुल्य देण्यांत यावी असे देखील प्रथम अपिलात नमूद केले आहे.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दि.२५.९.२००९ च्या आदेशान्वये प्रथम अपील मुदतबाहय असल्यामुळे निकाली काढलेले आहे.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचे आदेशाने व्यथित होऊन दि.२६.११.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केलेले आहे. सदर अपिलाची सुनावणी दि.१६.२.२०१० रोजी आयोजित करण्यांत आली होती. त्या सुनावणीस फक्त अपिलार्थी उपस्थित होते.

अपिलार्थीने दाखल केलेले अपील व सोबतची कागदपत्रे पाहता जन माहिती अधिकारी यांनी त्यांना जरी विहित वेळेत शुल्क भरण्याबाबत कळविले असले तरी एकूण किती शुल्क भरावे, एकूण माहिती किती असेल याबाबत त्यांचे पत्रात नमूद केलेले नाही.

**अपिलार्थीने प्रथम अपील मुदतीनंतर सादर केलेले आहे हे मान्य करावे लागेल. तथापि जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्यास अपिलार्थीने स्वतः जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात जाऊन निश्चित काय माहिती हवी आहे त्याबाबत जन माहिती अधिकारी यांना अवगत करावे. जन माहिती अधिकारी यांना शक्यतो जास्तीत जास्त माहिती देण्याची कार्यवाही करावी.**

## आदेश

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई**
**दिनांकः १९.३.२०१०**

**(डॉ. सुरेश वि.जोशी)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.५३७०/०२

श्री. राजेश बाबू नागले --अपिलार्थी
सिध्दार्थ कॉलनी झोपडपट्टी
अलियावर जंग मार्ग, वांद्रे पूर्व
मुंबई ञ ४०००५१

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक --उत्तरवादी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण सहकार कक्ष, ५ वामजला,
गृहनिर्माण भवन, वांद्रे पूर्व मुंबई ५१

जन माहिती अधिकारी सहकार अधिकारी श्रेणी-१
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण सहकार कक्ष, ५ वामजला,
गृहनिर्माण भवन, वांद्रे पूर्व मुंबई ५१

- विवेचन -

श्री.राजेश बाबू नागले यांनी जन माहिती अधिकारी तथा सहकार अधिकारी श्रेणी-१ यांचेकडे सिध्दार्थ कॉलनी हित संरक्षण को. ऑ. हौ.सोसायटी सी.टी.एस.नं.६१९,६२० अलियावर जंग मार्ग, कार्डीनल शाळेजवळ वांद्रे पूर्व च्या झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण योजनेतंर्गत झालेल्या पुनविकासाबाबतची माहिती मागविली आहे. यात नियोजित सिध्दार्थ एस.आर.ए.सहकारी गृहनिर्माण संस्था बांद्रा, मुंबई या संस्थेच्या गाळेवाटपाबाबत माहिती प्रत्येक गाळेधारकाचे अलॉटमेंट लेटर व व्हिडिओ शुटींगची सीडी या माहितीची मागणी केली होती. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.१५.५.२००९ रोजीच्या पत्रान्वये खालीलप्रमाणे आदेश पारीत केले.

माहिती अर्जात मागितलेली माहिती संस्था पातळीवरील असल्याने संस्थेकडून प्राप्त करु शकता.

वरीलप्रमणे आदेश देऊन माहिती अर्ज निकाली काढण्यांत आला.

जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या आदेशाने समाधान झाले नाही म्हणून प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था यांचेकडे दि.१९.६.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दि.२०.७.२००९ रोजी प्रथम अपिलाच्या अनुषंगाने खालील प्रमाणे आदेश पारित केलेले आहेत.

अपिलाकार श्री. राजेश बाबू नागले यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत संस्थेविषयी माहिती प्राप्त होणेसाठी शासकिय माहिती अधिकारी यांनी संस्थेस महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९ (अ) अन्वये निर्देश देऊन माहिती अर्जदार यास उपलब्ध करुन द्यावी.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेल्या आदेशाने व्यथित होऊन व्दितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपीलावर दि.१५.२.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली होती. सदर सुनावणीत अपिलार्थीसह जन माहिती अधिकारी उपस्थित होते. प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित होते.

अपिलकर्त्याने दाखल केलेले व्दितीय अपील व त्यासोबतची कागदपत्रे सुनावणीचेवेळी झालेली चर्चा लक्षात घेता जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचे आदेशाचे पालन करुन घेतले असे दिसून येत नाही. सहकारी गृहनिर्माण जर संस्थेकडून ही माहिती अर्जदारास मिळाली नसेल व जन माहिती अधिकारी यांना सुध्दा अर्जदारास संस्थेकडून ती मिळवून देता आली नसेल तर एस.आर.ए. च्या रेकॉर्डमधून वरील माहिती अर्जदारास सात दिवसांत देण्यां यावी.

## आदेश

अपील मान्य करण्यांत येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी उपनिर्दिष्ट कारवाई करावी.

मुंबई
दिनांकः १९.३.२०१०

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.५२१६/०२

श्री. जे.एम.सिराज --अपिलार्थी
रुम नं.१ अशोक नगर,
मरोळ पाईप लाईन,
अंधेरी पूर्व मुंबई ४०००५९

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक अभियंता (ई व का) --उत्तरवादी
के/पूर्व वॉर्ड, आझाद रोड, गुंदवली अंधेरी पूर्व
मुंबई ४०००६९

जन माहिती अधिकारी सहकार अधिकारी श्रेणी-१
के/पूर्व वॉर्ड, आझाद रोड, गुंदवली, अंधेरी पूर्व
मुंबई ४०००६९

- विवेचन ः

अपिलाचा दिनांक ४.११.२००९
सुनावणीची तारीख दि..१६.१.२०१०

अपिलार्थी, अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित. अपिलार्थीनी दि.२३.३.२००९ च्या अर्जाव्दारे त्यांच्या दि.१३.३.२००९ च्या पत्राची सद्यःस्थिती काय आहे याबाबत विचारणा केली. यावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.१६.५.२००९ च्या पत्रान्वये उत्तर दिले व त्यांच्या पत्रांच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा तपशिल कळविला. परंतू या उत्तराने समाधान न झाल्याने त्यांनी दि.३.१०.२००९ रोजी प्रथम अपील केले. त्यांच्या म्हणण्यानुसार त्यांना चुकीची माहिती देण्यांत आली होती. प्रथम अपिलावर सुनावणी होऊन त्यावरील निर्णय त्यांना दि.२१.१०.२००९ च्या पत्रान्वये कळविण्यांत आला. त्यानुसार असे आदेश देण्यांत आलेत की, अपिलार्थीच्या माहिती अर्जानुसार १० दिवसांच्या आत माहिती पुरविण्यांत यावी. तथापि त्यांना ती मिळाली नाही. म्हणून त्यानी हे कारण करुन आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

**व्दितीय अपिलावरील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व उत्तरवादी गैरहजर होते. त्यामुळे अपिलार्थीना माहिती पुरविण्यांत आली किंवा कसे हे आयोगास जाणून घेता आले नाही. तरी सदर प्रकरणी आयोगाचे असे निर्देश आहेत की, अपिलार्थीच्या माहिती अर्जात नमूद त्यांच्या दि.१३.३.२००९ च्या पत्राच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा वस्तुनिष्ठ तपशिल अपिलार्थीना सदर आदेशाच्या दिनांकापासून १० दिवसांच्या आत कळविण्यांत यावा.**

आदेश

**अपिल निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(डॉ. सुरेश वि.जोशी)**
**दिनांकः २३.३.२०१०** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.१४१३/०२

श्री.देवमन नारायण आहेरराव अपिलार्थी
मु.पो.खांडबारा. ता.नागपूर
जिल्हा - नंदूरबार

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी --उत्तरवादी
प्रचायंत समिती, नवापूर ता.नवापूर
जिल्हा नंदूरबार

जन माहिती अधिकारी गट विकास अधिकारी
पंचायत समिती कार्यालय,
नवापूर ता.नवापूर, जि.नंदूरबार

- विवेचन -

अपिलाचा दिनांक ७.५.२००९

सुनावणीची तारीख दि.८.१२.२००९

अपिलार्थी, अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपिलकार श्री.देवमन नारायण आहेरराव यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३)अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.७.५.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत जिल्हाधिकारी कार्यालय सभागृह, धुळे, जि.धुळे येथे दि.८.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी व अपिलार्थी उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.४.२.२००९ रोजी अर्ज करुन, खालील नमूद माहिती मागितली होती.

१. कार्यकक्षेत येणा-या विभागातून किती कर्मचारी सरकारी नियमानुसार हेड क्वॉर्टर किंवा नियुक्तीच्या जागेवर राहतात. कर्मचा-यांची बदली अती दुर्गम व दुर्गम भागात होणे आवश्यक असून सुध्दा बदली झालेली नाही.
२. शाळामध्ये पोषण आहार वाटप केला जातो किंवा नाही याची चौकशी कोणमार्फत केली होती व ही योजना कोण राबवतो.
३. गरीब मुलांना तसेच अनुसूचित जाती जमाती यांना प्रत्येक वर्षी शिष्यवृत्ती व गणवेश वाटप होणे किंवा नाही. शिष्यवृत्तीबाबत लेखा परिक्षण होते का?
४. अधिनियम २००५ च्या कलम-४ पोटनियमानुसार आपणाकडे माहिती उपलब्ध आहे का
५. घरकुल योजनेत आजपर्यंत आपल्या कक्षेत येणा-या ग्रामपंचायत मध्ये भ्रष्टाचार झाला आहे काय? घरकुलासाठी खोटे अनुदान वाटप झाले आहे का ? झाल्यास जबाबदार कोण? द्रारिद्रय रेषेखाली व नागरीकास घरकुल योजनेचा काम होते काय ?
६. ग्रामपंचायत व मराठी शाळा व इतर कार्यालयात कर्मचारी वेळेत येतात का ? किंवा जेवणाची सुटटी किती घेतात
७. ग्रामपंचायत खांडबारा येथे केंद्र नावाने जागा आहे निधी घरपट्टी आपणांकडून ग्रामपंचायतीला दिली जात नाही इत्यादि माहिती मागितली होती.

माहिती विस्तृत व जास्त प्रमाणात असल्याने संकलीत करण्यास उशिर झाला असे असला तरी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वेळेत माहिती दिलेली नाही.

माहिती न मिळाल्याने प्रथम अपील दाखल करण्यांत आले. परंतू प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कोणतेही आदेश पारित केले नाहीत किंवा अपिलार्थी चर्चेस बोलविले नाही.

अपिलार्थीने माहिती न मिळाल्याने व्दितीय अपील दाखल केले. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. परंतू प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित होते.

सुनावणीच्या वेळेला निर्देशिलेल्या बाबी :-

१. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि.४.२.२००९ च्या अर्जास दि.८.१२.२००९ रोजी माहिती दिली म्हणजे त्यासाठी १० महिन्याचा कालावधी लागला.
२. माहिती अपूरी दिली व अपूर्ण असल्यास नंतर देण्याचे कबूल केले.

**३. प्रथम अपिलीय  प्राधिकारी यांनी या दहा महिन्यात कोणतेही आदेश पारित केले नाहीत शिवाय ते आयोगाकडील सुनवणीस अनुपस्थित राहिले नाहीत या सर्व बाबींचा विचार करता असे दिसून येते की, माहिती जरी दिली असली तरी ती १० महिन्याच्या विलंबाने दिली आहे. ही बाब दुर्लक्षित करुन चालणार नाही. दिलेली माहिती ही अपूरी दिली आहे तेव्हाया विलंबाबात मागितलेली माहिती बरीच विस्तृत होती याचा विचार करुन अधिनियमाच्या कलम २० (१)अन्वये जन माहिती अधिकारी यांच्यावर रुपये १००००/-ची शास्ती लादण्यांत येत आहे ही शास्ती मे व जून २०१० मधील वेतनातून प्रत्येक महिन्याला रु. ५०००/- असे दोन्ही महिने मिळून रुपये १००००/- वसूल करावी व शासनाने विहित केलेल्या लेखाशिर्षाखाली जमा करावी व तसे केल्याचा अनुपालन अहवाल आयोगास दि.१५ जून २०१० पर्यत पाठवावा तसेच अपिलार्थीस अद्याप काही माहिती देणे शिल्लक असेल तर ती त्यांना २० दिवसांत उपलब्ध करुन द्यावी.**

**प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अर्जाची व प्रथम अपिलाची कोणतीही दाखल घेतलेली नाही किंवा त्याकडे जाणुनबुजून दुर्लक्ष केलेले दिसून येते.**

**या आदेशाची प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, नंदूरबार यांना देण्यांत यावी.त्याची संबंधितांवर लादलेली रक्कम वसूल करण्यांची कार्यवाही करावी.**

<u>आदेश</u>

अपिल निकाली काढण्यांत येत आहे. वर निर्देशिल्याप्रमाणे कार्यवाही करावी अनुपालन अहवाल आयोगास त्वरीत सादर करावा.

मुंबई
दिनांकः २३.३.२०१०

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य  मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.१३०३/०२

श्री.संतोष नामदेव परतणे — अपिलार्थी
विद्यानगर, भुसावळ रोड,
फैजपूर, ता.यावल जि.जळगांव

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक --उत्तरवादी
सहकारी संस्था, जळगांव

जन माहिती अधिकारी विभागीय सह निबंधक
नाशिक विभाग, नाशिक

- विवेचन -

अपिलाचा दिनांक १८.३.२००९
सुनावणीची तारीख दि.२७.११.२००९
अपिलार्थी, अपिलीय अधिकारी उपस्थित व जन माहिती अधिकारी अनुपस्थित

अपिलार्थीनी दि.१.१२.२००८ च्या अर्जान्वये श्री.संतोष नामदेव परतणे यांच्या दि.१३.८.२००८ रोजीच्या तक्रार अर्जात नमूद केलेल्या मुद्दाबाबत केलेल्या चौकशीच्या अहवालाची प्रत मागितली.

उपरोक्त माहिती न मिळाल्याने त्यांनी दि.२.१.२००९ रोजी प्रथम अपील कले. परंतू त्यांना माहिती प्राप्त झाली नाही. त्यामुळे अपिलार्थीनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपिलावरील सुनावणीच्यावेळी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या वतीने असे सादर करण्यांत आले की, सदर प्रकरणी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, बोदवड यांच्याकडून अहवाल मागविला असून तो अप्राप्त आहे. तरी अपिलार्थीना माहिती देता येत नाही. यावर आयोगाचे असे निर्देश आहेत की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी संबधितांकडून अहवाल प्राप्त करण्यासाठी पाठपुरावा करावा व अहवाल प्राप्त होताच त्यांच्या प्रती विनाशुल्क अपिलार्थीना

**पुरवाव्यात. ही कार्यवाही कोणत्याही परिस्थितीत आदेश मिळाल्यापासून १ महिन्याच्या आत अहवालाची प्रत अर्जदारास देण्यांत यावी.**

आदेश

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई**
**दिनांक: २३.३.२०१०**

**(डॉ. सुरेश वि.जोशी)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.३६८९/०२

श्री.कौस्तुभ दत्तात्रय गोखले --अपिलार्थी
सिध्दीविनायक प्रसाद,
डॉ.शामा प्रसाद मुखर्जी रोड,
डोंबिवली पूर्व ४२१ २०१
तालुका कल्याण जिल्हा ठाणे

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहसचिव नवि-२८ --उत्तरवादी
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई ३२

जन माहिती अधिकारी तथा कक्षअधिकारी नवि-२८
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई ३२

- विवेचन -

अपिलार्थी श्री.कौस्तुभ दत्तात्रय गोखले यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये दि.१८ जून ३००८ रोजी माहिती अर्ज करुन नगर विकास विभागाच्या शासन निर्णय क्रमांक -कंडोंमपा-१००७/प्र.क्र.३४३/०७/नवि-२८ दिनांक २७ सप्टेंबर २००७ च्या अनुषंगाने एकूण चार मुद्यांबाबत माहिती मागितली होती. त्यावर विर्निदिष्ट मुदतीमध्ये उक्त जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती न मिळाल्याने अपिलार्थी यांनी कलम १९ (१)अन्वये नगर विकास विभागाच्या उक्त प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.२१.७.२००८ रोजी प्रथम अपिल केले होते. त्यावर देखील प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित न केल्यामुळे जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेवर दंडात्मक कारवाई व्हावी व मुळ अर्जातील तपशिलाप्रमाणे माहिती मिळण्याच्या दृष्टीने अपिलार्थी यांनी या आयोगाकडे

**दि.२.९.२००८ रोजी कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपील सादर केले. सदर व्दितीय अपीलावर दि.९.२.२००९ रोजी सुनावणी आयोजित केली होती. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी हे अनुपस्थित होते. श्रीमती उ.सं.दांडेकर, जन माहिती अधिकारी नगर विकास विभाग नवि-२८ हया सुनावणीच्या दुस-या दिवशी म्हणजे दि.१०.२.२००९ रोजी उपस्थित होत्या.**

**जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.१०.२.२००९ रोजीच्या पत्रान्वये असे नमूद केले की, "श्री. कौस्तुभ दतात्रय गोखले,डोंबिवली जि.ठाणे यांच्या दि.१८.६.२००८ च्या माहिती अर्जाबाबत माहिती देण्याचे अनावधानाने नजरचुकीने राहून गेले आहे. या मागे अर्जदारास माहिती न देण्याचा कोणताही हेतू नव्हता. मी माहिती न दिल्याबाबत अर्जदार व मा.राज्य माहिती आयोगाची दिलगीर आहे. अर्जदारास तातडीने माहिती पुरविण्यांत येत आहे. त्यावर दोन दिवसांमध्ये अपिलार्थी यांना विनामूल्य माहिती पाठवून द्या" असे जन माहिती अधिकारी यांना मी निर्देश दिले.**

**जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जावर कार्यवाही करण्यास अनावधानाने नजरचुकीने विलंब झाल्याचे मान्य केले असल्याने त्यांना यापुढे अशा प्रकारे माहिती अर्जावर वेळेत कार्यवाही करण्याची दक्षता न घेतल्याचे आढळल्यास त्यांच्यावर कलम २० अन्वये शास्ती लादण्यांत येईल अशी सक्त ताकिद देण्यांत येत आहे.**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी प्रस्तृत प्रकरणी प्रथम अपिलावर काहीच कार्यवाही न केल्यामुळे तीव्र नाराजी व्यक्त करण्यांत येत आहे. त्यांनी त्यांचे कर्तव्य पार पाडताना झालेल्या विलंबाबाबत किमान खुलासा तरी सादर करणे आवश्यक होते. तेही त्यांनी न केल्यामुळे त्यांना पुढीलप्रमाणे निर्देश देण्यांत येत आहेत.**

## आदेश

अपिल मान्य करण्यांत येत आहे. जन माहिती अधिक ारी यांनी वरीलप्रमाणे कार्यवाही करावी व दक्षता घ्यावी. प्रथम अपिलय प्राधिकारी यांनी

प्रथम अपिलावर कार्यवाही कां केली नाही. याबाबतचा खुलासा आयोगास १५ दिवसांत सादर करावा.

<table>
<tr><td>मुंबई<br>दिनांकः २३.३.२०१०</td><td>(डॉ. सुरेश वि.जोशी)<br>राज्य मुख्य माहिती आयुक्त</td></tr>
</table>

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४६२००/अपील क्रमांक ५५०९/(जुना ४३७२)०२

श्री. सैदूर रेहमान -----अपीलार्थी
१८२, ढाब्बू स्ट्रीट, सैफी मस्जीद जवळ,
नळबाजार, मुंबई ४०० ००३.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा शिक्षण निरीक्षक (नॉर्थ झोन) ----उत्तरवादी
प्रशासकीय इमारत, दुसरा मजला,
चेंबूरकर मार्ग, चेंबूर (पूर्व) मुंबई ७१.

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षण उपनिरीक्षक , एम वॉर्ड
१५९ बी विंग, प्रशासकीय इमारत, दुसरा मजला,
चेंबूरकर मार्ग, चेंबूर (पूर्व) मुंबई ७१.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक २९/१२/२००९
सुनावणीचा दिनांक २ मार्च, २०१०.
अपीलार्थी यांचे प्रतिनिधी उपस्थित, जन माहिती अधिकारी अनुपस्थित.

अपीलार्थीस क्रिसेंट हायस्कूल ट्रॉम्बे येथील मुख्याध्यापक श्रीमती सबिहा अंजूम बेग यांच्या नियुक्तीसंदर्भात स्कूल कमिटीचा नेमणूक मंजूरीचा प्रस्ताव, नेमणूक मंजूरी, मुख्याध्यापक या जागेसाठी असणा-या अनुभवाची माहिती वगैरे माहिती पाहिजे होती.

असे दिसते की, प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या वेळेला अपीलार्थी व अपिलीय अधिकारी यांच्यात वादावादी झाली. शिक्षण उपनिरीक्षकांच्या टिप्पणीनुसार अपीलार्थी हे मुद्दा सोडून इतर बाबींवर बोलत बसले.

सुनावणीच्या वेळैला अपीलार्थी तसेच जन माहिती अधिकारी हे उपस्थित नव्हते. मात्र अपीलार्थीना हवी असणारी माहिती लक्षात घेता मुख्याध्यापीका श्रीमती सबिहा अंजूम बेग यांच्या नियुक्तीविषयी शिक्षण निरीक्षक यांच्या कार्यालयात जी कागदपत्रे असतील ती कागदपत्रे अपीलार्थीस ७ दिवसांचे आंत विनामूल्य देण्यात यावी असे निर्देश देण्यात येत आहेत.

सुनावणीच्या वेळेला अनुपस्थित राहिल्याबद्दल जन माहिती अधिकारी यांनी त्यांचा खुलासा आयोगास १० दिवसांचे आत सादर करावा.

*---आदेश---*

अपील मान्य करण्यात येत आहे.

अपीलार्थीस हवी असणारी माहिती ७ दिवसांचे आत विनामूल्य देण्यात यावी.

जन माहिती अधिकारी यांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक २ मार्च, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४६१९१/अपील क्रमांक ५५०८/(जुना ४३७९)०२

श्री. अब्दुल सलाम खान -----अपीलार्थी
१४८, झकेरिया बंदर रोड, शिवडी,
मुंबई ४०० ०१५.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त ----उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका, एफ/ दक्षिण विभाग,
रुम नं. ३२, २ रा मजला, डॉ. बी.ए. रोड,
परळ, मुंबई ४०० ०१२.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
बृहन्मुंबई महानगरपालिका, एफ/ दक्षिण विभाग,
रुम नं. ३२, २ रा मजला, डॉ. बी.ए. रोड,
परळ, मुंबई ४०० ०१२.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक २९/१२/२००९
सुनावणीचा दिनांक २ मार्च, २०१०.

अपीलार्थी,  जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी  उपस्थित.

अपीलार्थीच्या दि. २७ जुलै २००९ रोजीच्या पत्रावर  २६/८/२००९ रोजी अपीलार्थीस हवी असणारी माहिती म्हणजेच झकेरिया बंदर रोड व रफि अहमद किडवई मार्गावर स्लम तसेच एफ-२  मध्ये पुनर्वसनास पात्र असणा-या लोकांची पात्रता सिध्द करणा-या संपूर्ण फाईलच्या छायांकित प्रती  रु. ३,५१८/-  भरुन माहिती देण्यात येईल असे कळविण्यात आले.

सुनावणीच्या वेळेला हे स्पष्ट झाले की, अपीलार्थींनी अजूनहि हे पैसे भरलेले नाहीत. दोन्ही पक्षाशी चर्चा करुन असे ठरविण्यात आले की, अपीलार्थी  उदया दि. ३ मार्च २०१० रोजी सकाळी ११-०० वाजता  जन माहिती अधिका-यांच्या कार्यालयात जातील.   त्यांना नस्ती दाखविण्यात यावी व ते ज्या कागदपत्रांची निवड करतील ती कागदपत्रे शुल्क त्वरित भरुन त्यानंतर लगेचच अपीलार्थीस माहिती देण्यात यावी.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक २ मार्च, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५८५०/अपील क्रमांक ५४३६/०२
क्रमांक-मु.मा.आ/४४७०७/अपील क्रमांक ५४३७/०२

श्रीमती ईला बलदेव -----अपीलार्थी
बी-००१ वागडनगर, रामदेव पार्क रोड,
मीरा रोड (पूर्व) जि. ठाणे.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता ----उत्तरवादी
एच/पश्चिम वॉर्ड, सेंट मार्टीन्स रोड,
वांद्रे (पश्चिम) मुंबई ४०० ०५०.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ.का.)

एच/पश्चिम वॉर्ड,  सेंट मार्टीन्स रोड,
वांद्रे (पश्चिम) मुंबई  ४०० ०५०.

***---विवेचन---***

अपीलांचा दिनांक २१/१०/२००९ व  १५/१२/२००९
सुनावणीचा दिनांक  २५ फेब्रूवारी , २०१०.
अपीलार्थी व  जन माहिती अधिकारी उपस्थित.

या दोन्ही अपीलातील मुळ अर्जाद्वारा अपीलार्थींना एका विवक्षित अनधिकृत बांधकामांबद्दल तसेच  दुस-या अर्जाद्वारा  १५ नोव्हेंबर, २००८ ते आताच्या दिनांकापर्यंत निदर्शनास आलेल्या तथा शोधून काढलेल्या अनधिकृत बांधकामे व त्यावरील कारवाई यासंदर्भात माहिती पाहिजे होती.

माहिती उपलब्ध आहे व  नस्तीचे निरीक्षण करुन  घेऊन माहिती घेऊन जावी असे अपीलार्थीस कळविण्यांत आलेले आहे.    सुनावणीच्या वेळेला जन माहिती अधिका-यांना या अनधिकृत बांधकामाच्या नोंदी व  केलेल्या कारवाईच्या नोंदी कोणत्या रजिस्टरला घेण्यात येतात असे विचारले असता  डिटेक्शन रजिस्टर आणि डिमॉलिशन रजिस्टर या दोन रजिस्टरना या नोंदी घेण्यात येत असतात असे सांगितले.

अपीलार्थींची नस्त्यांची निरीक्षण करण्याची इच्छा नाही.   तेव्हा त्यांनी मुळ अर्जात दर्शविलेल्या कालावधीपुरत्या रजिस्टरमधील नोंदी अपीलार्थीस विनामूल्य देण्यात याव्यात. ज्या विशेष अनधिकृत बांधकामांची माहिती अपीलार्थीस पाहिजे आहे त्यासंबंधी वेगळयाने माहिती देण्यात यावी.   ही माहिती अपीलार्थीस ७ दिवसांचे आंत देण्यात यावी.

***----आदेश---***

दोन्ही अपीले निकाली काढण्यात येत आहेत.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक ३ मार्च, २०१०                                        राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले
अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५८५९/अपील क्रमांक५४८३
/०२

श्री. राजू कारभारी अहिरे                                        -----अपीलार्थी
नवीन रेशनिंग दुकानाजवळ, सर्वोदय हॉस्पीटलच्या मागे,
भिमनगर, घाटकोपर (पश्चिम) मुंबई ४०० ०८६.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता ----उत्तरवादी
सहायक मनपा आयुक्त, एस विभाग कार्यालय,
एस विभाग इमारत, लाल बहादूर शास्त्री मार्ग,
मंगतराम पेट्रोल पंपाजवळ, भांडूप (प) मुंबई ७८.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (परिरक्षण)
सहायक मनपा आयुक्त, एस विभाग कार्यालय,
एस विभाग इमारत, लाल बहादूर शास्त्री मार्ग,
मंगतराम पेट्रोल पंपाजवळ, भांडूप (प) मुंबई ७८.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक १५/१२/२००९
सुनावणीचा दिनांक १० मार्च, २०१०.
अपीलार्थी,जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

सुनावणीच्या वेळेला अपीलार्थीनी, त्यांना संपूर्ण माहिती मिळालेली आहे व त्यांचे

समाधान

झालेले आहे असे निवेदन दिलेले आहे.

---आदेश--

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक १० मार्च, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त
मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले
अपील.

क्रमांक-मु.मा.आ/२४२/अपील क्रमांक ५४८१ /०२

श्री. एम.आर.जे. मंडिल -----अपीलार्थी
१०१, चार्लीसली कोर्ट,
क्लोव्हर व्हिलेज, वाणवरी, पुणे ॽ ४११ ०४०.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी ----उत्तरवादी
आयुक्त, बृहन्मुंबई मनपा कार्यालय,
३, महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१.

२. जन माहिती अधिकारी
आयुक्त, बृहन्मुंबई मनपा कार्यालय,
३, महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक १०/२/२०१०
सुनावणीचा दिनांक १० मार्च, २०१०.

आयोगाच्या दि. ८ ऑक्टोबर, २००९ रोजीच्या अंतरिम आदेशानुसार कार्यकारी अभियंता , एफ/वेस्ट वार्ड तथा अपिलीय अधिकारी यांनी दि. ३०/११/२००९ रोजी आदेश पारित करुन जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ.व का) यांनी अपीलार्थीस दि. ६/११/२००८ रोजी केलेल्या संयुक्त इन्स्पेक्श रिपोर्टची प्रत देण्याचे निर्देश दिले. ही प्रत न मिळाल्यामुळे अपीलार्थी यांनी आयोगाकडे अपील/तक्रार केलेली आहे.

सुनावणीच्या वेळेला जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अशा पध्दतीचे इन्स्पेक्शन करण्यात आलेले होते. मात्र संयुक्त इन्स्पेक्शन रिपोर्ट हा तयार करण्यात आलेला नव्हता. मात्र त्यावेळेला केलेल्या पाहणीच्या बेसीसवर जिल्हाधिकारी कार्यालयास पत्र लिहिलेल होते. त्या

पत्राची प्रत अपीलार्थींना त्वरित देण्याचे निर्देश देण्यांत आले.

अपीलार्थींच्या म्हणण्यानुसार त्यांच्या प्लॉटवर झालेल्या अनधिकृत बांधकामाबाबत त्यांनी महापालिका आयुक्तांकडे दाद मागणे जास्त योग्य राहिल.

***---आदेश---***

अपील /तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक १० मार्च, २०१०

राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

क्रमांक-मु.मा.आ/४२०७९/तक्रार क्रमांक ७१९ /०१

श्री. एस हरीहरन -----तक्रारदार
३०१, राजश्री वाटीका, बिल्डींग नं. ३४,
पंतनगर, घाटकोपर (पूर्व) मुंबई ७५.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा सहकार अधिकारी ----उत्तरवादी
सहकार विभाग, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
वांद्रे (पूर्व) मुंबई ४०० ०५१.

२. जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक
सहकार विभाग, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
वांद्रे (पूर्व) मुंबई ४०० ०५१.

***---विवेचन---***

तक्रारीचा दिनांक ९/७/२००९
सुनावणीचा दिनांक १० मार्च, २०१०.
तक्रारदार व जन माहिती अधिकारी उपस्थित.

आयोगाने अपील क्र. ४३२८ च्या अपीलात सहकार संस्थेकडून अपीलार्थीस सहकार कायद्याअंतर्गत माहिती मिळत नसल्यामुळे स्वत: ही माहिती मॅनेजिंग कमिटीच्या सदस्यांच्या बॉन्डस् च्या बाबतीतील माहिती मिळवून देण्याचे निर्देश दिले होते. मात्र अशा पध्दतीची माहिती न मिळाल्यामुळे तक्रारदार यांनी आयोगाकडे तक्रार केलेली आहे.

याबाबतीत जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन दिलेले आहे.

" मी आपले निदर्शनास आणू इच्छितो की, मी उपरोक्त कार्यालयात माहिती अधिकारी म्हणून माहे ऑक्टोबर २००९ पासून कार्यरत आहे. माझेपूर्वी अन्य व्यक्तींकडे सदरचे काम होते. माझेकडे रितसर कार्यालयीन कागदपत्रांचा ताबा मिळालेला नाही. त्याबाबत मी माझ्या उपरोक्त कार्यालयाकडे लेखी पत्र दिलेले आहे. त्यामुळे मला आपले संदर्भिय क्र. २ च्या आदेशाबाबत आपले संदर्भ क्रमांक चे पत्र मिळेपर्यंत माहित झालेले नाही. त्यामुळे सदर आदेशाप्रमाणे कार्यवाही मला करता आलेली नाही. तसेच कार्यालयीन दप्ताचा शोध घेतला असता संबंधित कागदपत्रे सापडत नाही. त्यामुळे माझेपूर्वी सदर आदेशानुसार कार्यवाही झ ााली किंवा नाही याबाबतही निश्चित म्हणणे सादर करण्यात अडचण आहे.

तसेच मी आपले असेहि निदर्शनास आणू इच्छितो की, उपरोक्त कार्यालयाच्या कार्यकक्षेत ८ ते १० हजार सहकारी गृहनिर्माण संस्था असून तक्रारींचे प्रमाण खुप आहे. कामाच्या प्रमाणांत खुपच कमी कर्मचारी वर्ग आहे. त्यामुळे कार्यालयीन कामे वेळीच करणे अडचणीचे आहे. परंतु असे असले तरी प्राधान्यानुसार कामकाज करण्याचे सतत प्रयत्न करुन कामकाज केले जाते.

तरी वरील बाबींचा/ परिस्थितीचा विचार होऊन दंडात्मक कारवाई होऊ नये ही नम्र विनंती. मला आपले संदर्भ क्र. २ चे आदेश संदर्भ क्र. १ च्या पत्राच्या वेळी माहिती झाले असून ७ दिवसांत सदर आदेशाप्रमाणे कार्यवाही करुन आपणास अहवाल सादर करण्यात येईल. "

जन माहिती अधिका-यांना रितसर कागदपत्रांचा ताबा मिळाला नाही ही गंभीर बाब आहे. तेव्हा संबंधित उपनिबंधक यांनी रितसर कागदपत्रे हस्तांतरित न करणा-या अधिका-यांविरुध्द कडक शासकीय कारवाई करावी.

तसेच ७ दिवसांच्या आंत स्वतः लक्ष घालून विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदारांस माहिती देण्याचे मान्य केलेले आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

---आदेश---

अपील/तक्रार निकाली काढण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक १० मार्च, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५८७०/अपील क्रमांक ५४८४
/०२

क्रमांक-मु.मा.आ/४५८७५/अपील क्रमांक ५४८५
/०२

श्री. निमिश आर. शाह -----अपीलार्थी
६, गणबो स्ट्रीट, ७, मंग्रोल मॅन्शन,
फोर्ट , मुंबई ४०० ००१.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त ----उत्तरवादी
परिमंडळ २, सर जे.जे. मार्ग, नागपाडा,
मुंबई ४०० ००८.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त
दक्षिण प्रादेशिक विभाग, सर. जे.जे. मार्ग,
नागपाडा, मुंबई ४०० ००८.

## ---विवेचन---

**अपीलांचे दिनांक १७/१२/२००९**
**सुनावणीचा दिनांक १० मार्च, २०१०.**
**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

या दोन्ही अपीलांचा विषय एकच आहे. अपीलार्थीस त्यांनी सहपोलीस आयुक्त यांना वैयक्तिक भेटून दि. २७ एप्रिल, २००५ रोजी जे पत्र दिले होते त्या पत्रावर त्यांनी दिलेले निर्देश अपीलार्थीस माहिती करुन घ्यायचे आहेत. मात्र प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश देऊनहि हे पत्र हुडकून काढण्यात जन माहिती अधिकारी यशस्वी झालेले नाहीत. ज्या क्रिमीनल केसच्या संबंधी अपीलार्थीचा अर्ज आहे त्यासंदर्भात मात्र या अर्जात जे मुद्दे आहेत त्याबाबतीत अपीलार्थींनी सेशन कोर्ट व हायकोर्ट यांच्याकडे या मुळ प्रकरणाचा पाठपुरावा केल्यामुळे अंतिमतः ट्रायल कोर्टाने ६ महिन्याच्या आत वरील केसवर निर्णय द्यावा असे निर्देश हायकोर्टाने दिलेले आहेत असे सुनावणीच्या वेळेला अपीलार्थींनी सांगितले.

असे जरी असले तरी अपीलार्थींना जे कागदपत्र पाहिजे होते ते रेकॉर्डला नाहीत ही वस्तुस्थिती सक्षम कारभारास दुषणावहच आहे. मात्र ती बाब सेशन कोर्ट व हायकोर्ट यांच्या निदर्शनास आणले गेली असल्यामुळे अपीलार्थीस हवे असलेले पत्र व त्यावर जर कांही निर्देश असतील तर ते आज सापडू शकत नाहीत ही वस्तुस्थिती नाईलाजाने मान्य करावे लागेल.

## ---आदेश---

दोन्ही अपीले निकाली काढण्यात येत आहेत.

**(डॉ.सुरेश वि. जोशी),**

दिनांक १० मार्च, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५८७२/अपील क्रमांक ५४८७ /०२

श्री. ॲड् रामचंद्र एन कच्छवे -----अपीलार्थी
९८, दुसरा मजला, एक्स्प्लेनेड मॅन्शन,
काळाघोडा, फोर्ट, मुंबई ४०० ०२३.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी  तथा पोलीस उप आयुक्त ----उत्तरवादी
परिमंडळ १२,   मुंबई.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त
उत्तर नियंत्रण कक्ष, ठाकूर व्हिलेज,
कांदिवली (पूर्व) मुंबई.

*---विवेचन---*

अपीलाचा  दिनांक १०/१२/२००९
सुनावणीचा दिनांक  १० मार्च, २०१०.
अपीलार्थी यांचे वतीने श्रीयुत सुधीर सुर्वे  व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी ॲड् श्री रामचंद्र  एन कच्छवे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती मिळण्याकरिता माहिती अधिकारी तथा अवर सचिव गृहविभाग, मंत्रालय, मुंबई यांचे नांवे केलेला अर्ज पोलीस आयुक्त कार्यालयामार्फत जन माहिती अधिकारी यांचे  कार्यालयास दि. १८/०६/२००९ रोजी प्राप्त झाला होता.   पोलीस उप निरीक्षक खाडे यांचेविरुध्द तक्रार व प्रश्नार्थक मुद्दे असलेला अर्ज होता.

अपीलार्थीच्या अर्जाचे अवलोकन केले असता त्यात त्यांनी पोलीस उप निरीक्षक खाडे यांना निलंबित करुन गुन्हा दाखल का करण्यात आला नाही१   तसेच कारवाई करण्यात आलेल्या पोलीस अधिका-यांना पदोन्नती देण्याबाबतचा नियम आहे का१  असे प्रश्नार्थक व विश्लेषणात्मक मुद्दे नमूद असल्याचे आढळून आले.   अपीलार्थी यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत तरतुदीनुसार त्यांनी नमूद केलेले मुद्दे हे प्रश्नार्थक, विश्लेषणात्मक व तक्रारी स्वरुपाचे आहेत.   तसेच जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे वैयक्तिक मत देणे अपेक्षित नाही अशी माहिती देण्यात येऊन प्रथम अपिलीय अधिका-यांकडे ते अपील करु शकतात असे नमूद करुन अर्ज निकालात काढण्यात आला.

अपीलार्थीचे दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याने त्यांनी प्रथम अपिलीय अधिकारी व पोलीस उप आयुक्त, परिमडळ १२, मुंबई यांचेकडे अपील दाखल केले. अपीलार्थी यांना सुनावणीस वारंवार कळवून देखिल अपीलार्थी सुनावणीस उपस्थित राहिले नाहीत. करीता दि. २५/९/२००९ रोजी एकतर्फी सुनावणी घेऊन अपीलार्थीस अपील सुनावणीत स्वारस्य नसल्याचे दिसून येते असे नमूद करुन अपील निकाली काढण्यात येत असल्याचे आदेश पारित करण्यात आले. याविरुध्द सदरचे अपील आहे.

अपीलार्थीच्या माहितीच्या तक्रारीमध्ये सौम्य शिक्षा का देण्यात आली १ कडक शिक्षा का देण्यात आली नाही वगैरे प्रश्नांची उत्तरे जरी देणे अपेक्षित नसले तरी केलेल्या कारवाईचा जो अंतिम आदेश असेल त्या आदेशाची प्रत अपीलार्थीस देण्यात यावी. त्यामुळे अपीलार्थीस दिलेल्या शिक्षेविषयी कारणमिमांसा कळू शकते.

वरील माहिती ही एक आठवडयाच्या आत अपीलार्थीस देण्यात यावी.

***----आदेश---***

अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक १० मार्च, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५८६५/अपील क्रमांक

५४९०/०२

श्री. प्रविण विरजी सोळंकी -----अपीलार्थी

रुम नं. ८, न्यू वावन चाळ,

वीर तानाजी मालुसरे मार्ग, काळाचौकी, मुंबई ४०० ०३३.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक (प्रशासन) ----उत्तरवादी

छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय,

१५९/६१, महात्मा गांधी रोड, फोर्ट, मुंबई २३.

२. जन माहिती अधिकारी

छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय,

१५९/६१, महात्मा गांधी रोड, फोर्ट, मुंबई २३.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक ११/१२/२००९

सुनावणीचा दिनांक १० मार्च, २०१०.

अपीलार्थी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस शिपायाच्या पदाच्या नियुक्तीसंबंधीची माहिती पाहिजे होती. अपीलार्थीस दि. १०/११/२००९ रोजीच्या पत्राने माहिती देण्यांत आलेली आहे असे दिसून आले.

निवड झालेल्या उमेदवाराचे नांव अपीलार्थीस कळविण्यात यावे. मात्र त्यांनी अर्जासोबत जोडलेल्या प्रमाणपत्रे वगैरेच्या प्रती देण्याची आवश्यकता नाही.

जर सहायक संचालक प्रशासन हे जन माहिती अधिकारी असतील तर त्यांच्या पेक्षा वरिष्ठ दर्जाच्या अधिका-यांची प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून नियुक्ती होणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने वस्तु संग्रहालयाने त्वरित कार्यवाही करावी.

*---आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक १० मार्च, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५८६९/अपील क्रमांक ५४८९/०२

श्री. सुनिल महादेव कदम -----अपीलार्थी
वरळी बी.डी.डी. चाळ क्र. १० जवळ,
पी.डब्ल्यू.डी. कामगार वसाहत, पत्रा शेड,
डॉ. जी.एम. भोसले मार्ग, वरळी, मुंबई १८.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा संचालक ----उत्तरवादी
मुंबई विकास विभाग, चाळी,
वरळी, मुंबई (सा.बां.) मुंबई ४०० ०१८.

२. जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक
मुंबई विकास विभाग, चाळी,
वरळी, मुंबई (सा.बां.) मुंबई ४०० ०१८.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक ११/१२/२००९
सुनावणीचा दिनांक १० मार्च, २०१०.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

सुनावणीच्या वेळेला अपीलार्थींचे म्हणणे , अपीलार्थींचा अपीलमेमो, जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे व निवेदन लक्षात घेता  अपीलार्थीस  सर्वच मुद्दयांवर माहिती देण्यात आलेली आहे असे दिसून आले.  फक्त  संचालक मुंबई विकास विभाग वरळी यांनी गृहनिर्माण विभागास पाठविलेले दि. १/२/२००२ रोजीचे पत्राची प्रत ही त्यांच्या कार्यालयात सुध्दा असायला पाहिजे.  ती प्रत असल्यास ती अपीलार्थींना देण्यांत यावी.  जर तशी प्रत नसेल तर अपीलार्थींच्या मुळ अर्जातील  हा मुद्दा  जन माहिती अधिकारी , विकास विभाग वरळी यांनी  गृहनिर्माण विभागास पाठविण्यात यावा व गृहनिर्माण विभागाच्या जन माहिती अधिका-यांनी ती माहिती अपीलार्थीस देण्यात यावी.

*---आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.
संबंधितांनी  उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ११ मार्च, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५८६६/अपील क्रमांक ५४८८/०२

श्री. सुनिल महादेव कदम -----अपीलार्थी
वरळी बी.डी.डी. चाळ क्र. १० जवळ,
पी.डब्ल्यू.डी. कामगार वसाहत, पत्रा शेड,
डॉ. जी.एम. भोसले मार्ग, वरळी, मुंबई १८.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा संचालक ----उत्तरवादी
मुंबई विकास विभाग, चाळी,
वरळी, मुंबई (सा.बां.) मुंबई ४०० ०१८.

२. जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक
मुंबई विकास विभाग, चाळी,
वरळी, मुंबई (सा.बां.) मुंबई ४०० ०१८.

---विवेचन---

अपीलाचा दिनांक ११/१२/२००९
सुनावणीचा दिनांक १० मार्च, २०१०.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

जन माहिती अधिका-यांच्या म्हणण्यानुसार अपीलार्थी व त्यांचे वडिल हे एकाच विषयाची माहिती वेगवेगळया प्रकारे मागत असतात व माहिती पुरवूनहि त्यांचे समाधान होत नाही. अर्जदारांनी दिलेले अर्ज व त्याला दिलेली उत्तरे यासंबंधीचा त्यांनी पुढीलप्रमाणे गोषवारा सादर केलेला आहे.

| अ.क्र | अर्जाचा दिनांक | पृष्ठ क्रमांक | या कार्यालयाचे पत्र व दिनांक |
|---|---|---|---|
| १ | दि.२/७/२००९ | ब-१ | क्र.इव्हीएन२१४१/ दि. १७/८/०९ |
| २ | दि.२१/७/२००९ | ब-२ | क्र.इव्हीएन/२१४२/ दि. १७/८/२००९ |
| ३ | दि.७/११/२००९ | ब-३ | क्र.इव्हीएन/२९०८/ दि. ७/१२/२००९ |
| ४ | दि.१५/१२/२००९ | ब-४ | क्र.इव्हीएन/७४८/ दि. ११/२/२०१० |
| ५ | दि.१५/१२/२००९ | ब-५ | क्र.इव्हीएन/७४९/ दि. ११/२/२०१० |
| ६ | दि.१५/१२/२००९ अपील अर्ज | ब-६ | क्र.इव्हीएन/मा.अ/८६८/ दि. २२/२/२०१० |

अपीलार्थीचा अर्ज आणि त्यांना दिलेली माहिती याचा विचार केला असता अपीलार्थीस कोणत्या मुद्दयावर दिलेली माहिती समाधानकारक वाटत नाही असे विचारले असता मुद्दा क्र. ८ च्या बाबतीत ज्या ३६५ झोपडपट्टीधारकांची यादी त्यांना देण्यांत आलेली आहे त्यांना सेवाशुल्क आदेश वाटप झाल्यानंतर हमीपत्र स्वीकारल्याचा दिनांक व सेवाशुल्क वसूलीचा दिनांक ही माहिती दिलेली नाही असे दिसते.

३६५ झोपडपट्टीधारकांची संपूर्ण यादी देण्यांत आलेली आहे त्यात झोपडीचे क्षेत्रपळ व वर्ष नोंद सुध्दा देण्यांत आलेली आहे. अपीलार्थीस जी माहिती पाहिजे आहे ती प्रत्येक व्यक्तीची द्यायची झाल्यास मनुष्यबळ बरेच लागण्याची शक्यता असल्यामुळे अपीलार्थीनी

वानगीदाखल कांही नांवे द्यावीत व त्याचीच माहिति अपीलार्थीस देण्यात यावी म्हणजे अपीलार्थीचा कार्यभागहि भागू शकेल व व यंत्रणेवर विनाकारण जादा ताणहि पडणार नाही. तेव्हा ज्या कांही झोपडीधारकाबद्दलची अशी माहिती पाहिजे आहे अशा १० ते १५ झ ाोपडीधारकांची नांवे अपीलार्थींनी जन माहिती अधिका-यांना द्यावीत व त्याची माहिती अपीलार्थींना पुरविण्यात यावी असे निर्देश देण्यात येत आहेत.

<u>*----आदेश----*</u>

अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक ११ मार्च, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५८४९/अपील क्रमांक ५४९९/०२

श्री. हेमंत सखाराम सावंत -----अपीलार्थी
बी.आय.टी. चाळ क्र. ४, रुम नं. ६९/७३,
केशवराव खाडये मार्ग, मुंबई ४०० ०११.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा सहायक मनपा आयुक्त ----उत्तरवादी

बृहन्मुंबई महानगरपालिका, ई विभाग कार्यालय,
१०, शेख हफिझुद्दीन मार्ग, भायखळा (पश्चिम)
मुंबई ४०० ००८.

२. जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय आरोग्य अधिकारी
बृहन्मुंबई महानगरपालिका, ई विभाग कार्यालय,
१०, शेख हफिझुद्दीन मार्ग, भायखळा (पश्चिम)
मुंबई ४०० ००८.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक १५/१२/२००९
सुनावणीचा दिनांक १० मार्च, २०१०.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस श्री. सखाराम गणपत सावंत यांच्या जन्माबाबत व श्रीमती.लक्ष्मीबाई भिकाजी सावंत यांच्या मृत्युच्या नोंदी व प्रमाणपत्राबाबत कांही माहिती पाहिजे होती. अपीलार्थीस त्याबाबत दि. ३/११/२००३ व १५/२/१९९७ रोजी या दाखल्याच्या प्रती ज्यांना देण्यांत आलेल्या होत्या ती अर्ज करणारी व्यक्ती कोण होती वगैरे माहिती पाहिजे होती.

अशा पध्दतीचा रेकॉर्ड हा फक्त ५ वर्षासाठी जतन केल्या जातात व त्यामुळे वरील माहिती उपलब्ध नाही असे अपीलार्थीस कळविण्यात आले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपीलार्थीस
पुढीलप्रमाणे त्यांच्या आदेशात मार्गदर्शन केलेले आहे ते योग्यच आहे.

"जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १७ प्रमाणे कोणाही व्यक्तीने अर्ज केल्यास त्यास नोंदीचा उतारा देण्यात येतो. सबब आपण या दाखल्यांसाठी आता अर्ज केल्यास व संबंधित नोंद महानगरपालिकेकडे झालेली असल्यास असे दाखले आपणांसही मिळू शकतील व त्यावरुन दि. ३/११/२००३ व दि. १५/२/१९९७ रोजी देण्यात आलेल्या तथाकथित दाखल्याबाबत शहानिशा आपणांस करता येईल. "

जी माहिती अस्तित्वातच नाही ती देता येणार नाही. अपीलार्थीस हवे तर त्यांनी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांच्या सल्ल्याप्रमाणे कारवाई करावी.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ११ मार्च, २०१०

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

क्रमांक-मु.मा.आ/३९९४१/अपील क्रमांक ५५००/०२

श्री. एम. बी. लाल, श्री.टी.यू.खत्री -----अपीलार्थी
२/५, यशवत नगर, गोरेगांव (पश्चिम)
मुंबई ४०० ०६२.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक ----उत्तरवादी
प्रधान मुद्रांक कार्यालय, नगरभवन फोर्ट,
मुंबई ४०० ००१.

२. जन माहिती अधिकारी तथा उपमुद्रांक अधीक्षक
प्रधान मुद्रांक कार्यालय, नगरभवन फोर्ट,
मुंबई ४०० ००१.

*---विवेचन---*

मुळ अपीलाचा दिनांक २०/४/२००९
सुनावणीचा दिनांक १० मार्च, २०१०.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

सुनावणीच्या वेळेला असे दिसून आले की, अपीलार्थींची त्यांना सर्व रेकॉर्डचे इन्स्पेक्शन देण्यात यावे अशी जी मागणी होती त्यानुसार त्यांनी दि. २७/४/२००९ रोजी नस्तीची तपासणी घेऊन खालील कागदपत्रांच्या प्रती प्राप्त करुन घेतलेल्या आहेत.

"१. दि. २५/९/२००८ रोजीची सादर नोट रोजनाम्यासह

२. दि. २०/५/२००९ रोजीची सादर नोट

३. या कार्यासनाचे दि. २०/६/०८ रोजीचे पत्र (शासनास)

४. शासनाचे दि. २३/९/०८ रोजीचे पत्र.

५. या कार्यालयाचे दि. २५/९/०८ रोजीचे पत्र (शासनास)

६. दि. २५/१/९८ , दि. १५/१/००, दि. २४/४/०० रोजीचे मुल्यांकन अहवालाची प्रत.

७. या कार्यालयोच दि. २५/९/०८ रोजी मा.नो.म.नि.पुणे यांना लिहिलेले पत्र."

त्यामुळे जी माहिती पाहिजे होती त्या माहितीच्या प्रती अपीलार्थींना देण्यांत आलेल्या आहेत. असे जरी असले तरी अपीलार्थीचे म्हणणे की, कोर्टाच्या आदेशानंतर जर प्रॉपर्टीचे व्हॅल्यूएशन कमी झाले असेल तर त्यांनी दिलेल्या स्टॅम्पडयूटीचे रिफंड अपीलार्थीस शक्य तितक्या लवकर द्यायला पाहिजे.

याबाबतीत प्रधान मुद्रांक अधीक्षक यांनी योग्यती कार्यवाही १५ दिवसांच्या आत करण्याचे मान्य केलेले आहे.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक ११ मार्च, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५८५८/अपील क्रमांक ५४९७/०२

क्रमांक-मु.मा.आ/४५८५७/अपील क्रमांक ५४९८/०२

श्री. मेहमूद शेख -----अपीलार्थी
रुम नं. ७, दोस्त महमद चाळ,
नित्यानंद नगर, घाटकोपर (पश्चिम)
मुंबई ४०० ०८६.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा प्रमुख अभियंता (प.ज.वा) ----उत्तरवादी
मनपा इमारत, सिमेंट गोडाऊन ,
रुम नं. २११, ३ रा मजला, ५४६, ना.म.जोशी मार्ग,
भायखळा (पश्चिम) मुंबई ४०० ०११.
२. जन माहिती अधिकारी तथा उपप्रमुख अभियंता (प.ज.वा.)
पूर्व उपनगरे, ५ वा मजला, गॅरेजवाला इमारत,
पंतनगर, घाटकोपर (पूर्व) मुंबई ४०० ०७५.

*---विवेचन---*

मुळ अपीलाचा दिनांक १५/१२/२००९
सुनावणीचा दिनांक १० मार्च, २०१०.
अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

सुनावणीच्या वेळेला अपीलार्थींनी त्यांना माहिती मिळालेली आहे व त्यांचे पूर्ण समाधान झालेले आहे असे लेखी निवेदन देण्यात आलेले आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

*----आदेश---*

दोन्ही अपीले निकाली काढण्यात येत आहेत.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक ११ मार्च, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५८५५/अपील क्रमांक ५५०३/०२

श्री. फ्रान्सिस विन्सेंट सोर्स -----अपीलार्थी
सोर्स हाऊस, फ्लॅट नं. २,
पटेल पाखाडी, वर्सोवा, मुंबई ४०० ०६१.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त ----उत्तरवादी
परिमंडळ १२, शैलेंद्र नगर, दहिसर, मुंबई.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त
उत्तर नियंत्रण कक्ष, ठाकूर व्हिलेज, कांदिवली (पूर्व)
मुंबई ४०० १०१.

*---विवेचन---*

मुळ अपीलाचा दिनांक १६/१२/२००९
सुनावणीचा दिनांक ११ मार्च, २०१०.

अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीचे अपील पाहिले असता त्यांना माहिती नको आहे, त्यांना प्रत्यक्ष कारवाई पाहिजे.

फॅमिली कोर्ट मुंबई यांनी श्रीमती. प्रेसि रिचर्ड हेन्ड्रीक्स यांच्या बाजूने निकाल दिला असून गॉर्डन हेन्ड्रींग्स यांना, श्रीमती हेन्ड्रीक्स यांना कोणत्याही प्रकारे हाकलून देण्यापासून किंवा त्यांचे जागेतील राहत्या भागामध्ये प्रवेश करण्यापासून सुध्दा परमनंट इंजेक्शन दिलेले आहे. याची अंमलबजावणी व्हावी असे अपीलार्थीचे म्हणणे आहे.

याबाबत अर्ज दिल्यास संबंधित पोलीस स्टेशन कारवाई करतील असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले.

*----आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक १२ मार्च, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५८७३/अपील क्रमांक ५५०४/०२

श्री. बाबाजी हरी पाटील -----अपीलार्थी
लेडी सन हौसिंग कॉम्प्लेक्स,
सिध्दीविनायक इमारत, इ.क्र.७, रुम नं. ४०३,
दै. शिवनेर मार्ग, वरळी, मुंबई ४०० ०१८.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा सहायक मनपा आयुक्त ----उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/ दक्षिण वॉर्ड कार्यालय,
२ रा मजला, ८ ना.म.जोशी मार्ग, मुंबई १३.

२. जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय आरोग्य अधिकारी
बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/ दक्षिण वॉर्ड कार्यालय,
२ रा मजला, ८ ना.म.जोशी मार्ग, मुंबई १३.

*---विवेचन---*

मुळ अपीलाचा दिनांक १८/१२/२००९
सुनावणीचा दिनांक ११ मार्च, २०१०.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

सुनावणीच्या वेळेला हे स्पष्ट झाले की, अपिलीय अधिकारी यांच्या दि. २९/९/२००९ रोजीच्या आदेशाप्रमाणे दि. १२/११/२००९ रोजी अपीलार्थीस दुध केंद्राच्या संबंधातील अभिलेखावर असलेल्या कागदपत्रांबाबत सुस्पष्ट अभिप्रायासहीत पत्र पाठवावे असे निर्देश दिले होते व त्याप्रमाणे हे पत्र पाठविण्यात आलेले आहे व त्यात सर्व मुद्दयांचा खुलासाहि दिलेला आहे.

सुनावणीच्या वेळेला अपीलार्थीस संबंधित नस्ती सुध्दा त्यांना पाहता येईल व कांही अतिरिक्त कागदपत्रे पाहिजे असल्यास ते सुध्दा त्यांना मिळू शकतील असे सांगण्यांत आले.

*---आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक १२ मार्च, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५८४८/अपील क्रमांक ५५०१/०२

श्री. एम.बी. लाल -----अपीलार्थी
फ्लॅट नं. ६४, ६ वा मजला, इमारत क्र. २४,

आनंदसागर सोसायटी, वांद्रे रिक्लेमेशन
वांद्रे (पश्चिम) मुंबई ४०० ०५०.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक ----उत्तरवादी
सहकारी संस्था. मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१.

२. जन माहिती अधिकारी
सहकारी संस्था. मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१.

*---विवेचन---*

मुळ अपीलाचा दिनांक १४/१२/२००९
सुनावणीचा दिनांक ११ मार्च, २०१०.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीच्या अपीलातील मुद्दयांबाबत जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन देण्यात आले.

" श्री.एम.बी.लाल, आनंदसागर को.ऑप.हौसिंग सोसायटी लि. बांद्रा रिक्लमेशन यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये केलेल्या अर्जानुसार तसेच, आपण दिलेल्या आदेशानुसार आणि अपीलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल खालीलप्रमाणे सादर करीत आहे.

आनंद सागर को.ऑप.हौसिंग सोसायटी लि. इमारत क्र. २४, बांद्रा (पूर्व) मुंबई ४०० ०५० ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९(१) अन्वये नोंदणीकृत गृहनिर्माण संस्था आहे.

वरील संस्था मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाचे अखत्यारित असून तिचे निबंधक, उपनिबंधक, सहकारी संस्था, म्हाडा हे आहेत.

श्री.एम.बी.लाल यांनी जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयाकडे संस्थेने जादा रकमेची आकारणी केलेबाबत तक्रार दाखल करुन, त्याबाबतची कागदपत्रे मागणी केलेली होती. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९ (२) अन्वये श्री. वसंत शिंदे, प्रमाणित लेखा परिक्षक यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नेमणूक करुन, दि. ९/२/०७ रोजी मागणी केलेले दस्तऐवज पुढीलप्रमाणे उपलब्ध करुन दिलेले आहेत. संस्थेच्या सर्वसाधारण सभेचे सन १९९४-९५ पासून सन २०००-०१ पर्यंत सभा इतिवृत्तांताच्या छायाप्रती सन १९९५-२००१ या कालावधीच्या लेखा परिक्षण अहवालाच्या प्रती तसेच, दि. १/१/९५ ते दि. ३१/३/०३ पर्यंतची मासिक बीले श्री. एम.बी.लाल यांनी संस्थेस भरणा केलेल्या नऊ पेमेंटच्या पावत्या अंदाजित रक्कम रु. ६०,०००/- दि. ९/४/९६ रोजी संस्थेस भाग दाखल्यापोटी भरलेल्या प्रवेश फी रकमेची पावती, श्री.एम.बी.लाल यांच्या वैयक्तिक खतावणीची प्रत इ. च्या प्रती दिलेल्या असून, श्री. एम.बी.लाल यांनी जन माहिती अधिकारी कार्यालयात तथा लोकायुक्त कार्यालयाकडे दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियमातील तरतुदीनुसार आवश्यक ती कार्यवाही करुन त्यांची तक्रार निकाली काढली असून, सदर तक्रारीवर काहीही कार्यवाही केलेली नाही, अथवा मागणी केलेले दस्ताऐवज उपलब्ध करुन दिले नाही, या म्हणण्यात तथ्य नाही. तसेच वरील अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयाकडे दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने संस्थेच्या व्यवस्थापक समितीच्या दप्तराची तपासणी करणेकरीता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८९(अे) अन्वये जा.क्र. उप.नि/स.सं/मुं.मं./ ४८५/२०१० दि. १५/२/२०१० अन्वये आदेश निर्गमित केलेले आहेत. सबब, अपीलार्थी यांचे संदर्भात आणखी काही मुद्दे असतील आणि सदरचे मुद्दे त्यांनी जन माहिती अधिकारी कार्यालयाच्या

निदर्शनास आणून दिल्यास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलमातील तरतुदीनुसार तसेच, संस्थेच्या उपविधी क्र. १७५ मधील तरतुदीनुसार त्यांचा अर्ज/तक्रार निकाली काढण्याची कार्यवाही करण्यात येईल व आपल्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात येईल. "

त्याचप्रमाणे अपीलार्थींच्या तक्रारीवरुन सोसायटीच्या दप्तराची संपूर्ण तपासणी करण्याचेहि उपनिबंधकांनी ठरविले आहे व त्याप्रमाणे दि. २६/३/२०१० रोजी चेअरमन/सचिव यांना कार्यालयात दप्तर नोंदवहया घेऊन बोलाविण्यात आले आहे असेहि सुनावणीच्या वेळेस सांगण्यात आले.

त्यामुळे अपीलार्थीस आवश्यक ती माहिति देण्यात आलेली आहे. तसेच कार्यवाही करण्याचे सुध्दा जन माहिती अधिका-यांनी नमूद केलेले आहे.

*----आदेश----*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक १२ मार्च, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

क्रमांक-मु.मा.आ/अपील क्रमांक ५९५/०१

श्री. एस.के. नानगिया -----तक्रारदार
७०४, गोल्डन चॅरिएट को.ऑप.हौ.सो.
१३३, सेक्टर ६, चारकोप, कांदिवली (पश्चिम)
मुंबई ४०० ०६७.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक ----उत्तरवादी
सहकारी संस्था. मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१.

२. जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी श्रेणी-१
सहकारी संस्था. मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१.

*---विवेचन---*

श्री. एस.के.नानगिया यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८(१) अन्वये दि. १५/९/२००९ रोजी दाखल केलेल्या तक्रार अर्जावर दि. १८/१२/२००९ रोजी आयोगासमोर सुनावणी आयोजित केली होती. त्यावेळी तक्रारदार उपस्थित होते तथापि उत्तरवादी पैकी कोणीही उपस्थित नव्हते.

श्री.नानगिया यांनी दि. १/४/२००८ च्या माहिती अर्जान्वये उपनिबंधक सहकारी संस्था मुंबई यांच्या कार्यालयाकडून गृहनिर्माण सोसायटयांवर जे प्रशासक नेमले जातात त्याविषयी एकूण आठ मुद्दयांची माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यांनी त्यावर त्यांच्या दि. १७/५/२००८ च्या पत्रान्वये उत्तर दिले. सदर पत्र तक्रारदारांस दि. २०/५/२००८ रोजी प्राप्त झाले. हवी असलेली माहिती संपूर्णतः न मिळाल्याने श्री.एस.के. नानगिया यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांजकडे कलम १९(१) अन्वये दि. २७/५/२००८ रोजी अपील दाखल केले. त्यावर सुनावणी घेऊन डॉ. किशोर मांडे, प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी मूळ माहिती अर्जातील मुद्दा क्रमांक ३(सी) मधील २,४,५,६,७ व ८ या मुद्दयांची माहिती श्री. एस.के.नानगिया यांना १५ दिवसांत द्यावी असे आदेश पारित केले होते.

श्री.नानगिया यांनी त्यांच्या तक्रार अर्जामध्ये असाही मुद्दा मांडलेला आहे की, ज्या डॉ. किशोर मांडे यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी म्हणून दि. ८/७/२००८ रोजी वरीलप्रमाणे आदेश पारित केले ते स्वतः त्या कार्यालयाचे तत्कालीन जन माहिती अधिकारी असतांना त्यांनी माहिती देण्यास कुचराई केली होती. या मुद्दयाकडे श्री.नानगिया यांनी सुनावणीच्या वेळी पुन्हा लक्ष वेधून जा जाणून बुजून माहिती दडपण्याचा प्रकार असल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणले.

विद्यमान प्रथम अपिलीय प्राधिकारी हेच तत्कालीन जन माहिती अधिकारी असल्याने वास्तविक श्री.एस.के.नानगिया यांनी केलेल्या दि. २/४/२००८ च्या माहिती अर्जातील मुद्दा क्र. ३ (सी) मधील २,४,५,६,७ व ८ या मुद्दयांची माहिती १५ दिवसांत द्यावी असे नुसते आदेश पारित करण्याऐवजी नैतिक जबाबदारी म्हणून सदर माहिती अपीलार्थी श्री. एस.के. नानगिया यांना स्वतः जातीने देण्याची व्यवस्था करायला पाहिजे होती असे आयोगाचे मत आहे.

सदर जबाबदारीचे उत्तरदायित्व तत्कालीन जन माहिती अधिकारी म्हणॅन डॉ.किशोर मांडे यांचे असल्यामुळे तसेच त्यांनी तक्रारदार श्री.एस.के.नानगिया यांच्या दि. २/४/२००८ च्या माहिती अर्जास अनुसरुन संपूर्ण माहिती देण्यास विलंब लावल्यामुळे त्यांच्यावर शास्ती कां लावण्यात येऊ नये याबाबतचा खुलासा आयोगासमोर दि. ३०/३/२०१० रोजी समक्ष उपस्थित राहून सादर करणे आवश्यक राहील. याप्रकरणी मी पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

***----आदेश---***

तक्रार मान्य करण्यात येत आहे.

तत्कालीन जन माहिती अधिकारी डॉ. किशोर मांडे यांनी त्यांच्याच दि. ८/७/२००८ रोजी प्रथम अपिलीय प्राधिकारी म्हणून दिलेल्या आदेशाचे अनुपालन दहा दिवसांत करावे. तसेच त्यांचेवर शास्ती कां लावणेत येऊ नये याबाबतचा खुलासा दि.३०/३/२०१० रोजी प्रत्यक्ष कार्यालयात येऊन सादर करावा.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक १२ मार्च, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४६२२३/अपील क्रमांक ५५३४/०२

श्री. संजय अनंत भोळे -----अपीलार्थी
४, प्रयत्न को.ऑप.हौ.सोसायटी,
नेहरु रोड, जलाराम मंदिराजवळ, ठाकुर्ली ,
डोंबिवली (पूर्व) जि. ठाणे.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा सह परिवहन आयुक्त ----उत्तरवादी
परिवहन आयुक्त कार्यालय, प्रशासकीय इमारत,
३ व ४ था मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व)

मुंबई ४०० ०५१.

२. जन माहिती अधिकारी
परिवहन आयुक्त कार्यालय, प्रशासकीय इमारत,
३ व ४ था मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व)
मुंबई ४०० ०५१.

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक ६/०१/२०१०
सुनावणीचा दिनांक १८ मार्च, २०१०.
अपीलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीच्या अर्जास अनुसरुन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या आदेशात सर्व मुद्दयांचा यथायोग्य परामर्श घेतलेला आहे असे दिसून आले.

अपीलार्थीचा स्पेसिफीक मुद्दा हा की, ड्रायव्हींग लायसन्स व नोंदणी पुस्तक हे स्मार्ट कार्ड स्वरुपात घेणे बंधनकारक आहे की ऐच्छिक आहे. याबाबत हे बंधनकारक आहे असे स्पेसिफीक उत्तर अपीलार्थीस देण्यांत आलेले आहे.

अपीलार्थीच्या प्रश्नाला विवक्षित उत्तर दिले आहे. अपीलार्थीचे असे म्हणणे की, कायदेशीर तरतुदींशी हे सुसंगत नाही. अपीलार्थींना जर असे वाटत असेल तर त्यांना न्यायालयातूनच याबाबतीत निकाल लावून घेणे योग्य राहील. अपीलार्थीकडे या विषयातील सर्व परिपत्रके व कायदा व नियम यांच्या प्रती आहेत असे आयोगास दिसून आले.

अपिलीय अधिकारी यांनी अपीलार्थीच्या शंकेबाबत विवक्षितपणे उत्तर दिलेले आहे त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक १८ मार्च, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४६३५१/अपील क्रमांक ५५३२/०२

श्री. विजय कोंडया मंथेना -----अपीलार्थी

७/३४, अब्दुल्ला मेन्शन, स्टेशन रोड,
हरियानवाला लेन, कुर्ला (पश्चिम) मुंबई ७०

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा प्रमुख कर्मचारी अधिकारी ----उत्तरवादी
मनपा मुख्यालय, विस्तार इमारत,
६ वा मजला, मनपा मार्ग, मुंबई ४०० ००१.

२. जन माहिती अधिकारी
मनपा मुख्यालय, विस्तार इमारत,
६ वा मजला, मनपा मार्ग, मुंबई ४०० ००१.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक १२/०१/२०१०
सुनावणीचा दिनांक १८ मार्च, २०१०.
अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीनी सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र.संकीर्ण-१०५/३४/प्र.क्र.८/२००५/१८(८-का ) ७/११/२००५ या शासकीय कर्मचा-यांकडून शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबाबात व कर्तव्य पालनातील कसुरीबाबत शिस्तभंग कारवाई करण्याबाबतच्या अमलबजावणीबाबत खुलासा मागितला होता.

सदर शासन परिपत्रक बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झालेले नाही. वरील परिपत्रक जरी विवक्षितरित्या महापालिकांना पाठविण्यात आलेले नसले तरी प्रशासकीय गतीमानता वाढविण्याच्या दृष्टीने व विहित मुदतीत काम करण्याच्या प्रवृत्तीची जोपासना करण्याच्या दृष्टीने परिपत्रकातील मुद्दे महापालिका कशा पध्दतीने दैनंदिन कामकाजात अमलात आणता येऊ शकतील याचाही विचार महापालिकेने करणे आवश्यक आहे.

त्यादृष्टीने वरील परिपत्रकाच्या बाबतीत पुढील कार्यवाही करणार असल्याचे अपिलीय अधिकारी यांनी सांगितले.

*---आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक १८ मार्च, २०१०

राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४६२१३/अपील क्रमांक ५५३३/०२

श्री. लोकेगावकर नारायण एकनाथ -----अपीलार्थी
१२/६१९, सरदार नगर नं.१, सायन कोळीवाडा,
मुंबई ४०० ०२२.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक ----उत्तरवादी
(मुंबई विभाग), शिक्षण उपसंचालक यांचे कार्यालय,
चर्नी रोड, मुंबई ४०० ००२.

२. जन माहिती अधिकारी तथा सह शिक्षण संचालक (क.महावि)
शिक्षण उपसंचालक यांचे कार्यालय,
चर्नी रोड, मुंबई ४०० ००२.

*---विवेचन---*

अपील क्र. ४३०६ मधील आदेशानुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी देऊन आदेश पारित करण्याचे निर्देश दिले होते. पण त्यांनी अजूनहि सुनावणी घेतली नाही असे निदर्शनास आणल्यावरुन या प्रकरणाची सुनावणी दि. १८/३/२०१० रोजी घेण्यांत आली. त्यावेळेला अपीलार्थी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक ,मुंबई विभाग यांच्यातर्फे पुढीलप्रमाणे निवेदन देण्यात आले ः

" अपीलार्थी श्री. नारायण एकनाथ लोकेगांवकर यांनी दि. २०/५/२००८ अन्वये माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती मागितली होती. त्या अनुषंगाने (या

कार्यालयाने ) माहिती अधिकारी यांनी श्री. लोकेगावकर यांना दि. २० जून २००८ च्या पत्रान्वये माहितीच्या २७२ प्रती असून शासकीय नियमाप्रमाणे रक्कम शासकीय कोषागारात भरुन त्याची प्रत सादर केल्यावर माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे कळविले होते. यावर त्यांचे समाधान न झाल्याने त्यांनी मा. मुख्य माहिती आयुक्त यांच्याकडे अपील क्रमांक ४३०६/०२ द्वितीय अपील सादर केले होते. त्यावर सुनावणी होऊन संबंधितांस सुनावणीची संधी देऊन एक महिन्याच्या आत अपीलार्थीस अपीलांच्या मुद्दयांचा विचार करुन स्वयंस्पष्ट आदेश पारित करण्याबाबत मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे आदेश झाले होते.

त्या अनुषंगाने अपीलार्थी श्री. लोकेगांवकर यांना या कार्यालयाने दि. १०/०८/२००९ , दि. २२/९/२००९ तसेच १५ सप्टेंबर २००९ अन्वये सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत कळवूनही कार्यालयाची पत्रे मुदतीत न मिळाल्याचे कारण दर्शवून सुनावणीची वेळोवेळी संधी मागितली आहे.

उपरोक्त वस्तुस्थितीवरुन संबंधितास नैसर्गिक न्यायतत्वाचे पालन करुन वेळोवेळी संधी देण्यात आली आहे हे आपल्या सविनय निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

दरम्यानच्या काळात पूर्णवेळ शिक्षण उपसंचालक सेवानिवृत्त झाले त्यांचा अतिरिक्त कार्यभार सद्यः माझ्याकडे आहे. कामाच्या व्यापामुळे व दोन आस्थापनेचे काम सांभाळावे लागत असल्यामुळे श्री. नारायण लोकेगांवकर यांच्या प्रथम अपीलावर मला निर्णय देता आला नाही ही बाब सविनयपूर्वक आपल्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे. तथापि श्री. नारायण लोकेगांवकर यांच्या प्रकरणी निर्णय घेण्यास दि. ९ एप्रिल, २०१० पर्यंतची मुदतवाढ द्यावी ही विनंती. या कालावधीत श्री.लोकेगांवकर यांचे अपील प्रकरणी निर्णय घेण्यात येऊन अनुपालन अहवाल आयोगाला सादर करण्यात येईल. "

अपीलार्थीच्या अपीलावर उदया दि. १९ मार्च, २०१० रोजी सुनावणी घेऊन आदेश पारित करण्याचे निर्देश देण्यांत आले.

***---आदेश---***

अपील/तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक १८ मार्च, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४६२२७/अपील क्रमांक ५५३५/०२

श्री. अरुण गणपत भोवर -----अपीलार्थी
अ/६०३, साई आशिष जनकल्याण बँक शेजारी,
स्टेशन रोड, विक्रोळी (पूर्व) मुंबई ८३.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार ----उत्तरवादी
(कुर्ला-मुलुंड) तहसिलदार कार्यालय, मुलुंड,
मुंबई ४०० ०८२.

२. जन माहिती अधिकारी
(कुर्ला-मुलुंड) तहसिलदार कार्यालय, मुलुंड,
मुंबई ४०० ०८२.

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक २४/१२/२००९
सुनावणीचा दिनांक १८ मार्च, २०१०.
अपीलार्थी, जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीच्या अपीलासंबंधी जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन सादर केले.

"   अपीलार्थी श्री. अरुण गणपत भोवर यांनी या कार्यालयास दि. २४/९/०९ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत माहिती मिळणेकरीता अर्ज सादर केला होता. सदर अर्जाचे अनुषंगाने निवासी नायब तहसिलदार यांनी सहायक माहिती अधिकारी यांच्या वतीने माहिती अधिकार अधिनियमान्वये प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती देणे अपेक्षित नसल्याचे या कार्यालयाचे पत्र क्रमांक तह/कुर्ला/मा.अ./कावि ३२८ दि १/१/२०१० अन्वये अर्जदारास कळविले आहे. त्याचप्रमाणे मा. उपविभागीय अधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा हे प्रथम अपिलीय अधिक्‍ारी असता अर्जदार यांनी प्रथम अपीलाचा दिनांक २६/१०/२००९ चा अपील अर्ज तहसिलदार कुर्ला कार्यालयात सादर केला त्यांना प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे अर्ज दाखल करणेबाबत कळविणे आवश्यक होते. तथापि दि. १६/१२/२००९ चे पत्रान्वये माहिती प्राप्त करुन घेणेसाठी शुल्क भरणे आवश्यक असलेबाबत सहायक माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (महसूल) यांनी संबंधित अर्जदारास कळविले आहे. वास्तविक या कार्यालयात दाखल झालेला अपील अर्ज मा. अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडे या कार्यालयामार्फत सादर करणे आवश्यक होते व तसे अर्जदारास त्यानुसार कळविणे आवश्यक होते. मात्र तसे न करता सहायक माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (महसूल) यांनी अर्जदारास वरीलप्रमाणे उत्तर दिलेले आहे. त्यानुसार जरी अर्जदाराने या कार्यालयाकडे संपर्क साधला असता तर त्यांना आवश्यक माहिती पुरविता आली असती. मात्र अर्जदार यांनी संपर्क न साधता द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपीलार्थी श्री. अरुण गणपत भोवर यांनी सादर केलेला दिनांक २४/०९/२००९ चा विषयांकित अर्ज या कार्यालयात सादर केला त्यावेळी सार्वत्रिक विधानसभा निवडणूकीचे

काम चालू होते.   जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार कूर्ला व सहा जन माहिती अधिकारी हे सहा निवडणूक अधिकारी तथा नायब तहसिलदार (महसूल)हे अनुक्रमे सहायक निवडणूक अधिकारी म्हणून १५५- मुलुंड विधानसभा मतदार संघ व १६९-घाटकोपर विधानसभा मतदार संघात कार्यरत होते.   अर्जदारांना माहिती प्राप्त करुन घेणेसाठी दि. १६/१२/२००९ च्या पत्रान्वये  सहायक माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (महसूल) यांनी कळविले होते  मात्र अर्जदारांनी माहिती प्राप्त करुन न घेताच द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

तथापि अर्जदार यांनी मागणी केलेली माहिती या कार्यालयाचे पत्र क्रमांक तह/कु/मा.अ/कावि-६७/१० दि.९/३/२०१०  अन्वये अर्जदारास देणेत आली आहे. "

अपीलार्थींनी त्यांना सर्व माहिती प्राप्त झाल्याचे मान्य केलेले आहे.   विलंबाबाबतचा जन माहिती अधिका-यांचा खुलासा मान्य करण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक १८ मार्च, २०१०    राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५८५६/अपील क्रमांक
५४४५/०२

क्रमांक-मु.मा.आ/४५८४६/अपील क्रमांक
५४४६/०२

श्री. मेहमूद  मेहबूब शेख    -----अपीलार्थी
रुम नं. ७,  दोस्त मोहम्मद चाळ,
गौसिया मज्जिद मागे, नित्यानंद नगर,

घाटकोपर (पश्चिम) मुंबई ४०० ०८६.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता ----उत्तरवादी
आर सेंट्रल वॉर्ड, २ रा मजला,
मनपा मार्केट इमारत, स्वामी विवेकानंद रोड,
बोरीवली स्टेशनसमोर, बोरीवली (पश्चिम)
मुंबई ४०० ०९२.

२. जन माहिती अधिकारी
आर सेंट्रल वॉर्ड, २ रा मजला,
मनपा मार्केट इमारत, स्वामी विवेकानंद रोड,
बोरीवली स्टेशनसमोर, बोरीवली (पश्चिम)
मुंबई ४०० ०९२.

***---विवेचन---***

अपील क्रमांक ५४४५/०२ व ५४४६/०२ मध्ये दि. २४ फेब्रूवारी, २०१० रोजी दिलेल्या आदेशात अपीलार्थीस माहिती देण्याचे निर्देश देण्यात आले होते. तसेच मुदतीत माहिती न दिल्याबद्दल कारवाई का करण्यात येऊ नये याबाबतचा खुलासा दि. १८ मार्च २०१० रोजी प्रत्यक्ष सादर करण्याचे निर्देश जन माहिती अधिका-यांना दिले होते. त्याप्रमाणे खुलासा सादर केलेला आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या दिवशी बोरीवली येथील गोयल शॉपिंग सेंटरला जी आग लागली होती त्या आगीच्या संदर्भात त्यांच्या विभागाचे सर्व कर्मचारी अहोरात्र व्यस्त

असल्यामुळे ते येऊ शकले नव्हते असे सांगितले.

माहितीच्या बाबतीत अपीलार्थीस आता माहिती देण्यांत आलेली असून त्यांचे समाधान झाल्याचे पत्र दिलेले आहे ते आयोगाच्या निदर्शनास आणण्यात आले.

असे जरी असले तरी मुळतः माहिती देण्यात जन माहिती अधिकारी यांनी विलंब लावला ही वस्तुस्थिती शिल्लक राहतेच. त्यामुळे जन माहिती अधिका-यांवर नाममात्र कां होईना रु. २,५००/- ची शास्ती लादण्यात येत आहे. विलंबाबद्दल कुठचाहि खुलासा जन माहिती अधिकारी यांनी दिलेला नाही.

रु.२,५००/- ची शास्तीची रक्कम जन माहिती अधिकारी यांच्या १ मे, २०१० रोजी होणा-या पगारातून महापालिका आयुक्त यांनी वसूल करावी व ती शासनाने विहित केलेल्या लेखाशिर्षाखाली जमा करुन चलनाची प्रत व दिलेल्या निर्देशाप्रमाणे अहवाल आयोगास १५ मे, २०१० पर्यंत सादर करावा.

***---आदेश---***

दोन्ही अपीले मान्य करण्यात येत आहेत.

महापालिका आयुक्त यांनी जन माहिती अधिकारी यांचेवर लादण्यात आलेल्या रक्कम रु. २,५००/- ची शास्ती वसूलीची कार्यवाही करुन तसा अहवाल आयोगास सादर करावा.

(डॉ.सुरेश वि. जोशी),<br>
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक १८ मार्च, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५१४७/अपील क्रमांक ५४३५/०२

श्री. सुरेश चोकशी -----अपीलार्थी
बी-६५, उदाधी तरंग, जुहू रोड,
मुंबई ४०० ०४९.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक ----उत्तरवादी
सहकारी संस्था, मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला,
मुंबई ४०० ००१.

२. जन माहिती अधिकारी के/ वेस्ट वार्ड
सहकारी संस्था, मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला,
मुंबई ४०० ००१.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक २१/०९/२००९
सुनावणीचा दिनांक २३ फेब्रूवारी, २०१०.
अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थींनी दि. ३०/६/२००९ च्या अर्जान्वये खालील माहिती मागितली. मागितलेल्या माहितीचे सारांशरुपाने स्वरुप खालीलप्रमाणे ३

१. अपीलार्थींनी दि. १/१/२००५ रोजी आयुक्त, सहकारी संस्थ यांना दिलेल्या अर्जावरील कार्यवाहीचा तपशील.

२. उप निबंधक, के/वेस्ट वार्ड यांच्या दि. २५/४/२००६ रोजीच्या आदेशानुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा तपशील .

३. त्यांना देय असलेल्या रु. ८,३८,४३७/- परताव्याच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती.

४. सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या बाबतीत केलेल्या अन्य कार्यवाहीचा तपशील.

उपरोक्त माहिती त्यांना मिळू न शकल्याने त्यांनी दि. २०/८/२००९ रोजी प्रथम अपील केले. प्रथम अपील अर्जावर आदेश पारित न झाल्याचे कारण नमूद करुन त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणले की, अपीलार्थींच्या मूळ माहिती अर्जाला दि. २४/८/२००९ रोजी उत्तर देण्यात आले आहे. उत्तरात असेहि स्पष्ट करण्यात आले आहे की, मुद्दा क्र. १,२, व ५ ची माहिती त्यांच्या कक्षेत येत नाही. माहिती अर्जाचे अवलोकन केले असता जन माहिती अधिकारी यांची मुद्दा क्र. १,३, ५ बाबतची भूमिका सयुक्तिक आहे.

अपीलार्थींनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली आहे. अपीलार्थींचे प्रथम अपील दि. १५/९/२००९ रोजी फेटाळण्यात आले आहे. प्रथम अपीलावरील निर्णयाचे वाचन करता अपील रास्त कारणास्तव फेटाळल्याचे आयोगाचे मत आहे. सबब सदर प्रकरणी खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत.

<u>*----आदेश---*</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक १८ मार्च, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५८७८/अपील क्रमांक ५४३४/०२

श्रीमती. रमिला किलचंद -----अपीलार्थी
२ अ, सुनिता रिझ रोड, मलबार हिल,
मुंबई ४०० ०४६.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी ----उत्तरवादी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण ,
५ वा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व)
मुंबई ४०० ०५१.

२. जन माहिती अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण ,
५ वा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व)
मुंबई ४०० ०५१.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक १६/१२/२००९
सुनावणीचा दिनांक २३ फेब्रूवारी, २०१०.

अपीलार्थींचे प्रतिनिधी , जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थींनी दि. १५ जुलै २००९ च्या अर्जान्वये खालील इमारतींप्रकरणी भाडेकरुंच्या नांवाची यादी मागितली.

१. गिरधारी भवन (सीएसनं ५४१-गिरगांव प्रभाग )

२. किलाचंद हाऊस (सीएस नं४९६, ४९७,५०७- वि.पी.रोड)

३. पारेख बिल्डींग (सीएसनं ५३८- गिरगांव )

उपरोक्त माहिती प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी या कारणास्तव प्रथम अपील केले. (अपील अर्जावर दिनांक नाही ) या अर्जानंतर त्यांना गिरगांव प्रभागातील इमारतीशी निगडीत माहिती दि. ४/११/२००९ च्या पत्रान्वये पुरविण्यात आली. तथापि माहिती अपूरी व विहित मुदतीत पुरविली नाही हे कारण नमूद करुन त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी उत्तरवादींतर्फे असे सादर करण्यात आले की, त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती अपीलार्थींना पुरविण्यात आली आहे. इतर इमारतींची माहिती त्यांचेकडे असण्याची गरजहि नाही. अपीलार्थींना टेनंट लिस्ट हवी असेल तर ती त्यांनी त्या त्या इमारत मालकांकडून प्राप्त करुन घ्यावी. याबाबत आयोगाचे असे मत आहे की, अपीलार्थींनी मागितलेल्या माहितीपैकी जी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध होती ती त्यांनी अपीलार्थींना पुरविलेली आहे. यास्तव आयोगाचे खालीलप्रमाणे आदेश आहेत.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक १८ मार्च, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४६२२८/अपील क्रमांक ५५४०/०२
क्रमांक-मु.मा.आ/४६२२९/अपील क्रमांक ५५४१/०२
क्रमांक-मु.मा.आ/४६२३०/अपील क्रमांक ५५४२/०२

१.श्री. भूपेश एम. राठोड -----अपीलार्थी
२. श्री. चिराग भूपेश राठोड
११०७, मेकर चेंबर्स , वीर नरिमन पॉईंट,
मुंबई ४०० ०२१.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक ----उत्तरवादी

सहकारी संस्था, मुंबई (१) शहर, मल्होत्रा हाऊस,
६ वा मजला, फोर्ट , मुंबई ४०० ००१.

२. जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक डी वॉर्ड
सहकारी संस्था, मुंबई (१) शहर, मल्होत्रा हाऊस,
६ वा मजला, फोर्ट , मुंबई ४०० ००१.

***---विवेचन---***

अपीलांचे दिनांक २४ डिसेंबर, २००९
सुनावणीची तारीख १८ मार्च, २०१०.
अपीलार्थी , जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीना मॅनेजिंग कमिटीच्या सदस्यांची नांवे, पत्ते त्यांना दिलेले बॉन्ड्स, असोसिएटस मेंबर्सची यादी व पार्कींग लॉटसंबंधीची माहिती पाहिजे होती.

यातील पार्कींग लॉटची माहिती ही सोसायटी पातळीवरची असल्यामुळे अपीलार्थींनी ती सोसायटी कडून घ्यावी व त्यांना सोसायटीकडून माहिती मिळत नसल्यास सहकार कायद्याखाली त्यांनी असिस्टंट रजिस्ट्रार यांचेकडे तक्रार करुन प्राप्त करुन घ्यावी. कारण सोसायटी, सहकारी संस्था या माहितीचा अधिकार अधिनियमाखाली "जन प्राधिकरणे" नाहीत. मात्र असोसिएटस मेंबर्सची व बॉन्ड संबंधीची माहिती ही असिस्टंट रजिस्ट्रार कार्यालयामध्ये सहकार कायद्यानुसार असायला पाहिजे व यापैकी आता असोसिएटस मेंबर्सची माहिती द्यावयाची राहिलेली आहे ती माहिती अपीलार्थीना ७ दिवसांचे आत देण्यांत यावी असे निर्देश देण्यांत येत आहेत.

***---आदेश---***

तिन्ही अपीले निकाली काढण्यात येत आहेत.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक १८ मार्च, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक १४२१/०२

श्री. मोहन तोतराम सुर्यवंशी -----अपीलार्थी

रा. खानदेश गल्ली, तळोदा,
ता. तळोदा, जि. नंदूरबार.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी ----उत्तरवादी
नगर परिषद तळोदा, ता. तळोदा,
जि. नंदूरबार.

२. जन माहिती अधिकारी
तळोदा नगर परिषद कार्यालय,
ता. तळोदा, जि. नंदूरबार.

*---विवेचन---*

| | |
|---|---|
| माहिती अर्ज दाखल केल्याचा दिनांक | ३०/१/२००९ |
| जन माहिती अधिका-याने दिलेल्या आदेशाचा दिनांक | २६/२/२००९ |
| प्रथम अपिलीय प्राधिका-यांकडे दाखल अपीलाचा दिनांक | ७/३/२००९ |
| प्रथम अपिलीय प्राधिका-याने पारित केलेल्या आदेशाचा दि | १६/४/२००९ |

श्री. मोहन तोतराम सुर्यवंशी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये उपरोल्लेखित जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्याविरुध्द २/६/२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले होते. कलम १९(३) खालील या अपीलाची सुनावणी नवीन प्रशासकीय इमारत येथे जिल्हाधिकारी कार्यालय सभागृह धुळे जि. धुळे येथे आयोजित करण्यात आली होती. या सुनावणीसाठी अपीलार्थी व संबंधित जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित होते.

विचारणा केलेल्या माहितीचा तपशिल - अपीलार्थीनी दि. ३०/१/२००९ च्या अर्जाद्वारे १. सर्वश्री सावरे व चौधरी यांच्या दि. १/४/९९ ते २०/१२/०८ पर्यंतच्या सेवा पुस्तकातील नोंदीची झेरॉक्स प्रती (२) धुळे येथील औद्योगिक न्यायालयातील तक्रारीची अंतिम

निकालाची प्रत (३) पदोन्नतीचे रद्द झालेल्या ठरावाच्या निकालाची प्रत. (४) मुख्याधिकारी यांचे पगार कपातीचे आदेश प्रत व पगार पूर्ववत केल्याची प्रत.

जन माहिती अधिका-याचे उत्तर : जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे दि. २६/२/२००९ च्या पत्राद्वारे सदर माहिती ही एखादया व्यक्तीची वैयक्तिक स्वरुपाची असल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ कलम ८ मधील (ञ) (ज) नुसार देता येत नाही असे अपीलार्थीस कळविले. सदरची माहिती न मिळाल्यामुळे अपीलार्थीनी दि. ७/३/२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले.

प्रथम अपिलीय प्राधिका-याचे आदेश : अपीलार्थी हेतुपुरस्सर त्रास देण्याच्या हेतूने वैयक्तिक कर्मचा-यांची माहितीची मागणी करतात असे त्यांचे म्हणणे होते. तरीही ती माहिती नगरपालिका शाखा नंदूरबार यांच्याकडून उपलब्ध करुन घेतला येईल. (२) औद्योगिक न्यायालय धुळे यांचे कोर्टात अर्ज करुन तक्रार मिळाल्याची प्रत मिळविता येईल (३) तसेच काही कर्मचा-यांच्या पदोन्नत्या व पदावनत्या , त्यांचे वेतन निश्चिती वगैरे माहिती अपीलार्थीस दि. १६/४/२००९ च्या सविस्तर विवेचनाद्वारे कळविली आहे. काही माहिती प्रादेशिक संचालक नाशिक यांच्याकडून मार्गदर्शन घेऊन अपीलार्थीस त्यांच्या प्रती देण्यात येईल असे सूचित केले आहे. तरीही अपीलार्थीनी द्वितीय अपील सादर केले.

सुनावणभ्च्या वेळी अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी तिघेही अनुपस्थित होते. अपीलार्थीनी मागितलेली वैयक्तिक माहिती त्रयस्थ व्यक्तीशी संबंधित असल्याने अधिनियम २००५ मधील कलम ११(१) नुसार सदर माहिती प्रकट करण्यासाठी सदर व्यक्तीचे निवेदन विचारात घेऊनच अधिनियमातील तरतुदीप्रमाणे त्याप्रमाणे माहिती द्यावयाची किंवा नाही हे ठरविले जाते. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस सदर माहिती देण्यापूर्वी त्या व्यक्तींचे निवेदन घेऊनच माहिती देता येईल की नाही हे पहावे. व त्याप्रमाणे निर्णय प्रक्रियेची दिशा ठरवावी. या परिस्थितीत मी खालील आदेश पारित करीत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि.

जोशी),

दिनांक १८ मार्च, २०१० राज्य मुख्य माहिती

आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक

१५२३/०२

श्री.मो.अन्वर अ मजीद -----अपीलार्थी
स.नं. ३७:२, प्लॉट नं. ४, अन्सार कंपाऊंड,
अपना सुपर मार्केट जवळ, आग्रा रोड,
मालेगांव. ता. मालेगांव, जि. नाशिक.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा शहर अभियंता ----उत्तरवादी
मालेगांव महानगरपालिका,
ता. मालेगांव, जि. नाशिक.

२. जन माहिती अधिकारी
मालेगांव महानगरपालिका कार्यालय,
मालेगांव, जि. नाशिक.

***---विवेचन---***

अपीलांचा दिनांक १८/९/२००८
सुनावणीचा दिनांक २१/१२/२००९

अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी श्री. मो.अन्वर अ.मजीद यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १८/९/२००८ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल , जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक जि. नाशिक येथे दि. २१/१२/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी व अपीलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ७/६/०८ रोजी अर्ज करुन अपीलार्थी हे महानगरपालिकेचा पंजीबध्द बांधकाम ठेकेदार असून अपीलार्थीनी त्यांचे कामाच्या संदर्भात अनेक अर्ज देऊनही मनपाने अर्जावर वेळोवेळी काय कारवाई केली याची माहिती मिळावी.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस असे कळविले की, सुवर्ण जयंती शहर रोजगार योजना ही मा. जिल्हाधिकारी, नाशिक यांच्या मान्यतेने राबविली जात होती त्याअंतर्गत मंजूर काम अपीलार्थीस मिळाले होते. परंतु शासनाकडून निधी उपलब्ध झालेला नसल्याने कामाची लाईन आऊट दिलेली नव्हती व त्यामुळेच अपीलार्थीस निधी प्राप्त होईपर्यत कामाची रुपरेषा देता आली नाही असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे होते.

अपीलार्थीस माहिती न मिळाल्याने त्यांनी प्रथम अपील दाखल केले. त्यास अनुसरुन प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी त्यांच्या दि. ८/८/२००८ च्या निर्णयात असे नमूद केले आहे की, अपीलार्थीस दि. ३१/३/२००६ ते २१/५/२००८ चे अर्जावर कार्यवाही केल्याबद्दल अपीलार्थींना लेखी कळविले नाही हे सहा.जन माहिती अधिकारी यांनी कबूल केले. परंतु माहिती प्रश्नोत्तर स्वरुपाची असल्याने त्यावर कार्यवाही करण्यास आली नाही असे दिसून येते. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना आदेश देऊन शासकीय विभागाकडे

पाठपुरावा करावा व करण्यांत येणा-या कार्यवाहीबाबत अपीलार्थीस अवगत करावे असे ठरले.

निधी उपलब्ध नाही. अतिक्रमध झाले आहे. बांधकाम विभाग व इमारत विभाग यांच्या कर्मचा-यांत ताळमेळ नाही या कारणास्तव द्वितीय अपील दाखल केले. द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी प्रथम अपिलीय प्राधिकारी , जन माहिती अधिकारी व अपीलार्थी उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी असे निदर्शनास आले की, जन माहिती अधिकारी यांनी संपूर्ण माहिती दिली आहे व अपीलार्थींनी तसे लिहूनहि दिले आहे. मात्र त्यांच्या हाताखालच्या अधिका-यांनी कामाच्या बाबतीत त्रास दिला असे अपीलार्थीचे म्हणणे आहे. याबाबत त्यांनी हवी तर महापालिका आयुक्तांकडे तक्रार करावी. प्रत्यक्षात अपीलार्थीस माहिती मिळाल्याचे याप्रकरणी दिसून येत असल्याने मी खालील प्रमाणे आदेश देत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक १८ मार्च, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

क्रमांक-मु.मा.आ/४६२०१/अपील क्रमांक ५५४४/०२

श्री. सदानंद सिताराम चव्हाण -----अपीलार्थी
२०१, बी, बाळगोविंदाची चाळ, खो.नं. १५.,

डॉ. दादासाहेब भडकमकर मार्ग, ग्रँट रोड,
मुंबई ४०० ००७.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी ----उत्तरवादी
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ
गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१.

२. जन माहिती अधिकारी
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ
गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१.

*---विवेचन---*

अपीलांचे दिनांक ३० डिसेंबर, २००९
सुनावणीची तारीख १८ मार्च, २०१०.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस बाळगोविंद सहकारी गृह.संस्था यास म्हाडा अधिनियम १०३ ब नुसार व्हावयाच्या कारवाईच्या बाबतीतली माहिती पाहिजे होती. याबाबतीत ॲक्वीझीशनच्या प्रस्तावाच्या बाबतीतली आदेशाची प्रत देण्यात आलेली आहे. या आदेशानुसार ॲक्वीझ ीशन प्रोसिडिं बंद करण्यात आलेल्या होत्या. तद्वतच अशा पध्दतीचे ॲक्वीझीशनचे प्रस्ताव अंतिम करण्यास सुप्रीम कोर्टाने स्टे ऑर्डर सुध्दा दिलेली आहे.

थोडक्यात यासबंधीत कांहीही प्रगती झालेली नाही अशीच माहिती आहे. यासंबंधातील नस्ती अपीलार्थीनी पाहिलेली आहे व त्यांना पुन्हा ती पहायची असल्यास ती पुन्हा पाहून त्यांना
आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती प्राप्त करुन घेता येऊ शकतील.

*---आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि.

जोशी),

दिनांक  १९ मार्च, २०१०                                        राज्य मुख्य माहिती

आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४६२३७/अपील क्रमांक ५५४३/०२**

**श्री. एम. पी. भोसले -----अपीलार्थी**
**५१/११२०, आझादनगर ३,**
**विरा.देसाई रोड, अंधेरी (पश्चिम) मुंबई ५८**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक ----उत्तरवादी**
**सहकारी संस्था,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१.**

**२. जन माहिती अधिकारी**
**सहकारी संस्था,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१**

***---विवेचन---***

**अपीलांचे दिनांक २० डिसेंबर, २००९**
**सुनावणीची तारीख १८ मार्च, २०१०.**
**अपीलार्थी उपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित.**

**अपीलार्थीस पुढील माहिती पाहिजे होती.**

१. जा.क्र.उपनि/संस/मुम/४९७/२००७ उपनिबंधक सहकारी संस्था यांनी मुंबई गृहनिर्माण मंडळास लिहिलेल्या पत्राची प्रमाणित छायांकित प्रत देण्यात यावी.

२. मिळकत व्यवस्थापक २, मुंबई गृहनिर्माण मंडळ, बांद्रा, मुंबई दि. ३/२/२००७ रोजी उपनिबंधक सहकारी संस्था यांना लिहिलेल्या पत्राची छायांकित प्रत देण्यात यावी.

३. दि.२३/४/२००७ रोजी सुनावणी दरम्यान सचिव कृपासागर सहकारी संस्था यांनी दाखल केलेल्या कागदपत्राच्या प्रती देण्यात याव्यात.

४. जा.क्र.उपनि/संस/मुंमं/४९७/२००७ पत्रान्वये कृपासागर सोसायटी विरुध्द केलेल्या कारवाईची माहिती व अंतिम निर्णय झाला असल्यास त्याची प्रत देण्यात यावी.

५. माझ्या दि. ८/१/२००७ च्या अर्जानुसार काय कारवाई केली त्याची माहिती व कारवाई बंद केली असल्यास त्या आदेशाची प्रमाणित प्रत देण्यात यावी.

अपिलीय अधिका-यांनी दि. ३०/९/२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांनी १५ दिवसांत माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिले होते. पण त्याची अजूनहि अमलबजावणी झालेली नाही.

तसेच सुनावणीच्या वेळेला सुध्दा जन माहिती अधिकारी उपस्थित राहिले नाहीत. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्यावर मुदतीत माहिती न दिल्याबद्दल त्यांचेवर रु.१०,०००/- ची शास्ती लादण्यात येत आहे. ही शास्तीची रक्कम दि. १ मे, २०१० व १ जून, २०१० रोजी होणा-या पगारातून सम प्रमाणात वसूल करुन ती शासनाने विहित केलेल्या लेखाशिर्षाखाली जमा करुन चलनाची प्रत व पूर्तता अहवाल अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांनी आयोगास पाठवावा.

तसेच अपिलीय अधिका-यांनी, जन माहिती अधिका-यांकडून त्यांच्या आदेशाची अमलबजावणी हे आदेश मिळाल्यापासून ७ दिवसात करुन घ्यावी.

***---आदेश---***

अपील मान्य करण्यात येत आहे.
अपिलीय अधिकारी यांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि.

जोशी),
दिनांक १९ मार्च, २०१० राज्य मुख्य माहिती
आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४६२२४/अपील क्रमांक ५५३९/०२

श्री. ओनियल ॲन्थोनी किणी -----अपीलार्थी
५३, कालिना कोलोव्हरी व्हिलेज,
सांताक्रुज (पूर्व) मुंबई ४०० ०९८.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा उप जिल्हाधिकारी (अपीले) ----उत्तरवादी
मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय,
प्रशासकीय इमारत, १० वा मजला, शासकीय वसाहत,
वांद्रे (पूर्व) मुंबई ४०० ०५१.

२. जन माहिती अधिकारी
मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय,
प्रशासकीय इमारत, १० वा मजला, शासकीय वसाहत,

वांद्रे (पूर्व) मुंबई ४०० ०५१.

***---विवेचन---***

अपीलांचे दिनांक ४ जानेवारी , २०१०
सुनावणीची तारीख १८ मार्च, २०१०.
अपीलार्थी उपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित.

अपीलार्थीस ईस्ट इंडियन कम्युनिटीला इतर मागास वर्गीय प्रमाणपत्र मिळण्याच्या पध्दतीबाबत माहिती पाहिजे होती. त्यांना वेळोवेळी प्राप्त झालेल्या शासन निर्णयानुसार जातीचे दाखले देण्यात येतात असे उत्तर देण्यात आलेले आहे. हे योग्य उत्तर नाही.

जातीचे दाखले देत असतांना ज्या ज्या शासन निर्णयानुसार किंवा अधिनियमाचा आधार घेण्यात येतो त्याचा उल्लेख उता-यात करण्यात यावा व अपीलार्थीस आवश्यक असल्यास त्याच्या प्रती ते शुल्क भरुन प्राप्त करुन घेऊ शकतील.

मुळ प्रमाणपत्रासाठी अर्ज कोणाकडे करायचा व अपीलाची काय पध्दत आहे यासंबंधीची स्पष्ट माहिती अपीलार्थीस देण्यात यावी.

***---आदेश---***

अपील मान्य करण्यात येत आहे.
जन माहिती अधिकारी यांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि.
जोशी),
दिनांक १९ मार्च, २०१० राज्य मुख्य माहिती
आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४६२२६/अपील क्रमांक ५५३७/०२**

**त्रिवेणी अण्णासाहेब माने व इतर -----अपीलार्थी**
**केअर ऑफ लेझर फोटो स्टुडिओ,**
**बासुरी बार शेजारी, बरकत अली रोड,**
**वडाळा (पूर्व) मुंबई ४०० ०३७.**

**विरुध्द**

१. अपिलीय अधिकारी तथा उप जिल्हाधिकारी (अति/नि) ----उत्तरवादी
धारावी विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय मुंबई
ओल्ड कस्टम हाऊस, फोर्ट, मुंबई .

२. जन माहिती अधिकारी
धारावी विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय मुंबई
ओल्ड कस्टम हाऊस, फोर्ट, मुंबई .

---*विवेचन*---

अपीलांचे दिनांक १४ डिसेंबर, २०१०
सुनावणीची तारीख १८ मार्च, २०१०.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसाठी पात्रता अपात्रता ठरवित असतांना ज्या शासकीय निर्णयाच्या/ अधिनियमाच्या किंवा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने जारी केलेल्या निर्णयांचा आधार घेतला जात असेल त्याची संपूर्ण माहिती अपीलार्थीस द्यावी. तसेच पात्रता अपात्रता याविषयी जी अपीलाची पध्दत असेल त्याच्या रेझोल्युशनची प्रत अपीलार्थीस देण्यात यावी, म्हणजे अपीलार्थी योग्य प्रकारे आपले प्रकरण योग्यत्या प्राधिकरणाकडे नेऊन त्याबाबत दाद मागू शकतील.

---*आदेश*---

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि.
जोशी),
दिनांक १९ मार्च, २०१० राज्य मुख्य माहिती
आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले
अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५८५१/अपील क्रमांक

५४४९/०२

श्री.अब्दुल रऊफ अजमल अली खान -----अपीलार्थी
रुम नं. १८/२२, रियासत चाळ, संत सावता मार्ग,
नारियल वाडी, मुंबई ४०० ०१०.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी ----उत्तरवादी
सहायक मनपा आयुक्त यांचे कार्यालय,
इ वार्ड ,१ ला मजला, ई वार्ड इमारत,
१० शेख हफिझुद्दीन मार्ग, भायखळा, मुंबई ८

२. जन माहिती अधिकारी
सहायक मनपा कार्यालय, इ वार्ड , १ ला मजला,
ई वार्ड इमारत, १० शेख हफिझुद्दीन मार्ग,
भायखळा, मुंबई ४०० ००८.

*---विवेचन---*

दि. २४ फेब्रूवारी, २०१० रोजी अपील क्र. ५४४९ मधील आदेशाने जन माहिती अधिकारी सर्व्हेलन्स डिपार्टमेंट यांनी अपीलार्थीस ज्या सिमेल्ट्री नं ६९ चा कॅडेस्ट्रल नंबर काय आहे याची माहिती देण्याचे निर्देश देण्यांत आले होते. तसेच आतापर्यंत ही माहिती न दिल्याबद्दल शास्तीची कारवाई का करण्यात येऊ नये याची कारणे दाखवा नोटीस सुध्दा देण्यात आली होती.

सुनावणीच्या वेळेला मुळ जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलार्थीस उत्तर देतांना सर्व्हेलन्स विभाग असा उल्लेख केला आहे तो चुकीने झालेला आहे व तो सर्व्हेक्षण विभाग असा उल्लेख असावयास पाहिजे होता.

सर्व्हेक्षण विभागाकडे चौकशी केली असता अपीलार्थीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झ ाालेला नाही. मात्र सुनावणीच्या वेळेला सर्व्हेक्षण विभागाचे जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, नकाशावरुन आता अपीलार्थीस जी सिमेन्ट्री अभिप्रेत आहे, त्याची खात्री करुन घेतलेली आहे व अपीलार्थीस हवी ती माहिती २ दिवसांत देण्यात येईल असे सांगितले. त्यामुळे सर्व्हेक्षण विभागास मुळ अर्ज न मिळाल्यामुळे त्यांचेविरुध्द शास्तीचे आदेश नाहीत. मात्र ई विभाग या कार्यालयाने ज्या विभागाकडे माहितीचा अर्ज पाठवावयास पाहिजे होता तो योग्य प्रकारे न पाठविल्याबद्दल त्या ई विभागाच्या जन माहिती अधिका-यांना समज देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील अंतिमतः निकाली काढण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक १९ मार्च, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक १४६१/०२

श्री.डॉ. सुधाकर शिवराम पवार ----अपीलार्थी
धन्वंतरी, ७३५, एम.एच.बी. कॉलनी,
सातपुर, नाशिक, ता.जि. नाशिक -७.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त ----उत्तरवादी
धर्मादाय आयुक्त कार्यालय, नाशिक, जि. नाशिक.

२. जन माहिती अधिकारी
धर्मादाय आयुक्त कार्यालय, नाशिक, जि. नाशिक.

*---विवेचन---*

अपीलांचा दिनांक २६/७/२००७
सुनावणीचा दिनांक २१/१२/२००९

अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी श्री. डॉ. सुधाकर शिवराम पवार यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २६/७/२००७ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक, जि. नाशिक येथे दि. २१/१२/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी व अपीलार्थी अनुपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ३/२/२००७ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली आहे.

१. भारतीय स्टेट बँक गंगापूर शाखेत खाते उघडतांना संस्थेने बँकेस कार्यकारी मंडळाची यादी व झालेला ठराव याची प्रत .

२. हॉस्पीटलची इमारत हॉस्पीटल बंद करुन भाडयाने दिल्याची प्रत.

३. संस्थेने स्थावर/जंगम मालमत्ता विकलेली आहे त्याची प्रत.

जन माहिती अधिकारी यांनी सदर संस्थांची मागितलेली माहिती ही खाजगी स्वरुपाची असल्याने त्यांचा अर्ज दि. ०/२/२००७ रोजी सदर संस्थेकडे वर्ग केला व त्याची प्रत अपीलार्थीस माहितीसाठी दिलेली आहे.

माहिती मिळाली नाही म्हणून अपीलार्थीनी दि. १३/३/२००७ रोजी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय प्राधिकारी सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय यांनी दि. २९/५/२००९ रोजी सुनावणी घेतली त्यावेळी अपीलार्थी सुनावणीस हजर राहिले. त्यावेळी त्यांनी संस्थेच्या गैरव्यवहाराचे कथन केले. अशा वेळी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी असे निदर्शनास आणले की, संस्थेने अपीलार्थीस माहिती पुरविली नाही हे तसे सत्य असले तरी अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार

खाजगी संस्थेकडे माहिती मागणे किंवा त्यांना दंड करणे हे नियमात नसल्याने अशा प्रकरणावर आयोग कोणतीही कार्यवाही करु शकत नसल्याने त्यांचे अपील नाकारण्यांत आले.

तरीही अपीलार्थींनी द्वितीय अपील दाखल केले. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी गैरहजर होते. अपीलार्थींनी अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीपैकी जी माहिती सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयाकडे पब्लिक ट्रस्ट कायद्याखाली संस्थेने देणे बंधनकारक आहे ती त्यांना देण्यास तयार आहे. तसेच आता विश्वस्त संस्था "जन प्राधिकरणे "नाहीत हा मा. उच्च न्यायालयाचा निर्णय लक्षात घेता अपील निकाली काढण्यात येत आहे. मात्र जन माहिती अधिकारी यांनी त्यांचेकडील सर्व माहिती अपीलार्थीस द्यावी.

*---आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि.

जोशी),

दिनांक १९ मार्च, २०१० राज्य मुख्य माहिती

आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४६२२५/अपील क्रमांक ५५३८/०२

श्री. नाईजेल गोन्सालवीस -----अपीलार्थी
५, सोनाले हाऊस, खंबाटा लेन,
भायखळा (पूर्व) मुंबई ४०० ०२७.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य अभियंता ----उत्तरवादी
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,
सोनावाला इमारत, शिंदेवाडी, दादर (पूर्व)
मुंबई ४०० ०१४.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता ई-१ विभाग
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,
सोनावाला इमारत, शिंदेवाडी, दादर (पूर्व)
मुंबई ४०० ०१४.

*---विवेचन---*

अपीलांचे दिनांक २४ डिसेंबर, २०१०
सुनावणीची तारीख १८ मार्च, २०१०.
अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस बिल्डींग क्र.२८ खंबाटा लेन, सोनाले हाऊस च्या इमारतीच्या दुरुस्ती विषयीची माहिती पाहिजे होती व अपीलार्थीस ही माहिती देण्यांत आलेली आहे. मात्र त्यांचे समाधान झाले नाही.

विशेष करुन आर्किटेक्टचरबरोबर झालेले ॲग्रीमेंट, मोजमापे, बिल्डींगचे स्ट्रक्चरल रिपोर्ट आणि कामाची बोली यासंदर्भातील माहितीने त्यांचे समाधान झालेले नाही असे त्यांनी सांगितले.

त्यामुळे दोन्ही पक्षाशी चर्चा करुन असे ठरविण्यात आले की, अपीलार्थी हे शनिवार दि.२० मार्च, २०१० रोजी जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात दुपारी १२-०० वाजता जातील व या मुद्दयांबाबतची जन माहिती अधिकारी माहिती काढून तयार ठेवतील व अपीलार्थी त्याची तपासणी करुन त्यांना हवी असणारी माहिती शुल्क भरुन प्राप्त करुन घेतील.

---*आदेश*--

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक १९ मार्च, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४६२०४/अपील क्रमांक ५५५१/०२

श्री. एम.एस.एन.पिल्लई -----अपीलार्थी
ब-६, दासवानी को.ऑप.हौ.सोसायटी लि.
सेंट लुईस कॉन्व्हेंट स्कूल, चारबंगला,
अंधेरी (पश्चिम) मुंबई ४०० ०५३.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक ----उत्तरवादी
सहकारी संस्था-३, तळमजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे (पूर्व) मुंबई ४०० ०५१.

२. जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक
सहकारी संस्था के/वेस्ट तळमजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे (पूर्व) मुंबई ४०० ०५१.

---*विवेचन*---

अपीलांचे दिनांक २१ डिसेंबर, २०१०
सुनावणीची तारीख १९ मार्च, २०१०.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

सुनावणीच्या वेळेस अपीलार्थीस हे स्पष्ट करण्यात आले की, नुकतेच कांही हायकोर्टांनी तसेच मुंबई हायकोर्टाने दिलेल्या निर्णयानुसार सहकारी गृहनिर्माण संस्था या "जन प्राधिकरणे" नाहीत. म्हणजेच सहकारी गृहनिर्माण संस्थेकडून माहितीचा अधिकार

अधिनियमांतर्गत माहिती मागता येणार नाही. मात्र सदस्य गृहनिर्माण संस्थेकडून महाराष्ट्र को.ऑप.सोसायटी ॲक्ट कायद्याच्या कलम ३२ अन्वये माहिती मागू शकतात.

जर अशा प्रकारे माहिती सदस्य अर्जदारास मिळाली नाही तर त्याबाबती सहकार कायद्याअंतर्गत संबंधित उपनिबंधक यांच्याकडे तक्रारहि करु शकतात, जेणेकरुन उपनिबंधक हे ती माहिती अर्जदारास मिळवून देऊ शकतील. ही सर्व कारवाई सहकार कायद्याअंतर्गत व्हावयाची आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

अपीलार्थींनी त्यांच्या माहितीची गरज वरील पध्दती अमलात आणून पूर्ण करुन घेणे हे इष्ट राहिल.

(डॉ.सुरेश वि.

जोशी),

दिनांक १९ मार्च, २०१० राज्य मुख्य माहिती

आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४६२०३/अपील क्रमांक ५५५०/०२

श्री. रवि नायर -----अपीलार्थी
फ-४, सावळा चाळ, चिमटपाडा,
मरोळ नाका, अंधेरी (पूर्व) मुंबई ४०० ०५९.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता ----उत्तरवादी
एम.एम.आर.डी.ए. , वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स,
वांद्रे (पूर्व) मुंबई ४०० ०५१.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
एम.एम.आर.डी.ए. , वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स,
वांद्रे (पूर्व) मुंबई ४०० ०५१.

*---विवेचन---*

अपीलांचे दिनांक २६ डिसेंबर, २०१०

सुनावणीची तारीख  १९ मार्च, २०१०.
अपीलार्थी ,   जन माहिती अधिकारी  व अपिलीय अधिकारी  उपस्थित.

अपीलार्थीस मरोळ नाका अंधेरी (पूर्व) येथील विद्यमान ४५० एमएम आणि ३०० एमएम डाय वॉटर मेन क्रॉस कनेक्शन बाबत कार्यकारी अभियंता, मुंबई महानगरपालिका यांनी जे दि. २०/२/२००९ रोजी पत्र  एम.एम.आर.डी.ए. ला पाठविले होते.   त्यासंदर्भात त्यांनी मागितलेली परवानगी कोण देणार व सदरील पत्रावरील कारवाईची सद्यःस्थिती याची माहिती विचारली होती.

अपीलार्थीस त्यांचे प्रश्न स्पष्ट होत नाहीत,   मात्र सदरील प्रश्न हे मुंबई महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाशी चर्चिल्या जाऊ शकतील असे कळविले.  प्रथम अपिलीय आदेशात मात्र प्रथम अपिलीय अधिकारी यांनी,  जन माहिती अधिकारी यांना स्पॉट निरीक्षण घेण्याचे दृष्टीने  अपीलार्थी, मुंबई महानगरपालिका  व जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी सयुक्तिक पाहणी करावी  व सध्या तेथे चालू असलेल्या मेट्रो रेल्वे  व रस्त्यांची कामे लक्षात घेता अशी परवानगी कशी देता येईल हा मुद्दा तपासण्यात यावा असे निर्देश देऊन अपीलार्थीनाहि त्याप्रमाणे  १५ दिवसांत कळविण्याचे निर्देश देण्यांत आले होते.   मात्र अपीलार्थीस यासंदर्भात कांहीही कळविण्यात आले नाही म्हणून त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील सादर केलेले आहे.

सुनावणीच्या वेळेला हे स्पष्ट झाले की,  कार्यकारी अभियंता यांचे प्रतिनिधी उप अभियंता , अपीलार्थी  व महापालिकेचे अधिकारी यांनी स्थळनिरीक्षण केले त्यावेळेला महापालिकेने प्रत्यक्षात कामाला सुरुवात केलेली होती व आता आजघडीस ते काम पूर्ण झालेले आहे.   अपीलार्थी स्वतः स्थळनिरीक्षणाच्या वेळेस प्रत्यक्ष हजर होते  याचा अर्थ त्यांना नंतर लेखी कळवू नये किंवा माहिती देऊ नये असा होत नाही.   स्थळनिरीक्षणानंतर जो अहवाल उप अभियंता यांनी  कार्यकारी अभियंता तथा जन माहिती अधिकारी यांना दिला असेल त्याच्या बेसिसवर अपीलार्थीस माहिती देणे हे आवश्यकच होते.  तसेच सुरुवातीसहि

मुदतीत माहिती देण्यात आपली जबाबदारी पार पाडण्यात जन माहिती अधिकारी यांनी हलगर्जीपणा दाखविला आहे त्याबद्दल त्यांचेवर रु. ५,०००/- ची शास्ती लादण्यात येत आहे. ही शास्ती जन माहिती अधिकारी यांच्या १ मे २०१० रोजी होणा-या पगारातून एम.एम.आर.डी.ए. प्रशासनाने वसूल करावी व शासनाने विहित केलेल्या लेखाशिर्षाखाली जमा करुन तसा अहवाल आयोगास १५ मे, २०१० पर्यंत पाठवावा.

***---आदेश---***

अपील मान्य करण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी परवानगीबाबत जी सद्य:स्थिती असेल ती अपीलार्थीस त्वरित कळवावी.

प्राधिकरण प्रशासनाने शास्ती वसूलीची कारवाई करुन आयोगास मुदतीत कळवावे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक १९ मार्च, २०१० राज्य मुख्य माहिती
आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले
अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४६९४९/अपील क्रमांक
५५५४/०२

श्री. हरभजनसिंग तूर -----अपीलार्थी
फ्लॅट नं. ४०३, अ/२/८, दर्शन को.ऑप.हौ.सो.
गोकूळधाम गोरेगांव (पूर्व) मुंबई -- ४०००६३

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य अभियंता (इ.प्र.) ----उत्तरवादी
पश्चिम उपनगरे २, महानगरपालिका इमारत,
सी विंग, संस्कृती कॉम्प्लेक्स, ९० फूट डी.पी. रोड,
कांदिवली (पूर्व) मुंबई ४०० १०१.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इ.प्र.)
पश्चिम उपनगरे २, महानगरपालिका इमारत,
सी विंग, संस्कृती कॉम्प्लेक्स, ९० फूट डी.पी. रोड,
कांदिवली (पूर्व) मुंबई ४०० १०१.

*---विवेचन---*

अपीलांचे दिनांक २६ फेब्रूवारी , २०१०
सुनावणीची तारीख १९ मार्च, २०१०.
अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी उपस्थित.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. २७ जानेवारी, २०१० रोजीच्या आदेशाने क्रमांक CHE/4337/BP(WS)/AP ही नस्ती सापडून येत नाही, ती वगळता इतर सर्व नस्त्यांची तपासणी अपीलार्थीस देण्यांत आलेली आहे, मात्र ही नस्ती शोधण्यासाठी जारीने प्रयत्न करावा व त्यासाठी संबंधित कार्यालयाने एक परिपत्रक काढून चुकीने त्यांच्या विभागाकडे ही नस्ती आली आहे काय याचा इतर विभागाकडे शोध घेऊन अपीलार्थीस कळविण्याचे जन माहिती अधिकारी यांना निर्देश देण्यांत आले होते.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळेस सांगितले की, अशा प्रकारचे परिपत्रक काढण्यात आलेले आहे. मात्र अजूनपर्यंत नस्तीची ठाव-ठिकाणा लागलेला नाही. यासंबंधी पुढील १५ दिवसांत जारीने शोध घेण्यात यावा व अपीलार्थीस माहिती देण्याचा प्रयत्न करण्यात यावा. नस्ती नच सापडल्यास योग्य त्या प्रशासकीय कारवाईसाठी ही बाब महापालिका आयुक्तांच्या निदर्शनास आणावी.

*---आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक २० मार्च, २०१० राज्य मुख्य माहिती
आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४६२०२/अपील क्रमांक ५५५५/०२

श्री. रुपचंद लौंगाणी -----अपीलार्थी
६, फाऊंटन हेड को.ऑप.हौ. सो.लि.
३ रा मजला, १३३, एस.व्ही.रोड, खार, मुंबई ४०० ०५२.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा विधी अधिकारी ----उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय,
विधी विभाग, २ रा मजला, मनपा मार्ग , मुंबई ४०० ००१.

२. जन माहिती अधिकारी
विधी अधिकारी यांचे कार्यालय,
बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय,
विधी विभाग, २ रा मजला, मनपा मार्ग , मुंबई ४०० ००१

*---विवेचन---*

अपीलांचे दिनांक २१ डिसेंबर , २०१०
सुनावणीची तारीख १९ मार्च, २०१०.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून आले की, अपीलार्थीस योग्यती माहिती देण्यांत आलेली आहे.

अपीलार्थीचे म्हणणे असे होते की, श्रीयुत लाड यांची नेमणूक दि. २७/४/२००७ रोजी करण्यात आलेली आहे असे त्यांना उत्तर देण्यांत आलेले आहे ते चुकीचे आहे. पण

दिलेले उत्तर चुकीचे कसे आहे हे अपीलार्थी पटवून दाखवू शकले नाहीत. मात्र जन माहिती अधिकारी यांनी ज्या रेकॉर्डवरुन ती तारीख घेतली असेल त्या रेकॉर्डची फोटोप्रत अपीलार्थीस देण्याचे निर्देश
देण्यांत आले.

अपीलार्थींचा मुद्दा त्यांना उशिरा माहिती देण्यांत आली म्हणून जन माहिती अधिकारी यांचेवर शास्तीची कारवाई करावी.

याबाबत जन माहिती अधिकारी यांनी त्यांचा जो खुलासा दिलेला आहे त्यात त्यांच्याकडे दि. २७/४/२००९ पासून श्रीयुत देशपांडे जन माहिती अधिकारी आणि डेप्यूटी लॉ ऑफिसर यांचा अतिरिक्त कार्यभार सुध्दा देण्यांत आलेला आहे. ते माहिती अधिकारातील अर्ज हे नेहमीच मुदतीत निकाली काढण्याचा प्रयत्न करीत असतात व दि. ४/८/२००९ ते ९/१०/२००९ यादरम्यान एकूण २६ माहिती अर्जांबाबत कारवाई केलेली आहे, असेहि त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले.

जन माहिती अधिकारी यांचेकडे असलेला दोन विभागांचा कार्यभार सांभाळण्याचा मुद्दा विचारात घेता शास्ती जरी लावायची नाही असे आयोगाने ठरविले असले तरी जन माहिती अधिका-यांनी माहिती अधिकारांतील अर्ज वेगळयाने व्यवस्थित नोंद करुन ठेवल्या जातील व मुदतीत माहिती दिली जाईल याकडे विशेष लक्ष द्यावे असे निर्देश देण्यांत आले.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक २० मार्च, २०१०　　　　　　　　राज्य मुख्य माहिती
आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५७५९/अपील क्रमांक ५५५६/०२

श्री. गणेश किसनराव कोपले -----अपीलार्थी
४/६६, गितांजली समता नगर,
कांदिवली (पूर्व) मुंबई ४०० १०१.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य अधिकारी ----उत्तरवादी
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१.

२. जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक क्र.२
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१.

*---विवेचन---*

अपीलांचे दिनांक ८ डिसेंबर , २०१०
सुनावणीची तारीख १९ मार्च, २०१०.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. २८/१०/२००९ रोजीच्या आदेशात अपीलार्थीस १५ दिवसांच्या आत माहिती देण्याचे आदेश दिलेले होते. मात्र अपीलार्थीस अजूनहि माहिती मिळालेली नाही.

विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी दि. ५/३/२०१० रोजी कार्यभार स्वीकारला आहे. त्यांनी ४ दिवसांचे आंत अपीलार्थीस माहिती द्यावी असे निर्देश देण्यांत आले.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक श्रीयुत सुर्यकांत तेली यांनी अपीलार्थीस मुदतीत माहिती न दिल्याबद्दल त्यांचेवर अधिनियमाच्या कलम २० अन्वये शास्तीची कारवाई का करु नये याचा खुलासा दि. ५ एप्रिल, २०१० रोजी सायंकाळी ५-०० वाजता आयोगाच्या कार्यालयात प्रत्यक्ष येऊन सादर करावा.

***---आदेश---***

अपील मान्य करण्यात येत आहे.

सबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक २० मार्च, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४६२०७/अपील क्रमांक ५५५२/०२**

**श्री. प्रभाकर संभाजी घोले -----अपीलार्थी**
**७९ के, ६ ओम श्री गुरुदेव,**
**१८ वा रस्ता, खार (पश्चिम) मुंबई ४०० ०५२.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त ----उत्तरवादी**
**परिमंडळ ९, वांद्रे (पश्चिम)**
**मुंबई ४०० ०५०.**

**२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त**
**पश्चिम नियंत्रण कक्ष, वांद्रे (पश्चिम) मुंबई ५०.**

***---विवेचन---***

**अपीलांचे दिनांक २३ डिसेंबर , २०१०**
**सुनावणीची तारीख १९ मार्च, २०१०.**
**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

अपीलार्थीस संत तुकाराम गृहनिर्माण संस्था (नियोजित) चे मुख्य प्रवर्तक श्री. प्रकाश शांताराम कदम यांनी संस्थेच्या कांही सदस्यांविरुध्द फसवणूकीची जी तक्रार दाखल केलेली आहे त्याबाबत गुन्हा दाखल करुन तपासाबाबत माहितीची मागणी केली होती. मात्र अधिनियमाच्या कलम ८ (१) (ज ) अन्वये मागणी केलेली माहिती पुरविण्यास नकार दिलेला आहे व हाच निर्णय प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कायम केलेला आहे त्याविरुध्द सदरचे अपील आहे.

सुनावणीच्या वेळेला असे सांगण्यात आले की, वरील केसच्या बाबतीत एक चार्जशिट दाखल करण्यात आलेली आहे. मात्र इतर कांही मुद्दयांबाबत चौकशी करीत असतांना कांही आरोपींचा आणखी कोणा गुन्हयात सहभाग आहे किंवा कसे याची शहानिशा करण्यासाठी कागदपत्र हे हस्ताक्षर तज्ञांकडे पाठविण्यात आलेले आहेत.

माहितीचा अधिकार अधिनियमान्वये जी माहिती मागितलेली असेल त्यातील कांही माहिती देता येऊ शकत नसेल व कांही माहिती देता येऊ शकत असेल तर जी माहिती देता येऊ शकत असेल ती द्यावयास पाहिजे.

ज्या आरोपी गुन्हयाची तपासणी होऊन दोषारोपपत्र सुध्दा दाखल करण्यात आलेले आहे त्या दोषारोपपत्राशी संबंधित अपीलार्थींनी जी माहिती मागितली असेल ती माहिती अपीलार्थीस देण्यात यावी.

ज्याबाबत अजूनहि चौकशी चालू असेल ती माहिती चौकशी पूर्ण होऊन दोषारोपपत्र दाखल केल्यानंतर अपीलार्थीस द्यावी.

***---आदेश---***

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

जन माहिती अधिकारी यांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक २० मार्च, २०१० राज्य मुख्य माहिती

आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५३९४/अपील क्रमांक ५३१०/०२

श्री. योगिराज रा. तुळसकर -----अपीलार्थी

मे. तुळसकर आयर्न & स्टील वर्कस् ,

प्लॉट नं ०८, गोपी टँक रोड, माहिम (पश्चिम)

मुंबई ४०० ०१६.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा सहायक मनपा आयुक्त ----उत्तरवादी

जी/उत्तर विभाग, हरिश्चंद्र येवले मार्ग,

दादर (पश्चिम) मुंबई ४०० ०२८.

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी
जी/उत्तर विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,
दादर (पश्चिम) मुंबई ४०० ०२८.

*---विवेचन---*

श्री.योगीराज रा. तुळसकर, मुंबई यांनी दि. ९/२/२००७ रोजी जन माहिती अधिकारी जी/उत्तर विभाग कार्यालय, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडे प्लॉट नं. ८, गोपी टँक रोड, माहिम (पश्चिम) मुंबई येथील अनधिकृत बांधकामाबाबत काय कार्यवाही केली याची माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीच्या माहिती अर्जास दि. ६/३/२००७ रोजी उत्तर दिलेले आहे. सदर उत्तराने समाधान झाले नाही म्हणून सहायक मनपा आयुक्त, जी/उत्तर विभाग यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलाच्या अनुषंगाने दि. २८/४/२००८ रोजी आदेश पारित केल्याचे दिसते. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर अनधिकृत बांधकामाबाबत केलेल्या कारवाईचा अहवाल तसेच विहित शुल्क भरुन निरीक्षण करण्याची देखिल अनुमती द्यावी असे आदेश देऊन अपील निकाली काढले.

प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेशानुसार कार्यवाही झाली नाही म्हणून दि. १७/११/०९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर द्वितीय अपीलाची सुनावणी दि. ९/२/२०१० रोजी आयोजित करण्यात आली असून त्या सुनावणीस अपीलार्थी गैरहजर होते.

तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीचेवेळी सादर केलेली माहिती पाहता अपीलार्थीस माहिती दिली आहे. त्यामुळे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

*---आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक २० मार्च, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५४२९/अपील क्रमांक ५३६९/०२

श्री. हरिबा महादेव चोपडे -----अपीलार्थी
सावित्रीबाई माळीण चाळ, परीघखाडी वसाहत,
एल.बी.एस.मार्ग, सुधाकर स्टोअर्सच्या मागे,
खोली क्र. ३, कुर्ला (पश्चिम) मुंबई ४०० ०७०.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त ----उत्तरवादी
परिमंडळ ३ यांचे कार्यालय, मुंबई.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त
मध्य नियंत्रण कक्ष, बावळा कंपाऊंड,
डॉ. बी.ए. रोड, भायखळा (पूर्व) मुंबई.

*---विवेचन---*

श्री. हरिबा महादेव चोपडे, यांनी दि. १४/७/२००९ च्या माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त, मध्य प्रादेशिक नियंत्रण कक्ष यांचेकडे माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यांनी दि. २७/७/२००९ रोजी त्यांच्या माहितीच्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती दिली आहे.

सदर माहितीने समाधान झाले नाही म्हणून दि. ५/८/०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उप आयुक्त परिमंडळ ३ यांनी दि. ३१/८/०९ रोजी आदेश पारित करुन अपीलार्थीस सर्व माहिती दिली असल्याचे नमूद केले आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेशाने व्यथित होऊन अपीलार्थींनी दि. २०/११/०९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी दि. १५/२/२०१० रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणीस अपीलार्थीसह जन माहिती अधिकारी उपस्थित होते. प्रथम
अपिलीय प्राधिकारी उपस्थित नव्हते.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीचे वेळी सादर केलेली कागदपत्रे पाहता अपीलार्थीस सर्व माहिती दिली असल्याचे दिसले. तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनीही माहिती दिली असल्याचे त्यांचे आदेशात नमूद केलेले आहे. त्यामुळे खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक २० मार्च, २०१० राज्य मुख्य माहिती
आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४५४२३/अपील क्रमांक ५३६७/०२**

**श्री.प्रदिपसिंह ठाकूर -----अपीलार्थी**
**लालजी सिंह चाळ, खोतवाडी,**
**पी.एम. रोड, सांताक्रुज (पश्चिम) मुंबई ५४.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अभियंता ----उत्तरवादी**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ६ वा मजला,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१.**

**२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ६ वा मजला,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१.**

***---विवेचन---***

श्री. प्रदिपसिंह ठाकूर, मुंबई यांनी दि. ८ जुलै, २००९ रोजी जन माहिती अधिकारी, झ ाोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचेकडे माहिती मागितली होती. त्यास जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिले नाही म्हणून प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे दि. २१ ऑगस्ट २००९ रोजी प्रथम अपील दाखल केले.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी देखिल माहिती दिली नाही म्हणून दि. १८/११/२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले असून त्याची सुनावणी दि. १५/२/२०१० रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणीस जन माहिती अधिकारी यांचेसह अपीलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थीच्या माहिती अर्जाचे अनुषंगाने सर्व माहिती अपीलार्थीस ७ दिवसांत विनामूल्य द्यावी असे जन माहिती अधिकारी यांना निर्देश देण्यात येत आहेत.

*---आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक २० मार्च, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५८८१/अपील क्रमांक ५४३२/०२

श्री. रघु मदन्ना पुजारी -----अपीलार्थी
जी-१, सी विंग, ग्रीन लॉन अपार्टमेंट,
पी.आय.यू.एस. कॉलेलसमोर, आरे रोड,
गोरेगांव (पूर्व) मुंबई ४०० ०६३.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा सहायक मनपा आयुक्त ----उत्तरवादी
पी/ उत्तर विभाग, मामलतदार वाडी,
लिबर्टी गार्डन, मालाड (पश्चिम) मुंबई ४०० ०६४.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता
पी/ उत्तर विभाग, मामलतदार वाडी,
लिबर्टी गार्डन, मालाड (पश्चिम) मुंबई ४०० ०६४.

*---विवेचन---*

अपीलांचे दिनांक १६ डिसेंबर , २०१०

सुनावणीची तारीख २३ फेब्रूवारी, २०१०.

अपीलार्थी ,  जन माहिती अधिकारी  उपस्थित. अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

अपीलार्थींनी दि. ३/९/२००९ च्या अर्जाद्वारे खालील माहिती मागितली.

**Demolition report copy of demolition done on 30/09/2009 on Alamgir A sheikh galas andRaghu M poojari galas situated at CTS no 610/A/B Survery no 267 Hissa no1/1 part village malad taluka boribali known as poojari compound General Arun Kumar Vidya Marg Kanyapada mulad East Mumbai 400 0097**

उपरोक्त अर्जाला दि. ३१/१०/२००९ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिले.

त्यानुसार त्यांना रु.२/- प्रति पृष्ठ या दराने शुल्क भरण्यास सांगण्यात आले.

तथापि  माहिती मिळाली नाही या सबबीखाली त्यांनी दि. ११/११/२००९ रोजी प्रथम अपील केले.  यावर दि. २५/११/२००९ रोजी सुनावणी झाली.  सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थींच्या माहिती अर्जाला दि. ३१/१०/२००९ रोजी उत्तर दिल्याचे सांगितले.  यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्याची प्रत अपीलार्थींना द्यावी असे नमूद करुन प्रथम अपील निकाली काढले.  तथापि या निर्णयाने समाधान न झाल्याने त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी सादर केले की, अपीलार्थींना त्यांच्या मागणीनुसार कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती अपीलार्थींना पुरविण्यात आली आहे.  याचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारित करण्या येत आहे.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक २० मार्च, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५८८०/अपील क्रमांक ५४३३/०२

श्री. रघु मदन्ना पुजारी -----अपीलार्थी
जी-१, सी विंग, ग्रीन लॉन अपार्टमेंट,
पी.आय.यू.एस. कॉलेलसमोर, आरे रोड,
गोरेगांव (पूर्व) मुंबई ४०० ०६३.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा सहायक मनपा आयुक्त ----उत्तरवादी

पी/ उत्तर विभाग, मामलतदार वाडी,
लिबर्टी गार्डन, मालाड (पश्चिम) मुंबई ४०० ०६४.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ.का)
पी/ उत्तर विभाग, मामलतदार वाडी,
लिबर्टी गार्डन, मालाड (पश्चिम) मुंबई ४०० ०६४.

***---विवेचन---***

अपीलांचे दिनांक १६ डिसेंबर , २०१०
सुनावणीची तारीख २३ फेब्रूवारी, २०१०.
अपीलार्थी , जन माहिती अधिकारी उपस्थित. अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

अपीलार्थींनी दि. ३/१०/२००९ च्या अर्जाद्वारे खालील माहिती मागितली.

**Demolition done on 30/09/2009 on structures of Raghu M poojari situated at CTS no610"Ö/A/I/B survery no 267 Hissa no 1/1 part village malad Taluka Borivali known as poojari compound General Arun Kumar Vaiday Marg kanyapada malad East Mumbai-400 097**

उपरोक्त अर्जाला जन माहिती अधिकारी यांनी दि. ३१/१०/२००९ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिले. तथापि दि. ११/११/२००९ रोजी अपीलार्थींनी प्रथम अपील केले.

प्रथम अपीलावर दि. २५/११/२००९ रोजी सुनावणी होऊन खालील आदेश पारित करण्यात आले.

"जन माहिती अधिकारी श्री. गरुडे, स.अ.(इ व का) यांनी उपलब्ध माहिती १० दिवसांत अपीलार्थींना द्यावी. "

उपरोक्त आदेशाने समाधान न झाल्याने अपीलार्थींनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. द्वितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, अपीलार्थींना माहिती देण्यात आली आहे. अपीलार्थींच्या कथनानुसार त्यांना अतिक्रमण पाडून टाकण्याबाबत दिलेल्या नोटीसची प्रत हवी आहे व ती त्यांना देण्यांत आलेली नाही.

दोन्ही बाजूंचे म्हणणे जाणून घेऊन आयोगाचे असे निर्देश आहेत की, अपीलार्थींच्या मागणी नुसार उपरोक्त नोटीसची प्रत अपीलार्थींना कोणतेही शुल्क न आकारता पुरविण्यात यावी.

*----आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक २० मार्च, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/३७७१४/अपील क्रमांक ४०६९/०२**

**श्री. मोहम्म्द उस्मान शेख -----अपीलार्थी**
**प्लॉट नं. ६, रुम नं. ५३,**
**एन.सी.सी. गेट क्र. ७, मालवणी,**
**मालाड (पश्चिम) मुंबई - ४०० ०९५.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा सहायक मनपा आयुक्त ----उत्तरवादी**
**पी/नॉर्थ, लिबर्टी गार्डन, मामलतदार वाडी,**
**मालाड (पश्चिम) मुंबई ४०० ०६४.**

**२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ.व का.)**
**पी/नॉर्थ, लिबर्टी गार्डन, मामलतदार वाडी,**
**मालाड (पश्चिम) मुंबई ४०० ०६४.**

***---विवेचन---***

श्री. मोहम्मद शेख यांनी दि. १२/९/२००८ च्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती मागविली. सदर माहिती दि. १०/१०/२००८ च्या पत्रान्वये अपीलार्थीस देण्यात आली. तद्नंतर प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी त्यांचेकडे दाखल केलेल्या प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दि. २४/११/२००८ रोजी माहिती दिली.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नाही म्हणून द्वितीय अपील दाखल केले. त्याची सुनावणी दि. २३/३/०९ रोजी घेण्यात आली. सदर सुनावणीस अपीलार्थीसह जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अपीलार्थींनी अपीलासोबत दिलेली कागदपत्रे पाहता अपीलार्थीस माहिती दिली असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि.

जोशी),

दिनांक २० मार्च, २०१० राज्य मुख्य माहिती

आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/३७७१३/अपील क्रमांक ४०६८/०२

श्री. मोहम्म्द उस्मान शेख -----अपीलार्थी
प्लॉट नं. ६, रुम नं. ५३,
एन.सी.सी. गेट क्र. ७, मालवणी,
मालाड (पश्चिम) मुंबई - ४०० ०९५.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा सहायक मनपा आयुक्त ----उत्तरवादी
पी/नॉर्थ, लिबर्टी गार्डन, मामलतदार वाडी,
मालाड (पश्चिम) मुंबई ४०० ०६४.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ.व का.)
पी/नॉर्थ, लिबर्टी गार्डन, मामलतदार वाडी,
मालाड (पश्चिम) मुंबई ४०० ०६४.

*---विवेचन---*

श्री. मोहम्मद शेख यांनी दि. ६/११/२००८ च्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ.प्र) पी नॉर्थ यांचेकडे एकूण ६ मुद्दयांची माहिती मागविली होती. सदर माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे दि. २७ नोव्हेंबर २००८ रोजीचे पत्रान्वये दिलेली आहे. तद्नंतर अपीलार्थीनी दि. ६/१२/०८ रोजी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दि. २३/१२/२००८ च्या आदेशान्वये अपीलार्थीचे अर्जातील मुद्दा क्र. १,२,४ व ६ या मुद्दयांची माहिती सहायक अभियंता (इएनव्ही) यांचेकडे पाठवून त्यांना माहिती देण्याबाबत कळविले. तसेच मुद्दा क्र. ३ व ५ मधील माहिती सहायक अभियंता (इ.व.का) यांनी १५ दिवसांत सादर करावी असे कळवून अपील निकाली काढले.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेल्या आदेशाने समाधान न झाल्यामुळे अपीलार्थींनी द्वितीय अपील दाखल केले असून त्याची सुनावणी दि. २३/३/२००९ रोजी घेण्यात आली. सदर सुनावणीस अपीलार्थीसह जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अपीलार्थीचे म्हणणे की जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती दिशाभूल करणारी आहे.

अपीलार्थीचे अपील व सोबतची कागदपत्रे पाहता मी असे आदेश देत आहे की, प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी त्यांचे दि. २३/१२/०८ चे आदेशाप्रमाणे संबंधित जन माहिती अधिकारी यांनी योग्य कार्यवाही केली किंवा कसे याची स्वत: खातरजमा करावी.

--आदेश---

अपील निकाली काढण्यात येत आहे.
अपिलीय अधिकारी यांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि.

जोशी),
दिनांक २० मार्च, २०१० राज्य मुख्य माहिती
आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक १५४४/०२

श्री. तुकाराम यशवंत तपकिरे ----अपीलार्थी
घर नं. ४३८०, गजानन चौक,
पंचवटी, नाशिक -- ३

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता ----उत्तरवादी
नाशिक महानगरपालिका, नाशिक.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
नगर रचना विभाग, नाशिक महानगरपालिका,
नाशिक.

***---विवेचन---***

अपीलांचा दिनांक ४/५/२००९
सुनावणीचा दिनांक २१/१२/२००९
अपीलार्थी , जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी श्री. तुकाराम यशवंत तपकिरे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ४/५/२००९ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक, जि. नाशिक येथे दि. २१/१२/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली.

अपीलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. १२/१/२००९ रोजी अर्ज करुन (१) नाशिक येथील सर्व्हे नं. ८६/३ ई/ १ बी प्लॉट नं १ बी कल्पेश पार्क बी राधानगर वाघ मळा हया बिल्डींगचा नकाशा मिळावा तसेच हया बिल्डींगमध्ये किती प्रमाणांत अनधिकृत बांधकाम आहे याची माहिती तसेच (२) सावळी पॅलेस सर्व्हे नं. ८७/२/२/१ प्लॉट नं. ६, येथील बिल्डींगमधील अनधिकृत बांधकामाची माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दि. १२/२/२००९ च्या पत्राद्वारे सर्व्हे नं. ८६/३ ई/ १

बी प्लॉट नं १ बी मधील बांधकाम पूर्णत्वाचा नकाशा तसेच बिल्डींगचे किती प्रमाणात अनधिकृत काम केले आहे याची माहिती तसेच बांधकाम परवानगीचा नगाशा वगैरे माहिती देण्यांत आली.

परंतु सावळी पॅलेस सर्व्हे नं. ८७/२/२/१ प्लॉट नं.६ या बिल्डींगमधील अनधिकृत बांधकाम किती, मंजूरी अधिका-यांची नांवे वगैरे माहिती न मिळाल्याने अपीलार्थीनी दि. १२/३/२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले असता सदर अपीलावर दि. ३१/३/२००९ रोजी सुनावणी घेण्यांत आली. सदर सुनावणी दरम्यान अनधिकृत बांधकाम संबंधात देण्यांत आलेल्या नोटीसांची छायांकित प्रत ८ दिवसांत अपीलार्थीस देण्याचे निर्देश दिले. परंतु सुनावणीचे आदेश पारित करण्यापूर्वीच अपीलार्थीस नोटीसांच्या छायांकित प्रती देण्यात आल्या व त्या स्वीकारण्याचे त्यांनी लेखी दिले.

अपीलार्थीचे समाधान न झाल्याने त्यांनी दि. २/५/२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित होते.

अपीलार्थीस मागणीनुसार महानगरपालिकेच्या अभिलेखावर उपलब्ध असलेली माहिती देण्यांत आली. अनधिकृत बांधकामाबद्दल महानगरपालिका, नगर रचना विभागाकडे अतिक्रमण किती झाले हे मोजून ठेवण्यात येत नसल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे सदर माहिती अपीलार्थीस उपलब्ध करुन देण्यात येत नाही असे त्यांच्या निदर्शनास आणून देण्यांत आले. या व्यतिरिक्त सर्व उपलब्ध सर्व माहिती देण्यांत आलेली आहे.

मात्र जर अनधिकृत बांधकामाबाबत नोटीस काढण्यात आली असेल तर बांधकाम सकृतदर्शनी अनधिकृत ठरवित असतांना ज्या कागदपत्रांचा आधार घेतला असेल ती कागदपत्रे अपीलार्थीस देण्यात यावीत. ही कार्यवाही आदेश मिळाल्यापासून १० दिवसाचे आत जन माहिती अधिका-यांनी पूर्ण करावी.

*---आदेश---*

अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक २० मार्च, २०१०

राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक ११६३/०२**

**श्री. हेमंत जगन्नाथ काळे ----अपीलार्थी**
**३१, समर्थ कॉलनी, एम.जे. कॉलनी रोड,**
**जळगांव, ता. जि. जळगांव.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा समाज कल्याण अधिकारी ----उत्तरवादी**
**समाज कल्याण विभाग, आकाशवाणी जवळ,**
**जळगांव.**

**२. जन माहिती अधिकारी**
**समाज कल्याण अधिकारी कार्यालय, समाज कल्याण विभाग,**
**आकाशवाणी जवळ, जळगांव.**

***---विवेचन---***

**अपीलांचा दिनांक ११/१२/२००८**
**सुनावणीचा दिनांक २६/११/२००९**
**अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी उपस्थित.**

अपीलार्थी श्री. हेमंत जगन्नाथ काळे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ११/१२/२००८ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक, जि. नाशिक येथे दि. २६/१२/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली.

अपीलार्थींनी जन माहिती अधिका-यांकडे दि. १९/३/२००८ रोजी अर्ज करुन २० वर्षापासूनची जळगांव जिल्हयांत व्यक्ती, संस्था, संघटना, मंडळे, शासकीय ,निमशासकीय तसेच शासनमान्य सर्व संस्था यांना मंजूर झालेले व मंजूरीसाठी आपण शिफारस केलेले प्राप्त झालेले आणि वाटप झालेले अनुदान इत्यादिचे अभिलेख तसेच राज्य व केंद्र शासनाच्या विविध विभागातील, महामंडळामार्फत इत्यादी प्राप्त झालेले सरळ अनुदान अभिलेखाच्या प्रतींची मागणी केली आहे.

अपीलार्थीस दि. ५/४/२००८ रोजी माहिती विस्तृत प्रमाणात असल्याने कार्यालयांत प्रत्यक्ष येऊन व चर्चा करुन हवी असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यास सांगण्यात आले.

माहिती मिळाली नाही या कारणास्तव प्रथम अपील दाखल करण्यांत आले. त्यावेळी अपीलार्थीस दि. १८/६/२००८ च्या पत्राद्वारे संस्थांची माहिती पुरविण्यात आली. त्याचप्रमाणे माहिती २० वर्षापासूनची असल्याने ती साधनसामुग्री ,मनुष्यबळ वगैरेची अत्यंत आवश्यकता असल्याने उपलब्ध माहिती त्यांच्या निरीक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यांत येईल असेहि नमूद केले.

अपीलार्थीचे कलम ७ मधील पोटकलम ६ नुसार माहिती वेळेत देणे व ती मोफत देणे आवश्यक असल्याच्या कारणास्तव द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. परंतु जन माहिती अधिकारी उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेल्या बाबी ঃ

१. मागितलेली माहिती २० वर्षापूर्वीची असून ती विस्तृत स्वरुपात आणि विखुरलेल्या प्रमाणांत आहे.

२. अधिनियमाच्या कलम ७ मधील पोट कलम ९ नुसार सार्वजनिक प्राधिकरणाची साधनसामुग्री या कामासाठी प्रमाणाबाहेर वळवावी लागत नसल्यास किंवा

अभिलेख सुरक्षितेच्या किंवा जतन करण्याच्या दृष्टीने ते हानीकारक नसल्यास माहिती ज्या स्वरुपात मागण्यांत आली त्या स्वरुपात ती पुरविण्यांत येईल.

३. तसेच कांही माहिती शासकीय , निमशासकीय संस्थेकडून उपलब्ध करुन घेणे आवश्यक आहे हे सत्य आहे.

४. अपीलार्थीनी , त्यांना दिलेल्या अर्जास अनुसरुन माहिती विविध प्रकारे पुरविण्यात आलेली आहे. कालावधी व मनुष्यबळ याचा विचार करता माहिती फार विस्तृत प्रमाणांत आहे हे मान्य करावे लागेल.

तेव्हा अपीलार्थींनी अधिका-यांना सहकार्य करुन प्रत्यक्ष कार्यालयात जाऊन हव्या असलेल्या

माहितीचे अवलोकन करावे. त्याचप्रमाणे अधिका-यांशी हव्या असलेल्या माहितीबद्दल माहितीची

व्याप्ति (किती वर्षांची ) या बाबतीतहि चर्चा करावी. अशी चर्चा झाल्यानंतर जन माहिती अधिका-यांनी शक्य होईल तेवढी जास्तीत जास्त माहिती अपीलार्थींचे समाधान होईल याप्रमाणे पुरवावी.

*---आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक २० मार्च, २०१० राज्य मुख्य माहिती

आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक १२०९/०२

श्री. शेख अख्तर शेख मेहबूब ----अपीलार्थी
रा. डॉ. आंबेडकर रोड, शिवाजी नगर,
इदगाह जवळ, मु.पो. ता. पाचोरा, जि. जळगांव.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सा.प्र.) ----उत्तरवादी
विभागीय आयुक्त कार्यालय नाशिक रोड, नाशिक.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी
नगर परिषद पाचोरा, ता. पाचोरा, जि. जळगांव.

***---विवेचन---***

अपीलांचा   दिनांक १४/०८/२००६
सुनावणीचा दिनांक  २६/११/२००९
अपीलार्थी ,  जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी   उपस्थित.

अपीलार्थी श्री. शेख अख्तर शेख मेहबूब  यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १४/०८/२००६ रोजी द्वितीय अपील सादर केले.  सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक, जि. नाशिक येथे दि. २६/११/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली.

अपीलार्थींनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २०/२/२००६ रोजी अर्ज करुन खालील नमूद माहिती मागितली होती.

१.	पाचोरा एस.टी. स्टॅंड शेजारी श्री. डॉ. घनश्याम रामदास चौधरी यांनी सिटी सर्व्हे नं. ३४६५ पार्टमध्ये दवाखान्याचे पक्के बांधकाम केलेले असून त्यांना नगरपालिकेने

बांधकाम परवानगी दिलेली नाही.

२.	टाऊन प्लॅनिंगने देखिल त्यांना परवानगी नाकारली  कारण तेथै प्राथमिक शाळेचे आरक्षण आहे.  म्हणून नगरपालिकेने त्यांचेविरुध्द एम.आर.टी.पी. ॲक्ट कलम ५३ प ४३ अन्वये जा.नं.१०९० दि. ७/६/२००२ अन्वये फिर्याद दिली आहे. पाचोरा पोलीस स्टेशनने गुन्हा दाखल केला किंवा नाही असल्यास गुन्हा नं व तारखेसह लेखी माहिती द्यावी.

तत्कालीन जन माहिती अधिकारी पाचोरा यांनी दि. १८/३/२००६ रोजी माहिती विहित नमुन्यात अपीलार्थीस कळविण्यात आली.   तसेच नगरपरिषद कार्यालयातील उपलब्ध मूळ कागदपत्रांच्या प्रती देऊन त्यांची सही मिळाल्याची नोंद ठेवण्यांत आली.

नगरपालिका पाचोरा यांनी त्यांचेकडे मागणी केलेली माहिती चुकीची पुरविली व दिशाभूल करुन सत्य दडवून ठेवले म्हणून प्रथम अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि. ११/७/२००६ रोजी आदेश पारित केले त्यात त्यांनी नमूद केले आहे की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी एम.आर.टी.पी.ॲक्ट प्रमाणे कार्यवाही केलेली आहे. डॉ.चौधरी यांनी नांवाचा लावलेला बोर्ड मनपाने काढून टाकलेला होता. अपीलार्थीस उपलब्ध असलेली माहिती देण्यांत आली आहे. त्यामुळे त्यांनी अपीलार्थीचे अपील फेटाळून लावलेले आहे.

विभागीय आयुक्त नाशिक यांनी दिलेला निकाल व पाचोरा नगरपालिकेकडे केलेली माहितीची मागणी ही अपीलार्थीस न पटणारी असल्याने त्यांनी आयोगाकडे दि.१४/८/२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

सुनावणीच्या वेळेलस निदर्शनास आलेल्या बाबी ---

१. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस कार्यालयात उपलब्ध माहिती व त्याच्या प्रती दिल्या आहेत.

२. मा. जिल्हा सत्र न्यायाधिश जळगांव यांचेकडील फौजदारी रिव्हीजन अर्ज क्र. १५०/०८ दि.

५/१२/२००८ ची न्याय निर्णयाची झेरॉक्स प्रत अपीलार्थीस दिलेली आहे.

न्यायालयाने डॉ. चौधरी यांच्या बाजूने निर्णय दिल्याने अपीलार्थीनी केलेले अपील अर्ज

निकालात निघालेला आहे. त्यामुळे अपीलार्थीस हवी असलेली सर्व माहिती देण्यांत आलेली असून त्यांनी ती स्वीकृत केल्याचे दिसून येते.

*---आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक २२ मार्च, २०१० राज्य मुख्य माहिती

आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक ११७०/०२

श्री. माधव तोताराम महाजन ----अपीलार्थी
सी.सी.डी.सी. अपार्टमेंट, समर्थ कॉलनी,
जळगांव, जि. जळगांव -- ४२५ ००१.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक व्यवस्थापक ----उत्तरवादी
राज्य परिवहन महामंडळ, प्रादेशिक कार्यालय,
शिंगाडा तलाव, नाशिक.

२. जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ सांख्यिकी
प्रादेशिक कार्यालय नाशिक प्रदेशि राज्य परिवहन महामंडळ,
एन.डी. पटेल रोड, शिंगाडा तलाव, ता.जि. नाशिक.

*---विवेचन---*

अपीलांचा दिनांक ०७/०३/२००८
सुनावणीचा दिनांक २६/११/२००९
अपीलार्थी , जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी श्री. माधव तोताराम महाजन यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०७/०३/२००८ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक, जि. नाशिक येथे दि. २६/११/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. ११/१०/२००७ रोजी अर्ज करुन खालील नमूद माहिती मागितली.

१. जळगांव विभागातील बरंडोल येथे कायम स्वरुपी बसस्थानक बांधण्यासाठी हे काम

जैसवाल ठेकेदार यांना देण्यांत आले, त्यांचे टेंडर केलेले करार , वर्क ऑर्डर, कामाची बिले, बिलाचे पोस्ट ऑडिट व फायनल बिल.

२. अभियंत्याची नेमणूक , त्यांचे मुख्यालय इत्यादी माहिती.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. १७/१०/२००७ च्या पत्राद्वारे अपीलार्थींनी मागितलेली माहिती कार्यकारी अभियंता राज्य परिवहन नाशिक प्रदेश यांच्याकडून मागविण्यात आलेली असून प्राप्त झाल्यावर आपणास देण्यात येईल असे कळविले.

अपीलार्थींनी माहिती न मिळाल्याने दि. ५/१२/२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी कार्यकारी अभियंता राज्य परिवहन नाशिक यांचे पत्र दिनांक १८/११/२००९ अन्वये प्राप्त झालेली माहिती अपीलार्थीस दि. २४/११/२००९ च्या पत्रान्वये देण्यांत आली.

परंतु अपीलार्थींना दिलेल्या त्रोटक व अपूर्ण माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे द्वितीय अपील दि. ७/३/२००९ रोजी दाखल केले. सुनावणीच्या दरम्यान निदर्शनास आलेल्या बाबी ---

१. माहिती दि. ११/१२ वर्षापूर्वीची असल्याने व संबंधित कार्यालय धुळयाहून नाशिक येथे स्थलांतरित करण्यात आल्यामुळे व सहजासहजी नस्ती उपलब्ध होऊ शकत नसल्याने फार प्रयत्नपूर्वक माहिती शोधून काढावी लागल्याने माहिती देण्यास विलंब झाला.

२. दि. २४/११/२००९ रोजी कार्यकारी अभियंता यांनी माहिती उपलब्ध करुन दिली.

३. नवीन मुद्दयांवर माहिती मागितल्यामुळे ती चर्चेअंती अपीलार्थीस कांही दिवसांत देण्यांत येईल असे सूचित करण्यांत आले.

जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती देणे अपेक्षित होते. परंतु माहिती ११ ते १२ वर्षापूर्वीची असल्यामुळे विलंब झाला हे त्यांचे म्हणणे खरे असले तरी अपीलार्थींनी केलेल्या अर्जावर निर्णय घेण्यास २ वर्षे लागली ही बाब खचितच जन माहिती अधिकारी यांना शोभणारी नाही.

उर्वरित माहिती अपीलार्थीस १० दिवसांत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक २२ मार्च, २०१० राज्य मुख्य माहिती
आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४४९९४/अपील क्रमांक ५२१५/०२

श्री. रायू गोविंद महांबरे ----अपीलार्थी
वनदेवी निवास, २ रा मजला, बाळा सावंत लेन,
सोमवार पेठ, वसई , जि. ठाणे.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त ----उत्तरवादी
परिमंडळ ३, बावला कंपाऊंड, डॉ. बी.ए. रोड,
भायखळा (पूर्व) मुंबई ४०० ०२७.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त
मध्य प्रादेशिक नियंत्रण कक्ष,
बावला कंपाऊंड, डॉ. बी.ए.रोड, भायखळा (पूर्व) मुंबई २७.

## ---विवेचन---

अपीलांचा दिनांक ०५/११/२००९
सुनावणीचा दिनांक १६/०१/२०१०
अपीलार्थी , जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

अपीलार्थीनी दि. १८/४/२००९ च्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दादर पोलीस ठाणे येथे दाखल गु.र. क्र. २८५/०९ कलम ४६५, ३६८,४७१, ४२०, ३४ भा.दं.वि. संदर्भातील कागदपत्रांची मागणी केली होती.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. १५/५/२००९ अन्वये अपीलार्थीस काही माहिती पुरविली. माहिती अपूरी पुरविण्याच्या कारणास्तव अपीलार्थींनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. त्यावर दि. ३/८/२००९ रोजी सुनावणी घेण्यांत आली. त्यावेळी दादर पोलीस ठाणे यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अपीलार्थींना दाखविण्यात आली. परंतु तरीही त्यांचे समाधान न झाल्याने पुन्हा दि. १०/८/०९ रोजी सुनावणी घेण्यांत आली. त्यावेळी दोन्ही अधिकारी उपस्थित होते परंतु अपीलार्थी गैरहजर होते. जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीनी मागितलेली माहिती पोलीस निरीक्षक दादर पोलीस ठाणे य आंचे दि. १०/८/०९ अन्वये पृष्ठ क्र १ ते ७ अशी प्राप्त झालेली माहिती अपीलार्थीस त्यांच्या कार्यालयात जाऊन प्रत्यक्ष देऊन तशी पोच घेतली व उर्वरित माहितीसंबंधी चौकशी चालू असल्याने नाकारण्यात आली.

अपीलार्थीनी माहिती अपूर्ण पुरविली, लपवून ठेवली या कारणास्तव द्वितीय अपील दाखल केले. सुनावणीच्या वेळी कोणीही उपस्थित नव्हते.

अपीलार्थीनी अपील अर्जात मागितलेली माहिती ही संबंधित गु.र. क्र. २८५/०८ कलम ४६५,४६८,४७१,४२० व ३४ भा.दं.वि. संदर्भातील कागदपत्रे असून ती अपीलार्थीस दिल्यास सदर गुन्हयाच्या पुढील तपासावर परिणाम होऊन तपास कार्यास अडथळा निर्माण

होऊ शकतो.   या कारणास्तव ती माहिती अधिकार अधिनियम कलम ८(१)(छ)(ज) अन्वये प्रथम अपिलीय अधिकारी यांनी नाकारलेली आहे.

याबाबत आयोगाचे असे मत आहे की, अपीलार्थींनी मागितलेल्या माहितीपैकी जी माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडे देण्यायोग्य उपलब्ध होती ती त्यांनी दिलेली आहे. उर्वरित माहिती न देण्यामागचे कारण प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी स्पष्ट केले असल्याने त्यांनी केलेली त्यांनी केलेली कृती योग्य असल्याचे आयोगाचे मत आहे.   या कारणास्तव मी खालीलप्रमाणे आदेश देतो.

***---आदेश----***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक  २२ मार्च,  २०१०                                        राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४४९३६/अपील क्रमांक ५२०७/०२

श्री. कारभारी लहानू गर्जे                                                ----अपीलार्थी
गौरीपुत्र , १४४/४३१८, कन्नमवार नगर २,

विक्रोळी (पूर्व) मुंबई ४०० ०८३.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक मनपा आयक्त ----उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,
पी/उत्तर विभाग, मामलेदार वाडी, लिबर्टी गार्डन,
मालाड (पश्चिम) मुंबई ४०० ०६४.

२.जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ.का)
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,
पी/उत्तर विभाग, मामलेदार वाडी, लिबर्टी गार्डन,
मालाड (पश्चिम) मुंबई ४०० ०६४.

*---विवेचन---*

अपीलांचा दिनांक ३०/१०/२००९
सुनावणीचा दिनांक १५/०१/२०१०
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित.

अपीलार्थी यांनी दि. ३/८/२००९ रोजी माहितीच्या अधिकाराखाली गांधी विद्यालय मालवणी, मालाड (पश्चिम) येथे अनधिकृत बांधकामाबद्दल अटक केलेले आरोपी बी.डी.काळे विरुध्द मा. न्यायालयांत दोषारोपपत्र दाखल करण्यासाठी दिलेल्या परवानगी कागदपत्रांच्या प्रमाणित छायांकित प्रती मिळण्याबाबतचा विनंती अर्ज केला होता. जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दि. २६/११/२००८ रोजी म्हणजे ३ महिन्यानंतर मालवणी पोलीस ठाणे मुंबई यांचेकडून प्राप्त झाल्यावर दिलेली आहे.

विहित मुदतीत माहिती न मिळाल्यामुळे प्रथम अपील दाखल करण्यांत आले. त्यावेळी झालेल्या सुनावणीच्या वेळी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिका-यांस उपलब्ध माहिती १५ दिवसांत द्यावी असे दि. १/१०/२००९ चे आदेश पारित

केले.  प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनहि अपीलार्थीस १५ दिवसांत माहिती न दिल्याने व्यथित होऊन अपीलार्थीनी दि. ३०/१०/२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले.

तत्पूर्वी आरोपी विरुध्द असलेला पोलीस तपास पूर्ण करण्यात आला. त्यांना अटक करुन त्यांच्याविरुध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करताना सहायक आयुक्त पी/उत्तर विभाग, महानगरपालिका मालाड (पश्चिम) मुंबई यांची परवानगी घेणे आवश्यक होते. त्याकरिता मालवणी पोलीस ठाण्याकडून दि. ३१/१०/०८ अन्वये परवानगी मिळविण्यासाठी पत्र पाठविण्यांत आले होते. परंतु परवानगी वेळेत न मिळाल्याने आरोपी विरुध्द न्यायालयांत दोषारोपपत्र दाखल करणे शक्य झालेले नव्हते. ती परवानगी दि. १५/१०/२००९ रोजी सहायक आयुक्त पी/उत्तर विभगाकडून देण्यांत आलेली आहे व श्री. काळे यांच्याविरुध्द आरोपपत्र दाखल होऊन प्रकरण न्यायप्रविष्ट झाले आहे.

अपीलार्थीस श्री. काळे यांच्याविरुध्द गुन्हा दाखल झाला का याची माहिती हवी होती. ती आता जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी परवानगीची प्रत अपीलार्थीस देण्याचे मान्य केले आहे. तरी जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दि. १५/१०/२००९ रोजीची प्रत उपलब्ध करुन द्यावी. तसेच अपीलार्थीस विहित मुदतीत माहिती देणे हे आपले कर्तव्य आहे ते यापुढे योग्यरित्या पार पाडणे अपेक्षित आहे.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक २२ मार्च, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक १५८६/०२

श्री. कृष्णा वामन तिवडे ----अपीलार्थी
विभागीय अध्यक्ष
राज्य परिवहन यांत्रिक कामगार संघटना,
नाशिक विभाग, नाशिक.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभागीय नियंत्रक ----उत्तरवादी
राज्य परिवहन विभागीय कार्यालय नाशिक, नाशिक.

२. जन माहिती अधिकारी तथा कर्मचारी वर्ग व कल्याण अधिकारी
राज्य परिवहन विभागीय कार्यालय नाशिक, नाशिक.

---*विवेचन*---

अपीलांचा दिनांक ०५/०८/२००९
सुनावणीचा दिनांक २२/१२/२००९
अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थींनी दि. ३/२/२००९ च्या अर्जान्वये कामगार करार सन १९९२-०३ अन्वये सर्व कामगारांना दुय्यम प्रतीत सेवा पुस्तकांची नक्कल मिळण्याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली. यावर दि. ३/३/२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांनी खालील प्रमाणे उत्तर दिले.

"संबंधित कर्मचा-यांना सेवापुस्तकाची झेरॉक्स प्रत अथवा दुय्यम प्रत दिली जाते. ती दिल्याबाबत स्थप्रत ठेवण्याची तरतुद नाही. तरी आपली मागणी सयुक्तिक वाटत नाही."

या उत्तराने समाधान न झाल्याने त्यांनी दि. २/४/२००९ रोजी प्रथम अपील केले. यावर त्यांना कळविण्यांत आले की, ५५३७ कर्मचा-यांपैकी ४०२८ कर्मचा-यांना दुय्यम प्रत देण्यात आली आहे. उर्वरित कर्मचा-यांना ती लवकरात लवकर देण्यात येईल.

उपरोक्त उत्तर मान्य नसल्याने त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी अनुपस्थित होते. उत्तरवादीतर्फे सांगण्यात आले की, अपीलार्थी २०० कर्मचा-यांची नांवे देतील व त्याच्या दुय्यम प्रती संबंधितंना जन माहिती अधिक्ारी यांच्यातर्फे देण्यात येतील असे अपीलार्थीबरोबर दि. २३/६/२००९ रोजी चर्चा होऊन ठरले होते पण अशी यादी अजून दिलेली नाही. यावर आयोगाचे निर्देश आहेत की, अपीलार्थीनी अशी यादी द्यावी व जन माहिती अधिकारी हे १५ दिवसांत सर्व माहिती देतील.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक २२ मार्च, २०१० राज्य मुख्य माहिती

आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक १६१५/०२**

**श्री. जे. एन. लगड ----अपीलार्थी**
**जन. सेक्रेटरी महा.लोक ग्रा.पंचायत बंगला नं.२०,**
**मोदकेश्वर, इंदिरानगर, नाशिक, ता.जि. नाशिक.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक ----उत्तरवादी**
**पोलीस अधीक्षक (ग्रामिण) कार्यालय,**
**सिडको, औरंगाबाद.**

**२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी**
**उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय,**
**गंगापूर, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद.**

*---विवेचन---*

अपीलांचा दिनांक १५/०५/२००९
सुनावणीचा दिनांक २२/१२/२००९
अपीलार्थी , जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थींनी दि. २८/११/२००८ च्या अर्जान्वये पोलीस ठाणे ता. गंगापूर, जि. औरंगाबाद येथील श्री. एस.डी.राठोड, पो.नि. श्री. यु.जे. राठोड, बीट हवालदार, श्री. एस.एच. लधाटे, नगदी कारकून यांच्या विषयी माहिती मागितली.

उपरोक्त माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी दि. ९/१/२००९ रोजी प्रथम अपील केले. यानंतर त्यांना माहिती पुरविण्यात आली. परंतु पुरविलेली माहिती अपूर्ण व खोटी असल्याचे नमूद करुन त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलावरील सुनावणीचे वेळी उत्तरवादींनी आयोगासमोर सादर केले की, अपीलार्थींना जी माहिती हवी आहे त्यात उपरोक्त कर्मचा-यांच्या वैयक्तिक माहितीचा समावेश आहे. तेव्हा वैयक्तिक माहिती वगळता इतर माहिती आम्ही देण्यास तयार आहोत. यावर आयोगाचे असे निर्देश आहेत की, वैयक्तिक माहिती काढून इतर माहिती अपीलार्थींना सदर आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत विनामूल्या पुरविण्यात यावी.

*----आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक २२ मार्च, २०१० राज्य मुख्य माहिती
आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक १५१९/०२

श्री. जे. एन. लगड ----अपीलार्थी
जन. सेक्रेटरी महा.लोक ग्रा.पंचायत बंगला नं.२०,
मोदकेश्वर, इंदिरानगर, नाशिक, ता.जि. नाशिक.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सा.प्र)                    ----उत्तरवादी
विभागीय आयुक्त कार्यालय नाशिक, नाशिक.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी
नगरपरिषद गंगापूर, जि. नाशिक.

---*विवेचन*---

अपीलांचा दिनांक ५/०२/२००८
सुनावणीचा दिनांक २१/१२/२००९
अपीलार्थी उपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

अपीलार्थींनी दि. २५/९/२००७ च्या माहिती अर्जाद्वारे मागितलेली माहिती संक्षिप्त स्वरुपात खालीलप्रमाणे आहे.

१. सर्व्हे नं. २०५/४ येथील अतिक्रमणाबाबत केलेल्या कार्यवाहीचा तपशील.
२. मुख्याधिकारी मुख्यालयी हजर असलेल्या दिनांकाचा तपशील.
३. गटर व रस्त्यांच्या साफसफाई बाबतचा तपशील.
४. डास नष्ट करण्याबाबतच्या उपाययोजनांचा तपशील.
५. बेवारस कुत्रे व मोकाट पाळीव जनावरे यांच्या बंदोबस्तासाठी केलेल्या कार्यवाहीचा तपशील.
६. शॉप इन्स्पेक्टर व ड्रग इन्स्पेक्टरांची नांवे व पत्ते.
७. नगरपरिषदेने स्वीकारलेल्या सर्व निविदांचा तपशील.

उपरोक्त अर्जाला दि. ३/११/२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिले. परंतु प्राप्त उत्तराने समाधान न झाल्याने त्यांनी दि. १/१२/२००७ रोजी प्रथम अपील केले. यावर दि. १८/१/२००८ रोजी आदेश पारित करण्यात आले व त्यानुसार खालील निर्णय देण्यात आला.

१. अपीलार्थींचे अपील मान्य.

२. मुळ माहिती अर्जातील मुद्दा क्र. २ व १५ ची माहिती ७ दिवसांच्या आत विनामूल्य पुरविण्यात यावी.

३. मुद्दा क्र. १ ते १५ च्या अनुषंगाने आवश्यक दस्तऐवजांची लेखी मागणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे करावी व हा दस्तऐवज अपीलार्थींना पुरविण्यात यावा.

यावर समाधान न झाल्याने त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. यावरील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी गैरहजर होते. वास्तविक पाहता त्यांनी सुनावणीसाठी हजर राहणे आवश्यक होते. तेव्हा आयोगाचे निदेश आहेत की, प्रथम अपीलावरील निर्णयानुसार अपीलार्थींना माहिती पुरविण्यात यावी.

जन माहिती अधिकारी हे सुनावणीस गैरहजर आहेत. तसेच त्यांनी माहिती सुध्दा दिलेली नाही. म्हणून त्यांचे रु. १०,०००/- ची शास्ती लावण्यात येत आहे. ही शास्तीची रक्कम जन माहिती अधिकारी यांच्या माहे मे व जून २०१० रोजी होणा-या पगारातून दोन समान हप्त्यांत वसूल करुन शासनाने विहित केलेल्या बजेट हेडमध्ये जमा करावी. जी जबाबदारी जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचेवर सोपविण्यात येत आहे. त्यांनी त्याप्रमाणे अनुपालन अहवाल १५ जून २०१० पर्यंत आयोगास सादर करावा.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.
या आदेशाची प्रत जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनाहि पाठविण्यात यावी.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक २३ मार्च, २०१० राज्य मुख्य माहिती
आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४४९३५/अपील क्रमांक ५२०८/०२

श्री. सुरेश बलदेवदास रहेजा -----अपीलार्थी
१३, भारत महल,८९,मरीन लाईन्स,
मुंबई ४०० ००२.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक ----उत्तरवादी
सहकारी संस्था, मुंबई विभाग,
मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला, जी.पी.ओ.समोर,
फोर्ट मुंबई ०१

२. जन माहिती अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक
सहकारी संस्था, मुंबई विभाग,
मलहोत्रा हाऊस, ६ वा मजला, जी.पी.ओ.समोर,
फोर्ट मुंबई ०१

*---विवेचन---*

विभागीय सहनिबंधक मुंबई यांनी पारीत केलेल्या दि. २३.०३.२००९ च्या आदेशाविरुध्द उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल झालेल्या रिट याचिका स्टॅप क्र.१२७८९/०९ च्या संदर्भात सोसायटीने अपीलकर्त्यास प्रलंबित असलेल्या सोसायटीच्या थकबाकी तसेच त्यावर आकारलेल्या व्याजाबाबत उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशनुसार थकबाकी रक्कमेवर व्याजाची परिगणता कशी केली याची माहिती दि. १३.०७.२००९ च्या अर्जाव्दारे माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दाव्याच्या निर्णयापूवी तीन महिन्यात लेखी म्हणणे सादर करण्याच्या सूचना देण्यांत आल्या होत्या. अंतिम आदेश दिनांक २३.०३.२००९ रोजी पारीत झाल्यामुळे त्यांच्या दिनांक २१.०५.२००९ रोजीच्या अर्जाचा विचार करण्यात आला नाही त्या विरोधात अपीलाथीने दि.३१.०८.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. त्यावेळी झालेल्या सुनावणीच्या वेळी प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी जन माहिती अधीकारी यांना दिलेले उत्तर योग्य आहे कसे सांगितले. पुनरीक्षण

अर्ज क्र.२५८/४ हा दावा न्यायप्रविष्ट असल्याने तयावर भाष्य करणे योग्य नाही असे नमूद करुन अपीलार्थीस पुननिरीक्षण अर्ज क्र.२५८/४ च्या दाव्याची तपासणी करुन त्यांनी मागितलेली कागदपत्रे पुरवावीत असेही दि. १४.१०.२००९ च्या पत्रात नमूद केले आहे.

अपीलार्थीने थकबाकीवर व्याजाची परिगणना कशी केली याची माहिती न मिळाल्याने व्दितीय अपील दाखल केले.

दि.१५.०१.२०१० रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधीकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. अपीलार्थी व प्रथम अपीलीय प्राधिकारी अनुपस्थित होते.

सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेल्या बाबी १) अपील कर्त्याने मागितलेली माहिती व जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी त्यांना दिलेली माहिती याचा ताळमेळ दिसून येत नाही. २) अपीलार्थीने थकबाकीवरील व्याजाची परिगणना कशी केली असता त्याचा उल्लेख दोन्ही अधिकाऱ्यांशी त्यांच्या पत्रात केलेला नाही. ३) उच्च न्यायालयांत कशा प्रकराचा दावा दाखल झाला व त्या दाव्याची निर्णयाची प्रत आढळून आली नाही. ४) उच्च न्यायालयाने थकबाकी व्याजाच्या विसंगतीची परिगणना वादी व प्रतिवादी यांनी आपसांत चर्चा करुन तो प्रश्न सोडवावा असा निर्णय दि.१०.०७.२००९ रोजी झालेला दिसून येतो. प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना दिनांक दि.१४.१०.२००९ च्या पत्राव्दारे जन माहिती अधिकारी यांनी अर्ज क्र.२५८/०४ च्या तपासणी दाव्याची माहिती अपीलार्थीस द्यावी असे म्हटले आहे व त्याप्रमाणे ते कागदपत्र दाखविण्यात आलेत. मात्र अर्जदारास हायकोर्टाच्या आदेशानुसार जी कारवाई करावयाची होती त्याबाबतीत माहिती पाहिजे आहे. अर्जदाराच्या निवेदनानुसार हायकोर्टाच्या ऑर्डर हा अर्ज क्र.२५८/०४ च्या आदेशाच्या नंतरचा आहे. त्यामुळे हायकोर्टाच्या आदेशाच्या अंमलबजावणीच्याबाबतीत जी काही स्थिती असेल त्यांची दहा दिवसात अर्जदारास माहिती देण्यात यावी.

*---आदेश---*

अपील मान्य करण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक २५.०३.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५४२२/अपील क्रमांक ५३६८/०२

श्री. शेख नसीबुल्लाह, -----अपीलार्थी
शॉप नं. २५४,बी नाथ पै मार्ग,
मानकेश्वर मंदिर, पांडुरंग हरे इमारत,
मुंबई ४०० ००२.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य अभियंता -----उत्तरवादी
(कस्टम केअर) बेस्ट भवन बेस्ट मार्ग पोष्ट बॉक्स क्र.१९२
मुंबई ०१

२. जन माहिती अधिकारी तथा विभागीय अभियंता
(कस्टम केअर) बेस्ट भवन बेस्ट मार्ग पोष्ट बॉक्स क्र.१९२
मुंबई ०१

*---विवेचन---*

व्दितीय अपीलाचा दिनांक : १७.११.२००९
सुनावणीचा दिनांक : १५.०२.२०१०
अपीलाथी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय प्राधिकारी अनुपस्थित.

अपीलार्थीने दिनांक १.०९.२००९ च्या अर्जाव्दारे त्यांनी खालीलप्रमाणे माहिती मागितली होती. १) त्यांना देण्यात आलेले इलेक्ट्रीक बील हे निवासी आहे की व्यापारी तत्वाचे आहे. २) व्यापारी बिलाचे निवासी बिलात रुपांतर करण्याचे तत्व काय तसेच ३) निवासी बिलाचे व्यापारी बिलात रुपांतर करण्याचे तत्व व ४) निवासी मीटर किती प्रकारचे असतात, इत्यादि अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांना हवी असलेली माहिती योग्य ती फी भरुन कार्यालयातून प्राप्त करन घ्यावी असे दि.३०.०९.२००९ च्या पत्राव्दारे अपीलार्थीस कळविले होते. व अपील निकाली काढण्यांत आले परंतु माहिती न मिळाल्याने प्रथम अपील दाखल केले. परंतु प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी अपिलार्थीस यापूर्वीच पत्र पाठविले असल्याने कोणतीही कार्यवाही केली नाही.

अपीलार्थीने या विरोधात दि. १६.११.२००९ रोजी व्दितीय अपील आयोगाकडे केले. दिनांक १५.०३.२०१० रोजी सुनावणी घेण्यांत आली.

सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेल्या बाबी: १) अपीलार्थीने तसेच प्रथम अपीलीय प्राधिकारी व जन माहिती अधिकारी हे तिघेही सुनावणीच्या वेळी अनुपस्थित होते. २) अपीलार्थीने दि.१६.११.२००९ रोजी माहितीसाठी रु.५०/- भरलेले आढळून आले ३) जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती देण्याची तयारी दाखविली होती. याप्रकरणी सुनावणीस सर्वच जण अनुपस्थित राहिल्याने अपिलार्थीस माहिती मिळाली असावी असे गहीत धरण्यांत येत आहे व त्यांना माहिती मिळाली आहे असे त्यांच्या अपील मेमोवरुन दिसते. अर्जदारांना एका मुद्यावर खुलासा पाहिजे आहे असे दिसते. माहितीच्या अधिकरामध्ये खुलासा करण्याची जरी आवश्यकता नसली तरी व्यापारी कनेक्शनचे निवासी कनेक्शन रुपांतराच्याबाबतीत शक्याशक्यता/धोरण याबाबतीत अर्जदारास ७ दिवसात माहिती द्यावी असे धोरण नसल्यास तसे करावे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक २५.०३.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/अपील क्रमांक ५३१८/०२

श्रीमती प्रणाली धायलकर, ----- अपीलार्थी
२३/३९,दिसली रोड, बी.डी.डी.चाळ,
एम.एम.जोशी मार्ग, मुंबई १३.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी ----- उत्तरवादी

आमदार निवास मंत्रालयाजवळ, मुंबई ४०० ०३२

२. जन माहिती अधिकारी
आमदार निवास मंत्रालयाजवळ, मुंबई ४०० ०३२

***---विवेचन---***

**व्दितीय अपीलाचा दिनांक : १७.११.२००९**
**सुनावणीचा दिनांक : ०६.०२.२०१०**
**अपीलार्थी : उपस्थित**
**जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय प्राधिकारी : अनुपस्थित.**

अपीलार्थीनी दिनांक ३१.०७.२००९ च्या अर्जान्वये कोर्ट प्रकरणांशी संबंधीत माहितीची मागणी केली. जन माहिती अधिकारी यांनी दि.१८.०९.२००९ च्या पत्रान्वये त्यांना असे कळविले की आपण कार्यालयात येउन माहितीच्या विषयाशी संबंधीत फाईल बघावी व आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या प्रती शुल्क भरुन आपणास मिळू शकतील. दरम्यानच्या काळात त्यांनी दि.१.०९.२००९ रोजी प्रथम अपील केले. तथापि त्यांना प्रतिसाद मिळाला नसल्याने त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपीलावरील सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की अपीलार्थीना कागदपत्रे बघण्यासाठी बोलाविले होते तथापि त्या आल्या नाही. यावर आयोगाचे असे निदेश आहेत की अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात जाउन स्वत: सर्व फाईल्स बघाव्या व त्यातील जी कागदपत्रे त्यांना हवी असतील त्यांची यादी त्यांना जन माहिती अधिकारी यांनी द्यावी. जन माहिती अधिकारी यांनी यादीनुसार कागदपत्रांच्या प्रती अपीलार्थीना विनाशुल्क उपलब्ध करुन द्याव्या.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक २५.०३.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/अपील क्रमांक ५३१९/०२

श्रीमती प्रणाली धायलकर, -----
अपीलार्थी
२३/३९,दिसली रोड, बी.डी.डी.चाळ,
एम.एम.जोशी मार्ग, मुंबई १३.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी -----
उत्तरवादी
कार्यकारी अभियंता (बांधकाम) इलाखा शहर
विभाग यांचे कार्यालय, ३ रा मजला, डी.डी.इमारत,
जुने जकात घर आवार, मुंबई २३

२. जन माहिती अधिकारी
कार्यकारी उपअभियंता (बांधकाम) इलाखा शहर
विभाग यांचे कार्यालय, ३ रा मजला, डी.डी.इमारत,
जुने जकात घर आवार, मुंबई २३

*---विवेचन---*

व्दितीय अपीलाचा दिनांक : १७.११.२००९
सुनावणीचा दिनांक : ०६.०२.२०१०
अपीलाथी : उपस्थित
जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय प्राधिकारी : उपस्थित

अपीलाथीनी दिनांक ३०.०७.२००९ च्या अर्जान्वये मागितलेल्या माहितीचा थोडक्यात तपशील खालीलप्रमाणे.

1) **Furnish information about cases filed before Suprimcourt thigh Court (Bombay Bench), City Civil & Sessions Court,**

**Maharashtra Administrative Tribunal, against Ministry of Public Works Department.**

2) Furnish information on implementation of order of the above men timed authorities.
3) Furnish information on duties & powers of officials.

उपरोक्त माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी दि.१.०९.२००९ रोजी प्रथम अपील केले. यावरील सुनावणीच्या वेळी अपीलार्थीना स्पष्ट करण्यात आले की त्यांनी मागितलेल्या माहितीचा अर्थबोध होत नसल्याने त्यांनी कार्यालयात उपस्थित राहून माहितीबाबत उलगडा करावा व त्याप्रमाणे त्यांना माहिती पुरविण्यात येईल. यावेळी अपीलार्थीनी सांगितले की माहितीचा अधिकार अमलात आल्यापासून कार्यालयातील संपुर्ण कोर्ट केसेसबाबत त्यांना माहिती हवी आहे. ही माहिती प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांच्या निर्णयानुसार निर्णयाच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत अपीलार्थीना यावयाची होती. परंतु माहिती मिळाली नसल्याचे कारण नमूद करुन त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे लेखी निवेदन आयोगास सादर केले. त्याचे अवलोकन करता असे दिसून येते की अपीलार्थीना द.३.११.२००९ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली आहे. अपीलार्थीना माहिती दिलेली असल्यामुळे खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत.

*---आदेश---*

अपील निकाली काढण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक २५.०३.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४४५९१/९३/९४/९५/अपील क्रमांक ५३९२/०२

श्री.अर्चना श्रीवास्तव, -----
अपीलार्थी
६९,न्यू मळा बाबासाहेब आंबेडकर रोड,
खार (प), मुंबई ४०० ०५०

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता -----
उत्तरवादी
जी/उत्तर विभाग यांचे कार्यालय, हरिचंद येवले मार्ग,
दादर (प), मुंबई २८

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी उपअभियंता
जी/उत्तर विभाग यांचे कार्यालय, हरिचंद येवले मार्ग,
दादर (प), मुंबई २८

*---विवेचन---*

व्दितीय अपीलाचा दिनांक : १.१२.२००९
सुनावणीचा दिनांक : १७.०२.२०१०
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय प्राधिकारी : अनुपस्थित

श्रीमती अर्चना श्रीवास्तव, मुंबई यांनी दि. २०.०६.२००९ रोजीच्या अर्जाव्दारे प्रकल्प अधिकारी (धारावी) यांचे पत्र क्र.४३०२३/प्रकल्प अधिकारी धारावी,दि. २२.०४.२००९ व उपायुक्त विशेष लोदी-१५,दि.१.१२.२००९ च्या संदर्भात देण्यात आलेले उत्तर व उल्लेख केलेल्या फोटोपास क्रमांकाची नक्कल इत्यादिच्या साक्षांकित प्रती मिळण्याची माहिती मागितली होती. त्यास अनुसरन जन माहिती अधिकारी यांनी मुद्या क्र.१ व ३ ची माहिती उपलब्ध असून योग्यती फी भरन माहिती प्राप्त करावी व शिल्लक मुद्दा क्र २ व ४ ची माहिती वरष्ठि वसाहत अधिकारी जी/उत्तर विभाग यांच्याशी संबंधीत असल्याने ते देतील.

अपीलार्थीने दाखल केलेल्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दिनांक २१.११.२००९ रोजी सुनावणी घेतली त्यावेळी जी/उत्तर विभागांचे अधिकारी व अपीलार्थी उपस्थित होते. सदर सुनावणी दरम्यान अपीलार्थीने मागितलेल्या माहितीबाबत सविस्तर चर्चा करण्यांत आली. त्यावेळी प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी त्यांच्या दि.२१.११.२००९ रोजी प्रकल्प अधिकारी व वरिष्ठ वसाहत अधिकारी यांनी अपीलार्थीस ७ दिवसात माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश देण्यात आले परंतु माहिती न मिळाल्याने अपीलार्थीने व्दितीय अपील दाखल केले.

सुनावणीच्यावेळी अपीलार्थी व वरिष्ठ वसाहत अधिकारी श्री साळवे उपस्थित होते. त्यावेळी निदर्शनास आलेल्या बाबी १) प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी पारित केलेल्या दि.२१.११.२००९ च्या आदेशानुसार अपीलार्थीस कार्यालयीन अभिलेखावरन प्रकल्प अधिकारी (जन माहिती अधिकारी) व वरिष्ठ वसाहत अधिकारी (जन माहिती अधिकारी) यांनी ७ दिवसात आत माहिती देण्याचे सांगितले होते पण वसाहत अधिकाऱ्यांनी अपीलार्थीस माहिती दिलेली नाही वरिष्ठ वसाहत अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान आयोगास दि.१७.०२.२०१० चे जे पत्र दिले आहे त्यात ४-५ दिवसात माहिती देण्यांत येईल असे नमूद केले आहे.

वसाहत अधिकारी यांनी मुदतीत माहिती न दिल्याबद्दल त्यांचेवर रु. ५०००/-ची शास्ती लादण्यात येत आहे. ही शास्ती महापालिकेने १ मे रोजी देय असणाऱ्या

पगारातून वसूल करावी व शासनाने विहित केलेल्या बजेट हेडमध्ये जमा करुन आयोगास अनुपालन अहवाल १५ मे पर्यत पाठवावा.

---आदेश---

अपील मान्य करण्यांत येत आहे.
महापालिकेने उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक २५.०३.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४४४४३/अपील क्रमांक ४९५८/०२

श्रीमती मीना गुप्ता, -----
अपीलार्थी
बिल्डीग नं.५, प्लॉट नं.६६,सरदार नगर, नं.४,
सायन कोळीवाडा, मुंबई ४०० ०५०

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी -----
उत्तरवादी
तंत्र शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य,

३ महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७,
धोबी तलाव, मुंबई २८

२. जन माहिती अधिकारी
तंत्र शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य,
३ महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७,
धोबी तलाव, मुंबई २८

*---विवेचन---*

व्दितीय अपीलाचा दिनांक : १४.१०.२००९
सुनावणीचा दिनांक : ६.११.२००९
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय प्राधिकारी : अनुपस्थित

श्रीमती मीना गुप्ता यांनी दिनांक २१.०९.२००९ च्या अर्जाव्दारे केदीभूत प्रवेश प्रक्रियेबाबत माहिती मागितली होती तर दि.२३.०९.२००९ च्या अर्जाव्दारे ऑडिओ व व्हिडीओ मार्फत मिळावीत जॉर्जबरोबर झालेल्या संभाषणाची सीडी तसेच लॉझसिलींग लिस्ट वगैरे माहितीची मागणी केली होती.

जन माहिती अधिकारी त्यांच्या अर्जानुसार दि.५.११.२००९ रोजी तंत्र शिक्षण संचालनालय मुंबई १ येथे सुनावणीसाठी बोलविले व संपुर्ण प्रवेश प्रक्रीया समजावून सांगितली पण त्यांना आवश्यक असलेल्या कागदपत्राच्या छायांक्ति प्रती घेण्यास त्यांनी नकार दिला, त्यानंतर त्यांनी प्रथम अपीलाव्दारे सन २००९ ते २०१० या कालावधीतील इंजिनिअरिग डीग्रीसंबंधी माहिती मागितली होती तीही त्यांना देण्यात आलेली आहे. अपीलार्थीने प्रथम अपीलावरील मुद्यावर माहिती न मिळाल्याने व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपीलाच्या सुनावणीच्यावेळी अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते त्यावेळी निदर्शनास आलेल्या बाबीः- १)अपीलार्थीने मागितलेली माहिती विस्तत स्वरपाची असून एकूण मूळ मुद्ये १३ व पोट मुद्ये ३६ होते त्यातील काही मुद्ये प्रश्नार्थक स्वस्र्याचे होते तरीही जन माहिती अधिकारी यांनी संपूर्ण प्रवेश प्रक्रीया व त्यांच्या छायांक्ति प्रती व जी माहिती अपिलार्थीस देण्यायोग्य होती ती

देण्यांत आली, तसेच जी माहिती उपलब्ध नाही ती देण्याचे बंधन त्यांना नाही म्हणून त्यांनी अधिनियमाच्या कलमाप्रमाणेच नाकारलेली आहे प्रस्तत प्रकरणी पाहिले असता असे दिसून येते की अपीलाथीस माहिती दिली आहे.

आयोगापुढील सुनावणीच्या वेळी अर्जदारास कोणत्या मुद्यावरील माहिती त्यांना अजून मिळाली नाही असे वाटते ते मुद्ये त्यांनी त्यांना लिहून देण्यास सांगण्यात आले. त्यातील ३ मुद्दे सांगितले मूळ अर्जातच नाहीत मुद्या क्र.६ (वाटुमल इन्स्टीटयूट) च्या बाबतीत माहिती वेबसाईटवरच आहे असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. उर्वरीत ३ मुद्यांच्याबाबतीत उपलब्ध माहिती त्वरीत देण्यात येईल असे निवेदन जन माहिती अधिकारी यांनी केले.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यांत येत आहे.
संबंधितांनी उपरिनिदिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक २५.०३.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/३८८८५/अपील क्रमांक ४३३७/०२

श्री. कारभारी लहानू गर्जे -----
अपीलार्थी
गौरीपूत्र, १४४/४३१८, (तळमजला),

कन्नमवार नगर, विक्रोळी (पूर्व) मुंबई ८३.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा शिक्षण निरीक्षक ----- उत्तरवादी
बृहन्मुंबई (उत्तर विभाग )
नवीन प्रशासकीय भवन, २ रा मजला, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग,
चेंबूर (पूर्व) मुंबई ४०० ०७१.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक
सावित्रीबाई फुले विद्यालय (माध्यमिक)
द्वारा- श्रेष्ठ क्लासेस, रमाबाई आंबेडकर नगर,
घाटकोपर (पूर्व) मुंबई ४०० ०७५.

*---विवेचन---*

अपील क्रमांक ४३३७ मध्ये झालेल्या दि. २० मे २००९ रोजीच्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस माहिती देण्याची कार्यवाही न केल्याबद्दल त्यांचा खुलासा मागविण्यात आला होता. शाळेच्या मुख्याध्यापकांनी स्वतः उपस्थित राहून जी जी माहिती देण्यांत येत आहे त्याची यादी आयोगाला सादर केली. त्यांच्या म्हणण्यानुसार आपसातील वैमनस्यामुळे अपीलार्थी माहितीच्या अधिकाराखाली वेगवेगळया पध्दतीची माहिती मागवित आहेत.

अपीलार्थी श्री. गर्जे यांच्या शाळेची मान्यता ही शासनाने आर्थिक फसवणूक केल्यामुळे काढून घेतलेली आहे व श्रीयुत गर्जे यांच्या संस्थेचे सचिव हे पूर्वी त्यांच्या शाळेत सहायक शिक्षक होते व ही शाळा बंद करण्यासाठी ते अनेक तक्रारी करीत आहेत.

माहितीच्या अधिकारामध्ये माहिती देय आहे किंवा नाही एवढे पाहणे आयोगास आवश्यक असते. त्यामुळे आपसातील हेवेदाव्याची दखल घेणे आयोगास आवश्यकता वाटत नाही. अपीलार्थीनी मात्र माहिती मागताना विवेक बाळगणे आवश्यक आहे.

अपिलीय अधिकारी तथा शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई उत्तर विभाग यांना असे निर्देश देण्यात येतात की, त्यांनी अपिलीय आदेशात माहिती देण्याचे निर्देश दिलेले होतेच. शाळेने दिलेल्या माहितीबाबत खातरजमा करुन घेण्यात यावी. शास्तीबाबत आदेश नाही.

***----आदेश---***

प्रकरण बंद करण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक २६.०३.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४४९९६/अपील क्रमांक ५२३०/०२

श्री. मो. रफिक चाँदमिया शेख ----- अपीलार्थी
७/६२, रमाबाई आंबेडकर नगर,
घाटकोपर (पूर्व) मुंबई ४०० ०७५.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी ----- उत्तरवादी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
(अभियांत्रिकी कक्ष) म्हाडा इमारत,
५ वा मजला, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१.

२. जन माहिती अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
(अभियांत्रिकी कक्ष) म्हाडा इमारत,
५ वा मजला, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक ५/११/२००९
सुनावणीचा दिनांक २०/१/२०१०
अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

श्री. मोहम्मद शेख यांनी त्यांचा अर्ज दि. ५/६/२००९ नुसार न.भू.क्र. १९४-अ/ १९५, सर्व्हे क्र. २३६, २४९/अ मौजे घाटकोपर ता. कुर्ला. जि. मुंबई उपनगर येथील भूखंडावर मे. ऐटको डेव्हलपर्स आणि रियाल्टी प्रा.लि. व वास्तुतज्ञ यांनी एस.आर.ए. योजने अंतर्गत सादर केलेला प्रस्ताव, (२) विकासाचे प्रस्ताव रद्द करण्याबाबत. (३) झोपडपटी पुनर्वसन प्राधिकरण यांचेकडील अर्ज कार्यवाही वगैरे माहिती मागविली होती. यावर जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही म्हणून प्रथम अपील करण्यांत आले. त्यावरील सुनावणीस अपीलार्थीस दोन वेळा प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी बोलाविले होते. त्यावेळी झालेल्या चर्चेत विकासक मे ऐटको डेव्हलपर्स आणि रियाल्टी प्रा.लि. यांचा प्रस्ताव मा.अप्पर जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांनी निकाली काढण्यासाठीचे शिफारस पत्र सचिव (झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण)यांना दि.३१.०१.२००९ रोजी पाठविण्यांत आले आहे याची माहिती अपीलार्थीस आहेच.

अपीलार्थीनी द्वितीय अपील अर्जात दोन मुद्दे उपस्थित केले आहेत. द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थी तसेच जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी हजर होते. सुनावणीच्या वेळेस झालेल्या चर्चेत प्रथम अपिलीय अधिकारी यांनी विकासकाचा प्रस्ताव निकाली काढण्याबाबत शिफारसपत्र मा. सचिव (झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण ) यांना पाठविण्यात आले आहे याचा पुनरूच्चार केला. तसेच मुद्दा २ बद्दल असे सांगण्यात आले की, उप जिल्हाधिकारी

(झो.पु.प्रा.) यांजकडून झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या अभियांत्रिकी विभागास अहवाल प्राप्त झाल्यानंतर प्रकरणी योग्यती कार्यवाही करण्यात येईल असेहि अपीलार्थीस सांगण्यात आले. सद्य:स्थितीची माहिती दिली असल्याने पुढील आदेश देण्यात येतो.

## ---आदेश---

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक २६.०३.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/३४०६९/अपील क्रमांक १८२७/०२

श्री. दिलीपकुमार पी. दोशी ----- अपीलार्थी
वनमाळी भवन, नवरोजी लेन,
घाटकोपर (पूर्व) मुंबई ४०० ०८६.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा महाप्रबंधक ----- उत्तरवादी
उच्च न्यायालय, मुंबई.

२. जन माहिती अधिकारी
उच्च न्यायालय, मुंबई.

***---विवेचन---***

श्री. दिलीप दोशी, मुंबई यांनी दि. ४ फेब्रूवारी, २००८ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडे उच्च न्यायालय, मुंबई येथील सूट नं. ८९/२००७ व नोटीस ऑफ मोशन १३८४/२००७ च्या अनुषंगाने कायदेशीर मत व सल्ल्याची मागणी केली आहे.

जन माहिती अधिकारी तथा मास्टर आणि सहायक प्रोथोनोटरी, उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि. ८/२/२००८ रोजीच्या पत्रान्वये अपीलार्थीस असे कळविले आहे की, त्यांनी मागितलेली माहिती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार कायदेशीर मत अथवा सल्ला या स्वरुपाची असल्यामुळे देता येत नाही.

अपीलार्थीनी सदर आदेशाने समाधान झाले नाही म्हणून दि. ३ जून, २००८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. त्यास प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी २४ जून, २००८ रोजी उत्तर दिलेले असून ते खालील प्रमाणे आहे.

"The appellant has grievance that under what provision of law the Suit No. 89/2007 was valid & admitted. So also under what provision of law the notice of motion No. 223/2007 & notice No. 1384/2007 are valid. The information sought by the appellant is not within the ambit of section 2 (f) i.e. the definition clause of the Right to Information Act 2005.

Moreover as per order passed by the PIO the other information requested by him has already been furnished. Hence the appeal stands dismissed."

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचे आदेशाने देखिल समाधान झाले नाही म्हणून अपीलार्थीनी दि. १०/७/२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी

दि. ४/२/२००९ रोजी आयोजित केली होती. त्यास जन माहिती अधिकारी, उच्च न्यायालय, मुंबई हे उपस्थित होते. अपीलार्थी अनुपस्थित होते.

अपीलार्थींचे अपील व त्यासोबतची कागदपत्रे तसेच जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी सादर केलेली माहिती विचारात घेता प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपीलार्थीस योग्य तो निर्णय दिलेला आहे. त्यामुळे अपीलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे.

*---आदेश---*

अपील फेटाळण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक २६.०३.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४१८९०/अपील क्रमांक ४८३७/०२

श्री. डॉ. एस.एस. प्रभू -----अपीलार्थी
ब- २९, उदयन-प्रभा, तेजपाल स्कीम रोड नं.२,
विलेपार्ले (पूर्व) मुंबई .

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी -----उत्तरवादी
सहकार व वस्त्रोद्योग विभाग,
३ रा मजला, रुम नं. ३११, मंत्रालय, मुंबई ३२.

२. जन माहिती अधिकारी
सहकार व वस्त्रोद्योग विभाग,
३ रा मजला, रुम नं. ३११, मंत्रालय, मुंबई ३२.

---*विवेचन*---

अपीलार्थी श्री. एस.एस.प्रभू यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १/७/२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. २१/४/२००९ रोजी अर्ज करुन, सहकार पणन व वस्त्रोद्योग विभागाकडे दाखल केलेल्या पत्रावर केलेल्या कारवाईची माहिती मागितली होती. उक्त अधिनियमातील कलम ५(१) अनुसार प्रत्येक शासकीय कार्यालयात जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांची नियुक्ती केलेली आहे. अपीलार्थीनी मागितलेली माहिती उपनिबंधक, सहकारी संस्था (म्हाडा) , गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) यांचेशी संबंधित असल्याने अपीलार्थीचा अर्ज दि. २१/४/२००९ रोजी त्या प्राधिकरणाकडे हस्तांतरित केला. यासंबंधी संबंधित कार्यालयाकडे परस्पर संपर्क साधण्याबाबत अपीलार्थीस जन माहिती अधिका-यांनी कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलार्थीनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलार्थीच्या दि. १०/१२/०८ , १६/२/२००९ व १/३/२००९ च्या या ३ निवेदनावर कोणती कार्यवाही करण्यात आली याबाबतची माहिती अपीलार्थीस १५ दिवसाचे आत कळवावी. व दि. २१/४/२००९ च्या अपील अर्जात उपस्थित केलेल्या मुद्दयाबाबत समर्पक माहिती द्यावी असे जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव कार्यासन १४ स यांना

दि. २४/७/२००९ रोजी अपिलीय अधिकारी यांनी आदेश दिले. त्यानंतरही जन माहिती अधिका-यांनी समर्पक माहिती दिली नसल्याने अपीलार्थीनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि. १५/१०/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी तसेच अपीलार्थी उपस्थित होते.

सुनावणीचे वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलार्थीनी जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन सहकार पणन व वस्त्रोद्योग विभागाकडे दाखल केलेल्या अर्जावरील कार्यवाहीची माहिती मागितली होती.

सदर प्रकरणी अपीलार्थीच्या निवेदनावर केलेल्या कार्यवाहीची माहिती १५ दिवसाचे आत अपीलार्थीस कळवावी असे मौखिक आदेश दिले व प्रथम अपिलीय अधिका-यांनी लेखी आदेश दि. २४/९/२००९ रोजी पारित केले आहेत.

अपिलीय अधिकारी यांनी दि. २४/७/२००९ रोजीच्या सुनावणीचेवेळी दिलेल्या मौखिक आदेशानुसार ६ ऑगस्ट २००९ रोजी अवर सचिव, सहकार विभाग यांनी अपीलार्थीस माहिती दिली आहे व त्यांत वस्तुस्थिती व सद्य:स्थिती दर्शविलेली आहे.

आयोगापुढील सुनावणीच्या वेळी दि. ६/८/२००९ रोजीच्या पत्रात अपीलार्थीचा दि. १०/१२/२००८ चा अर्ज (माहिती अधिकारातील नव्हे ) हा सहकार आयुक्तांकडे अभिप्रायार्थ पाठविला आहे असे अपीलार्थीस कळविले होते, आता त्यांचे अभिप्राय आलेले असून याबाबत गृहनिर्माण विभागाशी सल्लामसलत करण्यात येत आहे, व त्यांचे अभिप्राय प्राप्त झ ालेवर अंतिम निर्णय घेण्यात येईल असे सांगण्यांत आले.

अपीलार्थींची विनंती  या सर्व कागदपत्रांच्या तपासणीचीहि आहे.   त्याप्रमाणे त्यांना जन माहिती अधिकारी यांनी तपासणी द्यावी.

---आदेश---

सद्यःस्थितीची माहिती दिली असल्याने अपील निकाली काढण्यात येत आहे.
अपीलार्थीस तपासणी देण्यात यावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक २६.०३.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५१८६/अपील क्रमांक ५३०२/०२

श्री. मिलींद शरद मुळे -----अपीलार्थी
२८४/१२, भांडेकर सदन, एन.सी.केळकर रोड,
दादर, मुंबई - ४०० ०२८

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी -----उत्तरवादी
पोलीस आयुक्त कार्यालय, क्रॉफर्ड मार्केट समोर,
डॉ.डी.एन. रोड, मुंबई - ४०० ००१.

२. जन माहिती अधिकारी
पोलीस आयुक्त कार्यालय, क्रॉफर्ड मार्केट समोर,
डॉ.डी.एन. रोड, मुंबई - ४०० ००१.

---विवेचन---

अपीलाचा दिनांक : ९.११.२००९
सुनावणीचा दिनांक : ४.०२.२०१०
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी :
प्रथम अपिलीय अधिकारी :

अपीलार्थीनी दिनांक १०.०८.२००९ च्या अर्जान्वये सायबर क्राईम विभागाने मुंबई व नवी मुंबई स्थित किती सार्वजनिक, खाजगी व शासकीय आस्थापनांना दिनांक ९.०१.२००९ परिपत्रकाच्या अनुषंगाने भेटी दिल्यात याबाबतच्या तपशीलाची मागणी केली. या अर्जाला जन माहिती अधिकारी यांनी दि.१०.०९.२००९ रोजी खालील उत्तर दिले.

आपण मागणी केलेल्या माहितीबाबत आपणांस असे कळविण्यात येते की, जी माहिती उघड करण्याचा कोणत्याही सार्वजनिक कामकाजाशी किंवा हित संबंधाशी कोणताही संबंध नसेल अशी माहिती माहितीचा अधिकार अधिनियम कलम ८ (१) (त्र) अन्वये नाकारण्यात येत आहे.

वरील उत्तराच्या विरुध्द त्यांनी दिनांक १६.०९.२००९ रोजी प्रथम अपील केले. प्रथम अपीलावर दि.१९.११.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली व खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी कलम ८ (१) (त्र) अन्वये नाकारलेल्या निर्णयाशी आम्ही सहमत आहोत. अपीलार्थीनी मागितलेल्या मुद्यांपैकी आपल्या कार्यालयाच्या अभिलेख्यावरील उपलब्ध असलेली माहिती सात दिवसांच्या आत पुरविण्यात यावी.

दरम्यानच्या काळात दिनांक ९.११.२००९ रोजी त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. यात त्यांनी असे नमूद केले की, सायबर क्राइम विभाग शहरातील विविध आस्थापनांना भेटी देऊन इंटरनेट वापरण्याऱ्यांना WI-FI च्या सुरक्षिततेबाबत शिक्षित करणार आहेत अशा आशयाची बातमी वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली होती व याच भेटींबाबत त्यांनी माहिती मागितली होती तेव्हा यात गोपनियतेचा भाग काहीही नाही.

व्दितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे दि.३.०२.२०१० रोजीचे लेखी निवेदन आयोगास सादर केले. याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की अपीलार्थींना खालीलप्रमाणे माहिती पुरविण्यात आली आहे.

दिनांक २७.११.२००९ रोजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सायबर गुन्हे अन्वेषण कक्ष, गुन्हे शाख गुन्हे अन्वेषण विभाग, मुंबई यांनी सादर केलेला अहवाल या व्यतिरिक्त इतर कुठचीही माहिती विभागाकडे नाही.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेऊन खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक २६.०३.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५१८२अपील क्रमांक ५२९९२

श्री. आनंद सारंग ----अपीलार्थी
यशोदा कुंज, रोड क्र. १, चेंबूर,
मुंबई -- ४०० ९७१.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा सहायक मनपा आयुक्त -----उत्तरवादी
एम/पश्चिम विभाग इमारत,
शरद भाऊ आचार्य मार्ग, चेंबूर, मुंबई ७१.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ.का)
एम/पश्चिम विभाग इमारत,
शरद भाऊ आचार्य मार्ग, चेंबूर, मुंबई ७१.

---विवेचन---

अपीलाचा दिनांक २५/१०/२००९
सुनावणीचा दिनांक ४/२/२०१०
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

अपीलार्थींनी दि. २७/२/२००९ च्या अर्जान्वये खालील माहिती मागितली ती सारांक्ष रुपाने खालील प्रमाणे -

1) Whether MRTP action order 51 (1) was initialed against K.S.Academy in the year 2002, 2003, 2004.
2) Action
3) Whether the building proposal proposed by the defaulter was rejected.
4) Copy of rejection letter
5) Whether the lenant of Vinayak smutty, Rd. No.1 also complained of change of user by K.S.Accdemy ete.

उपरोक्त अर्जाला जन माहिती अधिकारी यांनी दि. १६/६/२००९ रोजी उत्तर दिले. परंतु यावर समाधान न झाल्याने त्यांनी दि. २/७/२००९ रोजी प्रथम अपील केले. यावर सुनावणी होऊन दि.२४/८/२००९ रोजी आदेश पारित करण्यात आले. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांना असे निर्देश देण्यात आले की, त्यांनी माहिती अर्जातील मुद्दा क्र. २ बाबत सुधारित माहिती अपीलार्थीस पुरवावी. तथापि अपीलार्थीस माहिती मिळाली नाही व जी मिळाली ती अपूर्ण आहे. यास्तव त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी लेखी निवेदन सादर केले. त्यात असे नमूद केले आहे की, अपीलार्थींनी मागितलेल्या माहितीशी संबंधित फाईलचा शोध घेऊन ती मिळविली आहे. अपीलार्थींच्या अर्जात यशोदा कुंज व विनायक स्मृती या दोन इमारतींचा उल्लेख आहे. शोध घेतला असता विनायक स्मृती नावाची इमारत आढळून आली नाही. उपलब्ध फाईलची छायाप्रत अपीलार्थींना देण्यात येईल.

उपरोक्त निवेदनाचा विचार करता आयोगाचे असे निदेश आहेत की, अपीलार्थींना फाईलच्या छायाप्रती सदर आदेशाच्या दिनांकापासून १० दिवसाच्या आत विनामूल्य देण्यात याव्यात.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक २९.०३.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/सीआर/अपील क्रमांक १०४/१०

श्री. विकास जगन्नाथ चोपडे ----अपीलार्थी
मेन रोड, मु.पो. तालुका यावल,
जिल्हा जळगांव.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी -----उत्तरवादी
नगरपरिषद यावल, ता. यावल, जि. जळगांव.

२. जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता

**नगरपरिषद यावल, ता. यावल, जि. जळगांव.**

***---विवेचन---***

**अपीलाचा दिनांक १४/०७/२००९**
**सुनावणीचा दिनांक ६/०३/२०१०**
**अपीलार्थी , जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित.**

**अपीलार्थी श्री. विकास जगन्नाथ चोपडे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १४/७/२००९ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, जळगांव येथे दि. ६/३/२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली.**

**अपीलार्थींनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २३/२/२००९ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.**

**१. यावल नगरपरिषद हद्दीतील मंजूर विकास योजना सि.स.नं.१७८८ आरक्षण क्र. १८, पोस्ट खाते बाबत नगरपरिषद यांना प्राप्त प्रत.**

**२. संचालक नगररचना मुल्य निर्धारण यांचे निकाल पत्र.**

**३. टाऊन प्लॅनिंग ॲक्ट १२७ प्रमाणे भूसंपादन मुदतीत कार्यवाही न झाल्याने व्यपगत झालेले आरक्षण.**

**४. जागा मालकानी रेकॉर्डमध्ये दुरुस्तीसाठी दिलेला अर्ज.**

**५. नगरपरिषद कार्यालयांचा आरक्षण वगळण्याबाबत पारित ठराव इत्यादी अनुषंगाने माहिती मागितली होती.**

**जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस विहित मुदतीत माहिती न दिल्याने अपीलार्थींनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलावर अपिलीय अधिकारी यांनी**

कोणतेही आदेश पारित केले नाहीत किंवा अपीलाची दखल घेतलेली नाही. दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी दि. २८/४/२००९ च्या पत्राद्वारे बरीच माहिती दिली.

अपीलार्थींनी माहिती अपूरी व दिशाभूल करणारी असल्याचे नमूद करुन आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलावरील सुनावणीस अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. त्यामुळे अपीलार्थीस माहिती मिळाली की नाही याचा बोध होत नाही. अशा महत्वाच्या सुनावणीस अपीलार्थी गैरहजर राहिल्यामुळे आयोगास प्रथम अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी यांचेवर माहिती न देण्याबद्दल कारवाई करण्यास अडचण निर्माण होते.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस अधिनियमाच्या कलमानुसार १ महिन्यात माहिती देणे आवश्यक असते. परंतु त्यांनी ती २ महिन्यानंतर दिलेली आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलावर कार्यवाही केलेली दिसत नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचेवर रु. ५,०००/- ची शास्ती लावण्यात येत आहे. मुख्य अधिकारी , यावल नगरपरिषद यांनी ही शास्ती वसूली जन माहिती अधिकारी यांच्या १ मे, २०१० रोजी होणा-या पगारातून वसूल करावी व शासनाने विहित केलेल्या लेखाशिर्षाखाली जमा करुन तसा अहवाल आयोगास व नगर विकास विभाग यांना पाठवावा. या आदेशाची एक प्रत जिल्हाधिकारी जळगांव यांनाहि नगरपरिषदेकडून अनुपालन करुन घेण्यासाठी पाठविण्यात यावी.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस सर्वकष माहिती १५ दिवसांत विनामूल्य देण्यात यावी.

## ---आदेश---

अपील मान्य करण्यात येत आहे.

संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

या आदेशाची प्रत सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ आणि जिल्हाधिकारी, जळगांव यांनाहि पाठविण्यात यावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ३०.०३.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४६२०५/अपील क्रमांक ५५६२/०२
क्रमांक-मु.मा.आ/४६२०६/अपील क्रमांक ५५६३/०२

**श्री. मिर्झा अबुल हसन अब्दुल कुडूस ----अपीलार्थी**
**बी-४०८, सागर अपार्टमेंट, फादर पिटर परेरा रोड,**
**सीटी हॉस्पीटलमागे, सोनपूर लेन, एल.बी.एस.मार्ग,**
**कुर्ला (पश्चिम) मुंबई ४०० ०७०.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त -----उत्तरवादी**
**झोन ३, भायखळा, मुंबई ४०० ०२७.**

**२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त**
**मध्य नियंत्रण कक्ष, बावला कंपाऊंड,**
**भायखळा (पूर्व) मुंबई ४०० ०२७.**

***---विवेचन---***

**अपीलाचा दिनांक २२ डिसेंबर, २००९**
**सुनावणीचा दिनांक ३०/०३/२०१०**
**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

अपीलार्थी यांनी डॉ. अली अब्दुल कादीर दळवी व श्री. अख्तर जमाल कुरेशी यांच्याविरुध्द ४ कोटी ५८ लाखाची फसवणूक व धोकेबाजी करण्याची तक्रार गुदरली होती. यासंदर्भात त्यांनी कांही मुद्दयांवर माहिती विचारली होती व दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याने अंतिमतः आयोगाकडे ही दोन्ही द्वितीय अपीले सादर केली आहेत.

अपीलार्थीचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे खुलासा केलेला आहे.

"     अपीलार्थी यांनी केलेल्या अपील अर्जाचे अनुषंगाने प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. १५/१०/२००९ रोजी दिलेल्या अंतरिम आदेशान्वये व्हि.बी.नगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक भोसले यांनी अपीलार्थी यांच्याशी समन्वय साधून अपील अर्जातील नमूद मुद्दयांबाबतची माहिती देण्यास सांगितले होते. त्यानुसार पोलीस निरीक्षक भोसले यांनी दि. ६/११/२००९ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या अंतिम सुनावणीच्या वेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, व्हि.बी.नगर पोलीस ठाणे यांचा कार्यालयीन जा.क्र. ७२१७/०९ दि ०३/११/२००९ अन्वये माहिती सादर केली होती. त्यानुसार अपीलार्थी हे अंतिम सुनावणीच्या वेळेस गैरहजर असल्याने सदरची प्राप्त माहिती ही अपीलार्थी यांचे निवासस्थानी १० दिवसाचे आत रजिस्टर ए.डी. द्वारे पाठविण्याचे लेखी आदेश देऊन अपील निकाली काढले होते. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात अपीलार्थी दि. १२/११/२००९ रोजी समक्ष आल्याने त्यांना जा.क्र. ७५५०/प्रअ.क्र ८८७/सपोआ/मनिक/माहिती/०९ दि. ११/११/२००९ अन्वये वरिष्ठ पोलीस निरीक्षक, व्हि.बी. नगर पोलीस ठाणे यांचेकडून प्राप्त झालेली माहिती निःशुल्क पुरविण्यात येऊन त्याची दिनांकित स्वाक्षरी घेण्यात आली होती. सदर अपीलार्थी यांना पुरविण्यात आलेल्या माहितीमध्ये अपीलार्थी यांनी त्यांचे अर्जात नमूद केलेले होते की, ते सध्या रहात असलेल्या सोसायटीमधील तत्कालीन चेअरमन श्री.डॉ. अली अब्दुल दळवी व सेक्रेटरी श्री. शफिक रहमान बट यांनी अपीलार्थी यांना फ्लॅट ट्रान्सफर करतो परंतु आर्थिक गुन्हे शाखेकडे करण्यात आलेल्या रत्ना ड्रग्ज प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीविरुध्द केलेला तक्रार अर्ज माघारी घ्यावी नाही तर फ्लॅट ट्रान्सफर करणार नाही अशी धमकी देऊन बळजबरीने पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, तसेच उप निबंधक सहकारी सोसायटी ल वार्ड मुंबई यांचे नावे असलेल्या पत्रावर स्वाक्षरी करण्यास भाग पाडले आहे अशी तक्रार केली आहे. परंतु अपीलार्थी यांना दि. १५/१२/०९ ते २०/१२/०९ या मिळालेल्या कालावधीमध्ये त्यांचेवर दबाव नव्हता सबब स्थानिक पोलीस ठाणे किंवा इतर कोणत्याही पोलीस विभागाशी संपर्क

साधून तक्रार नोंदविणे आवश्यक होते परंतु त्यांनी तसे केलेले नाही. त्यामुळे आर्थिक गुन्हे शाखेकडे सदरचे प्रकरण तपासाकरीता असतानाही ते कोणत्याही निष्कर्षापर्यंत आलेले नाही. त्यामुळे अपीलार्थी यांनी केलेल्या दाव्यास पुष्टीदायक पुरावा मिळू शकलेला नाही असे नमूद केलेले आहे. "

जन माहिती अधिकारी यांनी असेहि सांगितले की, रत्ना ड्रग्ज कंपनी संदर्भात दखलपात्र गुन्हा होत नाही असा अभिप्राय कायदा अधिकारी यांचेकडून प्राप्त झाला आहे. त्याची प्रत व लेखी पत्र सुध्दा अपीलार्थीस देण्यांत आलेले आहे. त्यामुळे रेकॉर्डला असलेली सर्व माहिती अपीलार्थीस देण्यात आलेली आहे असे दिसून आले. याउप्परहि अपीलार्थीस स्वतः खात्री करुन घ्यायची असल्यास पोलीस स्टेशनमधील या केसच्या संदर्भाततील सर्व रेकॉर्डची पाहणी करुन त्यांना आवश्यक असलेल्या अतिरिक्त कागदपत्रांच्या प्रती सुध्दा ते प्राप्त करुन घेऊ शकतात.

पोलीसांनी योग्यप्रकारे चौकशी केली किंवा नाही , सर्व मुद्दे हाताळले किंवा नाही , गुन्हयाच्या बाबतीत निष्कर्ष योग्य आहेत किंवा नाही याबाबतीत निर्णय घेण्याचा अधिकार आयोगाला नाही. म्हणून रेकॉर्डमध्ये असलेली सर्व माहिती अपीलार्थीस देण्यांत आलेली असल्यामुळे पुढील आदेश देण्यात येतात.

***----आदेश---***

दोन्ही अपीले अमान्य करण्यात येत आहेत.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ३०.०३.२०१०

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४४५८४/अपील क्रमांक ५५६४/०२**

**श्री. मोहम्म्द शरीफ शब्बीर अहमद ----अपीलार्थी**
**मार्फत अधीक्षक**
**मुंबई मध्यवर्ती कारागृह मुंबई ४०० ०११.**
**श्री.मोहम्म्द शरीफ शब्बीर अहमद U.T- ६८१/२/४**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा सह सचिव -----उत्तरवादी**
**गृह विभाग, विशा-४,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी**
**गृह विभाग, विशा-४,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

***---विवेचन---***

श्री.मोहम्मद शरीफ शब्बीर अहमद , अंडर ट्रायल कैदी यांच्या आयोगाकडे असलेल्या तक्रारीची सुनावणी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगची सोय राज्य माहिती आयोगाकडे असल्यास दि. ३०/३/२०१० रोजी दुपारी १२-३० वाजता सदरील कैदयाला आयोगाकडे व्हिडीओ कान्फरन्सिंगद्वारा सादर करण्यात यावे असे निर्देश सिटी स्टेशन कोर्ट यांनी O.W.No .MCP/RTI/4284/2009 Dated 23/11/2009 अन्वये दिले होते. आयोगाकडे व्हिडीओ कॉन्फरन्सिंगची सोय आहे. मात्र मुंबई मध्यवर्ती कारागृहाशी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारा संबंध होऊ शकत नाही असे यावेळी सांगण्यांत आले. त्यामुळे अपीलार्थीच्या मुळ अर्जाचे अवलोकन करण्यात आले व जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून व निवेदन विचारात घेण्यांत आले. तसेच अपीलार्थींचा अपीलमेमो व तक्रार सुध्दा विचारात घेण्यांत आली.

अपीलार्थीस जी माहिती पाहिजे आहे ती शुल्क घेऊन द्यावयाची होती. व अपीलार्थीनी पाठविलेला शुल्काचा ड्राफ्ट हा विभागास मिळालेला नाही. त्यामुळे माहिती देण्यांत आलेली नाही असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे.

याबाबत जन माहिती अधिका-यांनी पुढीलप्रमाणे निवेदन दिलेले आहे.

"१. अपीलार्थी यांचा माहितीच्या अधिकाराअंतर्गतचा दि. २४/१०/२००७ चा मूळ अर्ज दि. २९/१०/२००७ रोजी प्राप्त झाला. त्यानुसार दि. ८ नोव्हेंबर, २००७ च्या पत्रान्वये अपीलार्थीस त्यांनी मागविलेल्या आदेशाच्या प्रती तयार ठेवल्याचे तसेच त्या प्रतींचा आणि टपाल खर्च अदा करण्याबाबत कळविण्यात आले. सदर अपीलार्थीच्या दि. २७ नोव्हेंबर, २००७ च्या पत्रान्वये माहितीसाठी आवश्यक शुल्काचा भरणा करण्याच्या अनुषंगाने डीमांड ड्राफ्ट दि. २४/१२/२००७ रोजी प्राप्त झाला होता. परंतु सदर ड्राफ्ट हा माझ्या वैयक्तिक नावाने प्राप्त झाला असल्याने व माहिती अधिकार अधिनियमात माहिती अधिका-याच्या वैयक्तिक नावाने धनादेश/डिमांड ड्राफ्ट स्वीकारण्याची तरतूद नसल्याने तसेच शासनास येणे असलेली रक्कम शासकिय अधिका-यास स्वतःच्या नावाने स्वीकारता येत नाही म्हणून

शासनाकडील बॅंक खाती अधिका-यांच्या नावाने उघडली जात नसल्याचे कळवून मूळ डिमांड ड्राफ्ट अपीलार्थीस परत करण्यात आला तसेच सुधारित डिमांड ड्राफ्ट पाठविण्याबाबत त्याचदिवशी कळविण्यात आले.

२. परंतु त्यानंतर अपीलार्थीकडून काही प्रतिसाद प्राप्त झाला नाही. मात्र अपीलार्थीचा दि. ६/२/२००८ चा अपील अर्ज दि. ५/३/२००८ रोजी प्राप्त झाला. दि. ५/३/२००८ रोजी प्राप्त झालेल्या अपील अर्जास अनुसरुन अपीलार्थीकडून सुधारित डिमांड ड्राफ्ट प्राप्त झाला होतो किंवा कसे याबाबत विभागामध्ये शोध घेण्यात आला. परंतु अपीलार्थीचे पत्र आणि त्याबरोबरचा डिमांड ड्राफ्ट प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही त्यामुळे अपीलार्थीस डिमांड ड्राफ्ट प्राप्त न झाल्याबद्दल दि. १०/३/२००८ रोजी अपिलीय अधिकारी व सह सचिव यांनी त्यांच्या दि. १०/३/२००८ च्या पत्रान्वये कळविलेले आहे. "

अपीलार्थींनी पाठविलेल्या दि. ८/१/२००८ रोजीच्या ड्राफ्टची फोटोकॉपी जोडलेली आहे त्यामुळे अपीलार्थीनी ही रक्कम जन माहिती अधिकारी यांना पाठविली आहे हे मानन्यास सकृतदर्शनी भरपूर आधार आहे.

अपीलार्थीस माहिती देय आहे व ती केव्हाही पाठविता येऊ शकेल असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. तेव्हा अपीलार्थीस हवी असणारी माहिती हे आदेश मिळाल्यापासून ५ दिवसांचे आत अपीलार्थींना रजिस्टर्ड पोष्टाने पाठविण्यात यावी.

***----आदेश----***

अपील मान्य करण्यात येत आहे.

संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक ३०.०३.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४६६३४/अपील क्रमांक ५५९९/०२**

**श्रीमती रेणू  काचोलिया ----अपीलार्थी**
**६२, उषा इमारत, १६१, एच-४,**
**एस.व्ही.रोड, विलेपार्ले (पश्चिम) मुंबई ५६.**

**विरुध्द**

१. अपिलीय अधिकारी तथा सहायक मनपा आयुक्त -----उत्तरवादी
के/ पश्चिम वॉर्ड, अंधेरी (पश्चिम)
मुंबई ४०० ०५८.

२. जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ निरीक्षक अनुज्ञप्ती,
के/ पश्चिम वॉर्ड, अंधेरी (पश्चिम)
मुंबई ४०० ०५८.

***---विवेचन---***

आयोगाच्या दि. २६/२/२००१० रोजीच्या आदेशानुसार अपीलार्थी यांनी केलेल्या अपीलानुसार जन माहिती अधिकारी यांना अस* आदेश दिले की, त्यांनी हे आदेश मिळाल्यापासून १० दिवसात प्रथम अपिलीय अधिका-यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे माहिती द्यावी. तसेच मुदतीत माहिती न दिल्याबद्दल शास्तीची कारवाई का करु नये याचा खुलासा द्यावा.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीच्या अपीलाअगोदरच दि. २९ डिसेंबर, २००९ रोजी केलेल्या कारवाईची माहिती दिलेली आहे व अपीलार्थीनी संबंधित नस्तीची पाहणी सुध्दा केलेली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले.

मात्र ज्या पॉलिसी गाईड लाईन्स प्रमाणे ही परवानगी देण्यात येते त्या पॉलिसी गाईड लाईनची प्रत उदयाच दि. ३१/३/२०१० रोजी अपीलार्थी यांनी स्वतः जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात जाऊन प्राप्त करुन घेण्याचे मान्य केले. त्यावेळेला अपीलार्थींना हवे तर पुन्हा एकदा नस्तीची पाहणी करुन आणखीन कांही कागदपत्रे हवी असतील तर ती प्राप्त करुन घेऊ शकतात.

मुंबई महापालिकेच्या प्रचलित गाईड लाईन प्रमाणे परवानगीची कारवाई झाली नाही असे जर अपीलार्थीना वाटत असेल तर त्यांनी त्याबाबत मुंबई महापालिकेच्या सक्षम प्राधिका-यांकडे तक्रार गुदरणे हे योग्य राहिल.

***---आदेश---***

शास्तीबाबत आदेश नाहीत.
प्रकरण निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ३०.०३.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४४१४५/अपील क्रमांक ५४९४/०२

श्री. चेतन कोठारी ----अपीलार्थी
५२, ओशियानिक अपार्टमेंट,
डॉ. राजाबली पटेल लेन, बी.देसाई रोड,
मुंबई ४०० ०२६.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी ----- उत्तरवादी
मुंबई उपनगर जिल्हा कार्यालय, १० वा मजला,
नवीन प्रशासकीय भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार बोरिवली
तहसिल कार्यालय बोरिवली, नाटकवाला लेन,
बोरिवली (पश्चिम).

३. जन माहिती अधिकारी
करमणूक व मनोरंजन कार्यालय ,
मुंबई उपनगर जिल्हा कार्यालय,
नवीन प्रशासकीय भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१.

४. जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार
तहसिल कार्यालय अंधेरी, दादाभाई नौरोजी रोड,
अंधेरी (पश्चिम).

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक ३० सप्टेंबर, २००९

सुनावणीचा दिनांक ११/३/२०१० व ३०/३/२०१०

अपीलार्थीस करमणूक व मनोरंजन कर द्वारा जमा झालेल्या महसूलासंबंधी माहिती पाहिजे होती. व ती न मिळाल्यामुळे त्यांनी आयोगाकडे अंतिमतः धाव घेतलेली आहे.

ही माहिती तहसिलदार कार्यालयापेक्षा एकत्रित स्वरुपात जिल्हाधिकारी कार्यालयातच प्राप्त होऊ शकते. त्यामुळे अपीलार्थीस २ दिवसांच्या आत यासंबंधीची माहिती पाठविण्याचे निर्देश जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय ( करमणूक शुल्क विभाग) यांना देण्यांत आले.

*----आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक ३०.०३.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५४०३/अपील क्रमांक ५५६७/०२
क्रमांक-मु.मा.आ/४६४०४/अपील क्रमांक ५५६८/०२

श्री. हरिष ठक्कर ----अपीलार्थी
२०, श्रीराम प्रसाद को.ऑप.हौ.सोसायटी,
बँक ऑफ बडोदा समोर, ७५, भाऊ दाजी रोड,
माटुंगा (मध्य) मुंबई ४०० ०१९.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक -----उत्तरवादी
सहकारी संस्था, मलहोत्रा हाऊस,
६ वा मजला, जी.पी.ओ.समोर, मुंबई ४०० ००१.

२. जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक
एफ/नॉर्थ वॉर्ड , मलहोत्रा हाऊस,
६ वा मजला, जी.पी.ओ.समोर, मुंबई ४०० ००१.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक ६ जानेवारी, २०१० व ७ जानेवारी, २०१०

सुनावणीचा दिनांक ३०/३/२०१०
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीना त्यांच्या श्रीराम प्रसाद को.ऑप.हौ.सोसायटीबाबत जी माहिती पाहिजे आहे त्याचे दोन भाग होतात.

१. जी माहिती गृहनिर्माण संस्था पातळीवरची आहे.

२. जी माहिती सहकारी संस्था, उपनिबंधक/सहायक निबंधक यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे अशी .

सुनावणीच्या वेळेला दोन्ही पक्षाशी चर्चा करुन असे ठरविण्यात आले की, संस्था पातळीवरची माहिती ही जन माहिती अधिकारी हे सहकार अधिनियमातील तरतुदीचा वापर करुन अपीलार्थीस मिळवून देतील.

जी माहिती सहायक निबंधक यांच्या कार्यालयामध्ये आहे उपलब्ध आहे त्या माहितीची सर्व कागदपत्रे मुद्देवार जन माहिती अधिकारी यांनी तयार ठेवावी व अपीलार्थी यांना त्या माहितीचे अवलोकन करु द्यावे व जी माहिती त्यांना हवी आहे ती माहिती अपीलार्थीस त्याच दिवशी देण्यात यावी.

***---आदेश---***

दोन्ही अपीले निकाली काढण्यात येत आहेत.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ३०.०३.२०१०

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४६३८५/अपील क्रमांक ५५७१/०२**

**श्रीमती. लता साहेबराव देशमुख ----अपीलार्थी**
**शॉप नं. ए- ३८, सागर पार्क,**
**घाटकोपर (पूर्व) मुंबई ४०० ०८६.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त -----उत्तरवादी**
**परिमंडळ ६, चेंबूर, मुंबई ७१.**

**२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त**
**पूर्व प्रादेशिक नियंत्रण कक्ष, चेंबूर , मुंबई ७१.**

---*विवेचन*---

**अपीलाचा दिनांक ४ जानेवारी, २०१०.**
**सुनावणीचा दिनांक ३०/३/२०१०**
**अपीलार्थी व त्यांचे वकील, तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित.**

**अपीलार्थीस C.C.N.47/Misc/05 तक्रारदार सतीश आत्माराम तळेकर यांच्या प्रकरणामध्ये हस्ताक्षर तज्ञांनी दिलेल्या अहवालाची प्रत पाहिजे होती. ही माहिती अधिनियमाच्या कलम ८(१)(ज) नुसार नाकारण्यात आली. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुध्दा जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ग्राहय धरुन अपीलार्थींचे अपील फेटाळले, त्याविरुध्द सदरचे अपील आहे.**

**आयोगाकडील सुनावणीच्या वेळेस तीन गोष्टी निदर्शनास आल्या.**

१. **सदरील केसमध्ये फौजदारी प्रकरणात सुप्रिम कोर्टाने स्थगनादेश दिलेले आहेत.**
२. **जन माहिती अधिकारी यांच्या म्हणण्यानुसार तपास अजून पूर्ण व्हायचा आहे.**
३. **अपीलार्थी जो हस्ताक्षरतज्ञांचा अहवाल मागतात तो अजून प्राप्तच झालेला नाही.**

**फौजदारी प्रकरण निवाडयासाठी मा.सुप्रिम कोर्टाच्या विचाराधिन असल्यामुळे सुप्रिम कोर्टाच्या निर्णयानंतरच तपासाच्या दिशेला निर्णायकता येऊ शकेल. तसेच जन माहिती अधिकारी यांनी माहिती नाकारण्याची जी कारणे दर्शविली आहेत ती आयोगास सयुक्तिक वाटतात. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.**

----*आदेश*---

**अपील अमान्य करण्यात येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि. जोशी),**

दिनांक ३०.०३.२०१०                                        राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले
अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक
१५००/०२

श्री. ॲड् सुधाकर आर. जाधव                                        -----
अपीलार्थी
श्री. नरेंद्र मधुकर लचके

एन ४१, जे.ए. ३- १२-१
सावतानगर, सिडको-४, नवीन सिडको,
नाशिक ४२२ ७०८.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता ----उत्तरवादी
कृष्णा खोरे विकास महामंडळ, कोरेगांव रोड,
कृष्णा नगर, सातारा, जि. सातारा.

२. जन माहिती अधिकारी
कृष्णा खोरे महामंडळ सातारा यांचे कार्यालय,
सातारा.

*---विवेचन---*

अपीलांचा दिनांक ११/४/२००९
सुनावणीचा दिनांक २१/१२/२००९
अपीलार्थी उपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

अपीलार्थीनी दि. २४/११/२००८ च्या अर्जान्वये सन २००७-०८ या वर्षात शासनाकडून महामंडळाला प्राप्त झालेल्या निधीतून हाती घेण्यात आलेल्या कामांबाबत विविध मुद्दयांची माहिती मागितली.

तथापि त्यांना उत्तर प्राप्त न झाल्याने त्यांनी दि. ९/१/२००९ रोजी प्रथम अपील केले. तथापि त्यांना माहिती प्राप्त होऊ शकली नाही. यास्तव त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी अपीलार्थीनी आयोगाच्या असे निदर्शनास आणले की, सुनावणीच्या दिनांकापर्यंत त्यांना माहिती उपलब्ध झालेली नाही. सुनावणीसाठी उत्तरवादी हजर नव्हते. उत्तरवादींनी सुनावणीसाठी गैरहजर असणे ही बाब

उचित नाही. तेव्हा याबाबत आयोगाचे असे निदेश आहेत की, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी , कृष्णा खोरे विकास मंडळ, कोरेगांव रोड, कृष्णानगर ,सातारा यांनी त्यांच्या अनुपस्थितीबाबतचा खुलासा आयोगाकडे सादर करावा. जन माहिती अधिकारी यांना असे निदेश देण्यात येतात की, त्यांनी अपीलार्थीनी मागितलेली माहिती त्वरित पुरवावी. तसेच माहिती पुरविण्याबाबत झालेल्या विलंबाबाबत त्यांच्यावर अधिनियमाच्या कलम २० अन्वये शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा आयोगास २० एप्रिल, २०१० पर्यंत सादर करावा. आयोगाचे असेहि निदेश आहेत की, खुलाश्याच्या पत्रात डाव्या बाजूस चौकानात "खु" असे लिहावे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि.

जोशी),

दिनांक ३०/०३/ २०१० राज्य मुख्य माहिती

आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक ११७/१०**

**श्री. कुबेर गोविंद कुमावत -----अपीलार्थी**
**श्रीरंग कॉलनी, प्लॉट नं.१, पिंपळखेड,**
**अमळनेर, जि. जळगांव.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा सचिव ----उत्तरवादी**
**खानदेश शिक्षण मंडळ व प्रताप महाविद्यालय,**
**अमळनेर, जि. जळगांव.**

**२. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य**
**प्रताप महाविद्यालय, अमळनेर, जि. जळगांव.**

***---विवेचन---***

**अपीलांचा दिनांक २५/११/२००९**
**सुनावणीचा दिनांक ०६/०३/२०१०**
**अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपीलार्थी श्री कुबेर गोविंद कुमावत यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३)अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २५/११/२००९ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत

भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, जळगांव येथे दि. ६/३/२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी व अपीलार्थी हे सर्व जण अनुपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ८/६/२००९ रोजी अर्ज करुन खालील नमूद माहिती मागितली होती.

१. खानदेश शिक्षण मंडळ व प्रताप महाविद्यालय या दोन्ही विभागात झालेल्या अपहार व घोटाळा प्रकरणांत सामील असलेल्या व सेवेत असणा-या अधिकारी व कर्मचा-यांची माहिती.

२. गुन्हा नोंद झाला असेल तर गुन्हयाचे स्वरुप.

३. न्यायालयीन खटला

४. गुन्हयांत सहभागी असलेल्या व सेवेत असलेल्या कर्मचा-यांच्या विरोधात कारवाई.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. ४/७/२००९ च्या पत्राद्वारे खानदेश शिक्षण मंडळाच्या प्रताप महाविद्यालयात अपहार व घोटाळा प्रकरण झालेले नाही. तसेच विचारलेली माहिती तपशीलवार नसल्याने प्रश्नांची माहिती देता येत नाही असे अपीलार्थीस कळविले. परंतु माहिती न मिळाल्यामुळे अपीलार्थीनी दि. २८/७/२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. त्यावर खानदेश शिक्षण मंडळाचे चिटणीस तथा प्रथम अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिका-यांनी दिलेली माहिती बरोबर असल्याचे दि. ३१/८/२००९ च्या पत्राद्वारे कळविले.

हवी असलेली माहिती न मिळाल्याने अपीलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी तिघेही गैरहजर होते. त्यामुळे अपीलार्थींचे म्हणणे काय होते, तसेच दोन्ही अधिका-यांचेही म्हणणे समजू शकले नाही. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी व

उत्तरवादी यांनी उदासिनता दाखविलेली आहे. अर्जदाराने मोघम माहिती न मागता विविक्षित माहिती मागावी.

---आदेश---

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक ३०/०३/ २०१०

राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक ११८/१०

श्री. प्रेमचंद रुपचंद सुरवाडे -----अपीलार्थी
मु. खंडाळा, पो. मोंढाळा,
ता. भुसावळ, जिल्हा जळगांव.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी ----उत्तरवादी
कृषि कार्यालय चोपडा, जि. जळगांव.

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी
चोपडा, जि. जळगांव.

---*विवेचन*---

अपीलांचा दिनांक १७/११/२००९
सुनावणीचा दिनांक ०६/०३/२०१०

अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी श्री प्रेमचंद रुपचंद सुरवडे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३)अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १७/११/२००९ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, जळगांव येथे दि. ६/३/२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपीलार्थी अनुपस्थित, प्रथम अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ३/०८/२००९ रोजी अर्ज करुन खालील नमूद माहिती मागितली होती.

१. आत्मा या योजनेंअंतर्गत कळधाण्यावर एकूण किती शेतीशाळा घेतल्या. प्राप्त अनुदान शेतक-यांनी सध्या केलेल्या रजिस्टरच्या प्रती व खर्चाचा तपशील.

२. तृण, कळ गळीत या धान्यावर किती शेती शाळा घेतल्या. शासनाचा फंड, खर्च इत्यादी.

जन माहिती अधिकारी यांनी दि. २८/८/२००९ रोजी अपीलार्थीस कार्यालयात बोलवून समक्ष माहिती दिली. परंतु काही मुद्दयांची माहिती न मिळाल्याने अपीलार्थीनी प्रथम अपील दाखल केले. त्यावर अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी आयोजित केली नाही परंतु माहे सप्टेंबर २००९ रोजी अपीलार्थीस समक्ष माहिती दाखवून समाधान झाले असे नमूद केले आहे.

शेतक-यांच्या तथा मजूरांच्या सध्याचे हजेरीपट, निविदा खरेदी आदेश इत्यादी माहिती न मिळाल्याने अपीलार्थींनी आयोगाकडे दि. १७/११/२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. त्यावेळी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थी अनुपस्थित होते तर प्रथम अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी झालेल्या चर्चेदरम्यान अपीलार्थीस उर्वरित देय असलेली माहिती उपलब्ध असून ती देण्यास तयार असल्याचे जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगास सांगितले.

अपीलार्थी सुनावणी गैरहजर राहिल्यामुळे त्यांना नेमकी कोणती माहिती मिळाली व न मिळालेली माहिती कोणती याचा बोध होऊ शकला नाही. अपीलार्थीस काही माहिती मिळाली हे गृहित धरुन अद्याप आयोगाच्या सुनावणीच्या वेळी प्रथम अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस देय असलेली माहिती देण्याचे मान्य केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांची कृती १५ दिवसांत प्रत्यक्ष अमलात आणावी.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक ३०/०३/ २०१० राज्य मुख्य माहिती

आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.१५२९/०२

**श्री.मुकेश शालीग्राम गोंदकर**
**अपिलार्थी**
**मु.पो.गोंदकर वस्ती, ओझर सिंग, ता.निफाड**
**जि.नासिक**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय सह निबंधक --उत्तरवादी**
**सहकारी संस्थानाशिक विभाग गडकर चौक नाशिक**

**जन माहिती अधिकारी जिल्हा उपनिंबधक**
**सहकारी संस्था, नाशिक, सहकार संकुल सारडा सर्कल,**
**नॅशरल ऊर्दू हायस्कूल जवळ,नाशिक**

***--- विवेचन---***

**अपिलाचा दिनांक ६.१०.२००७**
**सुनावणीची तारीख दि.२१.१२.२०१०**
**अपिलार्थी, अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

**अपिलार्थीनी दि.२०.३.२००७ च्या माहिती अर्जाव्दारे दावा क्र.८३२/२००५ च्या अनुषंगाने विश्वास को.ऑपरेटिव्ह बॅक लि.नाशिक यांनी केलेल्या अर्जावरील कार्यवाहीच्या तपशीलाची मागणी केली.**

**या अर्जाला दि.२५.४.२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिले. तथापि या उत्तराने समाधान न झाल्याने त्यांनी दि.१४.५.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपीलावर दि.१.८.२००७ रोजी आदेश पारित करण्यांत आले. त्यानुसार अपील अंशतः मंजूर करण्यांत येऊन अपिलार्थीना माहिती तात्काळ उपलब्ध करुन देण्याबाबत**

निर्देश दिले गेले. तथापि माहिती मिळाली नसल्याने त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

यावर सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजू ऐकून घेण्यांत आल्यात. जिल्हा उपनिबंधक यांनी पुढीलप्रमाणे निवेदन सादर केले.

"श्री. मुकेश शालीग्राम गोंदकर यांनी दि. २०/३/२००७ रोजी दाखल केलेल्या अर्जाचे अवलोकन करता, त्यांनी अर्जामध्ये प्रश्नार्थक स्वरुपाची विधाने केलेली असल्याने व माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम २(च) नुसार उपलब्ध असलेली माहिती देणे अपेक्षित असून त्यावर अभिप्राय देणे अभिप्रेत नसल्याने त्यांना माहिती उपलब्ध करुन देता आलेली नाही. सदर प्रकरणातील या कार्यालयामध्ये उपलब्ध असलेली कागदपत्रे श्री. गोंदकर यांनी मागणी करताक्षणी त्यांना उपलब्ध करुन देणेत येईल.

तसेच श्री. गोंदकर यांच्या कलम १०१ अन्वये निर्गमित झालेल्या वसुली दाखला व अपसेट प्राईज संदर्भात श्री. गोंदकर हे व्यथीत झाले असल्यास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५४ अन्वये पुर्ननिरीक्षण अर्ज दाखल करणेबाबत तरतुदी आहे. "

यावर आयोगाचे असे निर्देश आहेत की, प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार अपिलार्थीस माहिती पुरविण्यांत यावी. अपीलार्थीस हवे तर संपूर्ण नस्ती दाखविण्यात यावी.

## *आदेश*

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)

दिनांकः ३०.३.२०१०                                        राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक १३०/१०

श्री. करीमखा सरदारखा पठाण -----अपीलार्थी
मेवाती मुसलमान पंच
रा. कसाली मोहल्ला, मोती टेक अमळनेर,
मु.पो.ता. अमळनेर, जि. जळगांव.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार ----उत्तरवादी
तहसिलदार कार्यालय अमळनेर,
मु.पो.ता. अमळनेर, जि. जळगांव.

२. जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार
तहसिलदार कार्यालय अमळनेर,
मु.पो.ता. अमळनेर, जि. जळगांव.

*---विवेचन---*

अपीलांचा दिनांक ३/१०/२००९
सुनावणीचा दिनांक ०६/०३/२०१०

अपीलार्थी उपस्थित, जन माहिती अधिकारी अनुपस्थित, अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी श्री. करीमखा सरदारखा पठाण यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ३/१०/२००९ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर जळगांव येथे दि. ६/३/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी व अपीलार्थी उपस्थित होते, जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १/६/२००९ रोजी अर्ज करुन खालील

नमूद माहिती मागितली होती.

१. श्री.वरुणेश्वर महादेव अर्चक, विश्वनाथ धोंडदेव तारे व मुसलमान लोकांचा आसाबा

ज्या दस्तऐवजाचे आधारे गांव नमुना नं.७ वर दाखल करण्यात आले त्याची माहिती.

२. मौजे उखळवाडी प्रमाणै मौजे अमळनेर येथील स.नं. ३३/१, ३३/२, ३३/३ शी संबंधीत गाव नमुना नं. १ ड ची नक्कल मिळावी.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दि. २०/६/२००९ च्या पत्राद्वारे मुद्दा क्र. १ ची माहिती दिली. मुद्दा क्र. २ ची माहिती १९२६-२७ हया वर्षातील असल्याने अभिलेखात शोध घेऊनही उपलब्ध न झाल्याने ती पुरविता आली नाही.

अपीलार्थीनी पूर्ण माहिती न मिळाल्याने प्रथम अपील दाख्ल केले. त्यावर प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांनी पारित केलेले पत्र योग्य असून दिलेली माहिती योग्य असल्याचे आदेश पारित केले.

अपीलार्थीनी द्वितीय अपील आयोगाकडे दाखल केले. सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेल्या बाबी ---

१. अपीलार्थीस दि. १७/८/०९ च्या रोजनाम्यांत मुद्दा क्र. १ ची सन १९२६-२७ मधील गांव नमुना ७ ची माहिती दिली.

२. मुद्दा क्र. २ ची माहिती उपलब्ध नसल्याने ती पुरविता आली नाही म्हणून अपीलार्थी कार्यालयीन अभिलेखात समक्ष उपस्थित राहून तपासणी करु शकतात असेहि त्यांना सांगण्यात आले.

कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध नसलेली माहिती ही ८० वर्षापूर्वीची आहे. त्याचे दस्तऐवज सापडणे कठीणच आहे. एवढा मोठा कालावधी उलटून गेला असल्याने ती उपलब्ध होणे अशक्य आहे, व जी जुनी माहिती उपलब्ध होती ती प्रामाणिकपणे अपीलार्थीस दिलेली आहे हे अपिलीय अधिकारी यांनी आयोगाच्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थीस पटवून दिले.

---*आदेश*---

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)

दिनांक: ३०.३.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक १३३/१०

श्री. स्वप्निल नरेंद्र विसपुते -----
अपीलार्थी

द्वारा- नितीन लक्ष्मण विसपुते
हनुमानवाडी, फुलचंद शेठ बिल्डींग,
चाळीसगांव, जि. जळगांव.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजविकास अधिकारी ---- उत्तरवादी
विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांचे कार्यालय,
जात पडताळणी विभाग, जळगांव, जि. जळगांव.

२. जन माहिती अधिकारी
विशेष जिल्हा समाज कल्याण कार्यालय,
जात पडताळणी विभाग, जळगांव, जि. जळगांव.

---*विवेचन*---

अपीलांचा दिनांक २९/१०/२००९
सुनावणीचा दिनांक ०६/०३/२०१०
अपीलार्थीचे प्रतिनिधी उपस्थित, जन माहिती अधिकारी उपस्थित, अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

अपीलार्थी श्री. स्वप्निल नरेंद्र विसपुते यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २९/१०/२००९ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर जळगांव येथे दि. ६/३/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपीलार्थी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते, जन माहिती अधिकारी उपस्थित होते, प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते.

अपीलार्थींनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २०/७/२००९ रोजी अर्ज करुन अपीलार्थीस सन २००८-०९ मध्ये सायन्सच्या कोणत्या वर्गात प्रवेश घेतला व जर २००८-०९ या वर्षात १२ वीत असाल तर त्या वर्षाचे जातपडताळणी कामकाज सुरु आहे व त्रुटी

असल्यास विद्यालयास कळविण्यांत येईल असे लेखी कळविले व अर्जाची नोंद व क्रमांकही कळविण्यांत येईल. माहिती समाधानकारक न मिळाल्याने अपीलार्थीनी प्रथम अपील दाखल केले. परंतु जातपडताळणी पूर्ण झाली नसल्याने प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कोणतेही आदेश पारित केले नाहीत.

अपीलार्थीनी त्यानंतर आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. त्यावेळी अपीलार्थीचे प्रतिनिधी म्हणून वडिल हजर होते. तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित तर प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित होते.

सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेल्या बाबी ---

१. अपीलार्थीनी सायन्सला कोणत्या वर्षात प्रवेश घेतला होता याचा उल्लेख अर्जात नव्हता. त्यामुळे माहिती देता आली नाही.

२. जात पडताळणी विभागाकडे जिल्हयातील सर्व कॉलेजमधून जात पडताळणीसाठी अर्ज असतात त्यामुळे ती योग्यरित्या पडताळणी करावी लागते. ब-याच ठिकाणी त्रुटी असतात. त्यामुळे त्याच्यामध्ये वेळ जातो.

तरीही जन माहिती अधिकारी यांनी सर्व परिस्थिती अपीलार्थीच्या प्रतिनिधीस समजावून सांगितली व त्यांना अर्जावर पडताळणी समितीच्या दोन सभासदांच्या सहया झालेल्या असून अध्यक्षांची सही झाल्यावर वैधता प्रमाणपत्र दिले जाईल. तसेच अपीलार्थीस (प्रतिनिधीस) कार्यालयीन नस्तीही दाखविण्यांत आली. त्यामुळे अपीलार्थीचे समाधान झाल्याचे आढळून आले.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)

दिनांकः ३०.३.२०१०                                  राज्य  मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक १३९/१०

श्री. राजेश वसंत कुलकर्णी                                  -----अपीलार्थी
प्लॉट नं. ५२, राधाकृष्ण नगर,
एस.के.ऑईल मिल समोर, जळगांव  ४२५ ००१.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक                  ----उत्तरवादी
विभागीय कार्यालय, राज्य परिवहन महामंडळ,
जळगांव.

२. जन माहिती  अधिकारी तथा विभागीय कर्मचारी अधिकारी वर्ग
विशेष जिल्हा समाज कल्याण कार्यालय,
विभागीय कार्यालय, राज्य परिवहन महामंडळ, जळगांव.

---*विवेचन*---

अपीलांचा   दिनांक  ०७/१०/२००९
सुनावणीचा दिनांक  ०६/०३/२०१०

अपीलार्थींचे अनुपस्थित,  जन माहिती अधिकारी व  अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी श्री. राजेश वसंत कुलकर्णी  यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०७/१०/२००९ रोजी

द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर जळगांव येथे दि. ६/३/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपीलार्थी अनुपस्थित होते, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २५/७/२००९ रोजी अर्ज करुन खालील नमूद माहिती मागितली होती.

१. संदिप दा. मराठे यांनी प्रमुख कारागीर या पदासाठी सादर केलेल्या कागदपत्रांची
२. छायांकित प्रत.
३. सर्व उमेदवारांना मिळालेले प्रात्यक्षिक व तोंडी परिक्षेचे मार्क व त्यांच्या याद्या.
४. पदासाठी पात्रता व निकष.
५. उमेदवाराचा अनुभवाचा दाखला इत्यादि.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. २०/८/२००९ च्या पत्राद्वारे मुद्दा क्र. १ ची माहिती जाहिरातीमध्ये विषद केली आहे. मुद्दा क्र. २ मधील बाब ही सार्वजनिक कामकाजाशी संबंधित नाही. ती व्यक्तीच्या खाजगी बाबीमध्ये हस्तक्षेप करणारी आहे. त्यामुळे ती अधिनियमाच्या कलम ८ (ञ) न्वये देणे योग्य नाही. त्याचप्रमाणे इतर माहितीच्या प्रतीसाठी कार्यालयांत एकूण रु. ६१/- भरल्यास माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे अपीलार्थीस कळविण्यांत आले. परंतु माहिती न मिळाल्याने अपीलार्थीनी प्रथम अपील दाखल केले. परंतु अपीलार्थीनी फी न भरल्याने प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यावर कोणतीही कार्यवाही केली नाही.

अपीलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. त्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थी अनुपस्थित होते, परंतु प्रथम अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. त्यावेळी झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी

अपीलार्थीस फी भरण्यासाठी दोन पत्रे पाठविली, परंतु ती अपीलार्थींनी स्वीकारली नाहीत. फी भरल्यानंतर अधिनियमाच्या कलम

८ (ञ) खाली येणारी माहिती सोडून इतर उपलब्ध माहिती देण्यास जन माहिती अधिकारी यांनी अनुकूलता दाखविलेली आहे. अपीलार्थी गैरहजर राहिल्यामुळे त्यांना नक्की कोणती माहिती कशाप्रकारे हवी होती याचा खुलासा होऊ शकला नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ग्राहय धरावे लागेल. तरी अपीलार्थीस फी च्या बाबतीत मुदतीत कळविले असल्याने अपीलार्थींनी खरोखरच माहिती हवी असेल तर फी चा भरणा करुन कार्यालयांतून प्रत्यक्ष जाऊन माहिती प्राप्त करुन घ्यावी. अपीलार्थी यांनी फी चा भरणा केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस १५ दिवसांत माहिती द्यावी.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)

दिनांक: ३०.३.२०१० राज्य मुख्य माहिती
आयुक्त

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक १३६/१०

श्री. महमद हनिफ इस्माईल अरब -----अपीलार्थी
गौस नगर, गौसिया मस्जिद जवळ,
मु.पो. ता. भुसावळ, जि. जळगांव.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा सचिव ----उत्तरवादी
राज्य माहिती आयोग औरंगाबाद खंडपीठ
बचत भवन, लेखा व कोषागारे कार्यालयाच्या मागे,

औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग औरंगाबाद खंडपीठ
बचत भवन, लेखा व कोषागारे कार्यालयाच्या मागे,
औरंगाबाद.

*---विवेचन---*

अपीलांचा दिनांक २८/१०/२००९
सुनावणीचा दिनांक ०६/०३/२०१०
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित अपिलीय अधिकारी सेवानिवृत्त.

अपीलार्थी श्री. महमद हनिफ इस्माईल अरब यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २८/१०/२००९ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर जळगांव येथे दि. ६/३/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित प्रथम अपिलीय अधिकारी सेवानिवृत्त.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २५/७/२००९ रोजी अर्ज करुन सन
१९४५
साली केलेल्या खरेदीखताची मागणी केली होती.

अपीलार्थीनी यापूर्वी त्याच कारणास्तव मागितलेली तक्रार माहितीच्या अनुषंगाने राज्य मुख्य आयुक्त यांनी अपील क्रमांक ३३९/२००७ नुसार दि. ३/२/२००९ नुसार सदर खरेदीखताचे नोंदणी संबंधी दुय्यम निबंधकाकडे कागदपत्र उपलब्ध नसल्याने ते अपीलार्थीस देता येत नाही हे त्यांचे म्हणणे ग्राहय धरुन दि. ३/२/२००९ रोजी आदेश पारित केले होते.

या विरोधांत अपीलार्थीनी दि. २५/१०/२००९ रोजी आयोगाकडे त्याच कारणास्तव द्वितीय अपील दाखल केले आहे. सुनावणीच्या वेळी साधक बाधक चर्चा झाली. तेव्हा एकदा पारित झालेल्या आदेशाचे त्याच बाबीवर पुनर्विलोकन करण्याची तरतुद नसल्याने दि. ३/२/२००९ रोजी राज्य मुख्य माहिती आयुक्त यांनी पारित केलेले आदेश हे अंतीम असून त्यात कोणताही बदल करण्यात येत नाही असे अपीलार्थीस सांगण्यात आले.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)

दिनांकः ३०.३.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक २९/१०

श्री. सुरेश जगन्नाथ पाटील -----अपीलार्थी
मु.पो. पूर्णार्थ नगर , सद्‌गुरु ऑटोजवळ,
भुसावळ रोड, यावल, ता.यावल, जि. जळगांव.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी ----उत्तरवादी
नगरपरिषद यावल, ता. यावल, जि. जळगांव.

२. जन माहिती अधिकारी
नगर परिषद कार्यालय यावल, ता. यावला, जि. जळगांव.

*---विवेचन---*

अपीलांचा दिनांक ११/०६/२००९
सुनावणीचा दिनांक ०६/०३/२०१०
अपीलार्थी , जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

अपीलार्थी श्री. सुरेश जगन्नाथ पाटील यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ११/०६/२००९ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर जळगांव येथे दि. ६/३/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २१०/१२/२००८ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

१. यावल येथील एस.टी.बस स्टॅन्ड पासून चोपडा रोड वरील पुलापर्यंत दुभाजकांचे बांधकाम झाले आहे त्यात ठेकेदाराकडून बिल देतेवेळी रॉयल्टी वसूल केली आहे त्याची

प्रत.

२. ठेकदाराचे नांव, बांधकामाची मंजूर रक्कम, दिलेली रक्कम यांचा तपशील.

३. बांधकामातील साहित्याची रॉयल्टी केव्हा वसूल केली.

४. ठेकेदाराच्या वाहतूक परवान्याची छायांकित प्रत इत्यादी माहिती.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस कोणतीही माहिती देण्याची तसदी घेतली नाही. या कारणास्तव अपीलार्थींनी प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. २६/२/२००९ रोजी सुनावणी ठेवली. परंतु ती झाली की नाही याचा बोध या प्रकरणी होत नाही. परंतु अपीलार्थीस ६० दिवसानंतर अपुरी माहिती मिळाली असे त्यांचे म्हणणे आहे.

अपीलार्थीनी द्वितीय अपील दाखल केले त्यावेळी झालेल्या सुनावणीस अपीलार्थी, प्रथम अपिलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी तिघेही अनुपस्थित होते. त्या अनुषंगाने निदर्शनास आलेल्या बाबी --

१. जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस ६० दिवसानंतर अपूर्ण माहिती दिली.

२. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलावर सुनावणी घेतली नाही.

३. उर्वरित माहिती अपीलार्थीस मिळेल याची खात्री नाही.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी यांचेवर जन माहिती अधिकारी पूर्ण माहिती १० दिवसात देतील याची जबाबदारी टाकण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी आपली जबाबदारी योग्य प्रकारे पार पाडली नाही याचाहि विचार त्यांचे गोपनीय अहवाल लिहितांना मुख्य अधिकारी , यावल नगरपरिषद यांनी करावा.

*---आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
दिनांक: ३०.३.२०१० राज्य मुख्य माहिती
आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक १३८/१०

श्री. भरत भास्कर झोपे -----अपीलार्थी
रा. वरणगांव, झोपेवाडा,
ता. भुसावळ, जि. जळगांव.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा चेअरमन ----उत्तरवादी
दि वरणगांव एज्यूकेशन सोसायटी,
वरणगांव (ई ५) ता. भुसावळ, जि.जळगांव.

२. जन माहिती अधिकारी
दि वरणगांव एज्यूकेशन सोसायटी,
वरणगांव (ई ५) ता. भुसावळ, जि.जळगांव.

*---विवेचन---*

श्री. भरत भास्कर झोपे, वरणगांव , जि. जळगांव यांनी दि. २४/६/१००९ च्या माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी, दि वरणगांव एज्यूकेशन सोसायटी, वरणगांव (ई-५) ता. भुसावळ, जि. जळगांव यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" दि वरणगांव एज्यूकेशन सोसायटी, वरणगांव ता. भुसावळ, जि. जळगांव (ई-५) या संस्थेच्या दप्तरी नोंद असलेल्या जुन्या व नवीन संचालक मंडळाची दि. १७/८/०२ ते आजतागायत पर्यतची यादी हुद्दयासह देण्यात यावी. "

तद्नंतर दि. १३/८/२००९ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल करुन जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती देण्याची विनंती केली.

अपीलार्थीनी मागणी केलेली माहिती मिळाली नाही म्हणून दि. २४/१०/२००९ रोजी राज्य माहिती आयोग औरंगाबाद विभाग यांचेकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी दि. ६/३/२०१०रोजी जळगांव येथे आयोजित करण्यात आली. सदर सुनावणीस जन माहिती

अधिकारी उपस्थित होते तथापि अपीलार्थी अनुपस्थित होते.

अपीलार्थीनी दाखल केलेले अपील व सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी दिलेले लेखी उत्तर पाहता अपीलार्थीस संचालक मंडळाबाबत वेळोवेळी म्हणजेच दि. २४/५/२००७, २४/४/०९ च १/६/२००९ रोजी माहिती दिली असल्याचे स्पष्ट होते. अपीलार्थी सुनावणी गैरहजर असल्याने त्यांचे म्हणणे ऐकून घेता आले नाही. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)

दिनांकः ३०.३.२०१० राज्य मुख्य माहिती

आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक १३२/१०

श्री. गुलामगौस शेख अहमद -----अपीलार्थी
द्वारा- राबियाबी शेख रमजान गादी भांडार,
फरशी रोड, अमळनेर, जि. जळगांव.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता ----उत्तरवादी
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
जळगांव.

२. जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
अमळनेर, जि. जळगांव.

***---विवेचन---***

श्री. गुलाम गौस शेख अहमद ,अमळनेर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार दि. २३/६/२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. अमळनेर ,जि.जळगांव यांचेकडे दाखल केला. सबब अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २९/७/०९ रोजी उत्तर दिलेले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराने समाधान झाले नाही म्हणून अपीलार्थी यांनी दि. २७/८/२००९ रोजी प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कं. जळगंव यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यास दि. २५/९/२००९ रोजीच्या पत्रान्वये उत्तर दिलेले आहे.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचे उत्तराने समाधान झाले नाही म्हणून अपीलार्थी यांनी दि. १४/१०/२००९ रोजी राज्य माहिती आयोग, औरंगाबाद विभाग यांचेकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर द्वितीय अपीलाची सुनावणी दि. ६/३/२०१० रोजी जळगांव येथे आयोजित करण्यात आली

होती. त्यास अपीलार्थीसह जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

अपीलार्थींचे अपील व सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सादर केलेली टिप्पणी पाहता असे दिसते की, अपीलार्थींची मुळ मागणी खालीलप्रमाणे आहे.

"अमळनेर येथील सिटी सर्व्हे नं. ८६६ हे घर अपीलार्थींचे मालकीचे असून त्या जागेत श्री. छोटू साहेबजी बागवान हा अनधिकृतरित्या रहात असून त्या जागेवर त्यांना देण्यात आलेल्या लाईट कनेक्शन कोणत्या नियमाच्या आधारे देण्यात आले आहे याची माहिती मागितलेली आहे. "

अपीलार्थींचे माहितीच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कनेक्शन देण्यासंदर्भात सर्व माहिती दिलेली आहे. तथापि अपीलार्थींचे म्हणण्यानुसार लाईट कनेक्शन देतेवेळी ज्या पुराव्याची तपासणी करणे आवश्यक होते ती करण्यात आली नाही. याबाबत अपीलार्थीने योग्य त्या सक्षम प्राधिकरणाकडे अर्ज करुन दाद मागावी.

*----आदेश----*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)

दिनांकः ३०.३.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक ११/१०

श्री. सुभाष ओंकार अहिरे -----अपीलार्थी
रा. वरखेडी, ता.पाचोरा, जि. जळगांव.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी ----उत्तरवादी
पाचोरा, ता. पाचोरा, जि. जळगांव.

२. जन माहिती अधिकारी
तालुका कृषि अधिकारी कार्यालय पाचोरा,
ता. पाचोरा, जि. जळगांव.

***---विवेचन---***

अपीलांचा दिनांक १/०६/२००९
सुनावणीचा दिनांक ०५/०३/२०१०
अपीलार्थी , जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी श्री. सुभाष ओंकार अहिरे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १/०६/२००९ रोजी

द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर जळगांव येथे दि. ५/३/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ३०/०३/२००९ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

१. मा.जि.अ.कृ.अ. जळगांव यांचे पत्र दि. २३/१/२००९ ची छायांकित प्रत

२. मा.उ.वि.क.अ. पाचोरा यांचे पत्र दि. ३१/१/२००९ ची छायांकित प्रत

३. मा.उ.वि.कृ.अ. श्रीरामपूर यांचे पत्र दि. २५/२/०९ ची प्रत.

४. वैद्यकीय दाखल्यावर मत व्यक्त केलेल्या अधिका-यांचे अधिकार.

५. वैद्यकीय दाखला अमान्य करण्याबाबतचे शासकीय निर्णयाची प्रत

६. अधिनस्त कर्मचा-यांचे पगार, चलन, वसूली ,रजा मंजूरी इत्यादी माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दि. १८/४/०९ च्या पत्राद्वारे मुद्दा क्र. १ ते ६ पैकी उपलब्ध असलेली माहिती प्रत्यक्ष कार्यालयांत येऊन घेऊन जाण्यास सांगितले. माहिती अपूरी मिळाली म्हणून अपीलार्थीनी प्रथम अपील दाखल केले. परंतु प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यावर कोणतीही सुनावणी घेतली नाही किंवा कोणतेही आदेश पारित केले नाहीत.

अपीलार्थीनी व्यथित होऊन आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर सुनावणीस अपीलार्थी , प्रथम अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी असे तिघेही उपस्थित होते.

सुनावणीच्या वेळी झालेल्या चर्चेदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणले की, अपीलार्थीस पहिल्या तीन मुद्दयांवर माहिती देण्यात आली.

परंतु मुद्दे क्र. ४ ते ६ मध्ये अपीलार्थीनी कार्यालयप्रमुखांचे अधिकार तसेच रजा मंजूरी , ती नाकारणे व देय वेतन रोखणे वगैरे माहितीचे शासकीय आदेश/परिपत्रके यांची मागणी केली होती. ती अपीलार्थीस कार्यालयात उपलब्ध नाही म्हणून नाकारण्यात आली.

अपीलार्थीस त्यांनी मागितलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती मुदतीत दिलेली आहे. कांही माहितीबद्दल अपीलार्थीस कार्यालयात येऊन घेऊन जाण्यास सांगितले होते. परंतु ते कार्यालयात माहिती घेण्यास का जात नाहीत हे समजू शकले नाही. त्यांनी शासकीय आदेशाच्या/ परिपत्रकाच्या ज्या प्रती मागविल्या आहेत त्या न देण्याचे कारण समजू शकले नाही. परंतु अपीलार्थी हे शासकीय कर्मचारी आहेत. त्यांना शासन निर्णयाची माहिती असणे आवश्यक आहे. तरी सुध्दा त्यांनी संबंधित शासकीय विभागाशी संपर्क साधून शासन निर्णय उपलब्ध करुन घेऊ शकतात. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी शासकीय धोरण/परिपत्रके कार्यालयात उपलब्ध नाहीत हे त्यांचे म्हणणे सयुक्तिक वाटत नाही. तरी त्यांनी शासकीय आदेश/ परिपत्रके यांचे संकलन करुन ठेवावे. सर्वसाधारण शासकीय नियम अधिकारी/कर्मचारी यांना माहित हवेत.

जन माहिती अधिक्ारी यांनी त्यांच्या कार्यालयातील शासकीय आदेश/परिपत्रके याची नस्ती १ महिन्याचे आत अद्यावत करावी व अपीलार्थीस उर्वरित माहिती द्यावी.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)

दिनांक: ३०.३.२०१० राज्य मुख्य माहिती

आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक १४०/१०

श्री. भगवान नथु जाधव -----अपीलार्थी
द्वारा- डॉ. निकम शिवदास गोबा
मु.पो. नाचणखेडा, ता. जामनेर,
जिल्हा जळगांव.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी ----उत्तरवादी
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद जळगांव.

२. जन माहिती अधिकारी
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद जळगांव.

---*विवेचन*---

श्री.भगवान नथू जाधव यांनी दि. ४/७/२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती अर्ज सादर करुन सन २००१ ते २००७ या काळातील माध्यमिक विद्यालय मुंदखेडे (बु) या शाळेतील शिक्षकांच्या मान्यतेचे प्रस्ताव इ. माहिती मागितली होती. त्यानंतर दि. ३/८/२००९ रोजी प्रथम अपील देखिल दाखल केले.

दि. ३/९/१००९ रोजी राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचेकडे द्वितीय अपील दाखल केले असून त्या अपीलाची सुनावणी दि. ६/३/२०१० रोजी जळगांव येथे आयोजित करण्यात आली होती. सुनावणीस जन माहिती अधिकारी व अपीलार्थी हजर होते.

सुनावणीच्या वेळी सादर करण्यात आलेले कागदपत्रे विचारात घेता अपीलार्थीस दि. २५/८/२००९ रोजी त्यांच्या माहिती अर्जातील सर्व माहिती विनामूल्य मिळाली असून त्यांची कसलीही तक्रार नाही असे अपीलार्थींनी दि. २५/८/२००९ रोजी लेखी पत्र दिलेले आहे.

यावरुन असे स्पष्ट होते की, अपीलार्थीस सर्व माहिती मिळाली आहे व त्यांची कसलीही तक्रार नाही. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

----*आदेश*---

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश
वि.जोशी)
दिनांकः ३०.३.२०१० राज्य मुख्य माहिती
आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक १४०/१०

श्री. सुरेश जगन्नाथ पाटील -----अपीलार्थी
मु.पो. पूर्णार्थ नगर , सद्गुरु ऑटोजवळ,
भुसावळ रोड, यावल, ता.यावल, जि. जळगांव.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक ----उत्तरवादी
भूमि अभिलेख , जिल्हाधिकारी कार्यालय आवार,
जळगांव.

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक
भूमि अभिलेख कार्यालय यावल,
ता. यावल, जि. जळगांव.

*---विवेचन---*

श्री. सुरेश जगन्नाथ पाटील यांनी दि. १७/४/२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, यावल यांचेकडे दि. १ जानेवारी, २००८ ते १५ एप्रिल, २००९ या कालावधीतील एकूण ५ मुद्दयांची माहिती मागविली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिल्यामुळे दि. ५/६/२००९ रोजी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना, माहितीच्या अर्जावर कार्यवाही करतांना दिरंगाई होणार नाही याची दक्षता घेण्याबाबत ताकीद देऊन अपीलार्थीस उर्वरित माहिती दि. ३०/७/०९ रोजी पुरविली असल्याचे नमूद करुन अपील निकाली काढले.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचे आदेशाने समाधान झाले नाही म्हणून दि. ७/११/०९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर द्वितीय अपीलाची सुनावणी विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत दि. ६/३/२०१० रोजी जळगांव येथे आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणीस जन माहिती

अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होते तथापि अपीलार्थी अनुपस्थित होते.

अपीलार्थीनी आयोगाकडे सादर केलेले द्वितीय अपील व त्यासोबतची कागदपत्रे तसेच सुनावणीवेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेल्या लेखी तपशिलप्रमाणे असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस अंशतः माहिती दिली तद्नंतर पूर्ण माहिती दि. ३०/७/२००९ रोजी दिली. माहिती अर्जावर कार्यवाही करतांना योग्य ती काळजी घेण्याची समज प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना दिलेली आहे. अपीलार्थी हे सुनावणीस अनुपस्थित असल्यामुळे त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही.

अपीलार्थीस संपूर्ण माहिती मिळाली असल्याचे प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचे आदेशावरुन दिसते. तसेच माहिती अर्जावर कार्यवाही करतांना जन माहिती अधिकारी यांना दिलेली समज योग्य वाटते. यास्तव मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश

वि.जोशी)

दिनांकः ३०.३.२०१० राज्य मुख्य माहिती

आयुक्त

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/४६६१५/अपील क्रं. ५५१० ( जुना ४३७१)/०२**

**श्री. गोविंद सखाराम कापसे,( प्रेस रिपोर्टर- रास्ट्रवादी) ---------अपीलकर्ता**
**५१,बी भिमाबाई कापसे बिल्डींग, रुम नं.२,**
**तळमजला, कुर्ला कासईवाडा, नेहरू नगर,**
**कुला (प), मुंबई - ४०० ७०**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा --------- उत्तरवादी**
**सहायक महापालिका आयुक्त, मनपा आयुक्त,**
**जी/नॉर्थ वार्ड ऑफिस,दादर**

**जन माहिती अधिकारी**
**वरिष्ठ निरीक्षक लायसन्स, माहिम डिव्हजन, मनपा आयुक्त,**
**जी/नॉर्थ वार्ड ऑफिस,दादर**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : २०.०१.२०१०
सूनावणीचा दिनांक : ०२.०३.२०१०
अपिलार्थी : यांचे प्रतिनीधी उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

सुनावणीच्या वेळेला हे स्पष्ट झाले की, अपिलीय अधिकाऱ्याच्या निदेशनानुसार अर्जदाराने आवश्यकते शुल्क भरुन दि.३.०२.२०१० रोजी माहिती प्राप्त करुन घेतलेली आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः २.०३.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/४६१९९/अपील क्रं. ५५११ (जुना ४३७७)/०२**

**श्री. विनोद घोलप, ---------अपीलकर्ता**
**ए-१, शिवसदन, गोरसवाडी, लाला लजपतराय रोड,**
**एस.व्ही.रोड, मिलाप सिनेमाच्या मागे, मालाड (प),**
**मुंबई - ४०० ६४**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा --------- उत्तरवादी**
**कार्यकारी अभियंता, बृ.मनपा, पी / उत्तर विभाग कार्यालय,**
**मामलेतदार वाडी, लिबर्टी गार्डन, मालाड (प), मुंबई ४०० ०६४**

**जन माहिती अधिकारी**
**सहायक अभियंता (इ. व का.), बृ.मनपा, पी / उत्तर विभाग कार्यालय,**
**मामलेतदार वाडी, लिबर्टी गार्डन, मालाड (प), मुंबई ४०० ०६४**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : २९.१२.२००९
सूनावणीचा दिनांक : ०२.०३.२०१०
अपिलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

अर्जदाराला माकडवाला कंपाउंड, मालाड (पूर्व) येथील जे अनधिकृत बांधकाम अभिप्रेत आहे ते त्यांनी विवक्षीत पणे नमुद केल्यानंतर त्या अनधिकृत बांधकामाविरुध्द कलम ३५१ नुसार नोटीस देण्यात आलेली आहे. सदर नोटीशीबाबत अर्जदार श्रीयुत विनोद घोलप यांना कळविण्यात आलेले आहे असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले अपिलार्थी स्वतः अनुपस्थित असल्यामुळे याबाबत त्यांच्याकडून शहानिशा करुन घेतलेली नाही मात्र सद्यस्थितीतील माहिती दिली असल्यामुळे पुढील आदेश देण्यात येतो.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**

**दिनांकः २.०३.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. ५४८२/०२**

**श्री.अनिल वसंत कुमरे** **---------अपीलकर्ता**
**१९/३६९,मुंबई पोर्ट ट्रस्ट, नवीन वसाहत नाडकर्णी पार्क,**
**वडाळा (पूर्व),मुंबई ३७,**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **--------- उत्तरवादी**
**संचालक पणन/मुंबई मंडळ गृहनिर्माण क्षेत्र विकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उपसंचालक पणन/मुंबई मंडळ गृहनिर्माण क्षेत्र विकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : निरंक
सूनावणीचा दिनांक : १०.०३.२०१०
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

आयोगाने अर्जदारास दिनांक २९ डिसेंबर, २००९ रोजी प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी त्यांच्याकडे असलेल्या प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन आदेश पारित करावे असे निर्देश दिलेले होते. तसे न झाल्यामूळे आयोगाकडे सदरील अपील सादर झालेले आहे. सुनावणीच्या वेळेला वरील आदेश प्राप्त न झाल्यामूळे अपीलाची सुनावणी घेता येऊ शकली नाही असे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सांगितले मात्र अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अगोदर एकत्र चर्चा करुन अपीलार्थीस हवी असणारी माहिती ही दिनांक १५.०३.२०१० रोजी अर्जदारास देण्यात येईल असे ठरविलेले आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १०.०३.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**मुमाआ २००९/तक्रार क्रं. ६०६/०२**

**श्री.मनोज डी.रणदिवे** **---------तक्रारकर्ता**
**३/१६, गुरुपूष्यामृत हौसिंग सोसायटी,**
**गोलेट रोड, मुलुंड (पू),**
**मुंबई**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **--------- उत्तरवादी**
**पोलीस उपमहानिरीक्षक, पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,**
**कुलाबा, मुंबई**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहायक पोलीस महानिरीक्षक, पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,**
**कुलाबा, मुंबई**

**- वि वे च न -**

तक्रारीचा दिनांक : १२.११.२००९
सूनावणीचा दिनांक : १०.०३.२०१०
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

अर्जदाराची तक्रार आयोगाच्या दिनांक १३ ऑगस्ट,२००८ रोजीच्या आदेशाची अंमलबजावणी झाली नाही अशी होती. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी, पोलीस महासंचालक कार्यालय यांनी असे स्पष्ट केले की, अर्जदाराचा अर्ज हा पोलीस अधिक्षक, रायगड यांच्याकडे पाठविण्यात आला व त्यांनी अर्जदारास जी शुल्काची रक्कम भरण्याचे निर्देश दिले होते त्याप्रमाणे अर्जदाराने अजुनही शुल्काची रक्कम भरलेली नाही. तेव्हा अर्जदारास असे सुचविण्यात आले की त्यांनी शुल्काची रक्कम भरुन माहिती प्राप्त करुन घ्यावी. शुल्काची रक्कम भरण्या अगोदर कागदपत्रांची तपासणी करुनच कागदपत्रांची निवड करावयाची असल्यास ते तसे ही करु शकतात.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: १०.०३.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**मुमाआ २००९/तक्रार क्रं. ६००/०२**

**श्री.मनोज डी.रणदिवे ---------तक्रारकर्ता**
**३/१६, गुरुपूष्यामृत हौसिंग सोसायटी,**
**गोलेट रोड, मुलुंड (पू),**
**मुंबई ८१**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा --------- उत्तरवादी**
**उप अभियंता (इ/प्र), बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**पूर्व उपनगरे, राज लिगसी जवळ, पेपर मिल कंपाऊंड,**
**मुंबई**

**जन माहिती अधिकारी तथा**
**कार्यकारी अभियंता, (इ/प्र) बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**पूर्व उपनगरे, राज लिगसी जवळ, पेपर मिल कंपाऊंड,**
**मुंबई**

**- वि वे च न -**

तक्रारीचा दिनांक : ३०.१२.२००९
सूनावणीचा दिनांक : १०.०३.२०१०
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

आयोगाने ३ डिसेंबर ०८ रोजीच्या आदेशाने मुंबई महापालिकेने दोन बांधकामाच्या बाबतीत आर्किटेक्ट माहिती प्राप्त करुन घेऊन अर्जदारास देण्यात यावी असे निर्देश दिले होते. त्याप्रमाणे एका केसमध्ये आर्किटेक्टकडून माहिती प्राप्त झाली व दुसऱ्या केसमध्ये आर्किटेक्टकडेहि माहिती नसल्यामूळे प्राप्त होऊ शकलेली नाही. तसे अर्जदारास कळविण्यात आले होते. अर्जदारास ज्या प्रती देण्यात आल्या त्या सहजतेने वाचता येत नाही असे दिसून

आले. कार्यालयाने सुध्दा कॉपीज देत असतांना त्या प्रती सहजतेने वाचता येतील याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. या व्यतिरीक्तही काही माहिती अर्जदारास पहावयाची असल्यामूळे असे ठरविण्यात आले की, अर्जदाराच्या सोयीनुसार ते दिनांक १९ मार्च,२०१० रोजी दुपारी १२ वाजता जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात जातील व त्यांनी निवडकेलेल्या कागदपत्रांच्या प्रती त्यांना विनामूल्य देण्यात येतील.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १०.०३.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**मुमाआ २०१०/२७८/तक्रार क्रं. ७२३/०२**

**श्री.दयालराव कंठीराम देशपांडे --------तक्रारकर्ता**
**उपआयुक्त (पुनर्वसन), विभागीय आयुक्त कार्यालय,**
**सिव्हिल लाईन्स,**
**नागपूर**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा --------- उत्तरवादी**
**सह सचिव, सामान्य प्रशासन विभाग/दहा,**
**मंत्रालय, मुंबई ३२**

**जन माहिती अधिकारी तथा**
**अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग/दहा,**
**मंत्रालय, मुंबई ३२**

**- वि वे च न -**

तक्रारीचा दिनांक : १७.०२.२०१०
सूनावणीचा दिनांक : १०.०३.२०१०
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

दोन्ही बाजूचे म्हणने विचारात घेण्यात आले. अर्जदाराने कागदपत्रांची पाहणी करुन त्यांना कुठचे कागदपत्र पाहिजे त्याच्या पृष्ठ क्रमांकाची नोंद करुन घेतलेली आहे व अर्जदाराने अर्जाच्या सोबत मनिऑर्डर केल्याचे सिध्द करणारे पोष्टाच्या पावतीची प्रतीही जोडलेली होती.

अर्जदाराने केलेल्या साध्या अर्जासोबतच माहिती देण्यासाठी लागणारी रक्कम ही सुध्दा मनिऑर्डरने पाठविलेली होती ती कशासाठी पाठविली याचा खुलासा होत नसल्याने परत पाठविण्यात आली. मात्र मनिऑर्डर पाठविली होती यावरुन त्यांची निकड ही स्पष्ट होते त्यामुळे असे निर्देश देण्यात येतात की अर्जदाराने उद्या विभागामध्ये विहीत फी जमा करावी व अर्जदारास हवी असणारी माहिती ही दिनांक १५ मार्च,२०१० रोजी संध्याकाळी ५.३० वाजेपर्यंत त्यांना देण्यात यावी.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**

**दिनांक: १०.०३.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/४५८७१/अपील क्रं. ५४९२/०२**

**श्री. मिर्झा अबुल हसन अब्दुल कुद्दुस, ---------अपीलकर्ता**
**बी-४०८, सागर अपार्टमेंट/ फादर पीटर परेरा रोड,**
**सोनपूर लेन,एल.बी.एस.मार्ग,**
**कुर्ला (प), मुंबई ७०**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा --------- उत्तरवादी**
**जिल्हा उपनिबंधक, स.संस्था, जिल्हा उपनिबंधक, स.संस्था,**
**२, पूर्व उपनगरे, २ रा मजला, रुम नं. २०१, कोंकण भवन,सीबीडी बेलापूर,**
**नवी मुंबई**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उपनिबंधक, स.संस्था, एल वॉर्ड, रुम नं.३११, ३ रा मजला,**
**सीबीडी बेलापूर, नवी मुंबई**

## - वि वे च न -

अपीलाचा दिनांक : १७.१२.२००९
सूनावणीचा दिनांक : ११.०३.२०१०
अपिलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

अपीलाच्या संदर्भात सुनावणीच्या वेळेला जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन दिलेले आहे.

श्री.मिर्झा अब्दुल हसन अब्दुल कडून यांनी या कार्यालयाकडे दिनांक ९.०७.२००९ रोजी माहिती अधिकाराखालील माहितीबाबत अर्ज दाखल केलेला आहे. सदर अर्जावर कार्यालयाकडील जा.क्र.मुंबई/एल-वि/१२४५/सन-२००९ दिनांक १७.०७.२००९ च्या पत्रान्वये या कार्यालयात उपस्थित राहून हवी असणारी माहिती प्राप्त करुन घेणेस कळविले आहे. परंतु ते सदर कालावधीत हजर राहिले नाहीत. तसेच त्यांना यापूर्वी त्यांना वेळोवेळी दाखल केलेल्या दिनांक २५.०२.२०१० च्या अर्जास दिनांक १६.०३.२००९ रोजी, दिनांक १५.०७.२००९ च्या अर्जास दिनांक २७.०७.२००९ रोजी, दि.४.१२.२००९ च्या अर्जास दि.१५.१२.२००९ रोजी. दि.१७.१२.२००९ च्या अर्जास दिनांक २१.१२.२००९ रोजी, तसेच दि.७.०१.२०१० च्याअर्जास दि.१८.०२.२०१० रोजी, दि.१३.०१.२०१० च्या अर्जास

दि.१८.०१.२०१० रोजी पत्रान्वये कळवून त्यांना हवी असणारी माहिती प्राप्त करुन घेणेबाबत कळविले होते. परंतु ते सदर कालावधीत हजर राहिले नाहीत.

श्रीयुत मिर्झा अब्दुल हसन अब्दुल कुडूस यांनी दिनांक १५.०२.२०१० रोजी या कार्यालयात उपस्थित राहून त्यांना हवी असणारी माहिती धारिकेची संपुर्ण तपासणी घेऊन प्राप्त करुन घेतलेली आहे. तशी पोहच दि.१८.०१.२०१० च्या पत्रांवर घेतली आहे. संपुर्ण धारिकेची तपासणी घेऊन तक्रारदारांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. वरील नमूद परिस्थितीत तक्रारीत तथ्य नसल्याने तक्रार निकाली काढण्यात यावी ही विनंती.

अपीलार्थी अनुपस्थित आहे निवेदन लक्षात घेता पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येतो.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ११.०३.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/ अपील क्रं. १५२०/०२**

**श्री.नंदकुमार काळू नानकर, -------अपीलकर्ता**
**व्दाराः श्री.राजेंद्र काळू नानकर,एन-५३,**
**अे.अे. १/२६/५. महात्मा फुले नगर पवननगर सिडको,**
**नवीन नाशिक, नाशिक - ८**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी**
**जिल्हा रुग्णालय, त्रिबकरोड, नाशिक**
**जि.नाशिक.**

**जन माहिती अधिकारी**
**शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, त्रिबकरोड, नाशिक**
**जि.नाशिक.**

**- वि वे च न -**

अपीलकार श्री.नंदकुमार काळू नानकर, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७.१०.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय,परिसर जळगांव येथे दि. २१.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय प्राधिकारी तसेच जन माहिती अधिकारी व अपीलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे २८.०३.२००८ रोजी अर्ज करुन खालील नमुद केलेली सन २००६ ते २००७ या कालावधीत नाशिक जिल्हा रुग्णालयांत झालेल्या चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्याचे सरळसेवा भरतीबाबत माहिती तसेच संपुर्ण मूळ कागदपत्राच्या साक्षांकित प्रती मिळण्याबाबत माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस ते दारिद्र रेषेखाली येत नसल्याने माहितीच्या प्रतीसाठी होणारा खर्च कार्यालयात भरल्याशिवाय त्यांना छायांकित प्रती देता येणार नाही असे दिनांक ७.०६.२००८ च्या पत्राव्दारे कळविले.

अपीलार्थीने दिनांक १६.०६.२००८ रोजी माहिती मिळाली नाही म्हणून प्रथम अपील दाखल केले त्या अपीलावर प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दिनांक ३०.०६.२००८ रोजी सुनावणी घेतली त्यावेळी अपिलार्थी गैरहजर होते परंतु अपिलार्थीने प्रथम शुल्क भरुन माहिती घ्यावी असा निर्णय झाला.

माहिती मिळाली नाही म्हणून अपीलार्थीने दिनांक ७.१०.२००८ रोजी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी प्रथम अपिलीय प्राधिकारी,जन माहिती अधिकारी व अपिलार्थी उपस्थित होते.

सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेल्या बाबी.

अपिलार्थी यांनी दारिद्ररेषेखालील असल्याचे पिवळे शिधावाटप पत्रिका दाखविली. त्यावर उत्पन्न दाखविले नाही असा आक्षेप जन माहिती अधिकाऱ्यांचा आहे मात्र पुर्वी शिधावाटप पत्रिका हे दारिद्रयरेषेखालील व्यक्तीलाच दिली जात असे. तसेच धान्य वितरण अधिकारी यांनी सुध्दा प्रशासकिय अधिकारी जिल्हा रुग्णालय नाशिक यांना त्यांच्या दिनांक २९.०५.२००८ रोजीच्या पत्रानुसार श्रीयुत नरेंद्र काळू नानकर यांना बी.पी.एल. शिधापत्रिका वितरीत करण्यात आली आहे असे स्पष्टपणे लिहून दिलेले आहे. त्यामुळे अर्जदार हे विनामुल्य माहिती मिळण्यास पात्र ठरतात. महापालिकेने जरी त्यांचे नाव दारिद्रयरेषखालील लोकांच्या यादीत नाही असे लिहीले असले तरी बी.पी.एल.ची शिधावाटप पत्रिका त्यांना मिळाली असल्यामुळे अर्जदार यांना सकृतदर्शनी तरी माहिती विनामुल्य मिळण्याचा अधिकार आहे असे ठरविण्यात येत आहे. अर्जदारास सर्व उमेदवारांची माहिती, त्यांनी दिलेली प्रमाणपत्रा संबंधीत जोडलेली कागदपत्रे यांची माहिती हवी आहे. तृतीय पक्षाची माहिती असल्याने एवढया मोठया प्रमाणात पत्र व्यवहार करणे व्यावहारिक ठरणार नाही. त्यामुळे अर्जदारास ज्या उमेदवारांची निवड झालेली आहे त्या उमेदवारांची पुर्ण यादी व त्यांच्या निवडीसंबंधीची जी कागदपत्रे असतील ती कागदपत्रे विनामुल्य देण्यात याव्यात ही कार्यवाही सात दिवसांच्या आत पुर्ण करण्यात यावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**जन माहिती अधिकारी यांनी वर दर्शविल्याप्रमाणे कार्यवाही करावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**

**दिनांक: २६.०३.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/ अपील क्रं. १४६५/०२**

**श्री.नरेंद्र माधवलाल खंडेलवाल** **-------अपीलकर्ता**
**रा.कोमारोड, इगतपुरी, ता.इगतपूरी,**
**जि.नाशिक**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**उपर्वि विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय,**
**नाशिक, उप विभाग नाशिक**

**जन माहिती अधिकारी तथा**
**तहसीलदार,तहसील कार्यालय, इगतपूरी,ता.इगतपूरी,**
**जि.नाशिक**

**- वि वे च न -**

अपीलकार श्री.नरेंद्र माधवलाल खंडेलवाल यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८.०७.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय,परिसर जळगांव येथे दि. २१.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय प्राधिकारी अनुपस्थित होते व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलार्थी अनुपस्थित होते.

अपीलार्थींनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे ३.०१.२००८ रोजी अर्ज करुन खालील नमुद मौजे तळेगांव ता.इगतपुरी येथील नोंद क्र.२४६८ मधील नोंद बाब कमी झालेबाबत व इतर ३ मुद्यांवर माहिती मागितली होती. या सर्व माहितीची पृष्ठ संख्या ५१ इतकी असून एकूण रक्कम रु.१०२/- भरण्यास

दि.१०.०२.२००८ च्या पत्राव्दारे कळविण्यांत आली होती सदर रक्कम अपीलार्थीने भरलेली नाही. या विरोधात अपीलाथीने प्रथम अपील दाखल केले.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दिनांक २.०४.२००८ रोजी आदेश पारित करताना पुढीलप्रमाणे संबंधित मुद्दांचा उहापोह केलाआहे.

मी प्रस्तुत प्रकरणी वादी व प्रतिवादी यांनी केलेले युक्तीवाद केलेली कागदपत्रे अभ्यासले आहे. त्यावरुन एक गोष्ट स्पष्ट होते की, " वादी यांच्या अर्जातील मुद्दा क्र. १ ते ४ ची माहिती त्यांना पुरवण्यात आलेली आहे व ही बाब वादी यांनी देखिल सुनावणी दरम्यान मान्य केली आहे. वादी यांच्या मुळ अर्जातील मुद्दा क्र २ हा जमिनीचे मुळ मालक असतांना मला नोटीस का काढली नाही १ व मुद्दा क्र. ३ हा वादी हे ८.५ आर क्षेत्राचे सहहिस्सेदार असलेने त्यांना नोटीस व त्यांचे ना हरकत पत्र कायद्याने घेणे जरुरीचे असतांना देखिल त्यांना सदर बाबत का कळविले नाही १ असा आहे. माहिती अधिकाराअन्वये कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती पुरविणे अपेक्षित आहे. याद्वारे अभिप्रायात्मक स्वरुपाची माहिती पुरविणे अपेक्षित नाही म्हणूनच तलाठी व तहसिलदार कार्यालयाने याच अनुषंगाने वादी यांना दिलेले उत्तर देखिल तांत्रिक दृष्टया योग्यच आहे. यामुळे जाणुन बुजून माहिती देण्यात आलेली नाही हे वादी यांचे म्हणणे सयुक्तिक वाटत नाही.

वस्तुतः वादी यांनी अपीलात मागितलेली माहिती तसेच या कार्यालयाकडे अपील अर्जासमवेत जोडलेल्या जोडपत्र २ मधील उपस्थित केलेल्या विविध मुद्दयांचे स्वरुप हे अभिप्रायात्मक स्वरुपाचे आहे बाकी मुद्दयांचा आशय ज्या जनरल मुखत्यार पत्राद्वारे दस्त नोंदविला गेला आहे त्या मुखत्यारपत्राची वैधता, नोंद करतांना मुळ मालकाचे हितसंबंध व त्याअंती नोंद रद्द होणे अशा आशयाची आहे. प्रत्यक्ष सुनावणी दरम्यान वादी यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयांशी संबंधित महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १५० मालमत्ता हस्तांतरण कायदा व नोंदणी कायद्याशी संबंधित असल्याचे वादी यांचे प्रत्यक्ष निदर्शनास आणून देण्यात आले होते. नोंदीच्या कार्यपध्दती बद्दल वादी यांची तक्रार असेल तर त्यासाठी तंना सक्षम प्राधिकारी यांचेकडे दाद मागण्यासाठी असलेल्या महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ व २५७ च्या तरतुदींची देखिल वादी यांना माहिती देण्यात आलेली आहे. नोंदी विरुध्द मागण्याची दाद व माहिती अधिकाराखालील मागितलेली माहिती या दोन्ही बाबीतील भिन्नता वादी यांना समजून सांगण्यात आलेली आहे. कनिष्ठ महसूल कर्मचा-याची चुक असल्यास त्या प्रकरणातील आदेशातच संबंधिताविरुध्द कार्यवाही बद्दल देखिल आदेश समक्ष अधिकारी पारित करु शकतात ही बाब देखिल त्यांच्या निदर्शनास आणून दिलेली आहे.

या सर्व पार्श्वभूमिवर वादी यांच्या अपील अर्जात नमूद असल्याप्रमाणे त्यांना प्रतिवादी तसेच तलाठी यांचेकडून माहिती देण्यात आलेली आहे ही बाब स्पष्ट होते. यामुळे वादी यांचा अपील अर्ज फेटाळण्यास पात्र आहे या निष्कर्षाप्रत आल्याने मी अपील अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, नाशिक उपविभाग नाशिक खालील प्रमाणे आदेश देत आहे. "

व्दितीय अपीलाच्या सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांच्या घरी धार्मिक विधीमुळे ते बाहेरगांवी गेल्यामुळे हजर राहू शकले नाहीत जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी हजर होते. अपीलार्थीस माहिती उपलब्ध असून ज्या नक्कल प्रती त्यांना हव्या होत्या त्याची रु.१००/- रक्कम भरण्यास सांगुनही त्यांनी भरलेली दिसत नाही. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी ती भरण्यास सांगितलेली होती अपीलार्थीने दोन अपिले सादर केली तरी त्यात फीचा उल्लेख नाही. सुनावणीच्या वेळी गैरहजर राहिल्याने त्यांना कशाप्रकारे माहिती हवी होती याचा बोध होत नाही.

प्रथम अपिलीय अधिका-यांच्या विवेचनाशी आयोग सहमत आहे. अपीलार्थीनी फी भरुन माहिती प्राप्त करुन घ्यावी.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः २२.०३.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/ अपील क्रं. १००/०२**

**श्री.शामराव वसंत साळुंके, -------अपीलकर्ता**
**मु.पो.पंचशिल नगर, आठवडे बाजार,**
**भुसावळ, जि.जळगांव.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी**
**तालुका कृषि अधिकारी, कृषि कार्यालय**
**मुक्ताई नगर, जि.जळगांव.**

**जन माहिती अधिकारी**
**तालुका कृषि अधिकारी, कृषि कार्यालय**
**मुक्ताई नगर, जि.जळगांव.**

**- वि वे च न -**

अपीलकार श्री.शामराव वसंत साळुंके, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ४.०५.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केले सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय,परिसर जळगांव येथे दि. ६.०३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय प्राधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते व अपीलार्थी अनुपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे २.०२.२००९ रोजी अर्ज करुन खालील नमुद सन २००८ ते २००९ या वर्षात ठिबक सिंचन व सुक्ष्म सिंचन या योजनेस तालुक्यातील किती शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळाला त्यांच्या बिलांच्या प्रती योजनेवर अनुदान व वाटप किती याचा तपशील.२ ) विस्तार योजनेतील शेती शाळा त्याचा लाभार्थी यांची नोंद. ३) तालुक्यात किती पिक प्रात्यक्षिक घेतली व हजर

शेतकऱ्यांची यादी अनुदान प्राप्त एकूण खर्च यांच्या प्रती. ४ ) तालुक्यात हरभरा,गहू,करडई आदी पिकावर किती शेती शाळा घेतल्या व त्याचे वाटप इत्यादि माहितीची मागणी केली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस माहिती विस्तृत स्वरुपाची व क्लिष्ट व खर्चीक असून ती गोळा करण्यात फार कालावधी लागेल असे नमूद केले आहे. माहिती न मिळाल्याने अपीलार्थीने दिनांक १२.०३.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी कोणतेही लेखी आदेश पारित केले नाहीत किंवा जन माहिती अधिकारी यांना माहिती देण्यास सांगितले नाही फक्त माहिती अवलोकनार्थ ठेवली आहे असे नमूद केले आहे.

व्दितीय अपील दाखल झाल्यावर सुनावणीस अपीलार्थी गैरहजर होते परंतु प्रथम अपीलीय प्राधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. त्यावेळी निदर्शनास आलेल्या बाबी : १) माहिती केवळ विस्तृत स्वरुपाची आहे म्हणून नाकारलेली आहे. २) प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी प्रथम अपीलावर कोणतेही आदेश पारित केलेले नाहीत तसेच जन माहिती अधिकारी कोणत्याही सूचना दिलेल्या नाहित. ३) अर्जदाराने अर्ज करुन वर्ष झालेतरी त्यांना माहिती उपलब्ध असून देण्यात आलेली नाही. ४) आयोगाकडील सुनावणीच्या वेळी दोन्ही अधिकाऱ्यांनी माहिती न देण्याचा योग्य तो खुलासा सादर केलेला नाही यावरुन असे दिसून येते की माहिती ही प्रयत्न करुन उपलब्ध करुन देता आली असती परंतु अपीलार्थीस त्रास होईल अश उद्देशानेच माहिती देण्याची टाळाटाळ केलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी स्वत:ची जबाबदारी ओळखून व जनहित लक्षात घेऊन कार्य करणे अपेक्षित आहे अशा प्रकारे त्या पदाचा अवमान केल्या सारखेच आहे अशा त्यांच्या बेजबदार वर्तनाची दखल घेऊनजन माहिती अधिकारी यांच्यावर रु. ५,०००/- ची शास्ती करण्यांत येत आहे. ती त्यांच्या दिनांक १ मे २०१० रोजी होणाऱ्या वेतनातून वसूल करुन शासनाने विहित केलेल्या बजेट हेडमध्ये जमा करवी व तसे केल्याचा अनुपालन अहवाल आयोगास दिनंक १५ मे २०१० पर्यंत पाठवावा. ही जबाबदारी जिल्हाकृषी अधिकारी यांच्यावर टाकण्यात येत आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनीसुध्दा मुदतीत अपीलावर निर्णय द्यावयाचा असतो याची जाणीव ठेवावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**जिल्हाकृषी अधिकारी, जळगांव यांनी शास्ती वसूलीची कार्यवाही करावी, या आदेशाची प्रत त्यांनाही देण्यात यावी. अपीलीय अधिकाऱ्यांनी सुध्दा या आदेशाची प्रत त्यांना पाठवावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः २९.०३.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/ अपील क्रं. ९१ /०२**

**श्री.चंद्रकांत भानुदास भदाणे,** **-------अपीलकर्ता**
**समर्थ नगर, कॉटन मार्केट समोर,**
**अमळनेर, जि.जळगांव.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**सहायक धर्मदाय आयुक्त, जळगांव, जि.जळगांव.**

**जन माहिती अधिकारी**
**श्रम साफल्य एज्युकेशन सोसायटी, अमळनेर,**
**जि.जळगांव.**

**- वि वे च न -**

अपीलकार श्री.चंद्रकांत भानुदास भदाणे, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४.०२.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केले सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय,परिसर जळगांव येथे दि. ६.०३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय प्राधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते व अपीलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थींनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे १६.०९.२००८ रोजी अर्ज करुन खालील नमुद केलेली माहिती मागितली.

१ ) श्रम साफल्य एज्युकेशन सोसायटी अमळनेर स्थापनेपासून आजपर्यंत संस्थेच्या सभांचे प्रेसिंडबुकची छायांकित प्रत. २) श्रीम साफल्य एज्युकेशन अमळनेर स्थापनेपासून आजपर्यंत सभा बोलाविण्यासाठी तयार केलेले अजिंडे व या संदर्भात संस्थेच्या सभासदांना अजिंडे मिळाल्याबाबतची पोहच स्थानिक टपालबुक व टपालबुकाची छायांकित प्रत.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस कोणत्याही प्रकारे लेखी वा तोंडी माहिती संबंधी काहीही कळविले नाही त्यामुळे अपीलार्थीने दिनांक १६.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपीलार्थीने यापूर्वीही अनेक अपिले दाखल केल्याचे नमूद करण्यांत आले आहे श्रीम साफल्य एज्युकेशन सोसायटीचे कॉलेज कायम स्वरुपी विना अनुदान तत्त्वावर सुरु होते ते सुन २००८ पासून बंद स्थितीत आहे तसेच अपील अर्जात मागणी केलेले दस्तऐवज हे संस्थेने गोपनीय रेकॉर्ड आहे तसेच अपीलार्थीवर अर्थिक आरोप असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे त्याप्रकरणी मागितलेली माहिती अपीलार्थीस दिलेली आहे. त्यामुळे प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी अपील नस्तीबंद केले त्याविरोधात अपीलार्थीने आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. त्यावेळी झालेल्या सुनावणीच्या वेळी प्रथम अपीलीय प्राधिकारी, जन माहिती अधिकारी व अपीलार्थी उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेल्या बाबी. १ ) चर्चेदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अपीलार्थी यांच्या वर सन १९९२ ते २००६ पर्यंत यांनी प्राचार्य पदावर असतांना अनेक गैर व्यवहारामुळे त्यांची विभागीय चौकशी होऊन ते चौकशीत दोषी आढळून आले त्या विरोधांत त्यांनी केलेले अपील औरंगाबाद येथील विद्यापीठ न्यायप्राधिकरण यांचेकडे न्यायप्रविष्ठ आहे न्यायप्रविष्ठ प्रकरणाची माहिती तक्रारदारास देण्यांत आलेली आहे परंतु अर्जात मागणी केलेले दस्तऐवज हे संस्थेचे गोपनीय रेकॉर्ड आहे त्याची माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी नाकारलेले आहे. २) संस्थेने चालवित असलेली दोन महाविद्यालये ही विना अनुदानीत तत्त्वावर सुरु होती ती जुलै २००८ पासून अनुदानीत झालेली आहेत त्यामुळे विना अनुदानीत काळातील माहिती अपीलार्थीस देण्याचे बंधन नाही. असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी यांनी केले. अर्जदाराची माहितीची मागणी ही ट्रस्टच्या प्रोसीडींग्ज बुक संबंधी आहे. नुकतेच मुंबई हायकोर्टाच्या नागपूर खंडपीठाने पब्लीक ट्रस्ट या संस्था "जनप्राधिकरणे" नाहीत असा निर्णय दिला आहे. तसेच जी कालावधीची माहितीची मागणी केली त्या कालावधीत या संस्थेस शासनाची भरीव मदत झालेली दिसून येत नाही. या सर्व प्रकरणाचा विचार करता अपीलार्थीवर झालेली विभागीय चौकशी व पुढे दाखल केलेले अपील न्यायप्रविष्ठ आहे. त्यामुळे यावर काही भाष्य न करणे योग्य वाटते संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी दि.६.०३.२०१० रोजी केलेला खुलासा मान्य करण्यात येत आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील अमान्य करण्यांत येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः २६.०३.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/ अपील क्रं. ८७/०२**

**श्री.दिलीपकुमार गौरीशंकर अग्रवाल,** **-------अपीलकर्ता**
**रा.बोदवड,मेन रोड,ता.बोदवड,**
**जि.जळगांव.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**अधीक्षक, भूमी अभिलेख जळगांव,**
**जिल्हाधिकारी कार्यालय आवर जळगांव**

**जन माहिती अधिकारी**
**अधीक्षक, भूमी अभिलेख जळगांव,**

**- <u>वि वे च न</u> -**

अपीलकार श्री.दिलीपकुमार गौरीशंकर अग्रवाल, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ९.०१.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केले सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय,परिसर जळगांव येथे दि. ६.०३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय प्राधिकारी, जन माहिती अधिकारी व अपीलार्थी अनुपस्थित होते.

अपीलार्थींनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे २६.०९.२००७ रोजी अर्ज करुन खालील नमुद केलेली

१) नगर भूमापन योजना बोदवड येथे सन १९८० खाली लागू करण्यात आली यांत नगर भूमापन यांनी कर्तव्यात कसूर केल्यास त्याची तपासणी होते काय? झाल्यास दखल घेणारे अधिकारी कोण? २) कर्तव्यात कसून झालीतर बरोबर करण्याचे अधिकार कोणाचे. ३) भूमापनात कर्तव्य कसून झाल्यास संबंधीतताचे नुकसानीस जबाबदार अधिकाऱ्याची माहिती. ४) उजनी रस्ता व त्याचे आजुबाजूचा भाग व मिळकतीनगर भूमापन आलेखांत दाखविण्यात आलेला नाही इत्यादि अनुषंगाने माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी` अपीलार्थीस यथोचित माहिती दिनांक २३.१०.२००७ रोजीच्या पत्राव्दारे मुद्येनिहाय दिलेली आहे त्याव्यतिरिक्त त्यांनी यापूर्वीही त्यांना माहिती दिल्याचे दिसून येते.

अपिलार्थीने मुद्येसुद माहिती मिळाली नाही म्हणून प्रथम अपील दाखल केले त्याची सुनावणी दि.२०.११.२००७ रोजी ठेवण्यांत आली त्यावेळी झालेल्या चर्चेत अपीलार्थीने काही माहिती मिळाली नाही म्हणून तक्रार केली परंतु प्रकरणाचा सांगोपांग विचार करता जन माहिती अधिकारी यांनी योग्य ती माहिती दिली असल्याचे प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचे म्हणणे होते व त्यांनी अपील निकाली काढले.

अपीलार्थीने त्या विरोधात आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. त्यावेळी झालेल्या सुनावणीच्या वेळी असे निदर्शनास आले की अपीलार्थी, प्रथम अपीलीय प्राधिकारी व जन माहिती अधिकारी तिघेही सुनावणीस गैरहजर होते. मात्र असे दिसून येते की जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दिलेली माहिती यथोचित व मुद्येसुद दिलेली दिसून येते.

अपीलार्थीस माहिती मिळालेली आहे. कदाचित कारणावरुनच ते आयोगाच्या सुनावणीस गैरहजर राहिलेले दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: २६.०३.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/ अपील क्रं. ८५/०२**

**श्री.कैलास देवराम पाटील,** **--------अपीलकर्ता**
**७ब, भूषण कॉलनी, जळगांव,**
**जि.जळगांव.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**अभियांत्रिक महाविद्यालय,बांभोरी,जळगांव, जि. जळगांव**

**जन माहिती अधिकारी**
**प्राचार्य अभियांत्रिक महाविद्यालय, बांभोरी, जळगांव,**
**जि.जळगांव**

**- वि वे च न -**

अपीलकार श्री.कैलास देवराम पाटील, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२.०३.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केले सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय,परिसर जळगांव येथे दि. ६.०३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय प्राधिकारी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते तर अपीलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे १८.१२.२००८ रोजी अर्ज करुन खालील नमुद केलेली माहिती मागितली होती.

"१) व्यवस्थापन समितीच्या सभेत अपीलार्थीस सुनावणीस बोलाविण्यातबाबतचा ठराव करण्यांत आला त्या सभेची सूचना विषय पत्रिका. २) तंत्र निकेतन व अभियांत्रिकी महाविद्यालय बांभोरी,जळगांव येथील अपील सुनावणीचा तपशील इत्यादि ४ मुद्यांवर माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी कोणत्याही प्रकारे लेखी सूचना अथवा माहिती अपीलार्थीस दिलेली नाही."

अपीलार्थीने यावर दाखल केलेल्या प्रथम अपीलावरही प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी कोणतेही भाष्य केले नाही किंवा कोणतेही आवश्यक ते आदेश पारित केले नाहीत असे आढळून आले.

कोणतेही आदेश, माहिती पत्र याव्दारे मागितलेली अपेक्षित माहिती मिळत नसल्याने व्यथीत होऊन अपीलार्थीने आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी फक्त अपीलार्थी उपस्थित होते परंतु जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित होते.

सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेल्या बाबी :- १) जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलार्थीस कोणत्याही प्रकारे माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. २) माहिती अधिनियम २००५ मधील कलम २ (च) प्रमाणे माहिती देणे बंधनकारक असतांना दोन्ही वरिष्ठ अधिकारी याबाबत अनभिज्ञ दिसून आले. ३) आयोगाने आयोजित केलेल्या सुनावणीस दोन्ही अधिकारी अनुपस्थित राहिले. ४) दोघेही अधिकारी कामाबद्दल बेफिकिरपणे वागले.

अपीलार्थीने अर्ज करुन वर्ष आलांडून गेले तरी त्यांनी अपीलार्थीस काहीही कळविण्याची तसदी घेतली नाही माहिती उपलब्ध करुन न देणे अशा प्रकारे बेजबाबदारपणे वागण्यासंदर्भात अधिनियमाच्या कलम २० अन्वये जन माहिती अधिकारी यांच्यावर रु. ५०००/- ची शास्ती लादण्यांत येत आहे ही शास्ती १ मे २०१० रोजी होणाऱ्या वेतनातून वसुल करावी व शासनाने विहित केलेल्या बजेटहेडमध्ये जमा करावी व तसे केल्याचा अनुपालन अहवालआयोगास १५ मे २०१० पर्यंत पाठवावृ

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनाही अपीलार्थीस माहिती देण्यास कोणतेही सहकार्य केलेले नाही वरिष्ठांनी सोपविलेली जबाबदारी पार पाडण्याची, ती अमलांत आणण्याच्या कृतीची अपेक्षा करणे परंतु तीही पार पाडलेली नाही तरी यापुढे जबाबदारी आळखून त्यांनी काम करणे अपेक्षित आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**
**संबंधीतानी उपरिनिर्दिष्ट कार्यवाही करावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः २६.०३.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/४५८४७/अपील क्रं. ५५०२/०२**

**श्री.शंकर लक्ष्मण सिंग,** **-------अपीलकर्ता**
**३,अंबावाडी, पोद्दार तडे,गुरुव्दाराजवळ,**
**मालाड (पूर्व), मुंबई - ४०० ०९७**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**कार्यकारी अभियंता, सहायक मनपा आयुक्त, पी/उत्तर विभाग,**
**कार्यालय मामलेदार वाडी, लिबर्टी गार्डन,**
**मालाड (प), मुंबई ६४**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहायक अभियंता, सहायक मनपा आयुक्त, पी/उत्तर विभाग,**
**कार्यालय मामलेदार वाडी, लिबर्टी गार्डन,**
**मालाड (प), मुंबई ६४**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : ११.१२.२००९
सुनावणीचा दिनांक : ३०.०३.२०१०
अपीलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

अपीलार्थीस रु.३५४/- भरुन माहिती प्राप्त करुन घेण्याचे निर्देश देण्यात आले होते व प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या आदेशात सुध्दा हाच निर्णय कायम करण्यात आला होता. व्दितीय अपीलात अर्जदाराचे म्हणणे असे की, ही माहिती १७७ पेजेस असू शकत नाही. त्यामुळे त्यांनी पैसे भरलेले नाहीत.

जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, कागदपत्रे तयार ठेवण्यात आलेली आहेत ती १७७ पेजेस होती तेव्हा असे निर्देश देण्यात येत आहेत की अर्जदाराने सदर माहितीचे अवलोकन करावे व त्यांना जेवढी कागदपत्रे पाहिजे आहे तेवढेच फक्त शुल्क भरुन प्राप्त करुन घ्यावे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी यांनी उपरिनिर्दिष्ट कार्यवाही करावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: ३०.०३.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/४६४०८/अपील क्रं. ५५६५/०२**

**श्री.अरविंद भास्कर मिस्त्रि,** **--------अपीलकर्ता**
**१५/९/९, लकडावाला चाळ, प्लॉट नं. २७३/२७४,**
**जवाहर रोड, घाटकोपर, (पुर्व)**
**मुंबई - ४०० ०७७.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**वित्तीय सल्लागार, झापेडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पुर्व),**
**मुंबई - ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी**
**झापेडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पुर्व),**
**मुंबई - ४०० ०५१.**

## - वि वे च न -

अपीलाचा दिनांक : ०४.०१.२०१०
सुनावणीचा दिनांक : ३०.०३.२०१०
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

अर्जदाराचे मुद्दा क्रमांक ३ व ४ च्याबाबतीत समाधान झालेले नाही.

3) Decision/Resolution passed by H. Committee stating that power of Attorney holder or representative of applicant/appellant should not be allowed to argue on behalf of applicant/appellant in hearing.

4) Decision/Resolution passed by H. Committee stating that any person who is not developer or not-eligible member should be allowed to argue ob behalf of Developer/Society in hearing.

अशा पध्दतीची रेझ्युलेशन किंवा निर्णय रेकार्डला नाही असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. तसे अर्जदारास कळविण्यात यावे व तसे कळविलेतर आपले समाधान होईल असे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे. जे कागदपत्र रेकार्डला नाही तसे कळविण्यास हरकत नाही तेव्हा त्याप्रमाणे अर्जदारास कळविण्यात यावे.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**
**जन माहिती अधिकारी यांनी ५ दिवसात वरीलप्रमाणे कार्यवाही करावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: ३०.०३.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/४६४०१/अपील क्रं. ५५६६/०२**

**श्री.अतिक अबुबकर कागदी,** **-------अपीलकर्ता**
**सहकार नगर, बिल्डींग क्र.७, रुम नं.२,**
**नायगांव फ्रांस रोड,वडाळा,मुंबई - ४०० ०३१**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**अभियांत्रिकी कक्ष, झापडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पुर्व),**
**मुंबई - ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी**
**झापडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पुर्व),**
**मुंबई - ४०० ०५१.**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : ०७.०१.२०१०
सुनावणीचा दिनांक : ३०.०३.२०१०
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

अर्जदारास हवी असणारी सोसायटीची कागदपत्रे झापडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण कार्यालयातून गहाळ झाल्यामुळे सदर विषयासंबंधीत माहिती दिली जाऊ शकत नाही असे जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास

कळविलेले आहे. जर नस्ती सापडत नसेलतर ती संबंधीत आर्किटेक्ट वा संबंधीत पक्ष यांच्याशी संबंध साधून त्यांच्याकडून कागदपत्र मागवून घ्यावीत व अर्जदारास उशीरात उशीरा एक महिन्याच्या आत त्यांना हवी असणारी माहिती देण्यात यावी असे निर्देश देण्यात आले.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: ३०.०३.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/ अपील क्रं. ११३/०२**

**श्री.कुबेर गोविंद कुमावत,** **-------अपीलकर्ता**
**रा.अमळनेर, प्लॉट नं.१, श्रीरंग कॉलनी,**
**पिंपळे रोड, अमळनेर, जि.जळगांव.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**चिटणीस, खांदेश शिक्षण मंडळ व प्रताप महाविद्यालय, अमळनेर,**
**जि.जळगांव.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**प्राचार्य, प्रताप महाविद्यालय, खांदेश शिक्षण मंडळ,अमळनेर,**
**जि.जळगांव.**

**- वि वे च न -**

अपीलकार श्री.कुबेर गोविंद कुमावत, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५.११.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केले सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय,परिसर

जळगांव येथे दि. ६.०३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय प्राधिकारी व  जन माहिती अधिकारी, पीलार्थी अनुपस्थित होते.

अपीलार्थींनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे १७.०६.२००९ रोजी अर्ज करुन खालील नमुद केलेली माहिती मागितली होती.

"१) प्रा.कुबेर कुमावत यांच्या निलंबनाबाबतीत खानदेश शिक्षण मंडळ व्यवस्थापनाने केलेल्या ठरावाची प्रत. २) विभागीय चौकशीचा कालावधी किती. ३) डिसेंबर २००६ पर्यंत यु.जी.सी.मार्फत एकूण किती अनुदान प्राप्त झाले व त्याचे लेखा परिक्षणाच्या प्रती इत्यादि माहिती मागितली होती."

प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी दि. १४.०७.२००९ च्या पत्राव्दारे अपीलार्थीस प्रथम अपील दि. २३.०७.२००९ रोजी दाखल केले प्रत्यक्षात मुद्या क्र. १ ते २ याची माहिती दिलेली आहे. मुद्या क्र.३ संबंधीची माहिती प्रमुख हिन्दी विभाग प्रताप महाविद्यालय,अमळनेर यांच्याशी संबंधीत असल्याने त्यांना अपिलार्थीस माहिती देण्यास सांगितले. त्याबाबत प्रताप विद्यालय अध्यक्ष हिन्दी विभाग यांनी दि.४.०७.२००९ च्या पत्राव्दारे खर्चाची माहिती विभागात उपलब्ध नाही. प्रत्यक्षात प्रा.के.जी.कुमावत आर्थिक व्यवहार पहात होते व त्यांनी अशी कोणतीही माहिती सादर केलेली नाही.

अपीलार्थीने व्दितीय अपील दाखल केले त्यावेळी झालेल्या सुनावणीस स्वतः प्रथम अपीलीय प्राधिकारी, जन माहिती अधिकारी व अपीलार्थी अनुपस्थित होते. माहिती मुदतीत दिलेली दिसून येते, अपीलार्थी स्वतः आयोगाच्या सुनावणीस अनुपस्थित राहिल्यामुळे त्यांनी माहिती मिळाली की नाही याचा बोध होत नाही. परंतु कागदपत्रावरुन जन माहिती अधिकाऱ्यांनी त्याच्या अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती मुदतीत अपीलार्थीस दिलेली आहे. काही माहिती ही अपीलार्थी कार्यरत असलेल्या, प्रताप महाविद्यालयाशी संबंधीत होती. त्यावेळी तेच त्या विद्यालयाचे आर्थिक व्यवहार पहात होते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**

**दिनांकः २९.०३.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/ अपील क्रं. ११०/०२**

**श्री.चंद्रकांत रामदास जोशी,** **-------अपीलकर्ता**
**साईलिला १३७/१, आदर्शनगर,**
**गुलाबचंद कांकरिया शेजारी,**
**जि. जळगांव.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी** **------- उत्तरवादी**
**अभियांत्रिकी व तांत्रिक महाविद्यालय, बांभोरी,**
**जळगांव**

**जन माहिती अधिकारी**
**अभियांत्रिकी व तांत्रिक महाविद्यालय, बांभोरी,**
**जळगांव**

**- वि वे च न -**

अपीलकार श्री.चंद्रकांत रामदास जोशी, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७.०६.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केले सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय,परिसर

जळगांव येथे दि. ६.०३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय प्राधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलार्थी अनुपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे ६.०४.२००९ रोजी अर्ज करुन खालील नमुद केलेली माहिती मागितली होती.

" श्री.शेखावत यांची ज्या आदेशाने न्यासाच्या अधिकार पदी नेमणूक झाली त्या आदेशाची प्रत. २) सध्या कार्यरत असलेल्या पदाचा तपशील. ३) कार्यकालाचा कालावधी अधिकार पदी नसल्याच्या त्यांच्या बदली अधिकाऱ्यांची माहिती ४) न्यासाचे अधिकार पद बहाल करण्यात आलेल्या ठरावाची आदेशाची प्रत. ५) व्याजासह एकरकमी रक्कम जमा केल्याबाबतचा तपशील दि. ३१.०३.२००९ अखेर ॲडव्हान्स रकमेचा तपशील यादी इत्यादि १७ मुद्यांवर माहिती मागितली होती."

अर्जदारास विहित कालावधीत माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी दि.९.०५.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर सुनावणी घेण्यापूर्वीच जन माहिती अधिकारी यांनी सदर संस्था विनाअनुदानीत आहे त्याला शासनाकडून अनुदान मिळत नाही तरीही संस्थेच्या हक्काला बाधा न येता त्यांनी अपीलार्थीस मुद्येनिहाय दि.१६.०५.२००९ च्या पत्राव्दारे सविस्तर माहिती अपिलार्थीस दिलेली आहे. अपीलार्थीस काही मुद्यांवर उदा. अनुदानित आहे ती जनतेच्या पैशावर चालते याचा खुलासा व काही मुद्यांबाबत माहिती हवी असल्याने त्यांनी व्दितीय अपील दि. ३.११.२००९ रोजी केले त्याची सुनावणी दि. ६.०३.२००९ रोजी झाली त्यावेळेस फक्त अपिलार्थी हजर होते परंतु प्रथम अपीलीय प्राधिकारी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते. सुनावणीच्या वेळी लक्षात आलेल्या बाबी :- १) अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालयात बांभोरी हे श्रम साधाना बॉम्बे ट्रस्ट व्दारा संचालित संस्था विना अनुदानित असून संस्थेस कोणतेही आर्थिक अनुदान शासनाकडून मिळत नाही. २) जन माहिती अधिकारी यांनी तरीही संस्थेच्या हक्कास बाधा येणार नाही तरी विचारलेल्या मुद्यांवर सविस्तर माहिती दिली तसेच त्यांच्या प्रतीही अपीलार्थीस दिलेल्या आहेत. संस्था विनाअनुदानीत असल्यामुळे त्या संस्थेबद्दल माहिती देण्याचे बंधन जन माहिती अधिकारी यांना अधिनियमानुसार नाही. तरीही त्यांनी माहिती वेगवेगळया मुद्यांवर दिलेली आहे. तरीही अपीलार्थीस अद्याप काही माहिती देणे शिल्लक असल्यास ती त्यांना विनामुल्य देण्यात यावी.

प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी प्रथम अपीलावर कोणतेही आदेश पारित केलेले नाहीत किंवा अपीलार्थीस समाधान होईल अशी कोणतीही कृती केलेली नाही आयोगाच्या सुनावणीच्या वेळी ते गैरहजर राहिले. त्यांचे हे बेजबाबदार पणाचे वागणे योग्य नाही दिलेल्या अधिकाराचा जनहितासाठी उपयोग कसा झोईल

हे पहाणे त्यांचे कर्तव्य आहे. यापुढे अशा प्रकारचे वर्तन केल्यास त्यांच्यावर योग्यती प्रशासकीय कारवाईची शिफारस वरिष्ठांना करण्यांत येईल.या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: २६.०३.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/४६४०२/अपील क्रं. ५५६९/०२**

**श्री.आर.ए.सिंग,** **-------अपीलकर्ता**
**३ रा मजला, सुनामा हाऊस, १४०,**
**ऑगस्ट क्रांती मार्ग, शालीमार हॉटेल समोर,**
**केंम्पस कॉर्नर,**
**मुंबई - ४०० ०३६**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**मुख्य अभियंता (डी.पी), बृहन्मुंबई मनपा मुख्यालय,**
**४ था मजला, अनेक्स इमारत, महापालिका मार्ग, मुंबई - ४०० ००१**

**जन माहिती अधिकारी**
**उपमुख्य अभियंता (डी.पी), बृहन्मुंबई मनपा मुख्यालय,**
**४ था मजला, अनेक्स इमारत, महापालिका मार्ग, मुंबई - ४०० ००१**

## - वि वे च न -

अपीलाचा दिनांक : २८.१२.२००९
सुनावणीचा दिनांक : ३०.०३.२०१०
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय प्राधिकारी : उपस्थित

दोन्ही बाजुचे म्हणणे ऐकूण घेतले प्रथम अपिलीय अधिकारी यांनी यासंदर्भात त्यांच्या आदेशात योग्य रितीने अर्जदाराच्या अर्जाचा परामर्ष घेतला आहे तो पुढील प्रमाणे.

By your application date 7.05.2009, submitted before S.I.P.O. you had asked for soft copy of Development plan which M.C.G.M. is using for preparing D.P. remarks. The applicant was informed that the soft copy as requested by him cannot be furnished.

It was further explained by S.I.P.O. applicant that Corporation has spent considerable amount on Digitalization and creation of software for giving D.P. remarks for G.I.S., hence soft copy cannot be furnished and the following order is passed.

"Order"

The Software copy of Development plan as requested by you cannot be provided. The D.P. remarks are issued based on the Development plan sanctioned by the State Govt. If the applicant requires the copy of D.P., the same can be obtained from Zonal Asstt. Engineer (Survey)"s office in Zonal B.P. Sections of requisite payment. The appeal is thus disposed off

प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांच्या विवेचनाशी व आदेशाशी आयोग सहमत आहे.

**आदेश**

**अपील अमान्य करण्यांत येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: ३०.०३.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/ अपील क्रं. ५२९८/०२**

**श्री.नवीन शामराव परब, -------अपीलकर्ता**
**१ ला मजला, ७ टोपीवाला लेन,**
**मुळगांवकर इमारत, लॅमिन्टन रोड,**
**मुंबई - ४०० ००७.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा --------- उत्तरवादी**
**सहा. शिधा वाटप अधिकारी, शिधा वाटप अधिकारी यांचे कार्यालय,**
**महालक्ष्मी चेंबर, महालक्ष्मी, परळ, मुंबई.**

**जन माहिती अधिकारी**
**शिधा वाटप अधिकारी यांचे कार्यालय,**
**महालक्ष्मी चेंबर, महालक्ष्मी, मुंबई.**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक :- ११.११.२००९
सुनावणीचा दिनांक :- ४.०२.२०१०
अपीलार्थी :- उपस्थित
जन माहिती अधिकारी :- उपस्थित

प्रथम अपिलीय अधिकारी :- उपस्थित

अपीलार्थीनी दिनांक १२.०४.२००९ च्या माहिती अर्जाव्दारे रेशन कार्ड नं. BB/No 000903-No 048826 च्या बाबतीत मागील २५ वर्षांची खालील माहिती मागितली.

१) उपरोक्त रेशन कार्ड ज्या नावाने दिले आहे ते नाव.

२) रेशन कार्ड मिळविण्यासाठी सादर केलेल्या कागदपत्रांच्या प्रती.

३) कार्डात किती नावांचा समावेश आहे.

४) यातील काही नावे कमी करण्यात आली आहेत काय ? असल्यास त्याची यादी

उपरोक्त अर्जाला जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिले नसल्याने त्यांनी दि.३.०८.२००९ रोजी प्रथम अपील केले. यावर दि.२८.०८.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली नाही. परंतु सुनावणी झाली नाही ही बाब नमूद करुन अपीलार्थींनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केल.

व्दितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीला दिलेल्या दि. १.०९.२००९ रोजीच्या प्रत्राची प्रत सादर केली. त्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की अपीलार्थींनी माहिती अर्जाव्दारे मागितलेली माहिती व जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर यात तफावत आहे. दि. १२.०४.२००९ च्या माहिती अर्जाला दि. १.०९.२००९ रोजी म्हणजे तब्बल ३ महिने उशिराने उत्तर देणे अयोग्य आहे. याबाबत आयोगाचे असे निदेश आहेत की सदर आदेशाच्या दिनांकापासून १० दिवसांच्या आत अपीलार्थींना त्यांच्या माहिती अर्जानुसार माहिती पुरविण्यात यावी. तसेच सदर प्रकरणी माहिती देण्यास झालेल्या विलंबाबाबत जन माहिती अधिकारी यांचेवर रु.५०००/- ची शास्ती लादण्यात येत आहे ही शास्तीची रक्कम त्यांच्या दि. १ मे २०१० रोजी होणाऱ्या पगारातून वसुल करुन ही शासनाने विहीत केलेल्या बजेटहेड खाली जमा करुन तसा अनुपालन अहवाल आयोगास व अन्न व नागरी पुरवठा विभागास पाठवावा. ही जबाबदारी अपीलीय अधिकारी यांचेवर टाकण्यात येत आहे. या अपील निर्णयाची प्रत सचिव, अन्न व नागरी पुरवठा विभाग यांनाही देण्यात यावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**
**संबंधीतानी उपरिनिर्दिष्ट कार्यवाही करावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः २९.०३.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले तक्रार.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. १३१/०२**

**श्री. जाधव भगवान नथ्थू,** **------ अपीलकर्ता**
**व्दाराः- डॉ. निकम शिवदास गोबा,**
**मु.पो.नाचणखेडा, ता.जामनेर,**
**जि.जळगांव.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी** **------- उत्तरवादी**
**शिक्षणाधिकारी, माध्यामिक विभाग,जिल्हापरिषद जळगांव**

**जन माहिती अधिकारी**
**शिक्षणाधिकारी, माध्यामिक विभाग,जिल्हापरिषद जळगांव**

**- वि वे च न -**

अपीलकार श्री. जाधव भगवान नथ्थू यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३.०९.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय,परिसर

जळगांव येथे दि. ०६.०३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते. अपिलार्थी उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.०४.०७.२००९ रोजी अर्ज करुन, खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

" माध्यमिक विद्यालय मुंदखेडे ता.चाळीसगांव, जि.जळगांव या शाळेच्या मुख्याध्यापकांनी सन २००१ ते २००७ या काळात शाळेकडून सादर झालेल्या शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव (नेमणूक मान्यता आदेश) यांच्या छायांकित प्रती मिळणेबाबत."

जन माहिती अधिकारी यांनी माहितीचे कागदपत्र न्यायाधिकरण कोर्टात दाखल केलेले असल्याने माहिती देण्यास असमर्थता दाखविली त्या विरोधात अपिलार्थीने दिनांक ३.०८.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले त्यावर घेण्यात आलेल्या सुनावणीस जन माहिती अधिकारी व अपिलार्थी उपस्थित होते. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांस माहिती त्वरीत विनामुल्य देण्याचे निर्देशित केले. अपिलार्थीस दरम्यानच्या काळात माहिती दिल्याचे दिसून आले तरीही अपीलार्थीने व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले. त्यावेळी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थी व प्रथम अपीलीय प्राधिकारी उपस्थित होते. जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते त्यावेळी झालेल्या चर्चेत असे आढळून आले की अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी २५.०८.२००९ रोजी विद्यालयाकडून माहितीच्या २६ प्रती विनामुल्य मिळाल्याचे लेखी निवेदन दिले असून त्याची कोणतीही तक्रार नाही माहिती मिळाल्यामुळे अपीलार्थीचे समाधान झालेले आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: २६.०३.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. १२७/०२**

**श्री. काळु रामदास पाटील,** **------ अपीलकर्ता**
**मु.दगडी सबगव्हाण, पो.राजवड, व्हाया धरणगांव,ता.ल**
**जि.जळगांव**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**अपर निबंधक,सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य पुणे,**
**सहकार आयुक्त व विषयक यांचे कार्यालय मध्यवर्ती इमारत,**
**पुणे - ०१**

**जन माहिती अधिकारी, तथा**
**उपनिबंधक,सहकारी संस्था(सा बँका-२),**
**सहकार आयुक्त व निबंधक यांचे कार्यालय, मध्यवर्ती इमारत,**
**पुणे - ०१**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : ८.०६.२००९
सुनावणीचा दिनांक : ३०.०९.२००९
आदेश पारित झालेला दिनांक : ३०.०९.२००९

अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय प्राधिकारी : उपस्थित

"अर्जदार यांनी दि. २३.०२.२००९ रोजीच्या अर्जाव्दारे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० नुसार १०१ च्या वसुली अर्जासोबत जोडलेल्या स्टँप कोर्टफीचे नियम तसेच ठरलेली १०१ च्या अर्जाच्या वसुली प्रमाणपत्रासाठी श्री.चंद्रकांत बढे पतसंस्था, वरणगांव जि.जळगांव या संस्थेत त्यांनी फक्त रु.५० भरणा दाखवून खरी रक्कम वसुलीनंतर चलनाव्दारे भरण्याबाबत व संस्थेस मान्यता दिलेल्या पत्रांची प्रत इत्यादि तीन ते चार मुद्यांवर माहिती मागितली होती."

त्यावर जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास हव्या असलेल्या प्रतींची फी भरुन माहिती घेऊन जावी असे कळविले त्याप्रमाणे अर्जदाराने दि.२८.०४.२००८ रोजी रु. १३७०/- कार्यालयांत भरले परंतु त्यांना माहिती देण्यात आली नाही म्हणून अर्जदाराने व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी गैरहजर होते परंतु जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय प्राधिकारी यांचे प्रतिनिधी हजर होते त्यावेळी राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद खंडपीठ यांनी असे आदेश पारित केले की अपीलार्थीच्या दि.९.०४.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर हे आदेश निर्गमित झाल्यापासून ३० दिवसांच्या आत झालेल्या व संभाव्य क्षमापित करुन सुनावणी घेऊन निर्णय पारित करावा. हा निर्णय पारित झाल्यानंतर सुनावणी न घेता जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास दि.१६.१०.२००९ च्या पत्राव्दारे चौकशी अहवालाची एकूण ६२८ पानाच्या छायांकित प्रती पाठविण्यात येत आहे असे नमूद केले आहे. अर्जदाराने त्यांच्या दि. ६.०३.२०१० च्या अर्जात जन माहिती अधिकारी यांनी निर्गमित केलेले पत्र जोडले आहे. परंतु अर्जदारास माहिती मिळालेली दिसून येत नाही. तक्रार सुनावणीस जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय प्राधिकारी अनुपस्थित होते व अर्जदार उपस्थित होते. अर्जदारास जन माहिती अधिकारी यांनी माहितचे पत्र पाठविले असले तरी अर्जदार माहिती मिळालेली नाही असे त्यांच्या दि. ६.०३.२०१० अर्जावरुन अनुमान काढण्यांत येते जन माहिती अधिकारी यांचे हे वागणे बेजबाबदारपणाचे आहे त्यांनी माहिती देण्याचे पत्र पाठविले परंतु अर्जदारास माहिती मिळालेली नाही यावरुन असे दिसते की वरिष्ठांचे आदेश पालन न करणे मनमानी वगणे माहिती देण्यास बराच विलंब लावणे. अशा बऱ्याच बाबी जन हिताच्या विरोधात घेतल्याबद्दल त्यांच्यावर रु.१०,०००/- ची शास्ती लादण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम त्यांच्या १ मे २०१० रोजी होणाऱ्या वेतनातून वसुल करावी व शासकीय बजेट हेडमध्ये जमा करावी व त्याच्या अनुपालन अहवाल दि.१५ मे २०१० पर्यंत आयोगास पाठवावा तसेच अपिलार्थीस हवी असलेली माहिती १५ दिवसांत देण्यात यावी व तसे केल्याचे आयोगास कळवावे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**
**प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी उपरिनिर्दिष्ट वसुलीची कार्यवाही करावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः २९.०३.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. १२५/०२**

**श्री. जयराम तुळशीराम कोळी,** **------- अपीलकर्ता**
**३३०-अ, विष्णापूर रोड वरती, ता.चोपडा,**
**जि.जळगांव - ४२५ १०७**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**सहायक वनसंरक्षक, वन विभाग, चोपडा,ता.चोपडा,**
**जि.जळगांव**

**जन माहिती अधिकारी, तथा**
**वनक्षेत्रपाल देवगिरी रेंज वनविभाग,**
**देवगिरी,ता.चोपडा, जि.जळगांव.**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : ४.११.२००९
सुनावणीचा दिनांक : ०६.०३.२०१०
अपीलार्थी : अनुपस्थित

जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय प्राधिकारी : उपस्थित

अपीलकार श्री. जयराम तुळशीराम कोळी, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ४.११.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय,परिसर जळगांव येथे दि. ०६.०३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२९.०६.२००९ रोजी अर्ज करुन, खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

" १) दिनांक ३.०५.२००९, २५.०५.२००९ व दि. ३.०६.२००९ रोजी झालेल्या लिलावात ज्या लाकडांचा लिलाव झाला त्याचा प्रकार. उदा. सागवान लाकुड इतर जातीचे लाकुड, बांबु, काठया व काठया खरेदी करणाऱ्या व्यापारींची यादी. २) लिलावाची सविस्तर माहिती" इत्यादि.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस मागितलेली माहिती दि. १८.०७.२००९ च्या पत्राव्दारे विनामुल्य पुरविण्यांत आली परंतु काही माहिती न मिळाल्याने अपीलार्थीने प्रथम अपील दखल केले परंतु सदर अपील प्रथम अपीलीय प्राधिकारी यांना मिळाले नाही असे त्यांनी नमूद केले आहे. त्यामुळे त्या न मिळालेल्या अपीलावर सुनावणी घेण्यांत आली नाही.

अपीलार्थीने माहिती न मिळाल्याने व्यथीत होऊन व्दितीय अपील दाखल केले. त्या सुनावणीच्या वेळी नेमके अपीलार्थी अनुपस्थित होते परंतु प्रथम अपीलीय प्राधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित. सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेल्या बाबी १) अपीलार्थीस प्रत्यक्ष माहिती मिळाली की नाही हे समजू शकले नाही. २) जन माहिती अधिकारी यांनी जरी माहिती दिली असे म्हटले आहे की त्याचा लेखी पुरावा या प्रकरणांत आढळून आलेली नाही. ३) अपीलार्थी स्वतः आयोगाच्या सुनावणीस गैरहजर राहिल्याने त्यांना प्रत्यक्षात माहिती मिळाली की नाही याचा बोध होत नाही. मात्र ज्याअर्थी अपीलार्थी यांनी अपील केले आहे व त्यात त्यांना माहिती मिळाली नाही असे स्पष्ट म्हटले आहे म्हणून अर्जदारास दि. १८.०७.२००९ रोजी पाठविलेली माहिती पुन्हा ucp ने पाठवावी. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांकः २९.०३.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ २००९/४६४००/अपील क्रं. ५५९१/०२

श्री.सुनिल मुलचंद विश्वकर्मा, --------अपीलार्थी
प्लॉट नं. ८९,खेरवाडी, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१

विरुध्द

प्रथम अपिलिय प्राधिकारी तथा --------- उत्तरवादी
सहायक मनपा आयुक्त, सहायक मनपा आयुक्त,
एच/पूर्व १३७, टीपीएस - ५, दुसरा रोड, प्रभात कॉलनी, सांताक्रुज (पूर्व),
मुंबई ५५

जन माहिती अधिकारी तथा
सहायक अभियंता (इ/का), सहायक मनपा आयुक्त,
एच/पूर्व १३७, टीपीएस - ५, दुसरा रोड, प्रभात कॉलनी, सांताक्रुज (पूर्व),

मुंबई ५५

## --- विवेचन ----

श्री.सुनिल मुलचंद विश्वकर्मा, यांनी आयोगाकडे दि. ८.०१.२०१० रोजी अधिनियमाच्या कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपील सादर केले आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. १९.१२.२००९ च्या निर्णयात अपिलार्थीस माहिती देण्यात यावी असे निर्देश जन माहिती अधिकारी यांना दिलेले आहेत. मात्र त्याचे पालन झालेले नाही म्हणून आयोगाकडे व्दितीय अपील सादर करण्यात आले आहे.

जन माहिती अधिकारी यांना असे आदेश देण्यात येत आहेत की, त्यांनी हे आदेश मिळाल्यानंतर १० दिवसात प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी निर्देशिल्याप्रमाणे माहिती द्यावी.

जन माहिती अधिकारी यांना असेही निर्देश देण्यात येत आहेत की, त्यांनी अर्ज मिळाल्यानंतर तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी निर्देश देऊनही अपिलार्थीस माहिती दिलेली नाही. यासतव त्यांचेवर अधिनियमाच्या कलम २० अन्वये शास्तीची कारवाई का करुन नये याचा लेखी खुलासा दि. १९.०४.२०१० रोजी ५.०० वाजता आयोगासमोर समक्ष उपस्थित राहून सादर करावा. अपिलार्थी सुध्दा त्यांना हवेतर यावेळी उपस्थित राहू शकतात.

## -- आदेश --

अपील निकाली काढण्यात येत आहे.
संबंधितांनी उपर्निर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक :- ३१.०३.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ २००९/४६४०५/अपील क्रं. ५५९२/०२

श्री.विजय दिनकर पवार , --------अपीलार्थी
सार्वजकि बांधकाम कार्यालयाजवळ, शिवडी फास्ट ट्रॅक समोर,
अकेरीयाबंदर रोड, मुंबई - ४०० ०१५

विरुध्द

प्रथम अपिलिय प्राधिकारी --------- उत्तरवादी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
गृहनिर्माण भवन, ५ वा मजला, वांद्रे (पूर्व),
मुंबई ५१

जन माहिती अधिकारी तथा
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
गृहनिर्माण भवन, ५ वा मजला, वांद्रे (पूर्व),
मुंबई ५१

--- विवेचन ----

श्री. श्री.विजय दिनकर पवार , यांनी आयोगाकडे दि. ४.०१.२०१० रोजी अधिनियमाच्या कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपील सादर केले आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. ०३.११.२००९ च्या निर्णयात अपिलार्थीस माहिती देण्यात यावी असे निर्देश जन माहिती अधिकारी यांना दिलेले आहेत. मात्र त्याचे पालन झालेले नाही म्हणून आयोगाकडे व्दितीय अपील सादर करण्यात आले आहे.

जन माहिती अधिकारी यांना असे आदेश देण्यात येत आहेत की, त्यांनी हे आदेश मिळाल्यानंतर १० दिवसात प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी निर्देशिल्याप्रमाणे माहिती द्यावी.

जन माहिती अधिकारी यांना असेही निर्देश देण्यात येत आहेत की, त्यांनी अर्ज मिळाल्यानंतर तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी निर्देश देऊनही अपिलार्थीस माहिती दिलेली नाही. यासतव त्यांचेवर अधिनियमाच्या कलम २० अन्वये शास्तीची कारवाई का करुन नये याचा लेखी खुलासा दि. १९.०४.२०१० रोजी ५.०० वाजता आयोगासमोर समक्ष उपस्थित राहून सादर करावा. अपिलार्थी सुध्दा त्यांना हवेतर यावेळी उपस्थित राहू शकतात.

**-- आदेश --**

अपील निकाली काढण्यात येत आहे.
संबंधितांनी उपर्निर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक :- ३१.०३.२०१०

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. १५०/०२**

**श्री. श्रीकांत मधुकर भोईटे** ------- **अपीलकर्ता**
**शिवाजी नगर, यावल, मु.पो.ता.यावल,**
**जि.जळगांव.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** ------- **उत्तरवादी**
**मुध्याधिकारी, नगरपरिषद यावल, ता.यावल,**
**जि.जळगांव**

**जन माहिती अधिकारी तथा**
**कनिष्ट अभियंता, नगरपरिषद यावल, ता.यावल,**
**जि.जळगांव.**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : ०८.०८.२००९
सुनावणीचा दिनांक : ०६.०३.२०१०
अपीलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपीलीय प्राधिकारी : अनुपस्थित

अपीलकार श्री. श्रीकांत मधुकर भोईटे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८.०८.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर

अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय,परिसर जळगांव येथे दि. ०६.०३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी व अपिलार्थी अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.०९.०२.२००९ रोजी अर्ज करुन, खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

" १) यावल शहरात खिर्नीपूरा मशीद समोर संत राहिदास नगरमध्ये माजी नगरसेवक इकबालखाँ बशीरखाँ यांनी केलेले अतिक्रमण बांधकामाबाबत नगर पालिकेने त्यांचेवर काय कार्यवाही केली. जागेची कर आकारणी झाली आहे का. २) जागेवरील अतिक्रमण बांधकामाची नगरपालिका दप्तरी नोंद आहे काय? इत्यादि."

जन माहिती अधिकारी यांच्या अर्जावर कोणतीही कार्यवाही न केल्यामुळे अपिलार्थीने प्रथम अपील दाखल केले. त्यावरील सुनावणीस अपिलार्थी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित होते. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दिनांक ८.०७.२००९ रोजी पारित केलेल्या आदेशात जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस आवश्यक ती कागदपत्रे आठ दिवसांत पुरवावीत असे निर्देश दिले.

अपीलार्थीस प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी पारित केलेल्या आदेशानंतरही माहिती वेळेत मिळाली नाही म्हणून त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपील सुनावणीच्या वेळी अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय प्राधिकारी असे तिघेही अनुपस्थित होते.

एकंदरीत या प्रकरणात १) अपिलार्थीने मागितलेली माहिती कार्यालयाकडे उपलब्ध असूनही ती दिलेली नाही. २) प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना आदेशाव्दारे अपीलार्थी ८ दिवसांत माहिती द्या असे आदेश पारित करुनही जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या आदेशाचे पालन अद्याप पर्यंत केलेले नाही. ३) आयोगाच्या महत्वाच्या सुनावणीस ते गैरहजर राहिले.

संपूर्ण या प्रकरणांत जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस माहिती देण्यात कोणतीही मदत केली नाही. उलट बेफीकीरी वृत्तीचा नमूना सादर केलो कार्यालयातील प्रमुखांनी त्यांच्यावर विचाराने जबाबदारी टाकलेली असतांना त्या जबाबदारीचा गैरवापर होणे शासकीय अधिकाऱ्यास लांच्छनास्पद आहे. जन माहिती अधिकारी यांच्या या बेजबाबदार वागण्यावर अंकुश म्हणून व माहिती देण्यास उशीर केल्याबद्दल त्यांच्यावर रुपये ५,०००/- ची शास्ती लादण्यांत येत आहे. सदर शास्तीची रक्कम त्यांच्या १ मे २०१० रोजी होणाऱ्या पगरातून वसुल करण्यांत यावी व सदर रक्कम शासनाने विहित केलेल्या लेखाशिर्षाखाली जमा करावी व रक्कम वसुल केल्याचा अहवाल आयोगास १५ मे २०१० पर्यंत अवगत करवा.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी सदर शास्ती वसुलीची कार्यवाही करावी व अपिलार्थीस १५ दिवसांच्या आत विनामुल्य माहिती मिळेल याची दक्षता घ्यावी. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः २९.०३.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. १५१/०२**

**श्री. श्रीकांत मधुकर भोईटे** **------- अपीलकर्ता**
**शिवाजी नगर, यावल, मु.पो.ता.यावल,**
**जि.जळगांव.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**मुध्याधिकारी, नगरपरिषद यावल, ता.यावल,**
**जि.जळगांव**

**जन माहिती अधिकारी तथा**
**कनिष्ट अभियंता, नगरपरिषद यावल, ता.यावल,**
**जि.जळगांव.**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : ०८.०८.२००९
सुनावणीचा दिनांक : ०६.०३.२०१०
अपीलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपीलीय प्राधिकारी : अनुपस्थित

अपीलकार श्री. श्रीकांत मधुकर भोईटे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८.०८.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय,परिसर जळगांव येथे दि. ०६.०३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी व अपिलार्थी अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१८.०३.२००९ रोजी अर्ज करुन, खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

" वसुली लिपिक,टपरी गाळा भाडे वसुली लिपिक, अतिक्रमण धारक नगरसेवक यांना तसेच अतिक्रमणाबाबत नगरसेवक व त्यांचे नातेवाईकांना कनिष्ट अभियंता यांनी २४ तासाचे आंत माहिती सादर करणेबाबत दिलेल्या पत्राच्या छायांकित प्रती इत्यादि माहिती मागितली होती."

जन माहिती अधिकारी यांच्या त्यांच्या अर्जावर कोणतीही कार्यवाही न केल्यामुळे अपिलार्थीने प्रथम अपील दाखल केले. त्यावरील सुनावणी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दिनांक ८.०७.२००९ रोजी पारित केलेल्या आदेशात नमूद केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस आवश्यक ती कागदपत्रे आठ दिवसांत पुरविण्यांत येतील असे प्रत्यक्ष कबूल केले.

अपीलार्थीस प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी पारित केलेल्या आदेशानंतरही जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपील सुनावणीच्या वेळी अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय प्राधिकारी असे तिघेही अनुपस्थित होते.

एकंदरीत या प्रकरणी १) अपिलार्थीने मागितलेली माहिती कार्यालयाकडे उपलब्ध असूनही ती दिलेली नाही. २) प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना आदेश देऊनही जन माहिती अधिकारी यांनी माहिती ८ दिवसांत देण्याचे कबूल करुनही अपीलार्थीस माहिती दिली नाही. ३) आयोगाकडील महत्वाच्या सुनावणीस महत्व न देता ते गैरहजर राहिले.

या प्रकरणांत जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस माहिती देण्याचे मान्य करुनही माहिती दिली नाही व त्यांना माहिती देण्याचा प्रयत्नही केलेला नाही. त्यांची नेमणूक जनहितासाठी करण्यांत आलेली असतांना तयांनी कर्तव्याचे पालन केलेले नाही. यापूर्वीच्या प्रकरणांत (अपील क्र.१५०) त्यांच्यावर रुपये ५,०००/- शास्ती लादण्यांत आलेली आहे. अपीलार्थीस ७ दिवसात माहिती देण्यात यावी. या परिस्थितीत मी खालीलप्रमाण आदेश देत आहे.

## आदेश

अपील निकाली काढण्यांत येत आहे.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांकः २९.०३.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ २००९/अपील क्रं. १५६/०२

श्री. सुरळकर नागसेन राजाराम, ------- अपीलकर्ता
मु.पो.नाडगांव (दादानगर), ता.बोदवड,
जि.जळगांव.

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी
सहा अभियंता, महाराष्ट्र राज्य वितरण कं.लि.शहर तथा
ग्रामीण विभाग, सब डिव्हीजन वरणगांव, ता.भुसावल, जि.जळगांव

जन माहिती अधिकारी तथा
महाराष्ट्र राज्य वितरण कं.लि.शहर तथा
ग्रामीण विभाग, सब डिव्हीजन वरणगांव, ता.भुसावल, जि.जळगांव

- वि वे च न -

अपीलाचा दिनांक : २०.११.२००९
सुनावणीचा दिनांक : ०६.०३.२०१०
अपीलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

प्रथम अपीलीय प्राधिकारी : उपस्थित

अपीलकार श्री. सुरळकर नागसेन राजाराम, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०.११.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय,परिसर जळगांव येथे दि. ०६.०३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते.अपिलार्थी अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१७.०६.२००९ रोजी अर्ज करुन, खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

" महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ शाखा मोताळा यांनी ठेवलेल्या डेडस्टॉक रजिस्टरची वर्षनिहाय सत्यप्रत. २) सामानाच्या लिलाव केलेल्या वस्तुंची विक्री केलेल्या किमतीचा तपशील यांची प्रत. ३) विक्री पश्चात मंडळाने जमा प्राप्त निधीच्या पावत्या व कॅशबुकाच्या प्रती. ४) लिलाव व जाहीर बोलीचे निकष. ५) शेती पंपासाठी शेतकऱ्यांनी मागणी अर्जाच्या प्रती. ६) ग्रामीण व शहर भागाकरिता वीज उपयोगी पुरविलेल्या साहित्याच्या प्रती इत्यादि"

जन माहिती अधिकारी यांच्या त्यांच्या दिनांक २४.०७.२००९ च्या पत्राव्दारे कार्यालयांत उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस दिली परंतु काही माहिती विस्तृत स्परुपाची व रेकॉर्ड जीर्ण असल्याने ते कागदपत्र कामकाजाच्या दिवशी अपिलार्थीस येऊन पहाता येतील असे कळविले. अपिलार्थीने माहिती मुदतीत न दिल्याने व सत्यता पडताळता न आल्याने प्रथम अपील दाखल केले यावर प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही परंतु दि. २५.०९.२००९ च्या पत्राव्दारे अपिलार्थीस कार्यालयात येऊन माहिती प्रत्यक्ष येऊन पहावी असे कळविले.

अपीलार्थीस सुचविल्याप्रमाणे त्यांनी माहितीची प्रथम पाहणी करावी व त्यांना आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती त्यांना देण्यात याव्यात.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः २९.०३.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. १५४/०२**

**श्री. सुरळकर नागसेन राजाराम, ------- अपीलकर्ता**
**मु.पो.नाडगांव (दादानगर), ता.बोदवड,**
**जि.जळगांव.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी**
**विस्तार अधिकारी, ग्रामपंचायत, पंचायत समिती कार्यालय,**
**जामनेर, ता.जामनेर, जि.जळगांव**

**जन माहिती अधिकारी तथा**
**गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय,**
**जामनेर, ता.जामनेर, जि.जळगांव**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : २५.११.२००९
सुनावणीचा दिनांक : ०६.०३.२०१०

अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय प्राधिकारी : उपस्थित

अपीलकार श्री. सुरळकर नागसेन राजाराम, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५.११.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय,परिसर जळगांव येथे दि. ०६.०३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी व अपिलार्थी उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.०७.०९.२००९ रोजी अर्ज करुन, खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

" १) पंचायत समिती कार्यालयांती ग्रामपंचायत विभागातील आवक रजिस्टर मधून आलेल्या पत्रावर विस्तार अधिकारी यांनी केलेली कार्यवाही. २) राखीव ग्रामसेवकांच्या पदाची माहिती. ३) ग्रामसेवकांची गावासह माहिती. ४) पंचायत समिती कार्यालयातील कर्मचाऱ्याचे घरभाडे. ५) ग्रामपंचायत लेखा परिक्षणाची माहिती व दूरध्वनीबाबतची माहिती मागितली होती इत्यादि"

जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस लेखी व दूरध्वनिव्दारे माहिती विस्तृत प्रमाणात असल्याने ती प्रत्यक्ष येऊन घ्यावी असे कळविण्यांत आले. परंतु अपीलार्थी माहिती घेण्यास आले नाहीत असे त्यांचे म्हणणे आहे. अपीलार्थीने माहिती न मिळाल्याने प्रथम अपील दाखल केले परंतु त्यावर कोणतेही आदेश पारित करण्यांत आले नाहीत.

अपीलार्थीने व्यथित होऊन व्दितीय अपील दाखल केले त्या अपीलाच्या सुनावणीस अपीलार्थी, प्रथम अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित होतेत. त्यावेळी निदर्शनास आलेल्या बाबी :- १) जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस लेखी व दूरध्वनीमार्फत कळऊनही ते माहिती घेण्यास आले नाहीत. २) अर्जदार यांनी मागणी केलेली संपुर्ण माहिती तयार आहे ती समक्ष कार्यालयात येऊन पाहून घ्यावी. उपलब्ध माहिती त्वरीत घ्यावी व उर्वरीत माहिती पुढील १० दिवसात कार्यालयातून उपलब्ध करुन देण्यात येईल असे आयोगाच्या निदर्शनास आणले आहे.

अपीलार्थीने मागणी केलेली माहिती विस्तृत प्रमाणात व विविध विषयाची असल्याचे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ४.०३.२०१० च्या पत्राव्दारे आयोगाच्या निदर्शनास आणले आहे. मागितलेल्या माहितीच्या छायांकित प्रती काढण्यासाठी बराच खर्च करावा लागेल यासाठी शासनामार्फत पुरेसा निधीही उपलब्ध होत नाही त्यामुळे इच्छा असूनही वेळेत माहिती पुरविता येत नाही.

अपीलार्थीस कार्यालयांत माहिती घेऊन जाण्यास व अवलोकनासाठी बोलाविले असता ते कार्यालयांत का जाऊ शकले नाही याचा बोध होत नाही. त्यांना खरोखरच सदर माहिती जनहिताच्या दृष्टीने हवी असेल तर त्यांनी प्रत्यक्ष जाऊन अत्यंत गरज असलेली माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ४.०३.२०१० च्या पत्रात नमूद केल्याप्रमाणे तातडीची माहिती वगळून इतर माहिती अपिलार्थीस २० दिवसांत मोफत उपलब्ध करुन द्यावी व तसे केल्याचे आयोगास अवगत करावे. असे केल्याने अपीलार्थीचे हित अबाधीत राहील. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः २९.०३.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. १२/०२**

**श्री. विजय कृष्णाजी चव्हाण,** **------- अपीलकर्ता**
**पंचायत समिती, पाचोरा, ता.पाचोरा,**
**जि.जळगांव.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**अप्पर आयुक्त तथा अध्यक्ष, विभागीय जाती प्रमाणपत्र**
**पडताळणी समिती नाशिक**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र**
**पडताळणी समिती नाशिक विभाग क्र. २, मुख्यालय धुळे, ता.जि.धुळे**

## - वि वे च न -

अपीलाचा दिनांक : २८.०५.२००९
सुनावणीचा दिनांक : ०६.०३.२०१०

अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी :अनुपस्थित
प्रथम अपीलीय प्राधिकारी : अनुपस्थित

अपीलकार श्री. विजय कृष्णाजी चव्हाण, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८.०५.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय,परिसर जळगांव येथे दि. ०५.०३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते तर अपिलार्थी उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.०७.०२.२००९ रोजी अर्ज करुन, खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

" १) प्रकरण अनुसूचित जाती असून ते दोन वर्षापासून तपासणी अधिकारी यांच्याकडे का प्रलंबित आहे त्याचा तपशील. २) तयार झालेल्या वेधता प्रमाणपत्र नोंदणी रजिस्टरचे नाव अ.नं. ४९१ ते ५०० पानावरील सत्यप्रती ३) वैधता प्रमाणपत्र क्र. १९५०० चे सत्यप्रत इत्यादि"

जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ३.०६.२००९ च्या पत्राव्दारे अपिलार्थी यांनी सादर केलेल्या जावी प्रमाणपत्रासोबत जोडलेल्या कागदपत्रात त्रृटी असून त्याची पूर्तता अपिलार्थीने न केल्यामुळे जात तपासणी प्रकरण प्रलंबित आहे त्याकरिता अपिलार्थीने त्रृटीची पूर्तता करावी असे सूचित करण्यांत आले.

अपिलार्थीने माहिती न मिळाल्याने प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. ६.०४.२००९ नुसार अपीलाची मूळ संचिता अध्यक्ष विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र. १ व २ मुख्यालय धुळे यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठवून दिली.

अपिलार्थीने कोणतीच माहिती मिळत नसल्याने आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित हाते परंतु प्रथम अपिलीय प्राधिकारी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते. त्यावेळी निदर्शनास आलेल्या बाबीः- १) अपिलार्थीने जात प्रमाणपत्र पडताळणी होऊन वैधता प्रमाणपत्र मिळण्याबाबत जाने २००७ मध्ये अर्ज केलेला असून त्यांनी आवश्यक ती जात प्रमाणपत्रे समितीकडे सादर केलेली दिसून येतात. २) दोनवर्षे उलटून गेली तरी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस याबाबत काहीही कळविले नाही ३) अपिलार्थी अपिलांत गेल्यावर त्यांना दि. २८.०४.२००९ नुसार वडिल/काका/अत्या/आजोबा यांच्या जातीचे पुरावे सादर करण्यास सांगितले ४) प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दि.६.०४.२००९ रोजी अपीलाची मूळ संचिता पुढील सुनावणीसाठी अध्यक्ष विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती ट्ठ मुख्यालय धुळे येथे पाठविली.

मुख्य सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित राहिले एकंदरीत या प्रकरणात असे दिसून येते की अपिलार्थीस ३ वर्षे उलटून गेली तरी जातीचे वैधता प्रमाणपत्र मिळू शकत नाही हे

दुर्दैव तसेच दोन्ही अधिकाऱ्यांची या कामी उदानसिनता दिसून येते. त्रृटी होत्या तर त्यांनी लगेचच अपिलार्थीच्या निदर्शनास आणावयास हव्या होत्या. जन माहिती अधिकारी यांनी त्रृटीची कारणे दिली आहेत त्यांचे वडिल/काका यांच्या मूळ सेवापुस्तकांच्या प्रथम पानाच्या छायांकित प्रती जोडलेल्या आहेत त्यावर अधिकाऱ्यांची सही असणारच अशा प्रकारे काही तरी कारणे सांगून अपिलार्थीस त्याच्या हक्कापासून वंचित ठेवणे जन माहिती अधिकारी यांना शोभा देणारे नाही. मागितलेली माहिती अपीलार्थीस २० दिवसांत देण्यात यावी.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**
**संबंधीतांनी उपरिनिर्दिष्ट कार्यवाही करावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः २९.०३.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. १५७/०२**

**श्री. सुरळकर नागसेन राजाराम,** **------- अपीलकर्ता**
**मु.पो.नाडगांव (दादानगर), ता.बोदवड,**
**जि.जळगांव.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**कार्यकारी अभियंता, (शहर व ग्रामीण) महाराष्ट्र राज्य विज कंपनी लि.,**
**जामनेर, जि.जळगांव**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विज कंपनी,**
**शहर तथा ग्रामीण विभाग, सब डिव्हीजन, जामनेर,जि.जळगांव**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : २०.११.२००९
सुनावणीचा दिनांक : ०६.०३.२०१०

अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय प्राधिकारी : उपस्थित

अपीलकार श्री. सुरळकर नागसेन राजाराम, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०.११.२ ००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय,परिसर जळगांव येथे दि. ०६.०३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी व अपिलार्थी उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१८.०६.२००९ रोजी अर्ज करुन, खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

" १) महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ शाखा मोताळाने ठेवलेल्या डेडस्टॉक रजिस्टरची वर्षनिहाय सत्यप्रत २) सामानाच्या लिलाव केलेल्या वस्तुबाबतची विक्री केलेल्या किंमतीचा तपशील. ३) जमा निधी ज्या खात्यात जमा झाला त्याच्या बाबतच्या व कॅशबुकाच्या सत्यप्रती. ४) शेतकऱ्यांनी मागितलेल्या शेती पंपाच्या प्रती ५) ग्रामणी व शहरी विभागाकरिता विज उपयोगी साहित्याच्या सत्यप्रती इत्यादि माहिती "

जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती लेखी अथवा प्रत्यक्ष बोलऊन न दिल्यामुळे प्रथम अपील दाखल केले.

प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी अपीलार्थीस, जन माहिती अधिकारी यांच्याकडून उशीरा प्राप्त झालेल्या माहिती दिनांक २४.९.२००९ च्या पत्राव्दारे दिली असे नमूद केले आहे.

अर्जदाराने दारिद्रय रेषेखालील आहे असे नमूद केले पण त्यासंबंधीचा कोणताही पुरावा जोडला नाही तसेच शुल्क भरलेले नाही म्हणून माहिती देता आली नाही असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. तसेच काही माहिती उशीरा का होईना दिली आहे. कागदपत्रे जुनी व जीर्ण असल्याने कागदपत्रे उर्जदारास असलोकनार्थ उपलब्ध करुन दिल्या जातील असे सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी सांगितले.

तेव्हा अर्जदाराने कागदपत्रांची पाहणी करावी. कागदपत्रे जीर्ण नव्हती असे जर दिसून आले तर आयोगास तसा अहवाल करावा व जीर्ण असतील तर कागदत्राच्या टिपण्या त्यांनी घ्याव्यात. जातांना दारिद्रय रेषेखालीलस असल्याचा पुरावा घेऊन जावा. प्रत्यक्ष इन्स्पेक्शनच्या शुल्कासंबंधी जे नियम आहेत त्याचे पालन करावे.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनाही कामात कामचुकारपणा केलेला असून यापुढे त्यांनी जबाबदारीने वागावे व शास्ती वसुलीची कार्यवाही योग्यरित्या पार पाडावी तसेच अपिलार्थीस माहिती २० दिवसांत कशी मिळेल ते पहावे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यांत येत आहे.

संबंधीतांनी उपरिनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांकः २९.०३.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ २००९/अपील क्रं. १५९/०२

श्री. सुरळकर नागसेन राजाराम, ------- अपीलकर्ता
मु.पो.नाडगांव (दादानगर), ता.बोदवड,
जि.जळगांव.

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी
तसहील कार्यालय, मुक्ताईनगर, ता.मुक्ताईनगर,
जि.जळगांव,

जन माहिती अधिकारी तथा
तहसिलदार, तहसिल कार्यालय, मुक्ताईनगर, ता.मुक्ताईनगर,
जि.जळगांव

## - वि वे च न -

अपीलाचा दिनांक : १७.०८.२००९
सुनावणीचा दिनांक : ०६.०३.२०१०
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपीलीय प्राधिकारी : अनुपस्थित

अपीलकार श्री. सुरळकर नागसेन राजाराम, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७.०८.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय,परिसर जळगांव येथे दि. ०६.०३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते तर अपिलार्थी उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२३.०५.२००९ रोजी अर्ज करुन, खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

" १) मुक्ताईनगर तालुक्यातील एकूण असलेल्या सर्व स्वस्त धान्य दुकानाची सन जाने २००६ ते एप्रिल २००९ पर्यंतच्या कालावधीतील स्टॉक रजिस्टर, शेड रजिस्टर, कॅशमेमो रजिस्टर चलन इत्यादि. २) धान्य दुकानदार त्यांचे परमीट ३) धान्यसाठी व त्यांचे वाटप ४) बी.पी.एल.,ए.पी.एल, शिधाधारकांची नावे व यादी इत्यादि माहिती"

जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस लेखी वा तोंडी काही कळविले नाही त्यामुळे अपिलार्थीने प्रथम अपील दाखल केले त्यावरही प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी कोणतेही आदेश पारित केले नाहीत.

काहीही माहिती न मिळाल्याने अपीलार्थीने व्दितीय अपील दाखल केले. व्दितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी फक्त अपिलार्थी हजर होते तर प्रथम अपिलीय प्राधिकारी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते.

सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेल्या बाबी :- १) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे पूर्णपणे टाळले २) प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनीही त्यांच्या अधिकारांत कोणतेही आदेश पारित केले नाहीत. ३) सुनावणीच्या वेळी दोघेही अधिकारी जाणुनबुजून अनुपस्थित राहिले.

सदर प्रकरणात जन माहिती अधिकारी अपीलार्थीस माहिती देण्याच्या बाबतीत बेजबाबदार व अपयशी ठरल्याचे दिसून येते. जनहित लक्षात घेऊन त्यांच्याकडून चांगली कामगिरीची अपेक्षा असतांना त्यांनी आयोगाचा अपेक्षाभंग केला माहिती न देणे हे जन माहिती अधिकारी यांच्या पदाला लांच्छनास्पद आहे तरी माहिती न देणे अथवा नाकारणे देण्याचे टाळाटाळ करणे याकारणास्तव त्यांच्यावर रु. ५०००/- ची शास्ती लादण्यांत येत आहे. सदर शास्ती

त्यांच्या १ मे २०१० च्या पगारातून वसुल करावी. सदर रक्कम शासनाने विहित केलेल्या शासकीय लेखा शिर्षाखाली जमा करावी व त्याचा अनुपालन अहवाल आयोगास दिनांक १५ मे, २०१० पर्यंत पाठवावा.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना हवी असलेली माहिती १५ दिवसात विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

प्रथम अपिलीय प्राधिकारी या प्रकरणी पूर्णतयः दुर्लक्ष केलेले आढळून आलेले आहे. तरी यापुढे त्यांनी जबाबदारीने काम करावे अशी आयोगाची अपेक्षा आहे. पुनरावृत्ती आढळल्यास विभागीय चौकशी शिफारस करण्यात येईल.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः २९.०३.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. १२७/०२**

**श्री. काळु रामदास पाटील,** **------- अपीलकर्ता**
**मु.दगडी सबगव्हाण, पो.राजवड व्हाया धरणगांव,**
**ता.पारोळा,जि.जळगांव.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग, जिल्हापरिषद, जळगांव**
**जि.जळगांव**

**जन माहिती अधिकारी**
**लघुसिंचन विभाग, जिल्हापरिषद पारोळा,**
**मु.पो.ता.पारोळा,जि.जळगांव.**

अपीलाचा दिनांक : २६.१०.२००९
सुनावणीचा दिनांक : ०६.०३.२०१०
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपीलीय प्राधिकारी : अनुपस्थित

अपीलकार श्री. काळु रामदास पाटील, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६.१०.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय,परिसर जळगांव येथे दि. ०६.०३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते. अपिलार्थी उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.०५.०८.२००९ रोजी अर्ज करुन, खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

" १) पारोळा तालुक्यात किती जवाहर विहीरी मंजूर आहेत. २) जुन्या विहीरी किती व नवीन विहीरी किती. तसेच किती पाझर तलावांची दुरुस्ती झाली किती साठवण बंधारे झाले त्याची एम.बी.झेरॉक्स प्रत मिळावी व बिलाची प्रत."

जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस लेखी व तोंडी कसलीही माहिती विहित मुदतीत दिलेली नाही त्या विरोधात अपीलार्थीने प्रथम अपील दाखल केले परंतु प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनाही या माहितीच्या संदर्भात कोणतेही आदेश मुदतीत पारित केले नाही.

अपीलार्थीने दोन्ही अधिकाऱ्यांनी माहिती न दिल्यामुळे आयोगाकडे दिनांक २६.१०.२०१० रोजी व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपीलाच्या सुनावणीस फक्त अपीलार्थी उपस्थित होते परंतु प्रथम अपीलीय प्राधिकारी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते.

व्दितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेल्या बाबी:- १) अपीलार्थीस जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी अधिनियमानुसार विहित कालावधीत व त्यानंतरही कोणतीही माहिती दिली नाही किंबहुना त्यांच्या अर्जाची/अपीलाची कोणतीही दखल घेतली नाही. २) दोघेही अधिकारी आयोगाच्या सुनावणीस अनुपस्थित राहिले. ३) अपीलार्थीस त्यामुळे मानसिक,शारीरीक त्रास झालेला असून प्रवास खर्चही फुकट गेला आहे ही अपीलार्थीची व्यथा आहे अशा परिस्थितीत अपिलार्थीस माहिती देण्याचे टाळाटाळ करणे ती देण्यास विलंब लावणे आयोगाचे आदेश न मानणे त्याची पायमल्ली करणे तसेच अधिकाराचा मनमानी गैरउपयोग करणे इत्यादि कारणासाठी जन माहिती अधिकारी यांच्यावर रुपये ५०००/- ची शास्ती लादण्यांत येत असून ती त्यांच्या मे २०१० या महिन्यात होणाऱ्या त्यांच्या वेतनातून वसुल करावी व वसुलीची रक्कम शासकीय लेखाशिर्षखाली जमा करावी व त्याचा अनुपालन अहवाल आयोगास १५ मे २०१० पर्यंत अवगत करावा. प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनाही माहिती मिळवून देण्यास कसूर केलेला आहे त्यांनीही त्यांच्यावर सोपविलेली जबाबदारी योग्यरित्या पार पाडलेली नाही या कारणास्तव मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी योग्य ती दाखल घेऊन त्यांचेवर कार्यवाही करावी. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**
**मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद जळगांव यांनी शास्ती वसुलीची व उपरिनिर्दिष्ट कार्यवाह करावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: २९.०३.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. १३/०२**

**श्री. दयालदास प्रभुदास फुलवाणी,** **------- अपीलकर्ता**
**रु.नं. ३२३ च्या मागे सिंधी कॉलनी, पो.भुसावड,**
**जि.जळगांव.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**

**शिक्षण उपसंचाल, नाशिक विभाग, नाशिक**

**जन माहिती अधिकारी तथा**
**प्रशासन अधिकारी, नगरपालिका शिक्षण मंडळ कार्यालय,**
**भुसावळ, जि.जळगांव**

## - वि वे च न -

अपीलाचा दिनांक : २३.०५.२००९
सुनावणीचा दिनांक : ०५.०३.२०१०
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपीलीय प्राधिकारी : अनुपस्थित

अपीलकार श्री. दयालदास प्रभुदास फुलवाणी, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३.०५.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय,परिसर जळगांव येथे दि. ०५.०३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते तर अपिलार्थी उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१३.०१.२००९ रोजी अर्ज करुन, खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

" नगरपालिका शिक्षण मंडळ भुसावळ, जि.जळगांव च्या कार्यकक्षेत सन १९७९-८० व १९८०-८१ ते ३१.०५.२००८ पर्यंत कार्यरत असलेल्या शिक्षकांची माहिती १) सर्व माध्यमाच्या प्रशिक्षित शिक्षकांची माहिती "

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २४.०२.२००९ च्या पत्राव्दारे अपिलार्थीस मागितलेली माहिती ही १९७८ पासून असल्यामुळे संकलीत करण्यांत अडचणी येत असून माहिती देण्यास १५ दिवसाचा अधिक कालावधी द्यावा अशी विनंती केली परंतु नंतरही माहिती न मिळाल्याने अपीलार्थीने प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २.०६.२००९ च्या पत्राव्दारे जन माहिती अधिकारी यांना सक्त ताकीद देऊन माहिती वेळेत उपलब्ध करुन देण्यास सांगितले. परंतु मिळालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपीलार्थीने व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले.

व्दितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी फक्त अपिलार्थी हजर होते तर प्रथम अपिलीय प्राधिकारी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते. सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेल्या बाबी :- १) जन माहिती अधिकारी यांनी मुदतवाढ देऊनही अपीलार्थीस माहिती दिली नाही. २) जी माहिती दिली ती अपुरी दिशाभूल करणारी होती. ३)

अपीलार्थी हे जेष्ठ नागरीक आहेत त्यामुळे त्यांना आर्थिक व मानसिक त्रास झाला. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी त्यांना माहिती मुदतीत देण्यास सांगितले होते व न दिल्यास कारवाई करण्याचे संकेत दिले होते.

अपीलार्थीने मागितलेली माहिती ती पण अपुरी व चुकीची दिली तीही देण्यास ४ महिने लागले तरी पुर्ण माहिती देण्यात आली नाही. जन माहिती अधिकारी हे नेमके आयोगाच्या महत्वाच्या सुनावणीस गैरहजर राहिले त्यावरुन त्यांचे जबाबदारीने काम करण्याची इच्छा दिसत नाही तरी या सर्व प्रकरणांत त्यांना दोषी ठरविण्यांत येत असून त्यांच्यावर रुपये ५०००/- ची शास्ती लादण्यांत येत आहे सदर शास्ती त्यांच्या १ मे २०१० च्या वेतनातून वसुल करावी व शासनाने विहित केलेल्या शासकीय लेखा शिर्षाखाली जमा करावी व त्याचा अनुपालन अहवाल आयोगास दिनांक १५ मे, २०१० पर्यंत पाठवावा.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना हवी असलेली माहिती २० दिवसात विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी शास्ती वसुलीची कार्यवाही त्वरीत करावी तसेच अपीलार्थी हे जेष्ठ नागरिक आहेत हे लक्षांत घेऊन त्यांना लवकरात लवकर माहिती कशी मिळेल याची खबरदारी व जबाबदारी घ्यावी. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: २९.०३.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. २०/०२**

**श्री. विजयकुमार नामदेव काकडे,** **------- अपीलकर्ता**
**रु.नं. ३२३ च्या मागे सिंधी कॉलनी, पो.भुसावड,**
**जि.जळगांव.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी** **------- उत्तरवादी**
**गोदावरी फाऊंडेशन गोदावरी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग,**
**जळगांव, जि.जळगांव**

**जन माहिती अधिकारी**
**गोदावरी फाऊंडेशन गोदावरी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग,**
**जळगांव, जि.जळगांव**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : १५.०६.२००९
सुनावणीचा दिनांक : ०५.०३.२०१०
अपीलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय प्राधिकारी : अनुपस्थित

अपीलकार श्री. विजयकुमार नामदेव काकडे, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५.०६.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय,परिसर जळगांव येथे दि. ०५.०३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते तर अपिलार्थी उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२३.०३.२००९ रोजी अर्ज करुन, खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

" एम.एच.टी.-सीईटीच्या नेमणूकीच्या पत्रानुसार संस्थेने सर्व मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून किती फी घेतली ज्या विद्यार्थ्यांची नांवे व पत्ता व जाब इत्यादि २) शासनाकडून मिळणारी शिष्यवृत्तीचे वाटप मागावर्गीयांना कसे केले त्याचा तपशील ३) शिष्यवृत्ती देणे बाकी असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या इत्यादि दोन वर्ष अखेर शिष्यवृत्ती वाटप राहिले असल्यास त्याचा तपशील वगैरे १८ मुद्यांवर माहिती मागितली होती. "

जन माहिती अधिकारी तथा प्रिन्सिपल, गोदावरी इंजिनिअरींग कॉलेज जळगांव यांनी त्यांच्या दिनांक २२.०५.२००९ च्या पत्राव्दारे अपिलार्थीस या कॉलेजला शासनाकडून कोणतेही अनुदान किंवा वित्त पुरवठा होत नाही त्यामुळे संस्थेस माहिती अधिकार २००५ हा लागू होत नाही त्यामुळे अपीलार्थीस माहिती देण्याचे बंधन नसल्याचे कळविले. प्रथम अपिलावरही हे उत्तर देण्यात आले त्याविरोधात अपीलार्थीने व्दितीय अपील दाखल केले.

सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेल्या बाबी :- १) जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस अभियांत्रिकी महाविद्यालय हे पब्लीक ऑथॉरीटी नाही ते विनाअनुदानित आहे त्यामुळे त्याला माहितीचा अधिकार २००५ हा लागू नाही. २) रिट पिटीशन नं.५१३/२००८ मध्ये मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने यशवंतराव चव्हाण इंजिनिअरींग कॉलेज हे अधिनियम २००५ चे कलम ८ (ज) प्रमाणे सार्वजनिक प्राधिकरण नसल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५हा विनाअनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालयास लागू नसल्याचा निकाल दिलेला आहे. त्यामुळे तोच नियम गादावरी इंजिनिअरींग कॉलेजला लागू असल्याने अपिलार्थीस माहिती देण्याचे या संस्थेस बंधन नाही. हे संस्थेचे म्हणने ग्राहय धरण्यांत येत आहे.

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागरपूर खंडपीठाने दिलेल्या निर्णयाच्या अधीन राहून अपिलार्थीचे आयोगाकडे व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील अमान्य करण्यांत येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः २९.०३.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. २४/०२**

**श्री. भरत भास्कर झोपे,** **------- अपीलकर्ता**
**रा.वरणगांव, झोपे वाडा, ता.भुसावळ,**
**जि.जळगांव.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** ------- **उत्तरवादी**
**शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक**

**जन माहिती अधिकारी तथा**
**शिक्षणाधिकारी (माध्यमिक),**
**जिल्हापरिषद, जळगांव, जि.जळगांव**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : २१.०७.२००९
सुनावणीचा दिनांक : ०५.०३.२०१०
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय प्राधिकारी : अनुपस्थित

अपीलकार श्री. भरत भास्कर झोपे, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१.०७.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय,परिसर जळगांव येथे दि. ०५.०३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित होते, जन माहिती अधिकारी व अपिलार्थी उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.०४.०२.२००९ रोजी अर्ज करुन, खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

" दिनांक ८.०८.२००८ च्या तक्रारीव्दारे परिशिष्ट १ प्रमाणे मुख्याध्यापकाची नियुक्ती कशाप्रकारे करण्यात आली त्यांची लेखी माहिती २) दिनांक ६.०७.२००८ च्या जाहिरातीतील स्कुल कमिटीचे चेअरमन परिशिष्ट १ प्रमाणे नाहीत त्या संदर्भातील दस्तऐवज मिळावा याच संदर्भात पुढे अपिलार्थीने दिनांक ४.०२.२००९ रोजी नियमानुसार अर्ज दिला. "

जन माहिती अधिकारी यांनी शाळेत समिती महात्मा गांधी विद्यालय वरणगांव यांना दि.१८.०५.२००९ च्या पत्राव्दारे अपिलार्थीने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात दि.४.०६.२००९ रोजी सुनावणी ठेवली असून त्यास माहितीसह हजर रहाण्यास सांगण्यात आले. परंतु मुख्याध्यापक महात्मा गांधी वरणगांव हे अनुपस्थित राहिल्याने सुनावणी पुढे ढकरण्यात आली परंतु प्रत्यक्षात अपिलार्थीस कोणीही माहिती दिली नाही या विरोधात त्यांनी व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थीचे प्रतिनिधी व जन माहिती अधिकारी हे हजर होते प्रथम अपिलीय प्राधिकारी गैरहजर होते त्यावेळी असे दिसून आले की अपीलार्थीला वारंवारर सुनावणीच्या तारखा देण्यांत आल्या परंतु प्रत्यक्षांत सुनावणी घेतली गेलेली दिसत नाही. २) अपिलार्थीस माहिती कोण देणार यात संभ्रम निर्माण झ ाालेला दिसून येतो ३) माहिती सरळ आणि सोपी मागितलेली असतांना अपिलार्थीस उडवा-उडवीची उत्तरे देण्यात आली.

अपिलार्थीचे म्हणणे हे आहे की शिक्षण सेवक नेमणे आहे त्यासाठी वृत्तपत्रात जाहिरात दिली सदरहू जाहिरातीवर स्कूल कमिटी महात्मा गांधी विद्यालय वरणगांव चेअरमन म्हणून श्री.गणेश म.झोपे यांचे नांव आहे परंतु विश्वस्त मंडळामध्ये त्यांचे नाव नसतांना त्यांनी जाहिरात कशी दिली. याचे उत्तर त्यांना मिळालेले नाही जन माहिती अधिकारी यांनी सदर जाहिरातीची प्रत अपिलार्थीस दिलेली आहे परंतु त्याचे उत्तर त्यांनी दिलेले नाही. अर्जदारास म्हणतात त्याप्रमाणे विसंगती प्रत्यक्षात असेल तर त्याचे कारण दर्शविणारे कागदपत्र/अभिप्राय/टीपणी रकॉर्डला असावयास पाहिजे. त्याची प्रत अर्जदारास १० दिवसात देण्यात यावी.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः २९.०३.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. २ /०२**

**श्रीमती ॲड शोभना सुभाष मुळे ------- अपीलकर्ता**

**प्लॉट नं. २५, चिंतामणी, गणपती नगर,**
**ता.जि.जळगांव.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**सह जिल्हा निबंधक वर्ग-१, जळगांव, आकाशवाणी चौक,**
**जळगांव**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सह दुय्यम निबंधक वर्ग-२, कलेक्टर ऑफिस जळगांव,**
**जि.जळगांव**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : ०७.११.२००९
सुनावणीचा दिनांक : ०५.०३.२०१०
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय प्राधिकारी : उपस्थित

अपीलकार श्रीमती ॲड शोभना सुभाष मुळ यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७.११.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय,परिसर जळगांव येथे दि. ०५.०३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी व अपिलार्थी उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१५.०६.२००९ रोजी अर्ज करुन, खालील नमूद केलेली दस्त क्र. व वर्ष ७७७/२००९ रोजी सह दुय्यम निबंधक वर्ग-२ यांचे कार्यालयांत दिनांक १७.०३.२००९ रोजी नोंदविण्यांत आले त्यासंबंधी दस्ताऐवजांच्या प्रमाणित प्रतींची मागणी केली होती.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २६.०६.२००९ च्या पत्राव्दारे माहितीच्या दस्ताच्या प्रमाणित प्रती (साईजप्रमाणे) रु.५/- प्रत्येकी पान व कोर्ट फी रु. २०/- व विषयांकित दस्तवास १३ पाने असून दस्ताच्या प्रमाणित प्रती पाने फी रु.६५/- अधिक रु. २०/- कोर्ट फी अपीलार्थीने कार्यालयाकडे व्यक्तिशः प्रदान करावेत असे कळविले.

अपीलार्थीस सदर फी ही माहितीच्या अधिकारातील कलम ४ (अ) प्रमाणे असल्याचे सांगून प्रथम अपील दाखल केले त्यावर प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी दिनांक ४.०८.२००९ रोजी सुनावणी लावली प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी त्यांच्या आदेशात जन माहिती अधिकारी यांनी आकारलेली फी योग्य असल्याचे अपीलार्थीस सांगितले

त्याचप्रमाणे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे अंतर्गत नियम ४ (१) नुसार विशिष्ट दस्तऐवज नकाशे इत्यादिची किंमत अगोदरच निश्चित केली त्याबाबतीत अशी निश्चित केलेली किंमत अधिक टपाल खर्च द्यावा लागेल त्यानुसार नोंदणी अधिनियम १९०८ चे अंतर्गत तरतूदीनुसार जतन केलेल्या अभिलेख्याचे नोंदणी अधिनियमाखाली फी च्या तक्त्यानुसार जे शुल्क विहित केले असेल त्याप्रमाणे पानाची आकारणी करण्यांत येईल. अशी स्पष्ट तरतूद असल्याने अपिलार्थीस कळविले. परंतु हे आदेश त्यांना मान्य नसल्याने अपीलार्थीने व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थी प्रथम अपिलीय प्राधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. त्यावेळी झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने अपिलार्थीस जी कागदपत्रे दस्तऐवज नकाशे यांच्या प्रती हव्या असतील तर त्या संबंधीत विभागाने अशी निश्चित केलेली किंमत अधिक टपाल खर्च यासंबंधीच्या दोन्ही अधिसूचना दाखविण्यात आल्या आहेत त्यामुळे त्या विभागाने दस्तऐवजाबाबतीत जी फी अगोदरच ठरविलेली आहे व त्यानुसार अपिलार्थीस योग्य ती फी भरुन माहिती घेऊन जाण्याविषयी जन माहिती अधिकारी यांचेकडून वेळेत लेखी कळविण्यांत आलेले नियमानुसार आहे त्यामुळे अपिलार्थीने आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या/नकाशे/दस्तऐवज यांच्या प्रती त्या विभागाने निश्चित केलेली फी भरुन आवश्यकतेनुसार प्राप्त करुन घ्यावेत. या परिस्थितीत मी खालील प्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: २९.०३.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. ६ /०२**

**श्रीमती ॲड शोभना सुभाष मुळे ------- अपीलकर्ता**

**प्लॉट नं. २५, चिंतामणी, गणपती नगर,**
**ता.जि.जळगांव.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**सह जिल्हा निबंधक वर्ग-१, जळगांव, आकाशवाणी चौक,**
**जळगांव**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सह दुय्यम निबंधक वर्ग-२, कलेक्टर ऑफिस जळगांव,**
**जि.जळगांव**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : ०७.११.२००९
सुनावणीचा दिनांक : ०५.०३.२०१०
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय प्राधिकारी : उपस्थित

अपीलकार श्रीमती ॲड शोभना सुभाष मुळ यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७.११.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय,परिसर जळगांव येथे दि. ०५.०३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी व अपिलार्थी उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१५.०६.२००९ रोजी अर्ज करुन, खालील नमूद दि. २.०७.२००८ रोजी दस्त क्र व वर्ष १७९६/२००८ रोजी सह दुय्यम निबंधक वर्ग-२ यांचेकडे मौजे मेहरुन येथील सर्व्हे नं.४५०/१ मधील प्लॉट नं.५ नोंदविण्यांत आलेल्या / खरेदी खताच्या प्रमाणित प्रती मिळण्याबाबत विनंती केली होती.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २६.०६.२००९ च्या पत्राव्दारे माहितीच्या दस्ताच्या प्रमाणित प्रती रु. ५/- प्रत्येकी पान व कोर्ट फी रु. २०/- व विषयांकित दस्तवास १४ पाने असून दस्ताच्या प्रमाणित प्रतीसाठी पाने फी रु.७०/- अधिक रु. २०/- कोर्ट फी कार्यालयाकडे व्यक्तिशः प्रदान करावेत असे कळविले.

अपीलार्थीस सदर फी ही माहितीच्या अधिकारातील कलम ४ (अ) प्रमाणे असल्याचे सांगून प्रथम अपील दाखल केले त्यावर प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी दिनांक ४.०८.२००९ रोजी सुनावणी लावली प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांनी आकारलेली फी योग्य असल्याचे अपीलार्थीस सांगितले तसेच या व्यतिरिक्त नोंदणी अधिनियम १९०८ चे अंतर्गत तरतूदीनुसार जतन केलेल्या अभिलेख्याचे नोंदणी अधिनियमाखाली

फी च्या तक्त्यानुसार जे शुल्क विहित केले असेल त्याप्रमाणे पानाची आकारणी करण्यांत येईल. अशी स्पष्ट तरतूद असल्याने अपिलार्थीस कळविले. फी योग्य असल्याचे सांगितले परंतु अपिलार्थीस प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचे पारीत आदेशमान्य नसल्याने त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थी, प्रथम अपिलीय प्राधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. त्यावेळी झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने अपिलार्थीस जी कागदपत्रे, दस्तऐवज, नकाशे यांच्या प्रती हव्या असतील तर त्या संबंधीत विभागाने अशी निश्चित केलेली किंमत अधिक टपाल खर्च यासंबंधीच्या दोन्ही अधिसूचना दाखविण्यात आल्या आहेत त्यामुळे त्या विभागाने दस्तऐवजाबाबतीत जी फी अगोदरच ठरविलेली आहे व त्यानुसार अपिलार्थीस योग्य ती फी भरुन माहिती घेऊन जाण्याविषयी जन माहिती अधिकारी यांचेकडून वेळेत लेखी कळविण्यांत आलेले नियमानुसार आहे. त्यामुळे अपिलार्थीने आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या/नकाशे/दस्तऐवज यांच्या प्रती त्या विभागाने निश्चित केलेली फी भरुन आवश्यकतेनुसार प्राप्त करुन घ्याव्यात. या परिस्थितीत मी खालील प्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: २९.०३.२०१०**